ॐ तत्सत्

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य सदगुरू भगवान श्री श्रीधर स्वामी महाराज विरचित

स्वात्मनिरुपण

हिन्दी गद्यानुवादा वरून तयार केलेला

मराठी गद्यानुवाद

अनुवादक- श्रीधरभक्त

मनोगत

स्वात्मनिरुपण व दत्त करुणार्णव हे दोन्ही ग्रंथ म्हणजे पू. श्रीधर स्वामी महाराजांनी आपले स्वरूपच म्हटले आहे व ह्या दोन ग्रंथांचे गुरुचरित्रासारखे पारायण केले तर पू. स्वामींचे दर्शन घडते, असे पू. स्वामींनी श्री आत्मानंद ब्रह्मचारी यांना ते सेवेत असताना सांगितले आहे. दत्तकरुणार्णवाचे हिंदी भाषांतर पू. स्वामींनी कै. श्री गोविंद नरहरि वैजापुरकर यांच्या हस्ते काशीत आधीच करून घेतले होते व ते श्रीधर स्फूर्ती निवास, वाराणसी येथून प्रकाशितही झालेले आहे. दत्त करुणार्णव ग्रंथ पू. श्रीधर स्वामी कुरवपुर येथे एकांतात असताना अस्तित्वात आला. स्वात्मनिरुपण ग्रंथ हा पू. स्वामींना श्री समर्थ कृपेने आत्मसाक्षात्कार झाल्यावर लिहिलेला अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रथम ग्रंथ आहे. हा ग्रंथ श्रीधर कुटी ट्रस्ट, सज्जनगड येथून प्रकाशित झालेला आहे. ग्रंथाचा विषय अद्वैत असल्याने तसेच त्यात वापरलेली भाषा श्री ज्ञानेश्वरांच्या काळातील मराठी भाषा असल्याने समजण्यास अवघड आहे. जवळजवळ सत्तर वर्षांचा कालावधी गेला तरी त्याचे भावार्थ लेखन कुणी केले नव्हते.

ई.स. १९८० साली धारेश्वर, कर्नाटक येथे पू. स्वामींचे शिष्य पू. नर्मदानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे श्री लक्ष्मीनारायण) यांनी पु. स्वामींच्या प्रेरणेने अनुवादकाला आदेश दिला की स्वात्मनिरुपण ग्रंथाचे भावार्थ निरूपणाचे कार्य तुमचा हातूनच होणार आहे. त्यावेळेस अनुवादकाचे वय सुमारे २२-२३ वर्षांचे असल्याने अनुवादक साशंक होते. ई.स. २०१७ च्या फेब्रुवारी महिन्यात अनुवादक सिडनी येथे मुलीकडे गेलेला असताना पू. स्वामींची प्रेरणा झाली की राहिलेले गुरुकार्य करावे. त्या आधी अनुवादकाने पंचीकरण या ग्रंथाचे भाषांतर गु.भ. डॉ. सिवलीकर व गु.भ. मोरेकाका यांच्या सहाय्याने केले होते. अनुवादकाने स्वात्मनिरुपण ग्रंथाच्या गद्य भाषांतराचे कार्य पू. स्वामी प्रेरणेने हाती घेतले. मराठीत पू. स्वामींचे काय म्हणणे आहे ते समजूही लागले. मराठी लेखनाचा अभ्यास नसल्याने भाषांतर प्रथम हिंदी भाषेत केले व नंतर मराठी अनुवाद करण्यास गु.भ. चांदवडकर यांचे सहाय्य घेतले. मराठी अनुवादित स्वात्मनिरुपण गु.भ. चांदवडकर यांनी श्रीधर साहित्य वेबसाईटवर लगेच प्रकाशित केले. प्रस्तुत अनुवाद प. प.भगवान सद्गुर श्रीधर स्वामी विरचित स्वात्मनिरुपण, प्रकाशक श्रीधर कुटी ट्रस्ट वर आधारित आहे.

श्रीमती प्रभा कुलकर्णी, नाशिक यांनी श्रीधर संदेश मासिक (ई.स. २०२०-२१) मार्फत मराठी भाषांतराचा प्रयत्न केला, पण तीन-चार प्रकरणांनंतर त्यांना देवाज्ञा झाल्याने घेतलेले कार्य अपूर्ण राहिले. पूर्वीचा हिंदीत भाषांतर केलेल्या मराठी अनुवादात बऱ्याच त्रुटी आढळल्याने अनुवादकाला पुनश्च मराठी अनुवाद करणे भाग पडले. डॉ. पराग अमीन यांच्याकडून संशोधित मराठी अनुवादाचे संपादन करून घेतले. त्या साठी अनुवादक श्री चांदवडकर व डॉ. पराग अमीन यांचा आभारी आहे. बऱ्याच जागी संस्कृत श्लोकांचा अर्थ सांगण्यास आचार्य रामचंद्र गोविंद वैजापुरकर यांचा ही अनुवादक आभारी आहे.

अनुवादात जर काही त्रुटी आढळल्या तर त्या अनुवादका कडून घडल्या आहेत. त्रुटीका निदर्शनास आणल्यास पुढील आवृत्तीत सुधारणा करता येईल.

या कार्याचे पूर्ण श्रेय अनुवादक पू. स्वामींना देतो, कारण अनुवादकला मराठी भाषेचा गंध नसूनही मराठीत लिहिलेल्या स्वात्मनिरुपण ग्रंथाचे भावार्थ उमजणे त्यांच्या कृपे वाचून शक्य नव्हते. या कार्यात अनुवादकाच्या पत्नी सौ. अंजली वैजापुरकर, मुलगी सौ. अनुश्री देशपांडे व जावई श्री अमोघ देशपांडे, ज्यांच्या सहकार्यावाचून हे कार्य होणे शक्यच नव्हते, यांचा ही अनुवादक आभारी आहे.

श्रीधर चरण रज

श्याम गोविंद वैजापुरकर (मो. ९४१३३२६८३६)

१२६, अभयगढ , जोधपुर, राजस्थान

प्रस्तावना

"स्वात्मनिरुपण" ग्रंथ हा श्रीक्षेत्र सज्जनगढ येथे पू. श्रीधर स्वामींनी केलेल्या समर्थ सेवेचा प्रसाद आहे. श्रीक्षेत्र सज्जनगढ येथे साधनाकालात पू. स्वामी एक अद्वैत ग्रंथाच्या मनन-चिंतनात सतत मग्न असत. तो संक्षिप्त पद्यात्मक ग्रंथ **"आशीर्वाद"** या नावाने श्री श्रीधर कुटी ट्रस्टने काही वर्षांपूर्वी प्रकाशित केलेला आहे. त्या ग्रंथाचे विषद स्वरूप म्हणजेच **"स्वात्मनिरुपण"** हा ग्रंथ होय.

"स्वात्म" म्हणजे स्वतःचे शुद्ध अस्तित्व, म्हणजेच "मी", जे कारणरूपाने स्वयंप्रकाशित आहे. "मी" हा देह नसून देहातीत आहे. "मी" तिन्ही अवस्थांचा व तिन्ही गुणांचा अतीत असून अविनाशी आहे. पू. स्वामींनी या ग्रंथात "मी" यास **आद्य ईश्वर** या नावाने संबोधित केले आहे.

विशेष- पू स्वामीनी मूळ स्वात्मनिरुपण ग्रंथात आपले नाव न देता " येन केनचित मुनीना विरचिते" असा उल्लेख केलेला आहे.

ग्रंथात एकूण पंधरा प्रकरणे आहेत. मूळ पद्यात्मक ग्रंथात प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीस शीर्षकाखाली विषय-निर्देशन नसल्याने वाचकाला संपूर्ण प्रकरण वाचल्यावाचून विषयाचे आकलन होत नाही. तरीही आपल्या स्वल्प बुद्धीच्या चौकटीत, पू. स्वामींच्या प्रेरणेने, प्रत्येक प्रकरणाला योग्य शीर्षक देण्याचा प्रयत्न अनुवादकानी केलेला आहे. प्रकरणांत विषयानुरूप उपशीर्षकेही दिली आहेत. तरी वाचकांनी कोणतीही गैरसमजूत करून घेऊ नये.

प्रथम प्रकरणात — "मी" व "मी"चे विवेचना अंतर्गत देहातीत "मी", देह व देहजन्य कार्य मिथ्याच, सत्य-मिथ्या मीमांसा, दृश्याचे कारण — "मी"चा बोध, "मी" सच्चिदानंदस्वरूप, "मी" वृत्तीचा विषय नाही, आनंदात्मक सुषुप्ती अवस्थेतील वृत्तिरहित "मी", "मी" रहस्यमय, निर्विकल्प अनेकत्वाचे कारण — "मी" सत्ता नाम-रूपावर अध्यारोपित होणे, "मी" — अस्ति-भाति-प्रिय वृत्तीचे उद्गमस्थान, वृत्ती ज्ञान ग्रहण करण्यास अक्षम, चिद्रूप "मी" — वृत्तीचा ज्ञाता, "मी" अविनाशी तत्त्व, वृत्तीचा उदय व लय यांचे कारण — "मी"चे अज्ञान, संसार म्हणजे "मी"चे अज्ञान, "मी" हा साक्षीही नाही व अभयरूप "मी"चा साक्षात्कार अशक्य — हे विषय घेतलेले आहेत.

द्वितीय प्रकरणात — "मी"चे व्यापकत्व अंतर्गत "मी" नाम-रूपातीत व कालातीत, "मी"आधारित तिन्ही अवस्था, परंतु "मी" स्वतः तिन्ही अवस्थांतीत, "मी" स्वभावतः ब्रह्मतत्त्वच, "मी" स्वतः अविनाशी, भेदात्मक तीन अवस्था असूनही "मी" त्या पूर्वीचा, केवळ कार्यरूपाने "मी"च्या तीन अवस्था भासमान, "मी" द्वंद्व व त्रिपुटीरहित, "मी" दृश्यातीत, "मी" स्वयं सिद्ध, "मी" देहाच्या जागृतावस्था व स्वप्नावस्था नाही, सृष्टी-स्थिति-लयास कारण — माया (विद्या व अविद्या) व "मी" स्वतः अभेद — याविषयी चर्चा केलेली आहे.

तृतीय प्रकरणात — "मी" एकमात्र परिपूर्ण अंतर्गत "मी"चे अद्वैतत्व, "मी" स्वभावतः ब्रह्मच, तोच ब्रह्म "मी", "मी"च्या मूळरूपाचा बोध, "मी"ची स्फूर्ती न होणे हेच सत्य, "मी"च नित्य, कायमचे सत्य व "मी" स्वयंपरिपूर्ण — हे विषय आलेले आहेत.

चतुर्थ प्रकरणात — "मी" सनातन सत्यस्वरूप ब्रह्म अंतर्गत "मी" सत्य-आनंद-ज्ञानस्वरूप अद्वय ब्रह्म, "मी" तिन्ही अवस्थांत स्वप्रकाशित, विद्या-अविद्या, पुरुष-प्रकृती व जीव-ईश भावरहित ब्रह्मच "मी", तसेच "मी" देहातीत — हे विषय घेतलेले आहेत.

पंचम प्रकरणात — "मी"चे अद्वैतत्व अंतर्गत "मी" स्वप्रकाशित ब्रह्म, "मी" जीव-शिव, त्रिपुटी व तीन अवस्थांपेक्षा वेगळा, "मी"मध्ये सर्व समाविष्ट, व मायाजन्य कार्यांत "मी" रहस्यमय रूपाने — या विषयांचा समावेश आहे.

षष्ठम प्रकरणात — शक्ती, माया आणि "मी" अंतर्गत "मी" सर्वज्ञ, आनंदस्वरूप व स्वप्रकाशित; शक्ती व मायेचे अद्वैतत्व, माया व तिचे कार्य, शक्तीचे सामर्थ्य व "मी", मायेचे द्वैतरूप — विद्या व अविद्या, "मी"चे अनंत व अनादी

स्वरूप, शक्तीचे अनादी स्वरूप, "मी" व शक्तीच्या अनादी स्वरूपाचा संबंध, "मी" स्वप्रकाशित, शक्ती अव्यक्त-व्यक्त, शक्तीला चिद्स्वरूपाची विस्मृती म्हणजे अविद्या, जीवास स्त्री-पुरुषभावाचे कारण — स्वदेहाभिमान, व "मी" अतुलनीय नित्यज्ञान — यांचा समावेश आहे.

सप्तम प्रकरणात — "मी" व "मी"ची शक्ती अंतर्गत "मी" स्त्री-पुरुष-पुत्रभावरहित, स्त्री-पुरुष भावनेचे कारण — वासना ("मी" नाही), प्राणीमात्रांची उत्पत्ती व मूळ संकल्प, सृष्टीतील मूळपुरुष "मी", "मी" स्वतःच्या अस्तित्वपूर्तीसाठी पुरुष-स्त्री नावांनी नटतो, नाम-रूपरहित पिंड व ब्रह्मांडव्यापक "मी", "मी"मध्ये अनेकत्वबोधाचे कारण व स्त्री-पुरुष कारण — "मी" व "मी"ची शक्ती — याविषयी चर्चा केली आहे.

अष्टम प्रकरणात — "मी"चे अद्वैतत्व अंतर्गत "मी" व अनेकत्वाचे प्रागट्य, "मी"ची शक्ती जगतरूपाने व्यक्त, चैतन्यापासून जडाची उत्पत्ती, एकच "मी" जड व चेतन रूपात, "मी"द्वारा जगतकार्याची निर्मिती, कारण व कार्यरूपाने "मी", "मी"ची शक्ती अनेकत्वाला कारण, "मी" सर्व विषमतेपासून अलिप्त, "मी"च्या संकल्पाने सृष्टी-उत्पत्ती, "मी"च स्त्री-पुरुषरूपाने, ज्ञानस्वरूप "मी", "मी"मध्ये अनेकत्वाला स्थान नाही व "मी" — आद्य ईश्वर — हा अंतिम सिद्धांत मांडला आहे.

नवम प्रकरणात — सच्चिदानंद "मी"वर जगतावरण अंतर्गत "मी" कोण?, "मी"च्या नित्यज्ञानस्वरूपाला अनंत व अद्वय स्फुरण निरर्थक, "मी"चे सत्य स्वरूप, स्फूर्ती-प्रागट्य-स्थिति-लय "मी"च्या कारणी, "मी"मध्ये द्वैत-अद्वैत नाही, ज्ञानस्वरूप "मी"ची स्मृतीच स्फूर्ती, "मी"च्या बोधरूपाने होणारी स्मृती व विस्मृती सर्व भासात्मक, "मी" ब्रह्म — हे ज्ञानही मिथ्या, स्थूल सृष्टीचे प्रागट्य व प्रकृती-पुरुष-शक्ती — याविषयी समाधान केले आहे.

दशम प्रकरणात - प्रत्येक भूताची अभिमानी देवता, विश्वात्म्याच्या (हिरण्यगर्भाच्या) संकल्पाने पंचभूतांचे कर्म, कर्माची उत्पत्ती व संहार — हे विषय घेतलेले आहेत.

एकादश प्रकरणात — पंचीकरण भाग-२ अंतर्गत विश्वात्मा (हिरण्यगर्भ) — "मी"पासून स्थूलदेह निर्मिती, पंचभूत व त्रिगुणात्मक मिश्रित दृश्य विश्व, पंचभूत-त्रिगुणांचे स्वरूप व अष्टधा प्रकृती, पिंडाच्या चार देहांची उत्पत्ती, "ईश"(शिव)-"जीव" अभेदत्व, माया-विद्या (मूळ अविद्या) व अविद्या, "मी" ब्रह्म (विद्याजनित) व "मी" देह (अविद्याजनित) — विक्षेप, "मी"चे शुद्ध (विद्याजनित) व अशुद्ध (अविद्याजनित) आवरण, ईश-जीव भाव व सृष्टीनिर्मितीचे कारण — "ईश" संकल्प — असा उल्लेख आहे.

द्वादश प्रकरणात — मोक्षमार्ग व साधनापद्धती अंतर्गत द्वैत म्हणजे बंध व अद्वैत म्हणजे मोक्ष, "मी" व "माझे" — सर्व अनर्थांचे कारण, प्रातिभासिक व व्यावहारिक सत्ता, अंतर व बाह्य बंधन, व्यावहारिक-प्रातिभासिक-पारमार्थिक सत्ता, पारमार्थिक सत्ताच मोक्षाला कारण, "मी"वर येणारे आवरण व विक्षेप, विक्षेप नाहीसा होणे — मोक्ष, सत्त्व-रज-तम गुणात्मक वृत्ती, जन्म-मृत्यू म्हणजे जागृत-स्वप्न-सुषुप्ती चक्र, त्रिविध ताप, ऋणत्रय, "मी"चे अनुसंधान, त्रिपुटी, साक्षीभाव, योग, भक्ती, ज्ञान, वैराग्य, आत्मबोध, श्रवण-मनन-निदिध्यासन, आनंदांचे प्रकार, कर्म-भक्ती-ज्ञानकांड, नरकाचे द्वार — काम, क्रोध, लोभ — या सर्व विषयांवर विस्तृत विवेचन केले आहे.

त्रयोदश प्रकरणात — मोक्षासाठी अधिकारसंपन्नता व साधनपद्धती ; बुद्धीचे वैशिष्ट्य, आत्म-देह-मनशुद्धी, मुमुक्षु-साधक-सिद्ध, देहनाश, लोक, तप, सत्संग, सद्गुरू-लक्षणे, महावाक्ये, योग, मंत्र, जप, नामस्मरण, हठयोग — यांवर संक्षिप्त पण सारगर्भित उल्लेख आहे.

चतुर्दश प्रकरणात — ज्ञानयोग व ज्ञाननिष्ठा (आत्मनिष्ठा) ; "मी" शिव-जीव भावरहित, ज्ञानाचे महत्त्व, ज्ञानी-अज्ञानी लक्षणे, आत्मैक्ययोग, मायेचा मिथ्या खेळ, दृश्य जगत व "मी" सूक्ष्मातिसूक्ष्म — हे विषय समाविष्ट आहेत.

पंचदश प्रकरणात — "मी" सच्चित्सुखामृतोदधी अंतर्गत "मी" निर्विकल्प आनंदस्वरूप आहे. "मी"ला मायाजन्य कोणताही विकार स्पर्श करू शकत नाही, कारण माया मिथ्या असल्यास तिची कार्येही मिथ्याच ठरतात. जसे

नि:पुत्रिक स्त्रीला मूल झाले असे म्हणणे अर्थसंगत नाही, तसेच मायेचेही स्वतंत्र अस्तित्व नाही. जे काही आहे ते विकाररहित आनंदस्वरूप चित्, म्हणजेच "मी" (ब्रह्म) — हा ग्रंथाचा निष्कर्ष आहे.

छंदशास्त्राच्या दृष्टीने **"स्वात्मनिरुपण"** हा एक अप्रतिम ग्रंथ आहे. मुख्यतः आर्या, शार्दूलविक्रीडित व शिखरणी छंदांत काव्यरचना केलेली असूनही, ग्रंथात पू. स्वामींनी मराठीत प्रचलित प्राचीन-अर्वाचीन जवळजवळ सर्व छंदांचा समावेश केलेला आहे. काव्यक्षेत्रात असे लावण्य सहसा दिसून येत नाही. श्रोत्यांना श्रवण व चिंतनाद्वारे योग्य पारमार्थिक मार्गदर्शन लाभले, तर अनुवादकाकडून पू. स्वामींनी करून घेतलेली गुरुसेवा फलद्रूप झाली असे समजेन. मानवी बुद्धीला मर्यादा असतात; कुठे काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या अनुवादकाचा आहेत. निदर्शनास आणून दिल्यास पुढील आवृत्तीत सुधारणा करता येईल.

ॐ नमो भगवते श्रीधराय नम:

श्री गुरु चरण रज

श्याम गोविंद वैजापुरकर

मो. ९४१३३२६८३६

श्रीराम समर्थ

स्वात्म निरुपण

प्रकरण १

"मी"

"मी" चे विवेचन

श्री सद्‌गुरूंच्या कृपाप्रसादानेच जीवात्म्यास ह्या भवदुःखापासून मुक्ती आणी निरंकुश अशी तृप्ती प्राप्त होत असते. अशा जीवात्म्यास मग दुःख कधी स्पर्शदेखील करू शकत नाही. (१)

प्रस्तुत ग्रंथरचनाकारही भवदुःखापासून मुक्ती प्राप्त करण्यास सद्‌गुरु भगवान श्रीरामाला शरण आले होते. कारण सद्‌गुरु भगवान श्रीराम आपल्या भक्तांना विषयवासनेपासून परावृत्त करून अद्वय ब्रह्मस्वरूपाची प्राप्ती करवून देतात. (२)

सद्‌गुरु भगवान श्रीरामाच्या कृपेने ग्रंथरचनाकाराचाही भ्रम नष्ट झाला आणी त्यांस परमशांती प्राप्त झाली. म्हणून ते मनोमन सद्‌गुरु भगवान श्रीरामांना अति आदराने वंदन करीत आहेत. (३)

सद्‌गुरु भगवान श्रीरामांची भक्ती प्राप्त व्हावी या उद्देशाने ग्रंथरचनाकाराने श्रीक्षेत्र सज्जनगडावर श्री समर्थ रामदास स्वामींची सेवा केली होती. त्या सेवेच्या फलस्वरूप त्यांच्या हृदयात, त्यांच्या उद्धारासाठी भगवान श्रीरामांनी बोधरूपी प्रस्तुत ग्रंथ प्रगट केला. (४)

देहातीत "मी"

स्वात्मबोधाने भासणारा आणी अत्यंत प्रिय असलेला "मी" अल्प (नश्वर) असल्याने सत्य नाही. वास्तविक पाहता "मी" कोण आहे? ह्याबद्दल विचार करू गेल्यास त्यासमान कोणीही दिसत नाही. अस्तित्वरूपात आणी भासित होणाऱ्या रूपात आपल्याला ज्याची अनुभूती होते तो स्वयम् "मी" आहे. त्यापेक्षा काहीही भिन्न नाही. आदि आणी अंत दोन्हीत शेष राहणारा तो "मी" काय आहे, याचा शोध घ्यायचा आहे. अर्थात आदि आणी अंत दोन्हीत शेष राहणारा तो "मी" कोण आहे, ह्याचे अनुसंधान करायचे आहे. (५)

विशेष: "मी"- देह नसून स्वयंभासित स्वअस्तित्व

जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्थांचा देहाशी संबंध आहे. जागृतावस्था, स्वप्नावस्था अवस्था- या तिन्ही अवस्था असणाऱ्या देहासच जीवात्मा "मी" समजून त्यावर प्रेम करत राहतो. (६)

विशेष: जागृतावस्था — ज्यात इंद्रियांद्वारे भोगांचा प्रत्यक्ष अनुभव घडतो. स्वप्नावस्था — ज्यात स्थूल देहाचे भान नसल्याने इंद्रियांद्वारे भोगांचा प्रत्यक्ष अनुभव घडत नाही. सुषुप्ती अवस्था — ज्यात जागृतीतील स्थूल देह आणी स्वप्नातील सूक्ष्म देह ह्या दोन्ही देहांचे भान नसते.

अस्तित्व व दृश्यमान नसलेली कुठलीही वस्तू प्रिय असू शकत नाही. जो "मी" स्वप्नावस्थेत प्रिय असतो तोच "मी" जागृतावस्थेत प्रिय नसतो. त्यामुळे ह्या देहरूपी "मी"ला प्रिय कसे म्हणता येईल? ज्या देहाला "मी" म्हणतात, जर तो प्रिय आहे तर तो स्वप्नात का दिसत नाही? (७)

"मी" देहरूपाने जसा जागृतावस्थेत दिसतो तसा तो स्वप्नावस्थेत आणी सुषुप्ती अवस्थेत दिसत नसल्याने तो प्रिय होऊ शकत नाही. "मी" या तिन्ही अवस्थेत देहरूपाने असणे अशक्य आहे. निस्संदेह "मी" ह्या तिन्ही अवस्थांच्या पलीकडे आहे. (८)

"मी" देह नाही — म्हणून देह व देहजनित कार्यही मिथ्याच

"मी देह आहे" हा भाव जागृती, स्वप्न आणी सुषुप्ती अवस्थेत एकसारखा राहत नाही, अर्थात अवस्थेनुसार बदलतो. म्हणून देह "मी" होऊ शकत नाही. जो स्वप्नावस्थेत देहरूपाने "मी" होतो, तो "मी" जागृतावस्थेत नसतो. जो "मी" देहरूपाने स्वप्नावस्थेत असतो, तो "मी" देहरूपाने जागृतावस्थेत राहणे कसे संभव आहे? त्यामुळे ज्यास "मी" म्हणतात तो देह असूच शकत नाही. (९)

जर देहच मिथ्या आहे तर देहाद्वारे केले गेलेले व्यवहार सत्य कसे असू शकतात? म्हणून जगात भासमान होणारी सर्व क्रिया मिथ्याच आहे. (१०)

सत्य–मिथ्या मिमांसा

सत्य त्यालाच म्हणतात जे सर्वत्र व्याप्त असून काळाच्या बंधनापासून मुक्त असते. पण स्वप्नावस्थेत सर्व वस्तूंचा विलय होतो. म्हणून जगात सर्व काही मिथ्याच आहे. (११)

हा सर्व प्रपंच व्यर्थ आहे कारण हा केवळ दृष्टीभ्रमच आहे. त्यामुळे "मी" आणी"माझे" असे म्हणणे देखील व्यर्थ आहे. असे म्हणणे हे केवळ जागृतावस्थेत दृश्य पदार्थांशी असलेला मोहच दर्शविते. (१२)

म्हणून या गोष्टीचे सहज ज्ञान होते की जागृतावस्था ही खोटी आहे आणी विचार करून पाहिल्यास असे वाटते की स्वप्नावस्था सुद्धा खोटी आहे. विचार केल्यावर ज्ञात होते की स्वप्नावस्थेत "मी" म्हणून जो प्रिय असतो तो सुषुप्ती अवस्थेत गेल्यावर कधी दिसत नाही. (१३)

विचार केल्यावर ज्ञात होते की जागृतावस्था व स्वप्नावस्था दोन्ही अवस्था नाहीशा होतात. स्वप्नावस्थेत जे प्रिय आहे ते सुषुप्ती अवस्थेत नाही. जे वास्तविक नसते परंतु डोळ्यांनी दिसते त्याला सत्य कसे म्हणावे? म्हणून जे काही दृश्य दिसते आहे ते वास्तविक मिथ्याच आहे. (१४)

"मी" जागृतावस्थेचा आणी स्वप्नावस्थेचा विषय नाही. म्हणून देहभाव मिथ्या सिद्ध होतो. "मी" सर्वदा उपस्थित असतो आणी दृश्याच्या सत्यतेशी ह्याचा काहीही संबंध नसतो. दृश्याचा संबंध नेहमी स्वप्नावस्था आणी जागृतावस्थेशी असतो. (१५)

दृश्याचा संबंध जागृतावस्थेशी आहे आणी देहभावाचा संबंधही ह्याच दोन अवस्थांशी आहे. सुषुप्ती अवस्थेत दृश्य आणी देहभाव दोन्ही राहत नाहीत. पण “मी” एकमात्र कायम तसाच राहतो. (१६)

"मी" स्वप्नावस्था आणी जागृतावस्थेतील देहभावापेक्षा वेगळा आहे. म्हणून "मी" ह्या जागृतावस्था आणी स्वप्नावस्थेतील देहभावाचाच आहे असे म्हणणे कसे संभवेल? जर देहभावच "मी" असेल तर जागृतावस्था आणी स्वप्नावस्था यातून स्वतःला बाहेर काढणारा तो "मी" सत्य होऊ शकत नाही. (१७)

दृश्यामुळेच स्वप्नावस्था आणी जागृतावस्था सत्य वाटतात. परंतु तसे सुषुप्ती अवस्थेत होत नाही. जर दृश्य हेच सत्य असते तर सुषुप्ती अवस्थेत दृश्य लोप होणे कसे संभवणार? (१८)

सुषुप्ती अवस्थेत दृश्याचा अभाव असल्याने दृश्य हे वास्तविक सत्य नाही हे सिद्ध होते. त्यामुळे दृश्य सत्य नाही. परंतु दृश्य हे दिसते म्हणून ते सत्य आहे, असे म्हणणे कोण स्वीकार करील? (१९)

सुषुप्ती अवस्थेमध्ये दृश्य नसल्याने दृश्याचा भाव देखील नसतो. दृश्याचा अभाव असल्याने दृश्याचे भानही राहत नाही. (२०)

विशेष: अर्थात सुषुप्ती अवस्थेत दृश्याचा अभाव असल्याने दृश्याच्या भावाचे जे मुख्य कारण — जागृती आणी स्वप्नावस्थेचा देह — ते देखील राहत नाही.

दृश्याचे कारण — "मी"चा बोध

देह, इंद्रिय, मन, प्राणच "मी" आहे या बोधाने संपूर्ण दृश्य भासते. परंतु जेव्हा दृश्यासोबत देह, इंद्रिय, मन, प्राणाचा लोप होतो, तेव्हाही जो "मी" रूपात शेष राहतो तो अनिर्वाच्य आहे. (२१)

"मी" सच्चिदानंद स्वरूप

काहीही नसते अर्थात देह, इंद्रिय, मन, प्राणाच्या अभावात जो "मी" असतो ते सत्य आहे. त्याचा कधीही नाश होत नाही. अर्थात "मी" हा दृश्याचा विषय नाही. भानाचा अभाव असूनही "मी" अविनाशी तत्त्वच आहे. (२२)

सुषुप्ती अवस्थेत दृश्याचा अभाव असल्याने द्रष्टा आणी पाहण्याची क्रिया म्हणजे दर्शनही नसते. परंतु दृश्य, द्रष्टा आणी दर्शनाचे मूळ कारण "मी"च केवळ शेष राहते. (२३)

जागृतावस्था आणी स्वप्नावस्थेत दृश्यामुळे जी सुखानुभूती होते, ती "मी" च्या बोधामुळे होते. परंतु सुषुप्ती अवस्थेत जेव्हा दृश्याचा अभाव होतो तेव्हा "मी" सच्चिदानंद स्वरूपाने अस्तित्वात राहतोच. (२४)

सुषुप्ती अवस्थेत सर्व दृश्य अभावी केवळ "मी" बोधरूपाने असतो. तो सच्चिदानंदरूपी "मी" अदृश्य, अतर्क्य, अनंत व भानाचा अभाव असल्याने वृत्ती-शून्य स्थितीत असतो. (२५)

“मी" वृत्तीचा विषय नाही

"मी" वृत्तीचा विषय नसल्याने अत्यंत रहस्यमय आहे. "मी" स्वप्रकाशित असल्याने "मी" नाहीच असे म्हणणे देखील तर्कसंगतीला धरून नाही. (२६)

सुषुप्तीत काही न समजणे किंवा काही न भासणे म्हणजे "मी" ला स्वतःविषयीचे अज्ञान आहे अशी समजूत चुकीची आहे. "मी" वृत्तीचा विषय नाही म्हणून सुषुप्तीला अज्ञानावस्था म्हणतात. (२७)

उत्पत्ती आणी लयाचे ज्ञान ज्यापासून होते त्यास “वृत्ती” असे म्हणतात. परंतु वृत्ती उत्पन्न होण्यापूर्वी जे काही असते, ज्याबद्दल काही माहिती नाही त्याला "मी" म्हणतात. (२८)

आनंदात्मक सुषुप्ती अवस्थेचा वृत्ती-रहित "मी"

सुषुप्तीत "मी" ची ओळख होत नसल्याने वृत्ती जागृतावस्थेत परत येते. जागृतावस्थेत वृत्ती त्रिपुटी (द्रष्टा, दृश्य व दर्शन) चा आश्रय घेऊन वाणीच्या माध्यमाने म्हणते की "मी" कोण आहे हे मला कळले नाहीच. पण आनंदस्थिती येताच सुखाने वदते की "मी" म्हणजे आनंदच. वृत्ती म्हणते की "मी" कसा आहे? मला किंचितही कळलेला नाही. ह्या प्रमाणे वृत्ती स्वतः “मी” विषयीचे अज्ञानही दर्शविते. (२९)

स्वतः “मी” च्या ज्ञानरूपी अस्तित्वाने नटून माझ्यापासून उत्पन्न झालेली वृत्ती आनंदाचा भाव आठवून अनेक प्रकारच्या जडत्वाची अर्थात दृश्याची कल्पना करते. "मी" वर भासणारा अनेक स्थिर आणी चंचल

सुखांचा शोध घेऊन तेथे काही मिळाले नाही म्हणून सर्व जड (दृश्य) पदार्थांचा त्याग करून वृत्ती परत माघारी वळते. (३०)

दृश्याचा संपूर्ण लय होताच वृत्ती "मी" मध्येच स्वतःचे अस्तित्व नाहीसे करते. जगताविषयी काही जाणणे उरलेले नाही म्हणून वृत्ती चिद्रूपात स्थिर होते. आनंदात्मक सुषुप्ती अवस्थेत "मी" अद्वय आनंदरूपाने शिल्लक राहतो. परंतु हे ज्ञात होत नाही की ती सूक्ष्म वृत्ती काय आहे जिच्यापासून "मी" हे स्फुरण होते. (३१)

"मी"रहस्यमय निर्विकल्प

असा अनुभव येतो की वृत्ती ही "मी" पासून वेगळी आहे. वृत्तीचे मूळ शोधल्यास ती पदार्थ अथवा जड प्रकृतीच्या श्रेणीत येते. पदार्थापासून नित्य सुखप्राप्ती होत नाही कारण पदार्थ अनित्य आणी नाशवान असतो. म्हणून वृत्तीजन्य अथवा पदार्थजन्य सुखाचा त्याग करून शाश्वत सुखासाठी वृत्ती माघारी वळते. (३२)

वृत्तीचा लय झाल्यावरच पूर्ण सुखाची प्राप्ती होते. कारण तेथे द्रष्टा म्हणून कोणी राहत नाही. ही निर्विकल्प स्थितीच "मी" चे रहस्य आहे. हिलाच सुषुप्ती अवस्थेची निर्विकल्प स्थिती म्हणतात. (३३)

अनेकत्वाचे कारण— "मी" सत्ता नामरूपावर अध्यारोपित होणे

सच्चित्सुखघन "मी" अस्ति, प्रिय व अस्तित्वरूपाने असतो. पण नाम व रूप असले वा नसले तरी एकमात्र "मी" तेथे असतोच. (३४)

अस्ति, भाति आणी प्रिय या रूपांनी "मी" बोध म्हणजेच सच्चिदानंद स्वरूप. असणारे, भासणारे, दिसणारे आणी प्रिय असे "मी" चे स्वरूप निर्मळ आहे. असे असूनही "मी" ला स्वरूपाचा संग नाही. "मी" केवळ सच्चित्सुखच आहे. (३५)

जगात अस्तित्वरूपाने "मी" सत्य स्वरूप आहे. भासमान असल्याने "मी" चेतनायुक्त आहे. प्रेमाच्या स्फुरणाने "मी" आनंदरूप आहे. असा "मी" सच्चित्सुखरूप आहे. (३६)

स्वप्नावस्था, जागृतावस्था आणी सुषुप्ती अवस्था या तिन्हीहून "मी" अभिन्न आहे. तिन्ही अवस्थांत "मी" एकसारखा अद्वय आहे. अर्थात अवस्थेत परिवर्तन झाले म्हणून "मी" मध्ये परिवर्तन होत नाही. (३७)

"मी"— अस्ति–भाति–प्रिय वृत्तीचे उद्गमस्थळ

जगात कोणत्याही पदार्थाची सत्यता पाहण्यास गेल्यास "मी"च स्वतः सत्य स्वरूप आहे असे दिसते. सत्यतेच्या दृष्टीने "मी" वाचून असा कोणताही पदार्थ नाही. जशी पाण्याची लाट पाण्यापासून अभिन्न असते तसेच हेही आहे. भासणे आणी प्रिय लागणे ही वृत्ती तत्त्वदृष्ट्या "मी" मध्येच सामावलेली आहे. (३८)

वृत्ती ज्ञान ग्रहण करण्यास अक्षम

विकारयुक्त वृत्ती स्वतःला जडत्वाचे कारणी ओळखू शकत नाही. वृत्तीचा भास क्षणभरासाठी का होतो? स्वतः वृत्तीचे उत्पन्न होणे व नाश होणे कसे घडते? जी वृत्ती उत्पन्न होण्यापूर्वी व नष्ट झाल्यानंतरही नसते, त्या वृत्तीचे स्वतःचे अस्तित्व असणे कसे शक्य आहे? (३९)

चिद्रूप "मी"— वृत्तीचा ज्ञाता

आत्मवस्तु ("मी") ला विकार नाही. विकार जर कुठे असतो तर तो "मी" च्या ज्ञानाला अर्थात "मी" बोधाला आहे. विकाराला अर्थात "मी" बोधाला जो जाणतो तो "मी" चाच खरा चिद्रूप आहे. (४०)

"मी" अविनाशी तत्त्व

वृत्तीचा उदय आणी लय होत असता प्रत्यक्ष स्वरूपात "मी"च शेष राहतो. चिद्रूपाने, अर्थात चैतन्यरूपाने वृत्तीच्या प्रकट होण्याला व लय होण्याला "मी"च पाहतो. वृत्तीची आनंदरूप स्मृती जिच्यात जागृत राहते तो "मी"च आहे. सुषुप्ती अवस्थेत "मी"-बोधाचा लय झाल्यानंतर नित्य आनंदस्वरूपात "मी"च शेष राहतो. (४१)

सर्व जड पदार्थरूपी वृत्तींचा लय झाल्यानंतर सुषुप्तीत ज्याचे अस्तित्व शेष राहते तोच "मी" आहे. तेथे कुठलीही वृत्ती नसल्यामुळे स्वतःला जाणणारा एकटा "मी"च शेष राहतो. "मी" हा जागृतावस्था, स्वप्नावस्था व सुषुप्ती अवस्थेत अखंड रूपाने राहतो. "मी" हा वृत्ती-रहित अवस्थेमध्ये सदासर्वदा उपस्थित राहत असल्यामुळे "मी" नाही हा प्रश्नच निर्माण होत नाही. (४२)

वृत्तीचा उदय व लयाचे कारण — "मी" चे अज्ञान

"मी" च्या अज्ञानाने कल्पित वृत्तीचा उदय आणी लय होतो. "मी" च्या अज्ञानाने वृत्तीद्वारे जड दृश्य दिसते. "मी" च्या अज्ञानाने वृत्तीचा लय होत असल्याने दृश्यही दिसत नाही. या सर्वांस प्रकाशित करणारा स्वयम् "मी" शिवाय इतर कोणीही नाही. (४३)

तत्त्वदृष्ट्या दोरीच्या ठायी कधीच सर्प नसतो, तसे भावही निर्माण होत नाही. दोरीचे अज्ञानच सर्पाला कारण आहे. म्हणून दोरीच्या ठायी स्वतः सर्पाचा भास होतो. तसे पाहिले तर दोरीला स्वतः कधीही "मी दोरी नाही" अशी शंका येतच नाही. दोरीपासून स्वतःला वेगळे मानून जो दोरीला पाहतो त्यालाच असे अज्ञान उत्पन्न होते. (४४)

संसार म्हणजे "मी" चे अज्ञान

वृत्तीचा लय होताच "मी" मध्ये जगतदेखील राहत नाही. "मी" च्या अज्ञानाने जगाचा भास होतो. परंतु जेव्हा "मी" चा बोध होतो तेव्हा जगत राहत नाही. खरे पाहता "मी" ला स्वतः "मी" चे ज्ञान नसते. "मी" च्या अज्ञानामुळे वृत्तीला स्वतः जगत सत्य भासते. (४५)

"मी" च्या अज्ञानामुळे जी वृत्ती उठते तिलाच जगत अथवा संसार म्हणतात. पण स्वतः "मी" ला अशी भिन्नता — अर्थात जगत आणी"मी" वेगळे — कधीही भासत नाही. जसा सूर्य तिन्ही काळात दृश्य विश्वाला साक्षीरूपाने पाहतो तसाच जगताला "मी" साक्षीरूपानेच पाहतो. तात्त्विक दृष्टीने वृत्तीचा "मी" ला स्पर्श होत नाही. तसाच जगतकार्याचाही "मी" ला स्पर्श होत नाही. (४६)

"मी" हा साक्षीही नाही

"मी" सच्चिदानंद स्वरूप, अद्वय आणी निर्विकल्प आहे. "मी" मध्ये हे जग कधी प्रकट झालेच नाही आणी"मी" ला या जगाचा साक्षी म्हणणे देखील निरर्थक आहे. सापेक्ष भावाने "मी" ला व्यर्थपणे साक्षी म्हणतात. "मी" मध्ये वृत्तीला काही स्थानच नसल्याने "मी" ह्या जगाचा साक्षी कसा असू शकेल? (४७)

अभयरूप "मी" चा साक्षात्कार — अशक्य

"मी" ज्ञानस्वरूप असल्याने "मी" मध्ये जगताचे अस्तित्व कुठल्याही प्रकारे सत्य ठरविता येत नाही. त्याचप्रमाणे "मी" मध्ये वृत्ती आणी तिचे कार्य (अस्ति, भाति, प्रिय) ही नाहीत. म्हणून श्रुती म्हणते की "मी" मन, बुद्धी, इंद्रिये यांपासून प्राप्त होऊ शकत नाही. जिथे वृत्ती नावाची कुठली वस्तूच नाही तेथे वाणीच्या द्वारे "मी" प्राप्त होणे कसे शक्य आहे? (४८)

सर्व प्रकारच्या भिन्नतेचा लय झाल्यानंतर "मी" स्वतःत निर्विकल्प अवस्थेत राहतो. केवळ "मी"च सच्चिदानंदस्वरूपाने सर्वत्र व्यापक रूपात राहतो आणी"मी" मध्ये जगाचा उदय आणी लय होत नाही. "मी" सृष्टीच्या आरंभी जसा निर्विकार होता तसा वर्तमान काळातही आहे. सृष्टी कोठे आहे व कशी आहे हे "मी" ला ज्ञात नसल्यामुळे "मी" ला कुठलेही भय नाही. (४९)

सद्‌गुरू कृपेने ग्रंथकाराला अत्यल्प काळातच वरील ज्ञान प्राप्त झाले आणी अन्य लोकांनीही वरील ज्ञान प्राप्त करून देऊन हा भवसमुद्र पार केला. ज्या सद्‌गुरूंच्या कृपेने मला वरील ज्ञान प्राप्त झाले ते माझे सद्‌गुरू श्रीक्षेत्र सज्जनगडावर सदैव जागृत अवस्थेत वास करतात. त्याच सद्‌गुरूंचे अगाध ज्ञान ग्रंथकाराच्या आत्मस्वरूपात अविरतपणे प्रवाहित होत आहे.

॥ इति श्री रामदासकृपान्वितेन श्री श्रीधरस्वामीना विरचिते स्वात्मनिरूपणे प्रथमप्रकरणं संपूर्णम्॥

श्री रामसमर्थ

स्वात्मनिरुपण

प्रकरण-२

"मी" चे व्यापकत्व

"मी" नामरुपातीत व कालातीत

“मी” नामरूपातीत असून तिन्ही काळात (भूत, भविष्य आणी वर्तमान) स्वात्मबोधरूपात उपस्थित असतो. जरी “मी” नामरूपाच्या बंधनात प्रतीत होत असला तरी त्याला तिन्ही अवस्थांचे (जागृत, स्वप्न आणी सुषुप्ती) बंधन नाही. (१)

“मी” नामरूपातीत असून तिन्ही काळात (भूत, भविष्य आणी वर्तमान) बोधरूपात उपस्थित असतो. जरी “मी” नामरूपातीत आहे, तरी “मी” स्वयम् सत्यस्वरूपच आहे. (२)

“मी” नामरूपातीत असून तिन्ही काळात (भूत, भविष्य आणी वर्तमान) रूपात उपस्थित असतो. जरी “मी” नामरूपातीत आहे, तरी “मी” स्वयम् चैतन्यस्वरूपच आहे. (३)

“मी” नामरूपातीत असून तिन्ही काळात (भूत, भविष्य आणी वर्तमान) स्वात्मबोधरूपात उपस्थित असतो. जरी “मी” नामरूपातीत आहे, तरी “मी” स्वयम् आनंदस्वरूपच आहे. (४)

“मी” नामरूपातीत असून तिन्ही काळात (भूत, भविष्य आणी वर्तमान) स्वात्मबोधरूपात उपस्थित असतो. जरी “मी” नामरूपातीत आहे, तरी “मी” स्वयम् अस्ती, भाती आणी प्रिय होऊनच व्यक्त होतो. (५)

जरी “मी” नामरूपातीत असूनही अस्ती, भाती आणी प्रिय होऊन व्यक्त होतो, तरी “मी” अद्वितीय सच्चिदानंद परब्रह्म आहे. (६)

जरी “मी” नामरूपातीत आहे, तरी तिन्ही अवस्था (जागृत, स्वप्न, सुषुप्ती) “मी” च्याच आहेत. नामरूपाच्या माध्यमातून “मी” प्रगट होतो, तरी “मी” सुखस्वरूप अर्थात आनंदस्वरूपच आहे. (७)

“मी” नामरूपातीत आहे, परंतु तिन्ही अवस्था (जागृत, स्वप्न, सुषुप्ती) “मी” अर्थात माझ्याच आहेत. म्हणून श्रुतीने “मी” ला "ब्रह्मविज्ञानमानंदम्" अर्थात ब्रह्मस्वरूप, विज्ञानस्वरूप आणी आनंदस्वरूप ह्या शब्दांनी बोध केलेला आहे. (८)

“मी” नामरूपातीत आहे, परंतु तिन्ही अवस्था (जागृत, स्वप्न, सुषुप्ती) “मी” च आहेत. “मी” ला "सर्वप्रेमास्पदं" अर्थात सर्वांचा प्रिय ह्या नावाने देखील जाणले जाते. (९)

"मी" आधारित तिन्हीं अवस्था, पण "मी" स्वतः तिन्हीं अवस्थातीत

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था (जागृत, स्वप्न, सुषुप्ती) राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “मी” चिन्मात्ररूपात ह्या तिन्ही अवस्थांचा द्रष्टा असून स्वयम् अखंड आनंदरूप आहे. (१०)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “मी” स्वयम् शोक–मोहातीत ब्रह्मानंद आहे. (११)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “मी” ला श्रुती "दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः" अर्थात दिव्य अमूर्त पुरुष या नावाने संबोधित करते. (१२)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “मी” या तिन्ही अवस्थांना (जागृत, स्वप्न, सुषुप्ती) प्रकाशित करणारा स्वयंप्रकाश आहे. (१३)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. श्रुती माता "अजो नित्यः शाश्वतोऽयं" अर्थात “मी” अजन्मा, नित्य, शाश्वत आहे असे सांगते. (१४)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. श्रुती माता "मायाविद्यादिहीनोऽयम्" अर्थात “मी” मायाविद्यातीत आहे असे सांगते. (१५)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. श्रुती माता "अरेऽयमविनाशीति" अर्थात “मी” चा कधीही नाश नाहीये असे सांगते. (१६)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वतः “मी” नाहीत. श्रुती माता "पुरुषान्न परं किंचित्" — “मी” याहून अन्य कोणीही श्रेष्ठ नाही असे सांगते. (१७)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वतः “मी” नाहीत. श्रुती माता "आकाशवत् सर्वगतं" अर्थात “मी” आकाशाप्रमाणे व्यापक आहे असे सांगते. (१८)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वतः “मी” नाहीत. श्रुती माता "परागति परा काष्ठा" अर्थात “मी” मध्येच सर्वांचा लय होतो आणी“मी” चा अंत कोणीही लावू शकत नाही असे सांगते. (१९)

"मी" आधारित तिन्हीं अवस्था असूनही "मी" स्वभावत: ब्रह्मतत्त्वच

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. "पंचकोशातीत" — अन्नमयकोश, प्राणमयकोश, मनोमयकोश, विज्ञानमयकोश आणी आनंदमयकोश यांच्यापलीकडील ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२०)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “षट्भिशून्य” अर्थात सहा विकार (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणी मत्सर) रहित ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२१)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “षट्भावशून्य” — {षड्भाव : जायते (प्रकट होणे), अस्ति (अस्तित्व), वर्धते (वृद्धी), परिणमते (परिवर्तन), अपक्षीयते (क्षीण होणे), विनश्यति (नष्ट होणे)} — रहित ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२२)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “अवस्थाशून्यमद्वंद्वं” — जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थातीत आणी अद्वितीय (अद्वंद्व) असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२३)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. "यत् शुभ्रं ज्योतिषां ज्योतिः" अर्थात शुभ्र (कलंकरहित) आणी ज्योतींचीही ज्योती असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२४)

विशेष — “मी” कलंकरहित असून सर्वांना प्रकाशित करणारा आहे.

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “यतो वेमानि भूतानि” — ज्याच्या प्रकाशामुळे जगातील सर्व व्यवहार चालतात असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२५)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “गुणजातिक्रियाहीनम्” — त्रिगुण (सत्त्व, रज, तम), चार जाती (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र) व त्यांच्या क्रिया (शिक्षा, रक्षण, वाणिज्य, उद्योग–कला) रहित असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२६)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “सत्तामात्रस्वरूपं यत्” — सत्तामात्रानेच ज्याचे अस्तित्व आहे असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२७)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. श्रुती माता "सत्यं ज्ञानमनंतं यत्" — सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप आणी अनंतस्वरूप असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२८)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. “आदिमध्यान्तशून्यम् यत्” — आदि–मध्य–अंत यांचा नाश झाल्यानंतरही जे सत्ता किंवा अस्तित्वरूपाने राहते असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (२९)

“मी” च्या आधाराने तिन्ही अवस्था राहतात, परंतु तिन्ही अवस्था ह्या स्वयम् “मी” नाहीत. जागृत, स्वप्न आणी सुषुप्ती या तिन्ही अवस्थांना प्रकाशित करणारे ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (३०)

“मी” ज्ञानस्वरूप असल्याने माझा नाश होणे कदापि शक्य नाही. “मी” ला नामरूप नसल्याने तत्त्वदृष्ट्या “मी” चा कोणीही नाश करू शकत नाही. (३१)

कार्याचा संपूर्णतया आधार “मी” च असल्याने “मी” वर आश्रित कार्याचा नाश झाल्यानंतरही “मी” चा नाश होणे संभव नाही. (३२)

"मी" स्वतः अविनाशी

जागृत, स्वप्न आणी सुषुप्ती या अवस्था येतात आणी जातात, परंतु “मी” ला तिन्ही अवस्था नाहीत. “अजं विभुं सर्वगतं” अर्थात जन्मादि विकाररहित, सर्वव्यापी आणी सर्वज्ञ ब्रह्मतत्त्व स्वभावत: “मी” च आहे. (३३)

जागृत, स्वप्न आणी सुषुप्ती या अवस्था येतात आणी जातात, परंतु “मी” ला तिन्ही अवस्था नाहीत. "ध्रुवं कूटस्थमचलम्" अर्थात जो देहात आत्मरूपाने असूनही स्थिर व अक्रिय आहे, असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: "मी" च आहे. (३४)

जागृत, स्वप्न आणी सुषुप्ती या अवस्था येतात आणी जातात, परंतु “मी” ला तिन्ही अवस्था नाहीत. “निर्विकारं स्वयं ज्योती:” अविकारी आणी स्वप्रकाशित असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: "मी" च आहे. (३५)

जागृत, स्वप्न आणी सुषुप्ती या अवस्था येतात आणी जातात, परंतु “मी” ला तिन्ही अवस्था नाहीत. "अवस्थात्रयनिर्मुक्तं" तिन्ही अवस्थांच्या (जागृत, स्वप्न व सुषुप्ती) अतीत असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: "मी" च आहे. (३६)

भेदात्मक तीन अवस्था असूनही "मी" त्या पूर्वीचा

तिन्ही अवस्था भेदरूप दिसतात अर्थात वेगवेगळ्या दिसतात. परंतु “मी” ह्या अवस्था येण्याच्या पूर्वीही असतो. "सर्वभेदविषूण्यं" भेदातीत असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: "मी" च आहे. (३७)

तिन्ही अवस्था भेदरूप दिसतात; परंतु “मी” ह्या अवस्था येण्याच्या पूर्वीही असतो. "एकमेवाद्वितीयं" एकमात्र असून अद्वितीय आहे, असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: "मी" च आहे. (३८)

तिन्ही अवस्था भेदरूप दिसतात; परंतु “मी” ह्या अवस्था येण्याच्या पूर्वीही असतो. "स्वे महिम्नि स्वभासा" अर्थात स्वतःच्या प्रकाशाने प्रकाशित असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: "मी" च आहे. (३९)

केवळ कार्यरूपाने "मी" च्या तीन अवस्था भासमान

कार्यरूपाने स्वतः “मी” ला जरी तीन अवस्थांचे आवरण भासत असले, तरी "त्रिपरिच्छेदशून्यं" अर्थात तिन्ही अवस्थांच्या आवरणरहित असे ब्रह्मतत्त्व "मी" च आहे. (४०)

तिन्ही अवस्था नामरूपात्मक जरी असल्या तरी "नामरूपाद् विमुक्तं" नामरूपरहित ब्रह्म स्वभावत: "मी" च आहे. (४१)

कारणरूपाने जरी ह्या तिन्ही अवस्था भासत असल्या तरी "कार्यकारणशून्यं" कार्यकारणरहित ब्रह्म स्वभावत: "मी" च आहे. (४२)

कालाच्या अस्तित्वासाठी जरी चार अवस्था(सकाळ, दुपार, संध्याकाळ व रात्र) नामरूपाने असल्या तरी "सर्वकालाबाधितं" सर्व कालाच्या बंधनरहित ब्रह्म स्वभावत: "मी" च आहे. (४३)

तिन्ही अवस्था (जागृत, स्वप्न व सुषुप्ती) या त्रिगुणात्मक (सत्त्व, रज व तम) असल्या तरी "मायातीतं गुणातीतं" माया व त्रिगुणरहित ब्रह्म स्वभावत: "मी" च आहे. (४४)

तिन्ही अवस्थांचे(जाग्रत, स्वप्न व सुषुप्ति) येणे-जाणे कायमचे चाललेले असते. "अहेयमनुपादेयं" ज्यांना ग्रहण करता येत नाही व सोडताही येत नाही, असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: "मी" च आहे. (४५)

तिन्ही अवस्था (जाग्रत, स्वप्न व सुषुप्ति) उपाधी(स्थूलदेह, सूक्ष्मदेह व कारण देह) युक्त आहेत. "सर्वोपाधिविनिर्मुक्तं" सर्व उपाधी-रहित असे ब्रह्मतत्त्व स्वभावत: "मी" च आहे. (४६)

“द्वितीयाद्वै भयं" अर्थात जिथे द्वैत असते तिथे भय असते. “मी” अद्वितीय अर्थात द्वैत-रहित आहे, असे "अभयं वै ब्रह्म" अर्थात अभयरूपी ब्रह्म स्वभावत: "मी" च आहे. (४७)

विशेष — “मी” स्वयम् नामरूप आणी देह-उपाधीच्या अतीत असल्याने द्वैतभावामुळे उत्पन्न होणारे भय “मी” ला नाही.

विश्वात "आब्रह्म कीटकान्ति" अर्थात मोठ्यात मोठ्या जीवांपासून ते छोट्यात छोट्या जीवांपर्यंत सर्वांना तिन्ही अवस्था त्यांच्या जीवनात येत असतात. तसेच जीव–ईश (शिव), बंधन–मुक्ती व सुख–दुःख हे द्वैत कायम पाठीशीच आहेत. (४८)

तिन्ही अवस्थांच्या(जाग्रत, स्वप्न व सुषुप्ति) बंधनातून मुक्त ब्रह्म स्वभावत: "मी" च आहे. जीव–ईश (शिव), बंधन–मोक्ष हे सारे द्वैत "मी" ला नाहीत. “मी” "एकोऽहं" एकमात्र असून अद्वितीय आहे. (४९)

"मी" द्वंद्व व त्रिपुटी रहित

स्वयम् “मी” च्या आधारानेच सर्व प्रकारच्या सृष्टी, स्थिति आणी लय (त्रिपुटी) चे कार्य चालते. पण खरे पाहता "मी" ला ह्या विषयीचे किंचितही ज्ञान नसते. "मी" सर्वापासून असंग असल्याने "मी" ला याचा कधीही संबंध येणे संभव नाही. म्हणून जगातील कुठलेही द्वंद्व — जीव–ईश आदि व त्रिपुटी(द्रष्टा, दृश्य, व दर्शन) — "मी" ला नाही. (५०)

"मी" दृष्यातीत

उत्पत्ती आणी नाश या प्रक्रिया जरी होत असल्या तरी “मी” ने स्वतः कधीही ह्या प्रक्रिया पाहिलेल्या नाहीत. म्हणूनच “मी” स्वतः अजन्मा आणी अविनाशी ब्रह्मच आहे. (५१)

"मी" च्या भानाशिवाय दृश्याचे अस्तित्व स्वीकारणे शक्य नाही. "मी" म्हणून जो स्वतःचे भान कायम जागृत ठेवतो, खरे अस्तित्व म्हणून "मी" च आहे. (५२)

दृश्य ज्ञानरहित असल्याने जड आहे. जड पदार्थात ज्ञान (भान) असू शकत नाही. दृश्य ज्ञानरहित असल्याने दृश्याला अस्तित्वच नाही. दृश्याला अस्तित्व नसल्याने दृश्याला सत्यत्व असणे संभव नाही. (५३)

कारण–कार्यरहित “एकमेवाद्वितीयमिति" अर्थात एकमात्र अद्वितीय “मी” च सत्य आहे. श्रुती "तत्त्वमसि" असा बोध "मी" ला करीत आहे. ह्या बोधामुळे "मी" ला दृश्याची काही बाधा होत नाही. (५४)

"मी" स्वयं सिद्ध

अविद्या, माया (विद्या), भ्रम आणी अज्ञान हे वास्तविक पाहता "मी" ला काहीच नाही. "मी" स्वयंसिद्ध असल्याने तेथे दुसरे काहीही नाही. जे काही द्वैत भासते, ते "मी" व्यतिरिक्त काही आहे हा भावच आहे, आणी हा भाव एक भ्रम आहे. परंतु "मी" स्वभावत: सर्व प्रकारच्या भ्रमाच्या पलीकडचा आहे. (५५)

“मी” अशब्द, अस्पर्श, अरूप, अव्यय (देहरहित), भावनारहित, रसरहित, शुद्ध, गंधरहित, एकमेव आहे. “मी” पृथ्वी, जल, अग्नि, वायु आणी आकाशही नाही. “मी” क्रिया आणी कर्मातीत आहे. (५६)

सुषुप्ती अवस्थेतील अज्ञानच सर्व भासमान दृश्याच्या उत्पत्तीचे कारण आहे. सुषुप्तीमध्ये "मी" वर अज्ञानाचे आवरण आल्यामुळे ज्ञानाचा अभाव राहतो. स्वप्न आणी जागृतावस्थेमध्ये ज्ञानामुळे सर्व दृश्य दिसते. तेच “प्रज्ञानं ब्रह्म” — “मी” च आहे. “मी” स्वयं कल्पनातीत आहे. (५७)

"मी" देहाच्या जागृतावस्था व स्वप्नावस्था नाही

सर्व प्राणीमात्रात नामरूपामुळेच स्त्री आणी पुरुष देहभाव दिसतो. जागृतावस्था आणी स्वप्नावस्था "मी" ला नाहीत. तसेच "मी" जडदेहही नाही. (५८)

उच्चजाती, आश्रम, कुल, गोत्र हे सर्व जडदेहास लागू आहेत. जागृतावस्था आणी स्वप्नावस्था "मी" ला नाहीत. तसेच "मी" जडदेहही नाही. (५९)

सुंदर, कृश, स्थूल, बालपण आदि जडदेहाला लागू आहेत. जागृतावस्था आणी स्वप्नावस्था "मी" ला नाहीत. तसेच "मी" सूक्ष्मदेह (स्वप्नातील देह) ही नाही. (६०)

आंधळेपणा, बहिरेपणा, शूद्रकामादिक आदि जडदेहाला लागू आहेत. जागृतावस्था आणी स्वप्नावस्था "मी" ला नाहीत. तसेच "मी" सूक्ष्मदेह (स्वप्नातील देह) ही नाही. (६१)

प्राण, इंद्रिये, मन, बुद्धी, चित्त, अहंकार आदि सूक्ष्मदेहाला लागू आहेत. जागृतावस्था आणी स्वप्नावस्था "मी" ला नाहीत. तसेच "मी" सूक्ष्मदेहही नाही. (६२)

जडता (देह-अस्तित्वबोध), प्रियता, सुखभोगता आदि विकारांकरिता देहच कारणीभूत आहे. जागृतावस्था आणी स्वप्नावस्था "मी" ला कारणीभूत नाहीत. (६३)

"मी कोण आहे?" ह्या अज्ञानाकरिता देहच कारणीभूत आहे. जागृतावस्था आणी स्वप्नावस्था "मी" ला कारणीभूत नाहीत. (६४)

सृष्टी–स्थिति–लयाला कारण : माया (विद्या आणी अविद्या)

सर्वेश्वर, सर्वज्ञ, जगताची उत्पत्ती, स्थिति आणी लय यांना मायाच कारण आहे. जागृतावस्था व स्वप्नावस्था माया-आधारित आहेत; परंतु "मी" तसा नाही. (६५)

असती-भाती-प्रियादी वृत्ती, किंचिग्यता (अल्पता), देह, स्थिति व नाश यांचे कारण अविद्या (अज्ञान) आहे. जागृतावस्था आणी स्वप्नावस्था अविद्या-आधारित आहेत; पण "मी" तसा नाही. (६६)

गुंजा यांच्या लाल रंगाकडे पाहून जणू आग लागली आहे असे वाटते; परंतु काहीही जळालेले नसते. त्याचप्रमाणे जगात जीव आणी ईश या दशा केवळ अध्यारोपित आहेत. (६७)

"मी" वर व्यर्थ आरोपित विकार "मी" ला कधीही काहीही करू शकत नाहीत. "मी" स्फटिकाप्रमाणे पारदर्शी असून नेहमीच विकारांपासून अलिप्त असतो. (६८)

दोरीच्या जागी आवरण येण्यापूर्वी दोरी जशी दोरीच असते, त्याप्रमाणेच "मी" चे अज्ञान होण्यापूर्वीही "मी" जसा होता तसाच सतत भासतो. (६९)

"मी" चे स्वतःचे अज्ञानच जीव आणी ईश या दोन्ही नावांना दर्शवते. "मी" ला अविद्या आणी माया या उपाध्या केवळ भासमान आहेत. परंतु "मी" ला यापासून काहीही हानी नाही. (७०)

"मी" स्वतः अभेद

जगात जीव आणी ईश जड आणी चिन्मय रूपात भासीत होतात. परंतु "मी" निर्विकल्प ज्ञानमात्र असल्याने "मी" ला कुठल्याही प्रकारे अन्यभाव नाही. (७१)

"मी" हून अन्य सर्व जड असल्याने तेथे ज्ञानाची संभावना नाही. ज्ञानाच्या अभावात हे ज्ञात होत नाही की "मी" एकच आहे आणी अन्य काहीही नाही. (७२)

"मी" स्वत:च्या सुखप्राप्तीकरिता प्रकृती–पुरुष, नर–नारी, जीव–ईश उपाधी स्वतः धारण करतो. "मी" ला स्वतःविषयीचे असलेले अज्ञानच ह्या उपाधींच्या अनुभवाला कारणीभूत असते. परंतु "मी" स्वतः अभेदच आहे. (७३)

"मी" ला सर्व "अयमात्मा ब्रह्म" अर्थात "मी" स्वयं ब्रम्ह आहे ह्या नावाने जाणतात, असे श्रुतीमध्ये स्पष्टपणे सांगितलेले आहे. भेद आणी अभेदाचे निराकरण करून स्वयम् अनुभव घेणेच श्रेयस्कर आहे. (७४)

"मी" सच्चिदानंद अनंत सुखाचा सागर असून स्वतःमध्येच रममाण होतो. ह्याच्या अतिरिक्त "मी" ला कधीही दुसऱ्या कुठल्या वस्तूचा विचारही येत नाही. (७५)

"मी" स्वयम् अतर्क्य, अलक्ष्य, अद्वय आणी अगणित आहे, याचे "मी" ला ज्ञान असते. नित्य अखंडित रूपात "मी" स्वतःचेच स्फुरण (स्मरण) करत राहतो. ह्याच्या व्यतिरिक्त "मी" ला काहीही भास होत नाही. (७६)

वृत्ती प्रगट होण्यापूर्वी व लय होण्याच्या स्थितीतही "मी" स्वतःलाच जाणीवेच्या माध्यमाने पाहत असतो. "मी" स्वतः नित्य सच्चिदानंद परिपूर्ण आहे. म्हणून जगात "मी" व्यतिरिक्त काहीही वेगळे किंवा आगळे नाही. (७७)

ज्याप्रमाणे तरंगाच्या हालचालीत एक मात्र पाणीच असते, त्या प्रकारे अनंतरूपी "मी" च्या स्फुरणात चित्स्वरूपी "मी" च असतो. (७८)

समुद्रात जलस्वरूपात अनेक लाटा उठतात. त्याच प्रकारे या जगात "मी" मुळेच "मी–मी" स्फुरण होत असते. ज्याप्रमाणे लाटा आणी जल एकरूपच असतात त्या प्रकारे "मी" स्वतः "मी" असून सदैव चितसुखरूपानेच असतो. (७९)

जसे घटामध्ये सर्वत्र मातीच असते, त्याच प्रकारे सर्व ब्रह्मांडात "मी" स्वतःलाच पाहतो. (८०)

जसे समुद्राचे असणे व नाहीसे होणे यास फेसच कारणीभूत आहे, तसेच जगाचे कारणीभूत "मी" ला ही जन्म–मृत्यु भासमान आहे. खरे पाहता समुद्रात फेसाला जन्म–मृत्यु आहे; समुद्राला नाही. तसेच "मी" ला जन्म–मृत्यु नसून जगालाच जन्म–मृत्यु आहे. (८१)

लाटांच्या हालचालीमुळे फेसाची निर्मिती होते, परंतु त्यामुळे समुद्रातील पाण्यात काहीच फरक पडत नाही. त्याच प्रकारे या जगात जीव–ईश भासमान होतात. "मी" वर याचा कुठल्याही प्रकारे प्रभाव पडत नाही. (८२)

फेसाप्रमाणेच संपूर्ण जगात हालचालीमुळेच जीव–ईश भाव स्फुरतो. माया ही समुद्राच्या तरंगाप्रमाणे "मी" मध्ये असूनही "मी" पासून वेगळी नाही. (८३)

"मी" अनंत, अद्वय, चिदानंदाने परिपूर्ण सुखाचा सागर असून "मी" स्वतःमध्येच त्या प्रमाणे समरसून आहे, जसे समुद्रात पाण्याशिवाय काही दुसरे नसते. (८४)

॥ इति श्रीरामदासकृपान्वितेन श्रीश्रीधरस्वामीना विरचिते स्वात्मनिरूपणे

द्वितीय प्रकरणं संपूर्णम् ॥

॥श्रीरामसमर्थ॥

स्वात्मनिरुपण

प्रकरण ३

"मी" एकमात्र परिपूर्ण

"मी" चे अद्वयत्व

“मी” मध्ये व्याप्त ज्या तीन अवस्था (जागृती, स्वप्न आणी सुषुप्ती) दिसतात, त्या “मी” ला नाहीत. ज्या कारणी ह्या तीन अवस्था भासतात, मुळात त्या अवस्था “मी” च्या नाहीत. (१)

“मी” मध्ये जे स्थूलत्व भासते, त्यात सूक्ष्मच कारण आहे. व्यापक रूपाने जर सूक्ष्मच असले तर तेथे स्थूल असणे शक्यच नाही. (२)

घटात असलेले सूक्ष्माकाश (मर्यादा असलेली रिकामी पोकळी) घट नाहीये. दृश्यभावात घटाच्या कल्पनेच्या स्फुरणाचे कारण केवलाकाश (अमर्यादित रिकामी पोकळी) आहे. (३)

वरील केवलाकाशाच्या दृष्टांताने “मी” चा निर्णय होऊ शकत नाही. म्हणून श्रुती या विचारांचा त्याग करण्यास सांगते; कारण चिदानंदस्वरूप “मी” विषयी निर्णय घेण्यास हे योग्य नाही. (४)

अवकाशामुळे (जिथे कुठलीही क्रिया नाही अशी पोकळी) आकाश प्रतिभासीत होते. परंतु “मी” स्वयम् ज्ञानस्वरूपाने परिपूर्ण असल्याने तिथे अन्य कोणाचाही भास होणे असंभव आहे. (५)

विशेष — आकाश शून्य असून भासमान आहे, पण “मी” शून्य नसून ज्ञानस्वरूप असल्याने तेथे काही वेगळे भासमान होणे शक्य नाही.

रहस्यमय अज्ञानरूपी सुषुप्ती अवस्थेतच स्वप्नावस्था आणी जागृतावस्था समाविष्ट आहेत. सुषुप्ती अवस्थेच्या अवकाशात अज्ञानाची व्याप्ती आहे. (६)

ज्या अवस्थेत कुठल्याही प्रकारचे ज्ञान नसते, अशा वृत्ती-शून्य अवस्थेला सुषुप्ती अवस्था असे म्हणतात. सुषुप्ती अवस्थेमुळेच स्वप्नावस्था आणी जागृतावस्था आहेत, परंतु त्या अवस्थेत “मी” चे ज्ञान नसते. (७)

“मी” सुषुप्तीचे अज्ञान नाही आणी “मी” मध्ये कुठल्याही प्रकारचा विक्षेप भासत नाही. विक्षेपाची स्थिती फक्त स्वप्नावस्था आणी जागृतावस्थेतच संभवते. पण अशी विक्षेपस्थिती “मी” मध्ये नाही. (८)

विशेष — “मी” च्या विषयाचे “मी” ला अज्ञान असणे कधीही संभवत नाही. त्यामुळे “मी” ला स्वतःच्या सच्चिदानंद स्वरूपाविषयी विक्षेप असणे संभव नाही.

जागृत, स्वप्न व सुषुप्ती अवस्थेत जे काही भासते ते “मी” पासून वेगळे नसून ब्रह्मच आहे, असे श्रुतीचे सांगणे आहे. (९)

“मी” ज्ञानस्वरूप असल्याने द्वैतभावनेने भासत नाही. “मी” अद्वितीय (त्यासारखे दुसरे नाही) असल्याने “मी” सापेक्ष काहीच नाही. (१०)

चिद्भिन्न — अर्थात चेतनेव्यतिरिक्त जे काही आहे ("मी" पासून भिन्न जे काही आहे) ते जड असल्याने ते स्वतःला प्रकाशित कसे करील? असे विचार केल्यावर श्रुती माता सांगते की जे काही प्रकाशमान दृश्य दिसत आहे त्याला कारण चेतनस्वरूप "मी" च आहे. (११)

स्वप्नावस्था व जागृतावस्थेला कारण सुषुप्ती अवस्था आहे. पण श्रुती मातेचे असे सांगणे आहे की ह्या अवस्था "मी" ला भासविण्यास असमर्थ ठरतात. (१२)

वृत्ती-शून्य सुषुप्ती अवस्थेत काहीही भासमान नसते. स्वप्नावस्था व जागृतावस्था ज्या कारणी भासमान आहेत, त्याला वृत्ती-शून्य सुषुप्ती अवस्था कारणीभूत कशी होईल? (१३)

वृत्ती-शून्य अवस्था कशालाही भासमान करू शकत नाही, कारण ह्या अवस्थेत स्वतःचे व अन्याचे भास होणे शक्य नाही. ज्या कारणी वृत्ती-शून्य अवस्था भासते, तो "मी" च सर्वाना भासमान करतो. (१४)

वृत्ती-शून्य अवस्था ज्ञानावस्था नाही, व ज्ञानावस्था वृत्ती-शून्य अवस्था असू शकत नाही. "मी" या ज्ञानमात्र स्वरूपात वृत्ती-शून्य अवस्था सर्वदा भ्रमात्मकच राहणार. (१५)

"मी" ज्ञान (जाणीव किंवा चेतना) स्वरूप आहे. जाणीव (चेतना) स्वप्नावस्था आणी जागृतावस्था दोन्हीमध्ये स्वतः "मी" रुपानेच असते. "मी" ला स्वप्नावस्था व जागृतावस्था भासते, तेथे नेणीव (अचेतना) असणे शक्य नाही. (१६)

"मी" स्वतःच्या सत्तेने (बोधाने) स्वप्नावस्था आणी जागृतावस्थेला भासमान करतो. तसेच सुषुप्ती अवस्थेतील भास-शून्य स्थितीलाही स्वतःच्या सत्तेने (बोधाने) भासवितो. (१७)

हे स्पष्ट आहे की "मी" ही जाणीव (चेतना) कधीही नेणीव (अचेतना) होऊ शकत नाही. हेही सत्य आहे की सुषुप्ती अवस्थेत तीच जाणीव (चेतना) "मी" च्या सत्तेने (बोधाने) शिल्लक राहते. (१८)

जर सुषुप्ती अवस्थेत नेणीव (अचेतना) शिल्लक असती तर काहीही भासमान झाले नसते. सुषुप्ती अवस्थेतील "आनंदवृत्ती-भान" "मी" ला जाणीव (चेतना) असल्याचे सांगते. (१९)

सुषुप्ती अवस्थेतील आनंद नेणीव (अचेतन) अवस्थेत होणे शक्य नाही. सुषुप्तीत येणाऱ्या आनंदाची अनुभूती जाणीवेच्याच कारणी असते. (२०)

सुषुप्ती अवस्थेत "मी" या जाणीवेला (चेतनेला) जो आनंद होतो, तो आनंद नेणीवेचा नसून आपल्या आत्मस्वरूपाचा, अर्थात स्वस्वरूपाचा आहे. (२१)

सुषुप्ती अवस्थेत "मी" ची स्वतःची जाणीव (चेतना) "मी" मध्येच सामावलेली असते. त्या कारणी हे स्पष्ट होते की "मी" स्वतः सच्चिदानंद ब्रह्मच आहे. (२२)

"मी" कारणरूपाने स्वतःचा आत्मसत्तेने—अर्थात जाणीवेनें—कार्याला प्रकाशित करतो. म्हणून ज्याच्या कारणी कार्य मूर्त रूपात आले, तोच कार्याचा कर्ता आहे. (२३)

"मी" ला सृष्टीकार्याचे कारण—अर्थात कर्ता—मानल्याने सृष्टीकार्यात "मी" चे गुण दिसतात. काहीही न समजत असले तरीही जगाच्या दृष्टीने "मी" विषयीचे हे अज्ञानच असते. (२४)

माती स्वतःच्या कार्यामुळेच घटात व्यापक असते. म्हणून घटात मातीच्या कार्यामुळेच मातीचे गुण येतात. (२५)

विश्व प्रकाशित होण्यासाठी ज्ञान—अर्थात “मी”—हेच मुख्य कारण आहे. विश्वात ज्ञान अर्थात “मी” हून भिन्न काहीही नाही. म्हणून ज्ञान अर्थात “मी” हून भिन्न जे काही भासमान आहे ते स्वयम् जडच आहे. (२६)

“मी” हून भिन्न काहीही नाही. जागृतावस्था, स्वप्नावस्था आणी सुषुप्ती अवस्था “मी” मुळेच भासमान आहेत. भासमान होणाऱ्या तिन्ही अवस्थांतून वास्तव “मी” च भासमान होतो. (२७)

श्रुती माता असे म्हणते की जड पदार्थ कुठल्याही वस्तूस प्रकाशित करू शकत नाही. “यस्य भासा सर्वमिदं” — ज्यापासून सर्व काही प्रकाशित आहे, तो स्वयम् ज्योतीस्वरूप पुरुष—अर्थात भासक—“मी” च आहे. (२८)

येथे “मी” ला “भासक” असे संबोधलेले आहे, कारण त्याच “मी” च्या प्रकाशाने “मी” सहित सर्व काही भासीत होते. ही “मी” ची स्वप्रकाशित अवस्था आहे. (२९)

“पुरुषान्न परं किंचित, सा काष्टा सा परा गति:” — अर्थात “मी” म्हणजे पुरुषच (आत्माच) श्रेष्ठ अंतिम स्थिती आहे. “मी” पूर्ण आहे. “मी” उत्पत्ती, स्थिति आणी लयाचे कारण आहे. (३०)

“मी” ज्ञानस्वरूप असल्याने स्वयं “मी” च्या अस्तित्वाचे भान “मी” द्वारा प्रकट होते. परंतु “मी” ज्ञानाहून अभिन्न, ज्ञानरूपच आहे. (३१)

श्रुतीचे सांगणे आहे की "मी" चे स्वरूप ज्ञानमात्र असल्याने सर्वांचे कारण स्वयं "मी"च आहे. परंतु असे असूनही "मी" सर्वाहून निःसंग आहे. (३२)

"मी"हून भिन्न काहीच नाही आणी तसेच "मी"च्या समान अन्य काहीच नाही. "मी" केवळ ज्ञानमात्र आहे. "मी" मध्ये स्व-पर भाव अर्थात ‘माझे-तुझे’ असा भेद नाहीये. (३३)

श्रुती सांगते की "मी" केवळ ज्ञानमात्र असल्याने अद्वय आहे. जरी "मी" वर भासकत्वाचा गुण आरोपित केला गेला आहे, तरी "मी" त्यापासून अलिप्त आहे. (३४)

"मी" स्वप्रकाशित असून तिन्ही अवस्था भ्रामक आहेत. तिन्ही अवस्थांवर "मी" चे अधिष्ठान असल्याने भ्रम निर्माण होतो. "मी"चा तिन्ही अवस्थांशी कुठल्याही प्रकारचा संबंध नाहीये. (३५)

अंधारात पडलेल्या दोरीच्या ठिकाणी सर्पाचा भास होतो. परंतु दोरीवर कुठल्याही विकार अथवा कल्पनेचा प्रभाव पडत नाही. (३६)

ज्याप्रकारे दोरी सर्पभासाच्या पूर्वीही होती आणी सर्पभास नष्ट झाल्यावरही होती, त्या प्रकारे "मी" दृश्याच्या पूर्वी आणी दृश्याच्या नंतरही तसाच राहतो. दृश्यजगत नाममात्रही "मी" मध्ये व्याप्त नाहीये आणी"मी"ही दृश्यजगतात कधीही व्यापक नाहीये. (३७)

अनुभवगम्य पदार्थांना दृश्य या नावाने ओळखले जाते आणी दृश्यांमध्ये दृश्य, दर्शन आणी द्रष्टा ही त्रिपुटी राहते. परंतु "मी" स्वयम् दृश्य, दर्शन आणी द्रष्टा ही त्रिपुटी नाहीये. परंतु दृश्य, दर्शन आणी द्रष्टा ही त्रिपुटी "मी"मुळे आहे. (३८)

जे काही त्रिपुटी-रहित आहे ते अनुभवगम्य असू शकत नाही. "मी" त्रिपुटी-रहित असल्याने "मी" मध्ये काहीही अन्य भासत नाही. (३९)

काहीही बोध होत नाही असा बोध ज्याच्यामुळे होतो, त्याचे कारण स्वयम् "मी"चे ज्ञान आहे. हे ज्ञान सुषुप्तीपूर्वीही होते. त्या "मी" ज्ञानाहून भिन्न काहीही नाही. (४०)

ह्या "मी" च्या ज्ञाना कारणी सर्वकाही भासते. ह्या विरुद्ध जे काही भासते ते सर्व निव्वळ कल्पनाच आहे. (४१)

जरी नित्य ज्ञानस्वरूपा पासून कल्पना वेगळी वाटते, पण स्वतः कल्पना ज्ञान नाहीये. कारण कल्पना सर्वदा जडच असणार. (४२)

ज्ञानाभावी सर्व प्रकारचे जडत्व आणी शून्यता दिसते. तसेच ज्ञाना च्या अभावी कधीही जडत्वभावनेचा बोध होत नाही. (४३)

ज्याचे अस्तित्व नाही ते अस्तित्वाच्या अभावाने शून्यच आहे. "मी" मध्ये देहाच्या तीन अवस्था (जागृत, स्वप्न, सुषुप्ती) आणी दृश्य नाहीये. "मी" सदासर्वदा अद्वय रूपातच राहतो. (४४)

"मी" सत्तेच्या कारणी कल्पनाशक्तीने दृश्य भासत होते; ती कल्पना "मी"ला भासवू शकत नाही. त्या "मी"मध्ये कल्पनेचे कुठलेही अस्तित्व नसल्याने "मी" सदासर्वदा अद्वय स्थितीत असतो. (४५)

"मी"च्या अखंड ज्ञानाने (स्मृतीने) अर्थात अस्तित्व-बोधाने जरी सर्व खंडित (सत्तत बदलणारे) दृश्य भासत असले, तरी अखंडात होणारा खंडिततेचा भास भ्रमच असल्याने कायमचा स्थिर राहत नाही. (४६)

भ्रम कधीही सत्य असू शकत नाही. केवळ "मी"च एक चिदात्मा (चेतनायुक्त आत्मा) असल्याने "मी" शिवाय अन्य काहीही नाहीये. (४७)

"मी" ज्ञान आणी अज्ञान रहित एक मात्र सत्य."मी" च्या अखंडत्वात (स्मृतीत) खंडत्व (स्वतःविषयीचे अज्ञान अथवा विस्मृती) चा जो भ्रम उत्पन्न होतो, तो "मी"च्या स्वरूपदर्शनाने नष्ट होतो. "मी"च एक अखंड (स्मृती अथवा बोध) आहे. "मी" मध्ये खंड (स्वतःविषयीचे अज्ञान अथवा विस्मृती) नाहीये. (४८)

"मी"ची खंडताच (विस्मृतीच) भिन्नत्वाचे कारण आहे. ही खंडताच अनेकत्वाचा भास आहे. स्वात्मबोधाने केवळ "मी"च प्रगट होतो. "मी"ला खंडत्व (विस्मृती), भिन्नत्व आणी अनेकत्व यांचा स्पर्शही होत नाही. (४९)

वास्तविक पाहता भिन्नत्वाचा भास अज्ञानाचे कारण नाहीये. जर अज्ञानात ज्ञाना चा अभाव न मानला तरच वास्तविक दृष्ट्या ज्ञान अभिन्न आहे असे सिद्ध होईल. (५०)

केवळ ज्ञानच असे आहे की जेथे खंडता (विस्मृती) नसते. परत केवळ ज्ञानच असे आहे की जेथे खंडता (विस्मृती) नसते. (५१)

ज्ञानाचा अभाव हेच अज्ञानाचे कारण मानले तर हे दोन्ही एकमेकांचे विरुद्ध होतील; म्हणून अज्ञानाचे कारण ज्ञानाचा अभाव असणे शक्य नाही. (५२)

ज्याप्रकारे प्रकाश आणी अंधार एका ठिकाणी असणे संभवत नाही, त्या प्रकारे "मी"चे ज्ञान आणी अज्ञान दोन्ही भिन्नत्व (खंडत्व) चे कारण होऊ शकत नाही. (३३)

जर भिन्नत्व (खंडत्व) चे कारण "मी"चे ज्ञान आहे तर तेथे अज्ञान कसे राहू शकेल? जर भिन्नत्व (खंडत्व) ला "मी"चे अज्ञान कारण नाहीये तर जागृतावस्था आणी स्वप्नावस्था भासमान व्हायला नको. (५४)

"मी"मध्ये ज्ञान आणी अज्ञान दोन्ही असू शकत नाहीत. ज्ञान आणी अज्ञान या दोन्हींचे साहचर्य असले तर जगात कार्याची उत्पत्ती होणे संभव नाही. (५५)

"मी" भासमान न होण्याचे मुख्य कारण हे आहे की कारणाबरोबर कार्य भासत नाही. म्हणून "मी"च्या विषयी काहीही स्पष्ट नसल्याने "मी" एक मात्र सत्य आहे. त्यात भिन्नत्व नाहीये. (५६)

विशेष — "मी" ज्ञान आणी अज्ञानरहित एक मात्र सत्य आहे, ह्याचे कारण हे आहे की : (१) जर "मी" अज्ञानरूप आहे तर त्यात स्वतःची विस्मृती होण्याने भिन्नत्व दिसायला हवे; परंतु तसे नाहीये. (२) जर "मी" ज्ञानस्वरूप आहे तर ज्ञानास काहीतरी कारण असायला हवे. कारणाच्या अभावाने कार्याचे अस्तित्व नसते. परंतु असेही नाहीये.

"मी" स्फुरणाच्या आधीही "मी"चा अभाव नव्हता. म्हणून "मी" विस्मृतीरहित असल्याने अज्ञानरूप नाहीये. "मी" स्मृतीरूप असूनही कारणाच्या अभावाने देखील कार्यरूपाने भासमान आहे, अर्थात "मी"च्या बोधासाठी कुठल्याही कारणाची आवश्यकता नसते. कारणाच्या अभावाने देखील कार्यरूपाने भासत असल्याने "मी" एक मात्र सत्य आहे. (५७)

"मी" स्वभावत: ब्रह्मच.

"मी" एक मात्र आहे. म्हणून "मी"मध्ये भिन्नत्वाची कल्पना देखील केली जाऊ शकत नाही. ते निर्विकल्प आणी अनंत ब्रह्म अभिन्न रूपाने "मी"च आहे. (५८)

"मी"च्या ज्ञानमात्र स्वरूपात भिन्नत्वाचा अभाव असून एकरूपता आहे. म्हणून श्रुती म्हणते की "मी" स्वयम् ब्रह्म आहे आणी सर्वकाही ब्रह्मच आहे. (५९)

दोरीवर होणाऱ्या सर्पाचा भास दोरीचे अस्तित्व दर्शवतो. दोरी आणी सर्प वेगवेगळे म्हणणे म्हणजे वास्तविक पाहता दोरीवर सर्पभावाचे आवरणच आहे. (६०)

ब्रह्मतत्त्वावर आरोपित "अहं", "सर्व" — सारे ब्रह्मच आहे; आणी"अहं", "सर्व" हे ब्रह्म जरी असले तरी त्यांच्या अभावीही एकच ब्रह्म उरते. (६१)

तोच ब्रह्म "मी"

वास्तविक पाहता भेद-अभेद, तिन्ही अवस्था (जागृतावस्था, स्वप्नावस्था आणी सुषुप्तावस्था) च्या पूर्वी "मी"च होते. "न किंचिद् भावनाकारं" — अर्थात कुठल्याही प्रकारच्या भावनेच्या रहित राहणे हा ब्रह्माचा स्वभावच असल्याने तोच ब्रह्म "मी" आहे. (६२)

वास्तविक पाहता ज्ञान-अज्ञान, तिन्ही अवस्था (जागृतावस्था, स्वप्नावस्था आणी सुषुप्तावस्था) च्या पूर्वी "मी"च होते. "न किंचिद् भावनाकारं" — अर्थात कुठल्याही प्रकारच्या भावनेच्या रहित राहणे हा ब्रह्माचा स्वभावच असल्याने तोच ब्रह्म "मी" आहे. (६३)

वास्तविक पाहता उपस्थिति-अनुपस्थिति, तिन्ही अवस्था (जागृतावस्था, स्वप्नावस्था आणी सुषुप्तावस्था) च्या पूर्वी "मी"च होते. "न किंचिद् भावनाकारं" — अर्थात कुठल्याही प्रकारच्या भावनेच्या रहित राहणे हा ब्रह्माचा स्वभावच असल्याने तोच ब्रह्म "मी" आहे. (६४)

वास्तविक पाहता बद्ध-मुक्त, तिन्ही अवस्था (जागृतावस्था, स्वप्नावस्था आणी सुषुप्तावस्था) च्या पूर्वी "मी"च होते. "न किंचिद् भावनाकारं" — अर्थात कुठल्याही प्रकारच्या भावनेच्या रहित राहणे हा ब्रह्माचा स्वभावच असल्याने तोच ब्रह्म "मी" आहे. (६५)

वास्तविक पाहता कल्पित तिन्ही अवस्थांच्या (जागृतावस्था, स्वप्नावस्था आणी सुषुप्तावस्था) पूर्वी "मी"च होते. "न किंचिद् भावनाकारं" — अर्थात कुठल्याही प्रकारच्या भावनेच्या रहित राहणे हा ब्रह्माचा स्वभावच

असल्याने तोच ब्रह्म "मी" आहे. वास्तविक पाहता माया (विद्या)-अविद्या, जीव-ईश, पिंड-ब्रह्मांड या सर्वांशी "मी"चा कुठल्याही प्रकारचा संबंध नाहीये. "न किंचिद् भावनाकारं" — अर्थात कुठल्याही प्रकारच्या भावनेच्या रहित राहणे हा ब्रह्माचा स्वभावच असल्याने तोच ब्रह्म "मी" आहे. (६६)

"मी"च्या मूळरूपाचा बोध

अखिल विश्वात जे कांही स्थूलरूपाने भासत आहे अशा ज्ञानस्वरूपाला "मी"-"मी" म्हणून मानणे चुकीचे आहे. म्हणून जीवात्म्याने स्वतःमध्ये "मी"च्या मूळरूपाचा बोध जागृत ठेवून तो जरी प्रापंचिक कर्मे करीत राहिला तरी तो देहबंधनापासून मुक्त राहू शकतो. (६७)

"मी"च्या बोधाने प्रकट होणारा "मी"चे स्वरूप नाहीये. हा प्रकट होणारा बोध व्यर्थ आहे कारण हे सर्व मायेमुळे उत्पन्न झालेले मिथ्या रूप आहे. या बोधाच्या पूर्वी जो प्रकट नव्हता तो "मी" अरूपच आहे. जिथे "मी" हा विचार देखील उत्पन्न होत नाही तेच माझे स्वरूप आहे. (६८)

जर त्या एकत्वाच्या अवस्थेत “मी ब्रह्म आहे” हा भाव देखील उत्पन्न होत नाही, तर त्या निर्विकल्प अवस्थेत “मी जीव आहे” हा भाव उत्पन्न होणे कसे संभव आहे? त्या अद्वय स्थितीत विश्वोत्पत्ती अर्थात सृष्टिकार्य होणे कधीही संभव नाहीये. म्हणून त्या अवस्थेत जड देहाच्या भावनेची मिथ्या कल्पना कशी संभवेल? (६९)

"मी"ची स्फूर्ती न होणे हेच सत्य

क्षणार्धाकरिता देखील "मी"ची स्फूर्ती न होणे हेच सत्य आहे. "मी"-स्वयंस्फूर्तीचा बोध जो सर्वत्र भासमान आहे ते मायेचे मिथ्या कार्य आहे. "मी" स्वयंसर्वत्र आणी सर्वदा केवळ ज्ञानस्वरूपात राहतो. त्या अवस्थेत स्फूर्ती, जगत (विश्व) आणी अनेकत्वाची निर्मितीदेखील होत नाही. म्हणून स्फूर्ती, जगत (विश्व) आणी अनेकत्वाचा बोध व्यर्थ बडबडच आहे. (७०)

स्वतःमध्ये असलेली "मी" ही स्फूर्तीच जीव-ईश भेदाचे कारण आहे. स्फूर्ती-रहित "मी", जेथे कसलाही बोध नसतो, ते अभिन्नत्व दर्शवते. सर्वसाधारणपणे "मी" सर्वत्र एकरूपाने विद्यमान असल्याने "मी" पासून कांहीही वेगळे नाही. "मी" ह्या बोधात अरूपता असल्यामुळे कधीही "स्त्री-पुरुष" भेद उत्पन्न होत नाही. (७१)

"मी"च नित्य कायमचे सत्य

मायेच्या सर्व खोडकर कार्याकडे निश्चयपूर्वक दुर्लक्ष करून, "मी"च नित्य कायमचे सत्य आहे व त्या वाचून सर्व कांही अनित्य असल्याने त्याला सोडून द्यावे. माया-अविद्या आणी त्यांचे सर्व कार्य भ्रममूलकच आहेत. "मी"मध्ये माया-अविद्येच्या कार्याला कांहीही औचित्य नसल्याने सर्व कांही मिथ्याच आहे. (७२)

"मी" स्वयंपरिपूर्ण

"मी" एकरूपाने स्वयंपरिपूर्ण आहे आणी अन्य कुठल्याही मायाजनित कार्याचे "मी"मध्ये स्थान नाहीये. जर स्वतः मायेलाच "मी"मध्ये स्थान नाहीये, तर "मी"मध्ये मायाजनित असणारी स्फूर्ती संभवेल कशी? माया व मायाजनित सर्व कार्य खोटे आहे; तसेच "मी"मध्ये विद्येलाही स्थान नसल्याने सर्व कांही असार असून "मी"च एक साररूप आहे. (७३)

॥ इति श्रीरामदासकृपान्वितेन श्रीश्रीधरस्वामीना विरचिते स्वात्मनिरुपणे

तृतीयप्रकरणं संपूर्णम्॥

॥श्रीरामसमर्थ॥

स्वात्मनिरुपण

प्रकरण-४

"मी" सनातन सत्य स्वरुप ब्रम्ह

"मी" सत्य आनंद ज्ञान स्वरूप अद्वय ब्रह्म

"मी" अखंड परिपूर्ण सच्चिदानंदस्वरूपच आहे. परंतु ह्याचा असा अर्थ नाही की "मी" दृष्य पदार्थ आहे. पण "मी"च्या जाणण्यावाचून कांहीही जाणण्यासारखे नाही. (१)

हे संपूर्ण विश्व अविद्येच्या विकाराने ग्रस्त असलेल्या मनाचा खेळ आहे. ज्याच्या अस्तित्वाने मन प्रकाशित आहे ते सत्यस्वरूप ब्रह्म "मी" आहे. (२)

जीव-ईश भाव क्रमशः अविद्या आणी मायेने ग्रस्त आहे. जीव-ईश भाव भासण्याचे कारण ते सत्यस्वरूप ब्रह्म "मी" आहे. (३)

मायेपासून सदैव मुक्त, सर्व उपाधिरहित आणी सर्वांचा प्रिय असा आनंदरूप ब्रह्म "मी" आहे. (४)

"मी"च्या खऱ्या अज्ञानाने हे संपूर्ण विश्व भासीत होते; "मी" हा एकमात्र स्वप्रकाशित ज्ञानस्वरूप ब्रह्मच आहे. (५)

सुषुप्तीत ज्ञान-अज्ञान स्थिती ज्या प्रकाशाद्वारे ज्ञात होतात आणी ज्या प्रकाशामुळे तिन्ही अवस्था (जाग्रत, स्वप्न व सुषुप्ती) देखील ज्ञात होतात, ते अद्वय ब्रह्म "मी" आहे. (६)

"मी" तिन्ही अवस्थेत स्वप्रकाशित

"मी"ला प्रत्यभिज्ञा अर्थात स्वप्रकाशित म्हणतात. कारण "मी" सुषुप्तीचे स्मरण, ज्ञान-अज्ञान आणी पूर्वानुभव या सर्वांना सांभाळून ठेवतो. (७)

तसेच "मी"मुळेच सुषुप्ती अवस्थेतील अज्ञानस्थितीतून बाहेर आल्यावर अत्यंत सुखाचा अनुभव आणी जागृत अवस्थेत "मी"चा बोध होतो. (८)

सुषुप्ती अवस्थेत "मी"वर आवरण येण्याने "मी"ला काहीही ज्ञात नाही असे भासत होते. सुषुप्तीच्या ह्या रहस्यमय गूढ अवस्थेला भावशून्य स्थिती असे देखील म्हणतात. (९)

सुषुप्ती अवस्थेत अज्ञानासोबत सुखानुभव देखील आहे. हा सुखानुभव जागृत झाल्यावरच ज्ञात होतो. म्हणून सुषुप्ती अवस्थेतही वृत्ती उपस्थित राहते. (१०)

सुषुप्ती अवस्थेत वृत्तीचा अभाव नाहीये. म्हणून वृत्ती परत प्रकट होते. परंतु सुषुप्ती अवस्थेत वृत्ती सूक्ष्मरूपाने उपस्थित असल्याने तिची स्पष्ट अनुभूती होत नाही. (११)

मन आणी इंद्रिये यांच्या संयोगाने जागृत अवस्थेत सुषुप्ती अवस्थेतील वृत्ती शक्तिशाली होते. तीच वृत्ती सुषुप्ती अवस्थेत अत्यंत रहस्यमय रूपात सूक्ष्म असते. (१२)

सुषुप्ती अवस्थेत सूक्ष्मवृत्तीचे अज्ञान "मी"च्या ज्ञानप्रकाशाने प्रकट होण्याचे कारण "मी" स्वतः सिद्ध असून एकमात्र सच्चिदानंदच आहे. (१३)

सत्यात मिथ्यत्वाला स्थान नाहीये आणी मिथ्यत्वाने सत्याचा साक्षात्कार होत नाही. ह्या प्रकारे तिन्ही काळात (भूत, भविष्य आणी वर्तमान) ज्याचे अस्तित्व राहते ते चैतन्यमात्र ब्रह्म "मी"च आहे. (१४)

विद्या-अविद्या, पुरुष-प्रकृती आणी जीव-ईश भाव रहित ब्रह्म च "मी"

जेवढे म्हणून सृष्टीकार्य दिसते ते दोरीवरील सर्पाच्या भासाप्रमाणे आहे. तरीदेखील "मी" मिथ्या भासत नाही. ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (१५)

नाम-रूपाने जे भासीत होते, जे अदृश्य आहे आणी अनुभवाच्या कक्षेत येत नाही, ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (१६)

जे काही घडले आहे ते सर्व अनुभवाच्या कक्षेत येते. जे घडले नाही ते अनुभवाच्या कक्षेत येत नाही. परंतु जे स्वयम् कुठल्याही अनुभवाच्या अतीत आहे ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (१७)

माया आणी अविद्येमुळे जे काही भासीत होते ते सर्व सशाच्या शिंगाप्रमाणे मिथ्या आहे. त्या व्यतिरिक्त जे सत्यस्वरूप ब्रह्म आहे ते स्वयम् "मी" आहे. (१८)

जे सर्वज्ञ (सर्व ज्ञाता) आणी अल्पज्ञ (अल्प ज्ञाता)ही नाही, जे ब्रह्मांड, पिंड, संसारी आणी विरक्त या सर्वाहून भिन्न आहे ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (१९)

जेथे "मी" जीव-ईश, प्रकृती-पुरुष म्हणून वेगळेपणाचे स्फुरण होत नाही, ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (२०)

सत्य अभेद असते, अर्थात सत्यात अन्य भाव नसतो. सत्य सर्वदा अद्वय असते, अर्थात द्वैत रहित असते. अभेद-अद्वय सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (२१)

"मी" वंध्यास्त्रीच्या पुत्राप्रमाणे कार्य-कारण उपाधी रहित आहे. "कार्य-कारण-निर्मुक्तं" अर्थात कार्य-कारण रहित असे ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (२२)

"मी" ज्ञानस्वरूप असल्याने सुषुप्तीचे अज्ञान "मी"मध्ये नाहीये. तसेच "मी" देहकार्य करणारा ही नाही. "मी" स्वयम् देहवासना-रहित सत्यस्वरूप ब्रह्म आहे. (२३)

अज्ञानानेच देहात कामना (ईक्षणा) आणी वासना उत्पन्न होते. हे अज्ञान जिथे नाही ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (२४)

कामना आणी वासनामुळे काम आणी क्रोध हे विकार उत्पन्न होतात. जेथे काम-क्रोध विकारांचे अस्तित्वही नाही ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (२५)

"मी" ब्रह्मचारी देहाच्या अतीत

विश्वनिर्मितीरूपी बीज ज्यांस ब्रह्मांडाचा अव्यक्त (ब्रह्मांडाचा महाकारण देह) म्हणतात, तो "मी" नाहीये. विश्वनिर्मितीची वासनाही ज्यात नाही ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (२६)

ब्रह्मांडाच्या अव्यक्त देहावर आवरण आल्याने कामना आदी उत्पन्न होतात. ब्रह्मांडाच्या अव्यक्त देहावर सतत येणाऱ्या आवरणासारखे जेथे काहीही नाही ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (२७)

ब्रह्मांडाचा महाकारण देह (ईश) कामनायुक्त संकल्पापासून ब्रह्मांडाची निर्मिती करतो. कामना आणी संकल्प रहित असे ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (२८)

विशेष — "एकोहं बहुस्यां" हा कामनायुक्त संकल्प आहे.

ज्याप्रकारे व्याप्याचा व्यापकतेशी, प्रेर्याचा प्रेरकतेशी आणी ग्राह्याचा ग्राहकतेशी परस्पर संबंध आहे, परंतु जेथे असे काहीही नाहीये ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (२९)

ज्याला स्वस्वरूपाच्या अज्ञानाने सत्य हे मिथ्या भासते त्याला जीवात्मा म्हणतात. पण जेथे सत्याच्या अभावात "सर्व मिथ्या आहे" असा बोध नित्य स्फुरत असतो ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (३०)

ज्याला स्वतःच्या ज्ञानामुळे सत्य हे सत्यासारखेच भासते त्याला ईश्वर (ब्रह्मांडाचा कारणदेह) म्हणतात. जे सत्यत्वाच्या वेगळेपणाच्या बोधापासूनही मुक्त आहे ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (३१)

निराधार, निराकार, निष्प्रपंच, निरामय, अखंडानंद आणी अद्वय असे ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (३२)

स्थूल (जागृत) शरीराचा आधार अन्न आहे. सूक्ष्म (स्वप्न) शरीराचा आधार वासना आहे. कारण देहाचा आधार अज्ञान आहे. हे सर्व ज्यामुळे ज्ञात होते ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे.(३३)

ब्रह्मांडाचे कोंब अर्थात अंकुर "मी" आहे आणी"मी"च्या स्फूर्तीचे कारण माया (मूळमाया) आहे. माया आणी"मी" स्फूर्तीपासून मुक्त असे ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (३४)

जसे भिंतीवर लावलेल्या चित्रामुळे भिंतीचा काही भाग झाकला जातो तसे ब्रह्मांडरूपी चित्रामुळे ब्रह्मरूपी भिंतीचा काही भाग झाकला जातो. ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (३५)

बुद्धी, इंद्रिये, प्राण, देह, विस्मृती आणी अविवेक हे सर्व अविद्यात्मक असल्याने या सर्वांचे अस्तित्व जिथे नाही ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (३६)

सर्वेश्वरादींचे महात्म्य, स्मृती, ज्ञान आणी विवेक हे सर्व विद्यात्मक असल्याने या सर्वांचे अस्तित्व जिथे नाही ते सत्यस्वरूप ब्रह्म स्वयम् "मी" आहे. (३७)

विशेष: मायेची दोन रूपे आहेत—विद्या आणी अविद्या. विद्यात्मक—परमेश्वराचे माहात्म्य, आत्मस्मृती, ज्ञान आणी विवेक. अविद्यात्मक—बुद्धी, इंद्रिये, प्राण, देह, विस्मृती आणी अविवेक.

"मी" प्रत्यग्रूप (स्वस्वरूप), चिदाकाश (चेतनेने परिपूर्ण असलेले आकाश), स्वतःपूर्ण, निराकुल (उत्पत्ती-रहित) आणी अखंड सच्चिदानंद ब्रह्म आहे. (३८)

साक्षित्वाची बोधावस्था आणी नित्यमुक्त अबोधावस्था हे दोन्ही मायेचे लक्षण आहे. हे लक्षण जिथे नाही ते सत्यस्वरूप ब्रह्म "मी" आहे. (३९)

श्रोत्रादि इंद्रियांनी गतिमान असलेल्या देहास पिंडाचा स्थूल देह म्हणतात आणी पिंडाच्या स्थूल देहाभिमानीस "विश्व" म्हणतात. पिंडाच्या स्थूल देहाभिमानी विश्वाच्या अतीत ब्रह्मच "मी" आहे. (४०)

विशेष: ब्रह्मांडाचा स्थूल देह, विराटाच्या देहाभिमानीला "विश्व" म्हणतात.

स्थूल शरीर प्रतिबिंबरूपात भासीत होण्यास सूक्ष्म देहच कारण आहे. स्वप्नावस्थेत सूक्ष्म देहच स्थूल देहाप्रमाणे भासीत होतो. पिंडाच्या स्वप्नावस्था युक्त सूक्ष्म देहाभिमानीला "तैजस" म्हणतात. या सर्वांच्या अतीत असलेले ब्रह्मच "मी" आहे. (४१)

विशेष: ब्रह्मांडाच्या सूक्ष्म देहाच्या अभिमानीला "हिरण्यगर्भ" म्हणतात आणी पिंडाच्या सूक्ष्म देहाच्या अभिमानीला "तैजस" म्हणतात.

पिंडात चैतन्य आणी आनंदाचा कारक कारण देह (सुषुप्ती अवस्था) आहे. पिंडाचा कारण देह (सुषुप्ती अवस्था) यांच्या देहाभिमानीला "प्राज्ञ" म्हणतात. या सर्वांच्या अतीत असलेले ब्रह्मच "मी" आहे. (४२)

विशेष: ब्रह्मांडाच्या कारणदेहाच्या अभिमानीला "ईश्वर", आणी पिंडाच्या कारण देहाच्या अभिमानीला "प्राज्ञ" म्हणतात.

दिग्पाल अर्थात दिशेच्या देवतांकडून ब्रह्मांडाची निर्मिती होते. दृश्यरूप असल्याने ब्रह्मांडाच्या स्थूल देहाच्या अभिमानीला "विराट" म्हणतात. या सर्वांच्या अतीत असलेले ब्रह्मच "मी" आहे. (४३)

ज्याप्रकारे प्रतिबिंबाच्या आभासाने सूक्ष्म अथवा अदृश्य वस्तू प्रगट होते त्याच प्रकारे ब्रह्मांडाचा सूक्ष्म देह "महत" पासून सूत्रात्मा प्रकट होतो. परंतु या सर्वांच्या अतीत असलेले ज्यास ब्रह्म म्हणतात ते "मी"च आहे. (४४)

चैतन्ययुक्त सुखानुभवाचा प्रेरक ब्रह्मांडाचा अव्यक्त देह (कारण देह) आहे. ब्रह्मांडाचा अव्यक्त देहाभिमानीला "ईश्वर" म्हणतात. परंतु या सर्वांच्या अतीत असलेले ज्यास ब्रह्म म्हणतात ते "मी" आहे. (४५)

ज्याप्रकारे पिंडदेह आणी त्याच्या अवस्थांचा विलय ब्रह्मांडाच्या चार देह आणी त्यांच्या चार अवस्थांमध्ये होतो त्याच प्रकारे मायेमध्ये अहं-ब्रह्म स्फूर्ती विलीन होते. अहं-ब्रह्म स्फूर्ती-रहित निर्विकल्प ब्रह्म "मी" आहे. (४६)

पिंडात ब्रह्मांड समाविष्ट आहे. ब्रह्मांडाचे सूक्ष्म शरीर, सूत्रात्मा (हिरण्यगर्भ) आहे. ब्रह्मांडाचे कारण शरीर अव्यक्त आहे. पण या सर्वांपेक्षा पलीकडे ज्यास निरंतर ब्रह्म म्हणतात, ते म्हणजे "मी" आहे. (४७)

पिंडाचा स्थूल देह "विश्व", ब्रह्मांडाचा स्थूल देह "वैश्वानर (अग्नी)" मध्ये विलीन होतो. पिंडाचा सूक्ष्म देह "तैजस", ब्रह्मांडाच्या सूक्ष्म देहात—सूत्रात्मा (हिरण्यगर्भ) यात विलीन होतो. पिंडाचा कारण देह "प्राज्ञ", ब्रह्मांडाच्या कारणदेहात (अव्यक्तात) ईश्वरात विलीन होतो. परंतु या सर्वांच्या अतीत असलेले ज्यास निरंतर ब्रह्म म्हणतात ते "मी" आहे. (४८)

ह्याप्रकारे क्षेत्रज्ञ (पिंडात राहणारा आत्मा) आणी परमात्मा यांचे ऐक्य होते. असे कार्य-कारणभाव-रहित नित्य अस्तित्वात राहणारे ब्रह्म "मी" आहे. (४९)

अचिंत्य, अखंडरूपाने स्वसंवेद्य, अद्वयानंद, निर्विकार, निरालंब, सनातन ब्रह्मच "मी" आहे. (५०)

सर्व प्रकारच्या उपाधीं पासून नित्यमुक्त, केवळ सत्तामात्राने भासीत होणारे आणी"मी"-"तु" भावना-रहित सनातन ब्रह्म "मी" आहे. (५१)

जेथे अन्य काहीही भासीत नाही; स्वतःचे स्वरूपच असते, जे स्वयम् स्वतःसिद्ध आहे ते सनातन ब्रह्म "मी" आहे. (५२)

कामनायुक्त कर्मांचा परित्याग करून निष्काम कर्मांनी जडतत्त्वाची शुद्धी झालेला स्थूलदेह-रहित सनातन ब्रह्म "मी" आहे. (५३)

द्वैतभावनेचा परित्याग केल्याने लिंगदेह (स्थूल, सूक्ष्म, कारण आणी महाकारण देह) याची परिपूर्ण शुद्धी होऊन लिंगदेहरहित सनातन ब्रह्म "मी" आहे.(५४)

स्वस्वरूप ज्ञानानंतर अज्ञान शेष राहत नाही. अज्ञानरहित सनातन ब्रह्म "मी" आहे. (५५)

"मी" स्वतःच्या ज्ञानानेच चिन्मात्र (चेतनायुक्त) असल्याने चिन्मात्रतेचे कारण देह आहे हे नष्ट झालेले आहे. जे चिन्मात्रतेचे कारणदेह नाही ते सनातन ब्रह्म "मी" आहे. (५६)

धन, पत्नी, पुत्र आदींच्या इच्छेचे कारण "मी"चे अज्ञान आहे. जेथे असे अज्ञान नाही ते सनातन ब्रह्म "मी" आहे.(५७)

भ्रमामुळे संसारात लोक धन, पत्नी आदींचा उपभोग घेतात. परंतु जेथे हे भ्रमयुक्त संसारिक उपभोग नाहीत ते सनातन ब्रह्म "मी" आहे.(५८)

स्वर्गादी प्राप्तीच्या इच्छेने काही लोक सत्कर्म करतात. स्वर्गादी सुखप्राप्तीची इच्छा जेथे उत्पन्न होत नाही ते सनातन ब्रह्म "मी" आहे. (५९)

रोग, स्त्री-पुरुष, जन्म-मृत्यु हे सर्व पिंडदेहाच्या स्थूल देहाशी संबंधित आहेत. स्थूल शरीराची घाण जेथे नाही ते सनातन ब्रह्म "मी" आहे. (६०)

देहसुख प्राप्त करण्याची इच्छा पिंडदेहाशी संबंधित आहे. पिंडदेहरहित स्वतःच्या आनंदातच रमणारे ते सनातन ब्रह्म "मी" आहे. (६१)

अज्ञानवृत्तीचे कारण देहभाव आहे. जो सदैव चिन्मात्रस्वरूप आहे व जिथे देहभाव नाही असे सनातन ब्रह्म "मी" आहे. (६२)

वेदांतात वर्णिलेल्या अन्वय आणी व्यतिरेकाद्वारे स्वस्वरूपाची प्रामाणिकता सिद्ध केली जाते. अन्वय आणी व्यतिरेक-मुक्त सनातन ब्रह्म "मी" आहे. (६३)

सृष्टी, स्थिति आणी लय हे माया-जनित कार्य आहे. मायरूपी उपाधीरहित सनातन ब्रह्म "मी" आहे. (६४)

|| इति श्री रामदासकृपान्वितेन श्रीधरस्वामिना विरचिते स्वात्मनिरूपणे

चतुर्थ प्रकरणं संपूर्णम् ||

चार देह	ब्रम्हांड	पिंड
महाकारण देह	देह- साक्षी , देहाभिमानी ईश ("अंतरात्मा")	देह-साक्षी, देहाभिमानी जीव("अंतरात्मा")
कारण देह (अव्यक्त देह)	देह-अव्यक्त ,देहाभिमानी-ईश्वर	देह-अव्यक्त, देहाभिमानी-प्राज्ञ
सूक्ष्म देह (अव्यक्ता-व्यक्त)	देह-महत अथवा सूक्ष्मात्मा, देहाभिमानी-हिरण्यगर्भ अथवा सूत्रात्मा	देह- तैजस, देहाभिमानी-हिरण्यगर्भ
जाग्रत स्थूलदेह	स्थूलदेह -ब्रह्मांड देहाभिमानी-विराट अथवा वैश्वानर	देह- पिंड , देहाभिमानी- विश्व

श्री राम समर्थ

स्वात्मनिरुपण

प्रकरण – ५

"मी" चे अद्वैतत्व

"मी" स्वप्रकाशित ब्रम्ह

ज्यामुळे स्वतःचे अस्तित्व ज्ञात होते ते ज्ञान आहे. कारण "मी" च्या स्वतःच्या ज्ञानानेच "मी" ला अन्य सर्व काही ज्ञात होते. जिथे स्वतःच्या अस्तित्वाचे ज्ञान नसते ते जड असते. जड वस्तू कुठल्याही अन्य विषयाचे ज्ञान प्राप्त करण्यास असमर्थ ठरते. (१)

जड वस्तू कुठल्याही अन्य वस्तूचे ज्ञान प्राप्त करू शकत नाही. "मी" स्वयम् ज्ञानस्वरूप असल्याने "मी" ला सर्वदा स्वतःचे ज्ञान असतेच. (२)

"मी" ला "मी" मुळेच चराचर सृष्टीचे ज्ञान संभव आहे. "मी" ला स्वतःच्या ज्ञानाचे कारण "मी" च्या ज्ञानाव्यतिरिक्त अन्य काहीही नाही. (३)

"मी" म्हणून जे काही आहे ते "मी" मध्येच समावून जाते. "मी" च्या सच्चिदानंद स्वरूपात कुठल्याही अन्य प्रकारची जड संवेदना नाही. (४)

"मी" च्या ज्ञानमात्र स्वरूपात दृश्याचे अस्तित्व असणे कसे संभव आहे? म्हणून सुषुप्ती ही "मी" च्या अज्ञानालाच दर्शविते अर्थात "मी" च्या ज्ञानस्वरूपावर सुषुप्तीमध्ये आवरण येते. (५)

सुषुप्ती अवस्थेत काहीही ज्ञात न होणे याचे मुख्य कारण दृश्याचे "मी" वर आलेल्या आवरणात अर्थात अज्ञानात विलीन होणे आहे. सुषुप्ती अवस्थेत "मी" स्वयम् "मी" मध्ये सामावल्यावर जागृतावस्थेत पुन्हा प्रकट होतो. (६)

"मी" च्या स्वयम् "मी" ने ज्ञेय (ज्ञात करण्याचा विषय) चे ज्ञान होते. "मी" चे स्वयम् "मी" मध्ये विलीन होणे देखील ज्ञेयच आहे. (७)

भानाचा अभाव देखील ज्ञेय नाही. भानाच्या अभावात देखील स्वतः "मी" च राहतो. म्हणून अखंड ज्ञानस्वरूप चैतन्यरूप ब्रह्म "मी" च आहे. (८)

"मी" मध्ये जे काही "मी" म्हणून भासमान होते तेथे स्वतः "मी" चा प्रकाशच आहे. "मी" ला "मी" च्या भानाचे कारणही "मी" चाच स्वतःचा प्रकाशच आहे. (९)

"मी" द्रष्टा असून दृश्याला प्रकाशित करतो. या प्रकारे जे भासते ते दृश्य विश्व आहे. देहेंद्रिय, बुद्धी, मन यांतील व्यापित ज्ञान "मी" चेच आहे. (१०)

"मी" सर्वांना प्रकाशित करतो. "मी" मध्ये कुठल्याही प्रकारचा अन्य भाव नाही. म्हणून "मी" अद्वय आणी ज्ञानमात्र आहे. त्यामुळे हे सत्य आहे की "मी" ब्रह्मच आहे. (११)

दृश्याचा कारक "मी" चे ज्ञान आहे असे ज्ञात होते, परंतु असे काहीही नाही. जी अस्तित्वरहित असूनही भासवते तिला माया म्हणतात. (१२)

मायारूपी आरशात "मी" चे प्रतिबिंब द्वैत भासविते. त्रिपुटी (दृश्य, द्रष्टा आणी दर्शन) ला जो दर्शवितो त्याला ईश म्हणतात. (१३)

गुळाच्या एका कणात गुळाची चव गुळाच्या ढेपासारखीच असते. त्याच प्रकारे दृश्य, द्रष्टा आणी दर्शन या त्रयीचे कार्य "मी" च्या सत्तेने प्रकाशित आहे. (१४)

ईश माया (विद्या) उपाधीयुक्त आहे आणी जीव अविद्या उपाधीयुक्त आहे. परंतु "मी" स्वतः माया (विद्या) आणी अविद्या या उपाधींपासून मुक्त असून निर्विकाररूपाने सर्वांमध्ये व्याप्त आहे. (१५)

बुद्धीमध्ये "मी" स्वतःच्या प्रतिबिंबाने द्वैतरूपाने भासीत आहे. "मी" चे प्रतिबिंब जे त्रिपुटी रूपाने दृश्य, द्रष्टा आणी दर्शन भासविते त्याला जीव म्हणतात. (१६)

निर्विकाररूपाने जो भासीत होतो तो "मी" च आहे. "मी" च्या अनुपस्थितीत जड पदार्थाचा बोधही होत नाही आणी "मी" च्या अनुपस्थितीत जड पदार्थाचे अस्तित्वही नसते. (१७)

"मी" जीव-शिव, त्रिपुटी, तीन अवस्थेपेक्षा वेगळा

"मी" चा स्वयम् "मी" शी परिचय होणे हीच निर्विकार अवस्था होय. अशाप्रकारे "मी" स्वतः अद्वय आहे. "मी" मध्ये माया, जीव-ईश हा काहीच विचार नाही. (१८)

"मी" मध्ये मायाजन्य कार्य, मायावी सृष्टी आणी मायाजन्य कल्पनेला काहीच स्थान नाही. तसेच जीव, त्याच्या तीन अवस्था (जागृत, स्वप्न आणी सुषुप्ती) आणी बंध-मोक्षही नाहीत. (१९)

"मी" मध्ये सर्वाचे समाविष्ट

देशाच्या परिसीमेच्या अतीत असणारे व्यापकत्व, काळाच्या परिसीमेच्या अतीत असणारे नित्यत्व आणी वस्तूच्या परिसीमेच्या अतीत असणारे सर्वात्मकत्व — हे सर्व "मी" मध्ये समाविष्ट आहे. (२०)

"मी" ने सर्व वस्तूंचा बोध होतो आणी सर्वांपासून "मी" चाच बोध होतो. सर्वांमध्ये सदा सर्वदा समाविष्ट असूनही "मी" सर्वाहून वेगळा आहे. (२१)

कर्म करण्यास स्थूल देह आहे आणी देहाच्या मार्फतच कर्म केले जाऊ शकते. कर्म करण्याचा आभास सूक्ष्मदेहाद्वारे होतो आणी कर्माचा आभास सूक्ष्म देहातच राहतो. (२२)

अज्ञानाला जीव हे नाव आहे आणी जीवदशेत अज्ञान भासते. जीवात्म्यास स्वतः "मी" चे अज्ञानच बंधन आहे आणी अज्ञानाचा त्याग करताच "मी" ज्ञानमात्र आहे. (२३)

"मी" ज्ञानमात्र आणी अद्वय असल्याने त्यात अन्यत्वाचा भाव नाही. "मी" मध्ये जीवदशेतील अज्ञान आणी अज्ञानजन्य कार्य दोन्ही नाहीत. "मी" एकत्वभावाने नित्य सच्चिदानंदस्वरूप आहे. (२४)

"मी" स्वतःची चेतना ईश्वराला देऊन सृष्टीकार्याचे संचालन करतो. जेव्हा तोच ईश्वर ब्रह्मांडाच्या सृष्टीकार्याच्या संकल्पाचा त्याग करतो, तेव्हा ब्रह्मांडाचा प्रलय होतो. (२५)

"मी" च्या चैतन्यस्वरूपावर माया, ईश्वर आणी त्याचे कार्य असे काहीही नाही. "मी" तिन्ही काळात अद्वय आहे आणी अद्वय रूपातच भासतो. (२६)

"मी" द्वारा उत्पन्न माया "मी" च्या आधाराने राहते आणी शेवटी "मी" मध्येच लीन होते. परंतु "मी" सदैव चैतन्यरूपातच राहतो. (२७)

संपूर्ण विश्व मायेपासूनच निर्माण झाले आणी विश्व माया रूपाने असते. "मी" मध्ये मायेचे कुठलेही स्थान नसल्याने "मी" मध्ये मायोपाधित विश्व असणे कसे संभवेल? (२८)

सृष्टी, स्थिती आणी लयास माया आणी तिची प्रकृती हीच कारणीभूत आहे. प्रकृती त्रिगुणात्मक आहे आणी संपूर्ण सृष्टी त्रिगुणात्मक आहे. (२९)

"मी" च्या आधाराने माया स्वतः भिन्नत्वदृष्टीने व्यष्टि (व्यक्तिगत)–समष्टि (सर्वात्मक) भावद्वारे कार्यकारणरूपाने विश्वात व्यवहार करते. (३०)

माया कर्तृत्व आणी भोगतृत्व या भावनेने सत्य भासीत होते, परंतु माया सत्य नाही. "मी" मध्ये मायेची मायिक कार्ये नाहीत. "मी" निर्गुण आणी निष्क्रिय आहे. (३१)

असे म्हणतात की "मी" (अहं) स्फूर्तीपासून पिंड-ब्रह्मांड अस्तित्वात येतात. पण "मी" मध्ये अहं-स्फूर्ती नसल्याने "मी" मध्ये पिंड-ब्रह्मांड देखील नाही. (३२)

अहं-स्फूर्तीनिच जीव आणी शिव भाव आहेत आणी सृष्टीनिर्मितीचे कारण देखील तेच आहे. परंतु निर्विकल्प स्थितीत हे काहीही नाही आणी"मी" सदा सर्वदा अहं-स्फूर्ती रहित आहे. (३३)

अस्ति अर्थात अस्तित्वरूपाने, भाति अर्थात भासमान आणी प्रिय असल्याने सुखानुभव — या सर्वांचे कारण "मी" च आहे कारण "मी" स्वयम् सच्चिदानंदस्वरूप आहे. (३४)

"मी" ही स्मृती "मी" पासूनच प्रगट होते पण "मी" स्वतः स्मृतीचा आदि आणी अंती तसाच राहतो. "मी" चिद्घन असल्याने स्मृती उत्पत्ती आणी लय "मी" ला नाही. (३५)

"मी" मध्ये स्मृतीचा लय आणी उत्पत्ती कसे संभव आहे? "मी" स्वयं अनादि-अनंत असल्याने तो पूर्वीपासून जसा आहे तसाच राहतो. (३६)

"मी" च्या सच्चिदानंदस्वरूपात "मी" ही स्मृती लय होण्याचे कारण स्वतः "मी" च आहे. तरीही त्या अवस्थेत स्वभावतः तेथे आभासरहित "मी" च राहतो. (३७)

"मी" (अहं) स्फूर्ती रहित अवस्थेत एक सच्चिदसुखात्मक ब्रह्मच असते. तेच सत्य "मी" आहे. तेथे स्मृती व स्फूर्ती काहीही नसते. (३८)

"मी" जीव-शिव आणी माया-अविद्या नाही. "मी" या सर्वांचा उत्पत्तीकर्ता ही नाही. दृश्य प्रकाशित करणारा ही नाही. "मी" अखंड सुखस्वरूप ब्रह्मच आहे. (३९)

"मी" निष्कलंक, निरांतक, निर्विशेष, निराकुल, निरामय, निराकार, निरहं आणी निर्विकल्प आहे. (४०)

विशेष — निष्कलंक: कलंकरहित, निरांतक: ज्याचा अंत नाही, निर्विशेष: कुठल्याही प्रकारच्या विशेषतारहित, निराकुल: ज्याला कुठलाच वंश अर्थात जाती, वर्ण, धर्म, संप्रदाय नाही अर्थात या सर्वांच्या अतीत जो आहे, निरामय: निर्मल, निराकार: आकाररहित, निरहं: अहंबोधरहित.

नित्यशुद्ध, विमुक्त, अखंडानंद, अद्वय, सत्तामात्र, स्वसंवेद्य, नित्य आणी चैतन्यघन ब्रह्म "मी" च आहे. (४१)

मायाजन्य कार्यात "मी" रहस्यमय रूपाने

"मी" स्मृती, पिंड-ब्रह्मांड, सर्व प्रकारची दृश्ये, जीव-ईश आणी बंध-मोक्ष आदींना एक सूत्रात बांधून ठेवतो. (४२)

वरील सर्वांचा "मी" प्रकाशक असूनही मला त्यांचा संग नसतो. सूर्य सर्व दृश्य पदार्थांना प्रकाशित करतो परंतु सूर्याचा दृश्य पदार्थांशी कुठलाही संबंध नसतो. (४३)

निस्संग "मी" कोट्यवधी जीव-शिव अवस्थांनी ग्रसित नसतो. हे त्या प्रकारे सत्य आहे ज्याप्रमाणे दोरीवर आवरण येण्याने तिच्यावर अनंत सर्प जरी भासत असले तरी शेवटी एक दोरीच राहते. (४४)

ज्याप्रमाणे उसात साखर व्याप्त आहे व उसातील साखर अन्य कशाचीही अपेक्षा करीत नाही, तसेच मायाजन्य कार्यात "मी" रहस्यमय रूपाने व्याप्त आहे. (४५)

आकाशात अनेक ढग दिसतात पण आकाशाला ढगांचा संग लागत नाही आणी ढगही आकाशासारखे होत नाहीत. (४६)

"मी" मध्ये मायाजन्य अनेक आकार दिसतात. परंतु "मी" ला मायेचा संग लागत नाही आणी"मी" माये प्रमाणे देखील नाही. (४७)

ज्याप्रमाणे साखर स्वतःची गोडी सोडून अन्य कसलीही इच्छा करीत नाही त्याच प्रकारे "मी" एक आनंद सोडून पिंड-ब्रह्मांडाची कसलीही इच्छा करीत नाही. (४८)

ज्याप्रमाणे साखरेशी संपर्क झाल्याने कुठलाही पदार्थ गोड होतो त्याच प्रकारे माया आणी तिच्या कार्यापासून आनंदप्राप्तीचे कारण "मी" आहे. (४९)

ज्ञानामृत मुमुक्षूच्या सर्व प्रकारच्या दुःखांना नष्ट करते आणी मुमुक्षूला अमरत्व प्रदान करते, परंतु अमरत्व मुमुक्षूच्या गुणधर्मां पासून स्वतःला अलिप्त ठेवते. (५०)

याप्रकारे आनंदस्वरूप "मी" सर्व प्राणिमात्रांच्या दुःखांचा नाश तर करतो परंतु त्यांच्या गुणधर्मांपासून अलिप्त राहतो. (५१)

॥ इति श्री रामदासकृपान्वितेन श्री श्रीधरस्वामीना विरचिते स्वात्मनिरूपणे

पंचम प्रकरणं संपूर्णम् ॥

श्री राम समर्थ

स्वात्मनिरुपण

प्रकरण -६

शक्ती, माया अणि "मी"

"मी" सर्वज्ञ, आनंद स्वरुप व स्वप्रकाशित

"मी"मध्ये आनंदाचे स्फुरण "मी"द्वारेच होते, अन्य कशाने नाही. एकमात्र "मी" स्वयम् सर्वदा अद्वितीय रूपाने राहतो आणी"मी"मध्ये याशिवाय अन्य काहीही नाहीये. जरी सर्वत्र भिन्नता दिसत असली तरी वास्तवात भिन्नता नाहीये. ह्या प्रकारे अन्यात "मी"चेच स्वरूप दिसत असते. (१)

"मी"बद्दल विचार करणारा स्वतः "मी"च आहे. तेथे कोणा अन्याचे असणे संभवत नाही. जरी मानले की कोणी अन्य आहे तरी स्वतः "मी"मध्ये कोणी अन्य असणे संभवत नाही. "मी"मध्ये कोणी अन्य नाहीये आणी"मी"मध्ये जे अन्य भासीत होते त्याचे प्रमुख कारण "मी"मध्ये अन्य रूपाने जे काही आहे ते मुळातच अन्य नसून स्वतः "मी"च आहे. (२)

"मी"ला "मी"चा बोध होणे "मी"चा सहज स्वभाव आहे. हेच "मी"चे स्वरूप आहे. त्यामुळे "मी"चा बोध स्वतःला "मी"पासून भिन्न कसे ठेवू शकतो? जर भिन्न रूपाने "मी"ला "मी"चा बोध होत असेल, तर तेथेही "मी" स्वतः उपस्थित आहेच. स्वतः "मी" स्वेच्छेने उपस्थित असूनही "मी" बोधरूपात राहत नाही. (३)

"मी"मध्ये अन्याचा बोध होणे "मी"मध्ये अन्य भावनेलाच दर्शवते. म्हणून "मी"मध्ये असलेली "मी"ची शक्तीच सर्व ठिकाणी दिसणाऱ्या भिन्नत्वाचे मुख्य कारण आहे. काहीही भिन्न नसूनही जे भिन्नत्व भासते त्याचे मुख्य कारण "मी"ची शक्तीच आहे. "मी"चे स्वरूप अखंड असल्याने "मी"मध्ये कुठल्याही प्रकारच्या द्वैताला स्थान नाहीये. (४)

अदृश्य असूनही जी "मी"चा बोध करून देण्यात सक्षम आहे ती स्वतः "मी"ची शक्ती आहे. "मी"मध्ये व्यर्थपणे जो भिन्नत्वाचा भाव उत्पन्न होतो, तो सत्य सिद्ध होऊ शकत नाही. भिन्नत्वामध्ये द्वैत असल्याने ते सत्य नाहीये. सत्य नेहमी अद्वैत रूपातच राहते. "मी"च्या स्वरूपावर भिन्नत्वाचे खोटे आवरण कधीही संभवत नाही. (५)

"मी"मध्ये अन्याचा बोध "मी"च्या शक्तीमुळेच आहे. परंतु अन्य अर्थात भिन्न भावात आनंद नाहीये. ज्याची अनुभूती भिन्नत्वाने होते ते व्यर्थ आहे. "मी" आनंदस्वरूप आहे म्हणून "मी"चा आनंद "मी"हून भिन्न असू शकत नाही. स्वतः "मी"मध्ये अन्य काहीही नाहीये आणी स्वतः "मी"मध्ये शक्ती, सृष्टी आदी काहीही नाहीये. (६)

जरी दृश्य जगताला पाहून शक्ती ज्ञात होते, अर्थात जगताची निर्मिती कोणा शक्तीपासून झाली आहे हे ज्ञात होते, तरी सत्याचा साक्षात्कार झाल्यानंतर असे म्हणणे व्यर्थ आहे असे वाटते. असत्य नावाचे अन्य काहीही नसल्याने सत्यच एकमात्र आहे. व्यापक रूपाने सर्वत्र सत्यच राहते. (७)

सत्य सदासर्वदा राहते आणी सत्याहून भिन्न काहीही राहत नाही. सत्याच्या सापेक्ष असत्याचे अस्तित्व सशाच्या शिंगाप्रमाणे कल्पना मात्रच आहे. सर्वदा अस्तित्वरूपाने राहणारे सत्य आहे आणी सत्याच्या

सापेक्ष असणाऱ्या असत्याचे काहीही अस्तित्व नाहीये. म्हणून विद्वानांच्या मते सत्य कधीही मिथ्या असू शकत नाही. (८)

विशेष: “ब्रह्म सत्य जगत् मिथ्या” ब्रह्म अर्थात "मी"च एक मात्र सत्य आहे कारण "मी" सदा सर्वदा अपरिवर्तनशील असतो अर्थात एक सारखाच राहतो. परंतु दृश्य जगत परिवर्तनशील असल्याने असत्य अर्थात मिथ्या आहे. मिथ्या म्हणजे सत्याचा अभाव असणे नव्हे. सत्य वस्तूवर असलेल्या आवरणामुळे त्याच्या वास्तविक स्वरूपाचे आकलन न होणे म्हणजे मिथ्या. "मी" ब्रह्मास संबोधित करते.

जगास मिथ्या म्हटले म्हणजे जग नाहीच असे नव्हे. जग दृष्यमान असल्याने त्यास असत्य म्हणणे, अर्थात त्याच्या अस्तित्वाचा अस्वीकार, योग्य नाही.जर असे म्हटले की जग नावाचे काहीच नाहीये, तर तेही परस्परविरुद्ध ठरेल.म्हणून जगाचा आधार "मी"च आहे असे म्हटल्याने स्वभावतः "मी"चे अद्वितीयत्व सिद्ध होते. (९)

जग कार्यरूपाने असूनही शक्तीचे भिन्न रूपाने थोडेही अस्तित्व नाहीये. परंतु जग कार्य आहे ह्या दृष्टीने शक्तीच्या अस्तित्वाचा अस्वीकारही करता येत नाही. विचार केल्याने असे ज्ञात होते की असे काहीही नाहीये. हे परस्परविरोधाभासच उत्पन्न करते. म्हणून "मी" स्वतःसिद्ध आहे. शक्ती आणी शक्तीचे कार्य असे काहीही नाहीये. (१०)

शक्तीचा बोध "मी"वर आधारित असल्याने शक्ती "मी"पासून केव्हाही भिन्न नाहीये. जरी शक्ती "मी"मध्येच आहे तरी शक्ती आणी"मी" असंगच आहेत. ज्याप्रकारे एखाद्या संख्येत शून्य जोडल्याने त्या संख्येत परिवर्तन होत नाही, त्याच प्रकारे शक्ती "मी"मध्ये असूनही "मी" स्वभावतः एकच आहे, अर्थात "मी" सदासर्वदा अद्वय आहे. (११)

"मी"मध्ये ‘शक्ती’ या नावाचे अन्य काहीही नाहीये. "मी" स्वतःच "मी"मध्ये अद्वितीय रूपाने सदा राहतो. जरी शक्तीचे रहस्यमय जगतकार्य स्पष्ट दिसते, तरी शक्तीरूपात त्याचे वेगळे अस्तित्व नाहीये. अति विचार आणी चिंतन करूनही वंध्यासूत नावाने काहीही बोध होत नाही; त्याच प्रकारे विद्वानांच्या मतानुसार जगत नावाने काहीही नसून एकमात्र "मी"च आहे. (१२)

समुद्रात वायूमुळे अनेक लाटा निर्माण झाल्या आहेत असे भ्रमाने दिसते. परंतु समुद्रातील पाणी हे लाटांपेक्षा वेगळे नसते आणी लाटांमुळे समुद्रात कुठल्याही प्रकारचे परिवर्तन होत नाही. त्याच प्रकारे "मी"च्या शक्तीनेच मी-मी असे तरंग "मी"मध्ये उत्पन्न होतात. जरी असे असंख्य तरंग "मी"मध्ये भासीत होतात तरी त्यात "मी" नसतो. (१३)

जसे अनेक घटांच्या निर्मितीसाठी माती हीच कारण आहे, जसे आकाशात अनेक दृश्य दिसूनही आकाश त्यापासून अलिप्त असते, त्याच प्रकारे शक्तीने अनेक देहांची निर्मिती होते. "मी"च्या शक्तीने अनेकत्वाचा भास उत्पन्न होतो तरीही "मी" त्या अनेकत्वात नसतो.(१४)

सूर्याच्या किरणांनी तप्त जमिनीवर भासीत होणारा सूर्य मिथ्या आहे. तेथे सूर्याचे प्रतिबिंब असल्याने त्याला मृगजळ म्हणतात. भासित जलतरंगांवर जरी सूर्याचा भास झाला तरी सूर्य त्या जलाला स्पर्श करीत नाही व सूर्यही त्यात असत नाही. ह्या प्रकारे मृगजळाच्या गुणदोषाने सूर्य अलिप्तच राहतो. (१५)

"मी"च्या शक्तीने अनेकत्वाचा भास होतो. "मी"ची शक्ती असत्य असूनही या प्रकारे अनेक चंचलतेला ग्रहण करते. या अनेकत्वाचा "मी"ला क्षणमात्रही स्पर्श होत नाही. "मी"मध्ये अनेकत्व दिसतही नाही आणी"मी"मध्ये अनेकत्व असतही नाही. "मी"ला शक्तीचा कसलाही गुण व दोषाचा संग लागत नाही. (१६)

आकाशात पाहिले की (सूर्यप्रकाशामुळे) असे दिसते जणू काही आभूषण ठेवलेले आहेत; पण विचार केल्यावर असे लक्षात येते की हा तर निव्वळ दृष्टी आणी प्रकाशाचा खेळ आहे. जे दिसते ते सर्व मिथ्या आहे. आभूषण नावाचे आकाशात काहीच नाहीये. ज्ञानावस्थेत हे ज्ञात होते की हा सर्व सूर्याच्या प्रकाशाचा खेळ आहे — जे मिथ्या आहे. (१७)

अनंत सुखांचा सागर अर्थात स्वतः "मी"च चित्स्वरूपाने राहतो. अशी अन्य कुठलीही शक्ती नाहीये की जी "मी"वर आवरण करू शकेल. अद्वय स्वरूपात "मी" स्वतःत परिपूर्ण आहे आणी"मी"ला अन्य कुठलीही शक्ती स्पर्श देखील करू शकत नाही. शक्तीच्या अनुपस्थितीत "मी"ला स्वतःचे अज्ञान कधीही होत नाही. (१८)

अंधाराचे अस्तित्व सूर्यप्रकाशात साक्षीद्वारे सिद्ध करण्याचा प्रयत्न युक्तिसंगत नसल्याने सज्जनांच्या सभेत हास्यास्पदच ठरेल. जसे सूर्याच्या समोर अंधार राहू शकत नाही, तसेच "मी"च्या उपस्थितीत शक्तीच्या अस्तित्वाचा साक्षी कोण असू शकेल? (१९)

आकाशाला ढग शिवत असे दिसणे वायुमंडळात असलेल्या आर्द्रतेला दर्शवते. नभातून ढग खाली येणे म्हणजे ढगात पाण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याच प्रकारे शक्ती "मी"मध्ये भासीत होते, पण जगतकार्य शक्ती स्वयं करते. "मी"मध्ये शक्ती विकार उत्पन्न करील असे संभवत नाही आणी"मी" कधीही विचलित होत नाही. (२०)

ज्याप्रकारे वृक्ष स्वतः पिकलेल्या फळांनी आच्छादित असतो परंतु फळांना खाऊन तृप्त असणे अथवा फळ खाण्याची इच्छा करणे असे दोन्ही भाव वृक्षात नसतात. त्याच प्रकारे "मी"च्या शक्तीने जगतकार्य दिसते परंतु त्या जगतकार्याने "मी"ला ना तृप्ती प्राप्त होते ना काही प्राप्त करण्याची इच्छा असते. (२१)

जसे अंधारात खांबाचा ऐवजी चोराचा भास होणे सहज शक्य आहे. पण तेथे चोर नसून खांबच आहे. अंधारात खांबात भासणारा चोर कसलीही हालचाल करण्यास असमर्थ आहे. म्हणून खांबात भासणारा चोर कोणाला भीती दाखवीत नाही आणी स्वतः कोणाची भीतीही बाळगत नाही. तेथे एकमात्र खांबच आहे आणी खांबात विचारजनित चंचलताही नाहीये. (२२)

वरील दृष्टांताप्रमाणे जरी "मी" दिसत असला तरी "मी" तिथे नसतो. ज्या प्रकारे शक्ती असूनही दिसत नाही, शक्ती सृजन करीत नाही आणी दुसरे काही कार्यही करीत नाही. "मी"ला कोणी भीती दाखवित नाही आणी"मी" स्वतः कोणाची भीती बाळगत नाही. "मी" एकमात्र असून त्यात विकारजनित चंचलता नाहीये. (२३)

पाण्यात वायूमुळे हालचाल झाल्याने, पाण्यात प्रतिबिंबित होणारा सूर्य आकाशात स्वतःच्या स्थानापासून विचलित होत नाही. पाण्यात भिन्न रूपात सूर्याचे प्रतिबिंब दिसत असूनही सूर्य आपल्या मूळ स्थानीच राहतो. शक्तीच्या विकारांनी (गुणदोषांनी) अर्थात शक्तीच्या परिवर्तनाने "मी"मध्ये कधीही विकार अर्थात परिवर्तन होत नाही. "मी" विकारांनी ग्रस्त होत नाही आणी"मी"मध्ये विकार वास करीत नाही. "मी" सर्वाहून अलिप्त स्वस्थ बसून राहतो. (२४)

शक्ती जड असल्याने ना स्वतःला ना दुसऱ्यांना प्रकाशित करू शकते. शक्ती जड असल्याने प्रकाशित करण्यास असमर्थ आहे आणी शक्तिजनित सर्व कार्य जडच आहेत. आरशात सूर्याचा प्रकाश परावर्तित होऊन इतरांना सूर्याचीच उपस्थिती दर्शवितो. त्याचप्रकारे "मी" परावर्तित प्रकाशाच्या रूपात स्वतःची उपस्थिती दर्शवितो. (२५)

सोनेच आभूषणांच्या माध्यमातून अर्थात दागिन्यांच्या माध्यमातून विविध रूप धारण करते. मानवी सृष्टी देखील विविध आभूषणांप्रमाणे आहे, सोन्याप्रमाणे नाही. जरी "मी"च्या शक्तीद्वारे अनेक नामरूपांची निर्मिती होते परंतु "मी" स्वतःचा स्वभाव सुवर्णाप्रमाणे नाहीये कारण "मी" कधीही विकार (परिवर्तन) धारण करीत नाही. (२६)

विशेष: सोने अथवा सुवर्ण आकारानुरूप स्वतः परिवर्तित होते परंतु मानवसृष्टीत "मी"मध्ये कुठल्याही प्रकारचे परिवर्तन होत नाही.

वेगवेगळ्या आरशांच्या माध्यमातून दिसणारे स्वतःचे मुख एकच असते. जरी वेगवेगळ्या आरशांमध्ये दिसणारे स्वतःचे मुख वेगवेगळे भासले तरी वास्तवात हा मनाचा भास असत्यच असतो. आरसा कधीही त्यात दिसणाऱ्या मुखाचा आश्रय नसतो. परंतु मुख स्वतःचे प्रतिबिंब आरशात पाहण्यास नेहमी उत्सुक असतो. (२७)

"मी"चे प्रतिबिंबच "मी"चा बोध करविते. परंतु प्रतिबिंबाचा हा भास खोटा असूनही मन त्याला सत्यच मानते. "मी" प्रतिबिंबरूपात कधीही शक्तीचा आश्रय घेत नाही. "मी"च्या प्रतिबिंब निर्मितीला शक्तीच कारण आहे. (२८)

जसे आरशात प्रतिबिंब दिसो अथवा न दिसो मुख बिंबरूपात सर्वदा आपल्या स्थानीच असते. तसेच शक्तिजनित स्फुरण असो अथवा नसो किंवा स्फुरणाचा पूर्ण अभावही असो, परंतु "मी" सर्वदा उपस्थित असतोच. (२९)

जसे सूर्य ढगांनी आच्छादित झाल्याने दिसला नाही तर "सूर्य नाहीच" असे म्हणणे उचित होत नाही तसेच जर कोणी म्हणेल की "मी" शक्तीमुळे आच्छादित झाला आहे तर शक्ती "मी"ला कधीही आच्छादित करू शकत नाही. याप्रकारे अज्ञानी आणी मूर्ख लोक व्यर्थच भ्रमित होतात. (३०)

हे विश्व अनेक नाम आणी रूपांनी दिसते परंतु ते असत्य आहे. हे स्वतःच्या अज्ञानाने दिसत असते. ज्याप्रकारे स्वप्नावस्थेत अनेकत्वाचा भास होतो त्याच प्रकारे मूर्ख व्यक्ती स्वतः या जगात अनेकत्वाला स्वप्नाच्या सापेक्ष पाहतो. (३१)

जर छिद्ररहित आरशाला भेदून दृश्य आरशात प्रवेश करू शकते तर "मी" सघन असूनही "मी"मध्ये दृश्य जगत प्रवेश करू शकते. म्हणून शक्ती आणी तिचे कार्य "मी"ला भेदण्यास असमर्थ आहे. वास्तवात शक्तीमध्ये हे सामर्थ्य नाहीये की ती "मी"चे ज्ञान प्राप्त करू शकेल. (३२)

शक्ती आणी माया चे अद्वयत्व

"मी"च्या स्वभावाविरुद्ध "मी"मध्ये राहणारी शक्ती जिला अद्वया असेही म्हणतात, तिचे वेगळे असे अस्तित्व नाहीये. म्हणून शक्तीचे कार्य आणी स्वतः शक्ती "मी"हून भिन्न नाहीये. जग नावाचे कुठल्याही प्रकारचे अस्तित्व नाहीये आणी ते दृश्यरूपात भासीत होऊ शकत नाही. त्यामुळे जग मिथ्या आहे. शक्तीचे अस्तित्व स्वयम् असत्य आहे. वास्तविक रूपात शक्ती मायेचा आश्रय घेऊन "मी"लाच व्यक्त करते. (३३)

ज्याप्रकारे दृष्टीदोषाने दोन चंद्र दिसतात परंतु ते सत्य नसते, चंद्र केवळ एकच असतो. त्याचप्रकारे जीव आणी शिव हे द्वैतभास मायेमुळेच होतात. "मी"ला मायेचा स्पर्शही होत नसल्याने मायाचे दाखविणे व्यर्थच आहे. (३४)

ज्याप्रकारे शांत असलेल्या पाण्यात बुडबुडे दिसतात त्याच प्रकारे "मी"ची रहस्यमय शक्ती अनेक स्फूर्तीने व्यक्त होते. ज्याप्रकारे बुडबुड्यात एकच सूर्य प्रतिबिंबरूपाने दोन भासतात त्याच प्रकारे अहं स्फुरणाने "मी" जीव आणी शिव रूपाने व्यक्त आहे. (३५)

सूर्य सर्वदा बुडबुडे, पाणी आणी ढग यापासून असंगत्वच राखतो त्याच प्रकारे "मी"चा आणी शक्तीचा काहीही संबंध नाहीये आणी शक्ती "मी"मध्ये समाविष्टही नाहीये. "मी"चा संबंध स्फुरण, जडकार्य आणी शिव-जीव द्वैतभाव कोणाशीही नाहीये. (३६)

"मी" चा ह्या पूर्णानंद स्वरूपात "मी" निर्मल अद्वैत आणी चैतन्यरूपात, सर्व प्रकारच्या दृश्य प्रपंचरहित अचल, शांत, शून्यावस्थेत (निर्विकल्पावस्थेत) राहतो. "मी" स्वतः स्वप्रकाशद्वारे विमल रूपात निवृत्ती अवस्थेतच राहतो. "मी"मध्ये अहमस्फुरण हा मायाजनित चमत्कार आहे. (३७)

विशेष —"मी"मध्ये स्फुरणाचा भास "मी"च्या शक्तीने आहे जी स्वतः असत्य आहे. ह्या असत्य असलेल्या शक्तीचे सत्यरूपात भासीत होणेच माया आहे.

माया व तिचे कार्य

"मी"च्या आवरणरहित स्वरूपात जे काही घटित होते त्याचे कारण माया आहे. माया "मी"ला भासवू शकत नाही. "मी"मध्ये माया ना वास करते ना दिसते. मायेद्वारे अनंत ब्रह्मांडाची रचना होणे ही एक विचित्र घटना आहे. माया ब्रह्मांडाची निर्मिती कशी करते? कशाप्रकारे ब्रह्मांडात वास करते? आणी माया दृश्य निर्मिती कशी करते? हा एक प्रश्नच आहे. (३८)

माया ही विचित्र रूपात स्वतःमध्ये इंद्रजालाप्रमाणे अनेकत्व दाखवते. माया जगनिर्मितीच्या माध्यमातून स्वतःच नटून थटून सुशोभित होते. परंतु मायेचे हे कार्य कोणालाही दिसत नाही. माया अत्यंत विचित्र आहे कारण ही सत्यही नाही आणी असत्यदेखील नाहीये. माया स्वतः स्वतःच्याच इच्छेने काही निश्चय करते अथवा केलेला निश्चय रद्द करते. (३९)

मायेला परस्परविरुद्ध क्रिया करण्यात प्रभुत्व प्राप्त आहे. माया स्वतःच निश्चय करते की "मी" ब्रह्म आहे अथवा "मी" ब्रह्म नाहीये. माया स्वतः सर्वज्ञताभाव धारण करून जगताची निर्मिती आणी लय करते. माया स्वतःच्या मोहाने ज्ञानाला आवृत्त करून अल्पज्ञता भासवते. (४०)

मायाच स्वतः जीव आणी शिव हे द्वैत धारण करते. माया स्वतःहून "मी"च्या जाणीवेने स्वतःला विद्या या नावाने संबोधित करते आणी माया स्वतःहून "मी"च्या नेणीवेने स्वतःला अविद्या या नावाने संबोधित करते. माया स्वतः बंध आणी मोक्ष रुपी उपाधीची निर्मितीही करते. (४१)

माया स्वतः "मी ब्रह्म आहे" ह्या स्फुरणाने एकनिष्ठतेचा बोध करवते. मायेला सृष्टीकार्याचा आरंभ करतेवेळी ही जाणीव असते. पण नंतर ही जाणीव नसते. ह्याप्रकारे जगाची निर्मिती करून माया अव्यक्त बीजाप्रमाणे राहते व पुढे हीच माया पुरुष-प्रकृतीच्या रूपात भासते. (४२)

विद्या-अविद्या या दोन उपाधींबाबतही माया एकच आहे. माया स्वतः आकाश, वायु, अग्नि, जल व पृथ्वीची निर्मिती करते. या प्रकारे माया सूक्ष्म पंचमहाभूतांची निर्मिती देखील करते. या प्रकारे माया ब्रह्मांडाच्या स्थूल देहाची विराटाची निर्मिती करून स्वतःच्या अनेकत्वाला प्रकट करते. (४३)

भ्रम उत्पन्न करण्यासाठी अनेक रूप धारण करणे ही मायेची अद्‌भुत कृती आहे. माया स्वतः अनेक स्त्री-पुरुष रूपात प्रकट होऊन स्वतःची सत्यता सिद्ध करते. जे दृश्य पाहण्यायोग्य नाही आणी जे पाहिले

असता दुःखाचे कारण होऊ शकते अशा दृश्याच्या ठिकाणी माया सुखप्राप्तीचा मोह निर्माण करून हट्टाने पहावयास लावते. (४४)

शरद ऋतू आल्यावर आकाशात विचित्र पर्वताकार ढग उत्पन्न होतात पण हे ढग आकाशाला किती स्पर्श करतात? आकाशाला ह्या ढगांचा थोडाही स्पर्श होत नाही. त्याचप्रकारे मायेद्वारा निर्मित मायिक कार्यांशी "मी"चा थोडाही संबंध नाहीये आणी"मी" मायिक कार्यापासून कुठल्याही प्रकारे भयग्रस्त होत नाही. (४५)

समुद्रातून उत्पन्न झालेली लाट आणी बुडबुडे (फेस) हे समुद्राचे कधीही भक्षण करू शकत नाहीत. लाट आणी बुडबुडे (फेस) यांचा हा उद्देश कधीही सिद्ध होणे संभवत नाही कारण समुद्र स्वतः असीमित, अमर्याद आहे. त्याचप्रकारे माया आणी मायाजनित कार्य "मी"चे भक्षण करतील हे असंभव आहे कारण "मी"च्या अनुपस्थितीत त्यांचे अस्तित्वच राहत नाही. (४६)

शक्तीचे सामर्थ्य आणी"मी"

ज्याप्रकारे सूर्याच्या किरणांनी कमळ विकसित होते, सूर्याला कमळाचे कुठल्याही प्रकारचे आकर्षण नाहीये; स्वतः कमळही कसलीही कृती करीत नाही. अर्थात कमळ आणी सूर्य यांचा परस्पर काही संबंधदेखील नाहीये. तरी कमळ विकसित होते आणी सूर्य कमळाला स्पर्शदेखील करत नाही. (४७)

त्याच प्रकारे "मी"च्या सत्तामात्रानेच शक्ती सामर्थ्य स्फुरित होते. परंतु "मी" अक्रिय असल्याने "मी"मध्ये स्वतः स्फुरणही होत नाही. "मी" स्वतः काही करत नाही आणी"मी" स्वतः शक्तीकडून कार्य करवून घेतही नाही. "मी" आणी शक्तीचा परस्पर काही संबंधही नाहीये. "मी" स्वतःच्या चिद्रस्वरूप आनंदात स्वयं अभिन्नरूपात वास करतो. (४८)

ज्याप्रकारे अयस्क (धातू) कुठल्याही प्रकारचे कर्म न करून अचल राहतो. अयस्क कोणाला प्रेरित करीत नाही आणी साठवणही करीत नाही. अयस्काला लगाव नसूनही त्यात कणांची साठवण होत राहते. त्याच प्रकारे "मी" अचल आणी कर्मरहित असूनही शक्ति "मी"मध्ये समाविष्ट राहते. स्फुरण आणी अनेक कार्य शक्ती स्वयं करते परंतु "मी"ला स्फुरण आणी शक्तीच्या कार्याचे कुठलेही आकर्षण नाहीये. (४९)

सूर्यकांत मणी सूर्याच्या किरणांनी कांतिमान असतो परंतु तो स्वतः सूर्य नसतो. त्याच प्रकारे अग्नी अग्नियुक्त दिसतो पण अग्नी प्रकट होण्याचे कारण लाकूडच आहे. सूर्याच्या किरणांनीच सूर्यकांत मण्यात उष्णता असते. अन्य ठिकाणीही उष्णतेचे कारण सूर्याची किरणेच आहेत. (५०)

खरोखर "मी"च्या सत्तेने शक्ती जड पदार्थात चैतन्य आणते. "मी"मध्ये जशी शक्ती भासमान असते तशीच शक्ती ही जड पदार्थास चैतन्य भासविते. "मी"चा चैतन्ययुक्त स्वभाव शक्तिरूपाने अभिव्यक्त होतो. याचा उद्देश हाच आहे की "मी" काहीही करत नसूनही तिथे असतो. (५१)

विशेष —शक्तीचा जड (उपाधी) पदार्थाशी संयोग झाल्यावर जे दृश्य विकार प्रकट होतात किंवा अनुभवात येतात ती माया असते. नाम-रूपाचा व अनुभवाच्या कक्षात येणारे सर्व जडच समजावे.

ज्याप्रकारे बीज संपूर्ण वृक्षाचे कारण आहे त्याच प्रकारे शक्ती संपूर्ण विश्वनिर्मितीचे कारण आहे. ज्याप्रकारे बीजात वृक्षाला पल्लवित करण्याची शक्ती असते त्याच प्रकारे शक्तिरूपात "मी"च विश्वनिर्मितीचे कारण आहे. (५२)

ज्याप्रकारे बीजात शक्ती अदृश्य रूपात राहते त्याच प्रकारे "मी" अदृश्य असून त्याची शक्ती सर्व कार्य करते. "मी"ची अदृश्य शक्ती संपूर्ण दृश्याला प्रकाशित करते. परंतु जसे दृश्य शक्तीला स्वतःमध्ये बांधून

ठेवू शकत नाही तसेच "मी"ला शक्ती कधीही आपल्या बंधनात बांधू शकत नाही. "मी" सदासर्वदा उपस्थितच राहतो. (५३)

माया चे द्विरूप — विद्या आणी अविद्या

ज्याप्रकारे एकाच वृक्षाच्या दोन फांद्या असतात त्याच प्रकारे माया शक्तीच्या दोन शाखा आहेत. एकात *"अ"* मिळविल्याने अविद्या आणी दुसऱ्यात *"अ"*च्या अनुपस्थितीत विद्या. परंतु "मी"च्या अदृश्य सत्तेने हे सर्व जे काही भासत होत आहे ते मिथ्या आहे. (५४)

"मी" अशरीर आणी अनिच्छाव्रतधारक असल्याने "मी"ला स्त्रीरूपी शक्तीचा संग नाहीये. "मी"मध्ये शक्तीचा अभाव असूनही विद्या व अविद्याच्या कारणी जे द्वैत उत्पन्न होते तेच जीव आणी शिव यांचे कारण आहे. शक्तीभासित मायेच्या अविद्या शाखेच्या कन्येला जीव म्हणतात आणी विद्या शाखेच्या कन्येला शिव म्हणतात. परंतु "मी" स्वतः असंग आणी अखंडानंद आहे. त्यामुळे "मी"मध्ये जगाचे कुठलेही अस्तित्व नाहीये. (५५)

"मी" नर–नारी देहांच्या माध्यमातून व्यक्त होत नाही कारण "मी" अजन्मा आणी अमर आहे. "मी"मध्ये शक्तीला स्थान नसल्याने "मी" कन्यादिकांची उत्पत्ती करू शकत नाही. तेथे जीव–शिव भाव नाहीये. "मी" एकमात्र चित्स्वरूपच आहे. (५६)

जर कोणी म्हणेल की आकाशात एक अत्याधिक सुंदर अतिविशाल वृक्ष आहे जो फळांच्या भाराने झुकलेला आहे तर आकाशात असा वृक्ष असणे व तसे स्थळ असणे संभवत नाही. त्याच प्रकारे "मी"मध्ये शक्ती विस्तारित आणी पल्लवित होणे संभवत नाही. शक्ती स्वतःच्या सामर्थ्याने अद्‌भुत कार्यांनी स्वतः भासमान होते. (५७)

दृष्टी सांगते की डोळे दोन आहेत, तसेच माया द्वारे जीव आणी शिव यांचा भास होतो. कुठल्याही वस्तूस प्रकाशित करण्याकरिता दृष्टीमध्ये तेज अर्थात प्रकाशाची आवश्यकता असते. त्याच प्रकारे शक्तीला प्रकाशित करण्यासाठी "मी"ची आवश्यकता असते. (५८)

ज्याप्रकारे दृष्टीद्वारा स्वतःच्या डोळ्यात तेज असल्याचे जाणवते आणी हेही ज्ञात होते की जे काही दिसत आहे, अर्थात जे काही प्रकाशित होत आहे, त्याकरिता डोळ्यांचे स्वतःचे तेजच कारण आहे; त्याच प्रकारे स्वयम् "मी"ची शक्ती जीव आणी शिव या दोघांना प्रकाशित करते. याप्रकारे एकमात्र "मी"च संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतो. (५९)

ज्याप्रकारे सूर्याचा प्रकाश विश्वातील अनेकत्वाला प्रकाशित करतो परंतु सूर्य विश्वातील अनेकत्वाला धारण न करता असंगच राहतो, त्याचप्रकारे स्वतःच्या सत्तेने "मी" विश्वातील अनेकत्वाला प्रकाशित करतो. पण "मी" स्वतः तिथे नाहीये. "मी" अखंड चित्स्वरूपातच राहतो. "मी"हून अन्य काहीही नाहीये आणी"मी"मध्ये अन्य कोणी वासही करीत नाही. (६०)

ज्याप्रकारे अग्नीच्या प्रभावामुळे लोखंड कुठल्याही अन्य वस्तूला सहजतेने जाळू शकतो, त्याचप्रकारे जड शक्ती "मी"च्या सत्तेने स्वतःचे कार्य संपन्न करते. ज्याप्रकारे लोखंडास घाव घातल्याने अग्नीवर कुठलाही प्रभाव होत नाही त्याचप्रकारे जड शक्तीच्या (मायेच्या) कार्याने "मी"मध्ये विकारांची उत्पत्ती आणी नाश दोन्हीही होत नाही. (६१)

माया नदीचे राग आणी द्वेष हे दोन तट आहेत, जेथे स्वकर्मरूपी पाणी भरलेले आहे. हे पाणी अत्यधिक खोल आणी भीतीप्रद आहे. या पाण्यात शोकरूपी कठोर दगड देखील आहेत. या पाण्यात विषय आणी आशा रूपी छोटे गोल आकाराचे शेवाळे देखील आहे. (६२)

या माया नदीच्या तटावर कामादिक दुष्ट जलचररूपी अनेक भयानक दु:ख आहेत. या नदीत नर–नारी रूपात भोवरे देखील दिसत आहेत. विषयसुखभावना रूपी पाण्याचा प्रवाह अत्यधिक तीव्र गतीने येथे वाहतो. (६३)

माया नदीच्या प्रवाहात वाहत असताही "मी" बुडत नाही. "मी" स्थिर होऊन आपल्यावरून माया नदीच्या जलतरंगांना जाऊ देतो. हे तसे आहे जसे सूर्याचे प्रतिबिंब वाहत्या पाण्यात दिसूनही सूर्य त्या पाण्यासोबत वाहत नाही. जरी या मायेला "मी" प्रकाशित करतो तरी स्वतः "मी"चा मायेशी कुठल्याही प्रकारचा संबंध नाहीये. (६४)

जरी सूर्य नदी अथवा समुद्रामध्ये प्रतिबिंबित होतो तरी सूर्य कधीही नदी अथवा समुद्राला थोडाही स्पर्श करीत नाही. "मी"मध्ये माया व अविद्याजनित कार्य दिसतात ज्यामुळे "मी"ला जीव आणी शिव नाम प्राप्त होते परंतु "मी" जीव आणी शिव दोन्हीही नव्हे. (६५)

पाण्यात सूर्याचे प्रतिबिंब भिन्न रूपाने दिसते पण ते भिन्न प्रतिबिंब पाण्यात कधीही बुडत नाही. पाण्यात सूर्याचे प्रतिबिंब दिसते परंतु सूर्याला पाण्याचा बिलकुल स्पर्श होत नाही. असे भासते की सूर्य पाण्याला स्पर्श करीत आहे परंतु तो निव्वळ एक भासच आहे. (६६)

"मी" आनंदरूपाने सदासर्वदा एकटाच आहे. जरी "मी"चा भास होतो तरी हा प्रतिबिंबित भास आहे आणी"मी" तेथे नाहीये. म्हणून "मी"ला जीव–शिव उपाधी नाहीये. जर प्रतिबिंबित "मी"ला जीव–शिव उपाधी नाहीये मग स्वतः "मी"ला जीव–शिव उपाधी असणे कसे शक्य आहे? (६७)

रूपरहित आकाशाचे प्रतिबिंब पाण्यात दिसते. लोक असेही म्हणतात “पहा, पाण्यात दिसणारे आकाश कसे हलते आहे”. पण वास्तवात अनंत असणारे आकाश पाण्यात नसते आणी ते हालतही नसते. जे आकाश पाण्यात दिसत असते तो निव्वळ आभास असतो. आकाशात कुठल्याही प्रकारे हालचाल होत नसते. (६८)

निराकार "मी"चे विद्येत दिसणे व प्रतिबिंबित होणे भ्रम आहे. तसेच "मी"चे अविद्येत दिसणे व प्रतिबिंबित होणेही भ्रमच आहे. "मी"मध्ये कुठलीही जीव–शिव, जगत आणी कर्तव्य भावना नसते. "मी" चंचलही नाहीये. पण "मी" भासमान आहे, त्याचे कारण मायाचे कार्य आहे. (६९)

ज्याप्रकारे स्वप्नात अनेक रूप आणी आकार दिसतात, ते सर्व मनाचे खेळ असतात; वास्तवात तेथे काहीच नसते. तसेच शिव–जीव, नर–नारी सर्वच त्या अवस्थेत मिथ्या आहेत. स्वप्नातील चंचलत्वाचा भास व घडणारे कर्म जरी खरे भासत असले तरी ते खरे नसते. (७०)

त्याच प्रकारे मनाद्वारे जे काही दृश्य दिसते ते सत्य नाहीये. अनेक भिन्नभिन्न रूपे मनात दिसतात ते जागृतावस्थेत स्थिर राहत नाहीत. "मी"मध्ये जीव–शिव, नर–नारी आदि सर्व मिथ्या आहेत. "मी"मध्ये चंचलत्व आणी कर्म घटित होण्याचा भासही मिथ्या आहे. (७१)

सुषुप्ती अवस्थेला सत्य म्हणून स्वीकार करणे स्वयं अविद्याच आहे. या अविद्येने विश्व आणी जीव भासत होते. अविद्याजनित स्वप्न (सृष्टिसंकल्प) आणी अविद्याजनित जागृती (दृश्यसृष्टि) दोन्हीही मिथ्याच आहेत. अविद्येची ही कृती अत्यंत रहस्यमय असल्याने जीवोत्पत्तीचे कारणही आहे. (७२)

सुषुप्ती अवस्थेप्रमाणेच एक अव्यक्तावस्था देखील आहे. या अव्यक्ताने संपूर्ण विश्व–ब्रह्मांडाचा स्थूल देह “विराट” आणी सूक्ष्म देह “महत” रूपात साकार होते. ब्रह्मांडाचा महाकारण देह “ईश” विश्वाचे मूळ कारण आहे. (७३)

द्वैत–विकाराचे मूळ कारण मायाच आहे. मायेला स्वयं “मी ब्रह्म आहे” असा बोध राहतो. परंतु "मी"ला "मी" अशा बोधाची गरज नाहीये, कारण "मी" सदासर्वदा चित्स्वरूपातच राहतो. म्हणून "मी"मध्ये स्वबोधाचा अर्थात शक्तीचा अभाव असल्याने "मी"मध्ये शक्ती व माया दोन्हीही नाहीत. (७४)

जर वंशाचा मूळपुरुष (माया) नाहीये तर वंशही नाहीये, अर्थात जगतही नाहीये. म्हणून "मी"मध्ये द्वैत उपाधी, शिव–जीव उपाधी काहीही नाहीये. जरी द्वैत उपाधी सत्य भासीत होते तरी "मी" सहजरूपाने सर्वदा निर्विकार आहे. "मी"मध्ये वरील द्वैत उपाधींचा संग कधीही नाहीये. "मी" सदाच चित्स्वरूपात राहतो. (७५)

"मी"मध्ये स्वभावतः विकारयुक्त जड कार्याकरिता "मी" ही स्फूर्ती कधीही होत नाही. जर असे स्फुरण झालेही तर त्या अवस्थेतही "मी" चित्स्वरूपातच वास करतो. त्या स्फुरणरहित अवस्थेला चित्स्वरूपात्मकता म्हणतात. येथे "मी" ही जाणीव विरून "मी"शी ऐक्यत्वप्राप्त होते. (७६)

"मी" हे स्फुरण जरी मिथ्या नसले तरी चित्स्वरूपात "मी" विरघळून चिद्खंडता कायमची असतेच. चिद्रूपात अभिन्न रूपाने "मी" तेथे असतो. पण शिव–जीव व माया–जनित कार्य काहीही तेथे नसते. (७७)

"मी" चे अनंत स्वरूप

"मी" मध्ये अद्वैत-द्वैत आणी द्वैत-अद्वैत असे काहीही नाहीये. "मी" अनादि आणी अनंत असूनही द्वैत नाहीये. द्वैत नसूनही अभिन्न रूपाने "मी" असतोच. ह्या प्रकारे "मी" चे अस्तित्व सदैव आहेच आणी"मी" मध्ये भिन्नत्व कधीही नसते. (७८)

जर अनंतात द्वैत आहे तर त्याचा आधार काय आहे? अनंतात द्वैत नसते, असे विद्वानांचे म्हणणे आहे. अनंताचा अंत कधीही द्वैतभावाने ज्ञात केला जाऊ शकत नाही. म्हणून अनंताला वेगळेपणाने पाहता येत नाही. (७९)

जर "मी" अनंत आहे तर त्यात द्वैताचा अभाव आहे. म्हणून त्या अनंतात जीव आणी शिव कुठे आहेत? आणी कोणाला हे कसे ज्ञात होईल? म्हणून अद्वैत स्वरूपात स्वतः "मी" मध्ये सर्वदा अनंतता असल्याने द्वैत (भिन्नता) नाहीये. "मी" च्या चिद्स्वरूपात शक्ती व तिचे कार्य दोन्हीही नाहीये. (८०)

"मी" चे अनादि स्वरूप

"मी" अनादि असल्याने कारणाच्या अभावी कार्यही नाहीये. परंतु कारणाच्या अभावाने सृष्टीकार्य कसे संभव आहे? "मी" अनादि असल्याने भिन्नत्वदृष्टीने कारणरूपाने सृष्टीकार्याची उत्पत्ती कशी करू शकतो? म्हणून हा निष्कर्ष निघतो की "मी" अनादि नाहीये. (८१)

जर “मी” अनादि आहे तर तेथे आदि असणे कसे शक्य आहे? अनादि बरोबर आदि असेल तर द्वैत आणी अद्वैत एक सांगत असणे कसे शक्य आहे? अद्वैताला द्वैत म्हणणे देखील हास्यास्पद आहे आणी यास कोणी स्वीकारही करणार नाही. म्हणून "मी" सर्वदा एकमात्र अनादि आहे. तेथे द्वैत नाहीये. (८२)

जरी स्वीकारले की "मी" च्या “आदि” आणी“अनादि” स्वरूपात काही विरोध नाही. आदि आणी अनादि मध्ये विरोध नसेल तर अनादि कधीही द्वैत रूपाने भासायला नको. जर आदि आणी अनादि मध्ये विरोध

स्वीकारला तर आदिला आकार असायला पाहिजे. पण अनादिला काही आकार नसल्याने आदि आणी अनादि यांची परस्पर स्पर्धा करता येत नाही. (८३)

जर असे जरी मानले की "आदि" आणी"अनादि" अत्यंत विरुद्ध आहेत आणी"अनादि" ला द्वैत रूप आहे, तर हेही स्वीकारण्यास अयोग्य आहे. "अनादि" ची उत्पत्ती होत नाही आणी"आदि" सदा सर्वदा आपल्या पूर्वस्थितीत राहत नाही. त्यामुळे "आदि" आणी"अनादि" सर्वदा एकसारखेही नाहीत आणी भिन्नही नाहीत. (८४)

जर "मी" "आदि" आहे तर तो जड आहे — येथे ज्ञानाचा अभाव आहे. आणी जर "मी" "अनादि" आहे तर स्वयम् जड रूपात भासू नये. "मी" "मी" च्याच प्रकाशाने प्रकाशित आहे. म्हणून हा निष्कर्ष निघतो की स्वयम् "मी" हा "आदि"-"अनादि" नामाहून भिन्न आहे; कारण "आदि" आणी"अनादि" दोन्हीही स्वप्रकाशित नाहीत. (८५)

"अनादि" सर्वांसाठी आहे परंतु "आदि" चे तसे नाही. जगाच्या निर्मितीसाठी "मी" चे गुणच कारक आहेत, अर्थात "मी" ची सत्ता कारक आहे. "मी" मध्ये "आदि" आणी"अनादि" दोन्हीचा अभाव असल्याने त्यांचे जनितकार्यही असंभव आहे. त्यामुळे "अनादि" एकमात्र चिद्स्वरूपच आहे. (८६)

"मी" चे "अनादि" स्वरूप सत्य आहे तर "मी" चे "आदि" स्वरूप स्वतः मिथ्या ठरते. "मी" मध्ये "आदि" आणी"अनादि" दोन्हीचा आधार एकमात्र सत्य "मी" असल्याने दोघांना मिथ्या म्हणणे संभव नाही. हे त्याप्रमाणे आहे ज्याप्रमाणे देहाची सावली देहास बंधनात बांधू शकत नाही. "मी" ला स्वतःचा आधार असल्याने "अनादि" "मी" ला बंधनात बांधू शकत नाही, ज्या प्रकारे "मी" ला माया बंधनात बांधू शकत नाही. (८७)

ज्याप्रमाणे देहभावाचा संग त्याच्या सावलीशी नाही. सावली त्याच्या आत राहत नाही. त्यामुळे सावलीचे काही महत्त्व नाही आणीती मिथ्या आहे. त्याच प्रकारे "मी" मध्ये शक्तीला काही महत्त्व नाही आणी शक्ती मिथ्या आहे. अनादिस्वरूपाला "मी" चाच आधार असल्याने ती वेगळी राहू शकत नाही. (८८)

शक्तीचे अनादि स्वरूप

शक्ती "मी" द्वारे अस्तित्वात येते परंतु "मी" शक्तीपासून असंग आहे. शक्ती सर्वदा "मी" च्या आधाराने त्याच प्रकारे राहते ज्याप्रमाणे देहाबरोबर त्याची छाया अर्थात सावली राहते. म्हणून शक्तीला देखील "अनादि" म्हणतात. (८९)

ज्या प्रकारे बुद्धीला अत्यंत मूर्खतापूर्ण म्हणतात तरीही बुद्धीला 'शास्त्राची पत्नी' म्हणून मान्यता प्राप्त आहे, अर्थात बुद्धीचे औचित्य शास्त्रामुळेच आहे. विचार करून असे लक्षात येते की बुद्धी अत्यंत मूर्ख आहे आणी तिचा शास्त्राशी संबंध लावणे तर्कसंगत नाहीये. बुद्धीला जर कधीही "श्री"—अर्थात शब्दांचे ज्ञान—नाहीये, तर तिचा शास्त्रांशी संबंध कसा येऊ शकेल? (९०)

"मी" व शक्तीच्या अनादि स्वरूपाचा संबंध

जर शक्ती स्वतःला "अनादि" म्हणेल तर ती कधीही "मी" च्या समकक्ष नाही. शक्तीचा अनादि स्वरूपाचा व "मी" चा कसलाही संबंध नाही. "मी" नित्य असंग असून एकनिष्ठ ब्रह्मचारी आहे. (९१)

म्हणून तपस्वी, मुनी, योगी, यति, ब्रह्मचर्य पालन करणारे ब्रह्मचारी — सर्वांनी शक्तीला स्वयंभू पदवीने कायमसाठी सुशोभित केलेले आहे; कारण शक्ती, शक्तीचे कार्य, स्त्री-पुरुषदेह आणी संतती-उत्पादन असे भ्रमात्मक कार्य असे काही नाही. (९२)

"मी" स्वप्रकाशित

सूर्य उदय झाल्यावर तात्काळ धुके नष्ट होते. जेव्हा सूर्याचा प्रकाश पसरतो तेव्हा धुके स्वतःच नष्ट होऊन जाते आणी ते सूर्याचा प्रकाश पसरविण्यात व्यत्ययही आणत नाही. त्याच प्रकारे ज्या क्षणी "मी" उदित होतो तेव्हा माया नष्ट होऊन जाते. मायाजनित कार्य अर्थात दृश्य विश्व दिसतही नाही व ते कसला व्यत्ययही आणीत नाही. (९३)

जगात प्रकाश आणी अंधाराचा विरोधाभास दिसतो. परंतु "मी" च्या चिद्स्वरूपाने सर्व स्वयं प्रकाशित आहे. प्रकाश आणी अंधाराचा परस्पर विरोध असूनही हे आश्चर्य आहे की "मी" ची रहस्यमय शक्ती स्वतः प्रगट होऊन प्रकाश आणी अंधार दोघांना प्रतिभासित करते. (९४)

शक्ती अव्यक्त-व्यक्त

"मी" ची शक्ती अव्यक्त असूनही व्यक्त आहे. शक्तीची जीव-शिव कृती त्याचप्रकारे आहे. जरी शक्ती "मी" मुळेच अस्तित्वात आहे, परंतु "मी" ला शक्तीचा संग नाहीये आणी शक्ती "मी" मध्ये समाविष्टही नाही. "मी" मध्ये शक्तीचा भाव उत्पन्न होत नाही. "मी" आणी शक्तीचा काहीही संबंध नाहीये. (९५)

स्वयम् "मी" वर आधारित "मी" ची शक्ती जर इतकी अतर्क्य आहे तर "मी" किती अतर्क्य असेल? शक्ती-उत्पत्तीचे कारण "मी" नाहीये. 'हे सर्व नैसर्गिक आहे' असे म्हटल्याने दुसरा कुठलाही प्रश्न उद्भवत नाही. "मी" सर्वदा स्वतःच्या चिदानंदामध्ये राहतो परंतु शक्तीचे तसे नाहीये. (९६)

"मी" शक्तीच्या आवाक्याबाहेर असल्याने शक्ती "मी" ला स्वतःच्या पाशात बांधू शकत नाही. "मी" शक्तीच्या आवाक्याबाहेर असल्याने "मी" एकटाच राहतो. शक्ति आणी"मी" चा परस्पर विरुद्ध स्वभाव असल्याने "मी" शक्तीच्या बंधनात येऊ शकत नाही. असे निश्चित ठरते की "मी" सदा सर्वदा एकटाच आहे. "मी" च्या ठायी शक्तीला भाव नाही. (९७)

अनेकत्वाला धारण करणे हे शक्तीचे कार्य आहे; जेथे जग व्यक्त आणी अव्यक्त दोन्ही अवस्थेत राहते. ही अवस्थाच जगाच्या अस्तित्वाचा आरंभ आहे. ह्या स्थितीत जगदीश (ईश) जगत (सृष्टी) कल्पनेने व्यक्त होतो. (९८)

ह्या स्थितीत शक्ती चिन्मय स्वरूपाने राहते. यापुढे शक्ती स्वतंत्र नसूनही सर्व काही करीत असते; पण "मी" तेथे नसतो. शक्ती "मी" सत्तेच्या अधीन असून सर्व काही दाखविते. शक्तीच पुरुष-प्रकृती रूपाने स्वतःची स्मृती शिल्लक ठेविते. (९९)

शक्तीला चिद्स्वरूपाची विस्मृती म्हणजे अविद्या

पुढे शक्ती त्रिगुण आणी सूक्ष्म पंचमहाभूतांची निर्मिती करून स्वतः विविध रूपात व्यक्त होते. शक्ती स्वतःच्या विस्मृतीने स्वतः अविद्या बनते. हाच विस्मृतीचा भाव पुढे जीव अवस्थेच्या रूपात प्रकट होतो. (१००)

"मी"च्या विस्मृतीने जीवाला अनेक जन्म घ्यावे लागतात. जीवाला "मी"ची ही विस्मृती गेल्यानेच "मी"च्या स्वरूपात स्थान प्राप्त होते. असारयुक्त अनेकत्वाच्या विलासाचे कारण शक्तीच आहे. म्हणून असा भ्रम होतो की शक्ती "मी"मध्येच आहे. (१०१)

जीवास स्त्री-पुरुषभाव कारण स्वदेहाभिमान

जीवात्म्याचा स्वदेहाभिमानच स्त्री-पुरुष भाव आहे. स्त्री-पुरुषाची पूर्णता दोघांचे मिलन झाल्याने अर्थात विवाह झाल्याने होते. कष्टाने अनेक व्यवसाय करून पुरुष आपल्या पत्नीचे पोषण करतो. पुढे पती-पत्नीमध्ये कामवासनेची प्रबलता दिसते. (१०२)

“मी” आणी“माझे” ह्या स्वकृतीच्या भावनेने जीव घट्ट बांधला जातो आणी स्वतःच्या संतती, आप्त आणी गृह यामध्ये समाधानी होऊन राहतो. पुढे जीव आधिभौतिक, आधिदैविक आणी आध्यात्मिक या तीन तापामुळे जन्म-मृत्यू चक्र स्वतःवर ओढवून घेतो. याने शांती प्राप्त होत नाही म्हणून शेवटी वैराग्य धारण करतो. (१०३)

विषयोपभोगाने सुखप्राप्ती न होऊन क्षणातच विषयांचा कंटाळा येतो आणीक्लेश होतात. अहंकारयुक्त कर्मांनी उत्पन्न झालेले क्लेशांनी तिन्ही काळात विषयोपभोगाने सुखप्राप्ती संभव नाही. शरीर घाणीचे साम्राज्य असूनही असे वाटते की हा भ्रम आहे. अनेक जन्मांचे पुण्य जेव्हा संग्रहित होतात तेव्हा अध्यात्मात रूची उत्पन्न होते. (१०४)

"मी" अतुलनीय नित्य ज्ञान

आता हे ज्ञात होते की "मी" देह नाही. परंतु "मी" अतुलनीय नित्य ज्ञान आहे. "मी" जे अति अल्पज्ञ वाटत होते, ते अत्यंत अतुलनीय आहे. ह्या अनंत सुखरूपाच्या तुलनेत विषयांद्वारे प्राप्त होणारे सुख अत्यल्प आहे. जीवाला विषयसुखच हेच खरे असे प्रतीत होते. म्हणून जीवाला अल्पज्ञ म्हटले आहे. (१०५)

"मी"मध्ये जो अनेकत्वाचा भास आहे ते सर्व "मी"च्या आनंदानेच भरलेले आहे. असे भासते की एकमात्र “मी”पासून सर्व काही प्रकाशित होत आहे व तेथेही "मी"चाच वास आहे. “मी”ची अशी भावना जेथे स्वतः उदित आहे त्याला सर्वज्ञ असे म्हणतात. ह्या सर्वज्ञाला “ईश” म्हणतात, जो सर्वदा आपल्या निजस्थितीचा आनंद घेत राहतो. (106)

जीव–शिव नसूनही भिन्नत्वाचा बोध तसाच बनून राहतो. जर त्यास शक्तिरूपी उपाधी रहित पाहिले तर कुठलेही भिन्नत्व नाही आणी दोन्हीकडे एक अद्वैतच आहे. म्हणून जीव–शिव रूपाने एक "मी"च आहे. ह्या प्रकारे चिद्स्वरूपाने सर्वदा अखंड रूपाने एक "मी"च आहे; अन्य काहीही नाही. (१०७)

"मी"चे आनंदसागर स्वरूप स्वयं निर्विकल्प आहे. एकमात्र, अखंड चैतन्य, सत्य स्वरूपात कधीही कल्पनेचा प्रादुर्भाव नाही. अशा "मी"मध्ये जीव–शिव भाव उत्पन्न होणे नाला, नदी, समुद्र सारखेच आहे. जसे नाला, नदी व समुद्र जरी म्हटले तरी सर्व जागी पाणीच आढळते. “मी”मध्ये जीव–शिव भाव उत्पन्न होऊनही तरीही एकमात्र "मी"च तेथे असतो. (१०८)

॥ इति श्रीरामदासकृपान्वितेन श्री श्रीधरस्वामीना विरचिते स्वात्मनिरूपणे

षष्ट प्रकरणं संपूर्णम् ॥

श्री राम समर्थ

स्वात्मनिरुपण

प्रकरण-७

"मी" आणी"मी" ची शक्ती

"मी" स्त्री,पुरुष व पुत्र भाव रहित

“मी” देहाभिमानाने जगात स्वतःच्या जीवभावास वश होऊन स्त्री अथवा पुरुष समजतो आणी अज्ञानवश नीच कामवासनेने एकमेकांचा स्त्री-पुरुष भावनेने भोग पण घेतो. (१)

“मी” संतानोत्पत्तीच्या माध्यमाने स्वतःचे प्राकट्य "आत्मा वै पुत्र" (स्वतःचा आत्माच पुत्ररूपाने असतो) नावाने करतो, हे ह्या श्रुतीवाक्याने स्पष्ट कळते. ह्या प्रकारे “मी” स्वतःच्या देहाहंकाराने स्त्री, पुरुष आणी पुत्रादि नावाने विभक्त होतो. (२)

ह्या प्रकारे “मी”च स्त्री, पुरुष आणी पुत्र ह्या तीन नावांनी जगात व्यक्त आहे. म्हणून हेच सिद्ध होते की “मी” एकमात्र असूनही स्त्री, पुरुष आणी पुत्र नावांनीही व्यक्त आहे. (३)

“मी” जीवभावामुळे व स्वतः एकमात्र असल्याच्या विस्मृतीने अनेक प्रकारचे भेद उत्पन्न करतो. “मी” जीवभाववश स्वतःला देहच समजून स्त्री, पुरुष आणी पुत्र ह्या तीन नावांनी व्यक्त होतो. (४)

देहाला जड भावामुळे स्वतः “मी”चे सत्य स्फुरण होत नाही. देहच “मी” आहे हे मिथ्यत्व सत्य आहे, हे कसे मान्य होऊ शकेल? (५)

“देहच ‘मी’ आहे” असे समजून जीवात्मा अज्ञानाने वरील तीन रूपांची (स्त्री, पुरुष आणी पुत्र) कल्पना करतो. भ्रमामुळे जीव स्वशक्तीने स्त्री आणी संततीरूपाने स्वतःला ओळखतो. (६)

कामना आणी देहवृद्धी दोन्हीकरिता देह कारण नाहीये. “मी”चा संबंध देहचेतनेशी आणी स्त्री-पुरुष भावनेशी नाहीये. (७)

जर असे म्हटले की देह दृश्य भेदाला प्रकट करतो तर देहाला जड म्हणता येणार नाही. मग जो “मी” अदृश्य आहे, त्यात आणी देहात काही फरक असणे कसे संभवेल? (८)

एकाच “मी”चे वर नमूद केलेल्या तीन भिन्न रूपात (स्त्री, पुरुष आणी पुत्र) असणे कसे संभवेल? म्हणून एका “मी”मध्ये स्त्री, पुरुष आणी पुत्रादि भेद नाहीत. (९)

एका “मी”मध्ये स्त्री, पुरुष आणी पुत्रादि हे तीन भ्रमच आहेत, हे त्रिवार सत्य आहे. तिन्ही (स्त्री, पुरुष आणी पुत्र) भावांच्या त्यागाने आणी“मी”च्या ज्ञानाने निश्चितच मुक्ती प्राप्त होते. (१०)

त्वचा, रक्त, मांस, मेंदू, मज्जा, अस्थी, स्नायू, रज-रेत, मल-मूत्र, आम्ल, श्लेष्म, कफ, वात, पित्त हे सर्व “मी”मध्ये नाहीये. हा केवळ भ्रम आहे. (११)

नख, केस, घाम, लाळ, कृमी हे सर्व “मी” आहे असा बोध कधीही कोणालाही होत नाही. जर ह्या सर्वांना देह असे मानले तर मग “‘मी’ देह आहे” असे स्फुरण कोणाला होते? (१२)

स्त्री-पुरुष भावनाचे कारण वासना ("मी" नाहीये)

पुरुष आणी स्त्री देहाला कुटून जर त्याची चटणी केली तर त्या चटणीत स्त्री-पुरुष असा भ्रम कोणाला होईल का? (१३)

पुरुष आणी स्त्री दोघांच्या देहाला जर अग्नीमध्ये जाळून भस्म करून टाकले तर त्या भस्मात स्त्री-पुरुष असा भ्रम कोणाला होईल का? (१४)

जमिनीमध्ये शव पुरल्याने शेवटी त्याची माती होते. शवाची माती झाल्यावर हा स्त्री अथवा पुरुष देह आहे असे कोणी या संसारात सांगू शकतो का? (१५)

रज-रेताची निर्मिती अन्नापासून होते, म्हणून अन्नामध्ये स्त्री-पुरुष असा भ्रम कधी निर्माण होतो का? जर देह रज-रेताचाच आहे तर त्यात स्त्री-पुरुष असा भेद असणे कसे संभव आहे? (१६)

शव कधीही स्त्री अथवा पुरुष असे म्हणत नाही. त्यामुळे शवाद्वारे “मी” स्त्री अथवा पुरुष आहे हा भाव व्यक्त होणे कसे संभव आहे? (१७)

स्त्री-पुरुष संयोगजनित पुत्रेच्छेचा देहाशी कुठल्याही प्रकारचा संबंध नाहीये. हे स्पष्ट आहे की ज्या "मी"ला ही इच्छा होते तो देह नाहीये. (१८)

देहाहून भिन्न आणखी कोणी आहे का? जो स्वेच्छेने स्त्री-पुरुष देह धारण करतो आणी स्वतःला स्त्री-पुरुष वासनेने देखील ग्रस्त करतो? (१९)

"मी" देहापासून भिन्न असूनही "मी"ला स्वतः देहधर्मामुळे स्त्री अथवा पुरुष देह कसा स्वीकारता येतो? जर स्वीकार केला तर ह्याला अज्ञानच म्हणावे लागेल. (२०)

जर “मी” स्त्री अथवा पुरुष नाहीये तर देहाहंकारामुळे “मी”मध्ये स्त्री-पुरुष कामादि भावना कशा निर्माण होऊ शकतात? म्हणून हे सत्य आहे की “मी”मध्ये देहाहंकारजनित कामादि भावना नाहीयेत. (२१)

दृश्यमान जड देह दुर्गंधीयुक्त घाणीने भरलेला आहे. अन्नविकाराने अनेक रूपात सजून-धजून राहणारा हा देह कोणास कसा प्रिय होऊ शकतो? (२२)

जीवात्मा या जगात देहसुख प्राप्तीकरिता स्त्री-पुरुष नावांनी स्वतःला संबोधित करतो. ह्या प्रकारे जीवात्मा अनेक प्रकारच्या कर्मांनी त्या त्या भिन्न वासनांचा भोग घेतो. (२३)

विचार केल्याने हे स्पष्ट ज्ञात होते की “मी” स्त्री-पुरुष भावयुक्त देह नाहीये. मग “मी” स्वयम् मलमूत्राच्या भोगाने प्राप्त झालेल्या सुखात प्रेम नावाची कसलीही इच्छा कशी करू शकतो? (२४)

ह्या देहासच “मी” समजून देहाच्या मोहाने “मी” विषयजनित सुखात रत झालेला भासतो. देहधारी जीव "मी" नाहीये. म्हणून कसल्याही कल्पनेला न जुमानता “मी”ला देहधारी जीव समजू नये. (२५)

विशेष: देहधारी जीवाला ‘मी’चा सत्यबोध नसल्याने तो स्वतःला देहच समजतो. ‘मी’ला देहच समजणाऱ्याला जीव म्हणतात.

ज्याप्रकारे स्थूल देहास स्त्री अथवा पुरुष समजणे भ्रम आहे त्याचप्रकारे सूक्ष्मदेह, प्राणेंद्रिये आणी विषयवृत्ती हे सर्व भ्रमच आहेत. (२६)

पंचवायु (प्राण, अपान, उदान, व्यान आणी समान), पंचज्ञानेंद्रिय (शब्द, स्पर्श, रूप, रस आणी गंध) आणी स्त्री-पुरुष हे काहीही सत्य नाहीये. (२७)

डोळे, कान, जीभ, नासिका आदि देह संबंधित असणे हे सत्य नाहीये तसेच हात, पाय व गुदादि संबंधित असणेही सत्य नाहीये. (२८)

कोणास संदेह होऊ शकतो की वर नमूद केलेल्या इंद्रिया, स्थूल देह आणी सूक्ष्मदेहाशी संबंधित असूनही संबंधित नाहीत, हे कसे संभव आहे? याचे उत्तर हे आहे की स्थूल आणी सूक्ष्म देह हा केवळ भ्रम आहे. (२९)

"मी" स्थूल देह आहे ह्या धारणेला पूर्वीच स्पष्टपणे खोटे ठरविले आहे. जर "मी"ला सूक्ष्म देह म्हटले तर वास्तवात हे दृश्य नाहीये. (३०)

सर्वांना सामान्यपणे ज्ञात आहेच की सूक्ष्म देहाला नामादि भेद नसतो. त्याचप्रकारे सूक्ष्म देहाला पंचज्ञानेंद्रिय, पंचकर्मेंद्रिय आणीजीव रूपाने स्त्री-पुरुष असा कुठलाही भेद नाहीये. (३१)

मन, बुद्धी, चित्त, वृत्ती आणी स्वत्वभाव सर्वांमध्ये एकसारखाच पाहण्यात येतो. म्हणून हे सत्य आहे की जगात कुठल्याही प्रकारच्या भिन्नत्वाला सत्य मानणे ही एक भ्रांती आहे. (३२)

घोर निद्रा अर्थात सुषुप्तीत अन्य कुठलाही भाव नसल्याने सर्व काही अभिन्नत्वरूपाने ज्ञात होते. त्या स्थितीत "मी" स्त्री अथवा पुरुष हा भाव लय पावतो. (३३)

जेव्हा सुषुप्तीत सत्त्वगुणाच्या प्रभावाने जीवात्म्याला ऐक्यभावाचा बोध होतो, त्या स्थितीत स्त्री-पुरुष भेद नष्ट झाल्याने हे ज्ञान प्राप्त होते की "मी" सत्यस्वरूप आहे. (३४)

विशेष: जागृतीमध्ये "मी"ची विस्मृती तमोगुणाला दर्शवते. स्वप्नावस्थेत "मी"ची स्मृती व विस्मृती दोन्ही होणे हे रजोगुणाला दर्शवते आणी सुषुप्तीत "मी"ची अभेदत्वदृष्टी सत्त्वगुणाला दर्शवते. सुषुप्तीत "मी"वर आवरण आल्याने सुषुप्ती अवस्थेला अज्ञानावस्थाही म्हणतात. ज्यामुळे सुषुप्ती अवस्था तमोगुणप्रधान आहे असेही म्हणतात.

सुषुप्तीच्या स्थितीत स्थूल देह, सूक्ष्म देह आणी कारणदेहामध्ये कुठल्याही प्रकारचा भेद नसतो. भेददृष्टीचा संबंध वासनेशी आहे. म्हणून हे सत्य आहे की भेददृष्टी उत्पन्न होण्यासाठी वासनाच कारण आहे. (३५)

प्राणीमात्रांची उत्पत्ती व मूळ संकल्प

पंचीकृत पंचभूते अथवा अपंचीकृत पंचभूतांमध्ये पुरुष आणी स्त्री असा भेद नसतो. पंचीकृत पंचभूते अथवा अपंचीकृत पंचभूतांच्या कृतीमध्ये देखील स्त्री आणी पुरुष असा भाव नाहीये. (३६)

ब्रह्मोपनिषदांत असा स्पष्ट उल्लेख आहे की पंचभूतांची उत्पत्ती आत्म्यापासून झाली आहे. आकाशापासून वायू, वायूपासून अग्नि, अग्निपासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी आणी पृथ्वीपासून वनस्पती यांची उत्पत्ती झाली आहे. (३७)

वनस्पतीपासून सर्व प्राणिमात्रांच्या देहाची निर्मिती झाली. "अन्नात् पुरुषः" अर्थात अन्नापासून पुरुष अर्थात प्राणिमात्रांच्या देहाची उत्पत्ती झाली. हे वचन स्त्री-पुरुष भेददृष्टी रहित आहे. (३८)

विशेष: "खं" म्हणजे आकाश. आकाशाला "आत्मा" अशीही उपाधी दिली जाते. आकाश शून्य असून पंचभूतांच्या कक्षेत येतो, पण आत्मा चिद् आहे. आकाशात आत्मा अव्यक्तरूपाने असतोच. रज आणी रेताची निर्मिती अन्नापासून होते. रज आणी रेताच्या संयोगाने स्त्री अथवा पुरुष देह निर्माण होतो. वेदात प्राणिमात्रांना अर्थात आत्म्याला 'पुरुष' या नावाने संबोधित केले गेले आहे — "यत्पुरुषं यदधुः" (पुरुषसूक्त).

सामान्य पुरुष शब्दात तो स्त्रीवाचक नाही असा भ्रम खोटा आहे. सर्व प्राणिमात्र 'पुरुष' शब्दानेच संबोधित आहेत, असा स्पष्ट उल्लेख पुरुषसूक्तात आहे. (३९)

"साशनानशने अभि" या वाक्याने सर्व जड आणी चेतन, पुरुष नावानेच शोभायमान आहेत. म्हणून असे समजले पाहिजे की एकाच पुरुषस्वरूपात स्त्रीत्वाचा भेदात्मक बोध भ्रम आहे. (४०)

"लोकान् लोकपालान् सृजा" अर्थात लोक आणी लोकपाल यांच्या उत्पत्तीचा विचार निर्माण होणे याला कारण मुळपुरुषच आहे. त्या मुळपुरुषानेच "बहुस्याम्" अर्थात एकत्वापासून अनेकत्वाचा संकल्प केला. (४१)

त्याच्यापासून काहीही भिन्न नसल्याने तो स्वतःच सर्वरूपाने प्रकट झाला. "सोकामयत" अर्थात त्याने संकल्प केला. त्याने अनेकत्वाचा संकल्प केला. त्या संकल्पानेच "इदम् सर्वं सृजत" अर्थात संपूर्ण सृष्टीची उत्पत्ती झाली. (४२)

सृष्टिमध्ये मुळपुरुष "मी"

"तत्सृष्ट्वा तदनुप्रविष्य" — अर्थात सृष्टिची रचना करून त्या सृष्टीमध्ये प्रवेश करणारा अन्य कोणी नसून तो मुळपुरुष "मी"च आहे. तो "मी"च स्वयं "सच्चत्यच्च" (जे काही आहे ते सत्यच आहे) आणी"सत्यमृतम्" (सत् शिवाय अन्य काहीही नाही) नावानेही ओळखला जातो. ह्या सृष्टीत जे काही आहे आणी जे काही दृश्यगोचर होत आहे ते सर्व "मी"चाच विस्तार आहे. (४३)

त्यामुळे "मी"मध्ये स्त्री-पुरुष असा भिन्नत्वाचा अभाव असल्याने भिन्नत्वभाव असणे असंभव आहे. त्यामुळे स्त्री-पुरुषांमध्ये जे काही सत्य आहे ते "मी"च आहे. "मी"च स्वशक्तीच्या माध्यमाने जगत अथवा सृष्टीची निर्मिती करून स्वतःही त्यातच राहतो. "मी"च स्वशक्तीच्या माध्यमाने अभेदत्व कायम राखून अनेकत्वालाही धारण करतो. (४४)

"महत" (ब्रह्मरूप मूळ प्रकृती)च संपूर्ण भूतांची योनी आहे, अर्थात गर्भाधानाचे स्थान आहे. "मी" त्या "महत" योनीत (ब्रह्मरूप मूळ प्रकृती) चेतनारूपी गर्भ (बहुस्याम्) स्थापन करतो. या जड आणी चेतनेच्या संयोगाने सर्व भूतांची उत्पत्ती होते. (भ.गी. १४/३)

विशेष: ब्रह्मरूप मूळ प्रकृती"महत" संपूर्ण भूतांची योनी ही जड आहे व मुळपुरुष "मी"ची बहुस्याम् संकल्परूपी शक्ति चेतन आहे. अशा जड-चेतन संयोगानेच सृष्टी आकारात आली.

हे समजले पाहिजे की संपूर्ण भुते जड प्रकृती आणी चैतन्याच्या संयोगापासून उत्पन्न होतात आणी"मी" संपूर्ण जगाची उत्पत्ती आणी नाश करणारा आहे. संपूर्ण जगताचे मूळ कारण देखील "मी"च आहे. (भ.गी. ७/६)

नाना प्रकारच्या जीवसृष्टीच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व जीवांना गर्भात धारण करणारी माता प्रकृतीच आहे आणी जीव रूपी बीजाला स्थापन करणारा पिता "मी"च आहे. (भ.गी. १४/४)

"मी" स्वतःच्या अस्तित्वपूर्तीसाठी पुरुष-स्त्री नावांनी नटतो

पुरुष, प्रजा (पुत्रादि) आणी प्रकृती यांच्याहून "मी" भिन्न नाहीये. म्हणून "मी" स्वतःच्या अस्तित्वाला सिद्ध करण्यासाठी स्त्री, पुरुष, पुत्रादि नावाने व्यक्त होतो. (४५)

"एकोऽहं" अर्थात "मी" स्वयं एकमात्र असूनही जगामध्ये स्त्री, पुरुष, पुत्रादि द्वारे अन्यत्वाचे रूप धारण करतो. म्हणून "मी"हून अन्य काहीही सत्य नाहीये. ह्या वचनावर विश्वास केला पाहिजे. (४६)

"जीवेना आत्मानुप्रविश्य" — आत्मरूपाने "मी"ची शक्तीच जीवाच्या देहात प्रवेश करते. त्यामुळे स्त्री-पुरुष आणी पुत्रादि रूपात "मी" एकच आहे. "मी"मध्ये कुठल्याही प्रकारची भिन्नता नाहीये. (४७)

"मी" स्वतःच्या शक्तीच्या माध्यमातून संकल्पद्वारा स्वयं अनेकत्व धारण करतो. त्याचप्रकारे "मी" स्वतः जीव रूप पण धारण करतो. (४८)

"मी" स्वतःच्या शक्तीच्या माध्यमातून अनेकत्व धारण करून स्वतः ईश्वर म्हणवतो. त्याचप्रकारे "मी" "अहम्"ला स्वीकारून तीन भेदांद्वारे (द्रष्टा, दृश्य आणी दर्शन) जीवही म्हणवला जातो. (४९)

याप्रकारे देहदृष्टिने देखील सर्व जागी "मी"च असल्याने कुठल्याही प्रकारचा अन्यभाव नाहीये. हे स्पष्ट आहे की देहभावामुळे स्त्री, पुरुष आणी पुत्रादि भावना येत असल्या तरी तेथे एकमात्र "मी"च असतो. (५०)

स्त्री आणी पुरुष देहांची निर्मिती रज आणी रेताच्या मिश्रणापासूनच झाली आहे. रज आणी रेताच्या निर्मितीकरिता अन्नच कारण असल्यामुळे रज आणी रेतामध्ये कुठलीही भिन्नता नाहीये. (५१)

स्त्रीचा रज धातू आणी पुरुषाचा रेत धातूमध्ये ज्याची अधिकता असते ते स्त्री अथवा पुरुष देह निर्मितीचे कारण होते. ह्या प्रकारे निर्मित स्त्रीदेह आणी पुरुषदेहाला संतती (पुत्रादि) नावाने जाणले जाते. (५२)

स्त्रीचा रज धातू आणी पुरुषाचा रेत धातूचे मिश्रण देह निर्मितीचे कारण होते. रज धातू आणी रेतच्या निर्मितीकरिता अन्न कारण आहे. म्हणून स्त्री आणी पुरुष ही भेददृष्टी तर्कसंगत नाहीये. (५३)

स्त्री देहाच्या उजव्या भागाला पुरुष म्हणतात. म्हणून पुरुषांना स्त्री देखील म्हणता येईल. या प्रकारे एकाच देहात स्त्री-पुरुष असल्याने, स्त्री-पुरुषांत कुठला भेद नाहीये. (५४)

स्त्रीच्या उजव्या भागात जसा पुरुष आहे तसे पुरुषाच्या डाव्या भागात स्त्री आहे. त्यामुळे एकाच देहात स्त्री-पुरुष हा भेद असणे कसे संभव आहे? (५५)

"मी" स्त्री-पुरुष या दोन रूपातही एकच आहे आणी"मी" एकच असूनही स्त्री-पुरुष या दोन रूपात सज्ज आहे. याप्रमाणे एकाच देहात डाव्या भागात स्त्री आणी उजव्या भागात पुरुष सज्ज आहे. (५६)

स्त्री वामांगी नावाने प्रसिद्ध आहे. हे सर्वश्रुत आहे की आर्य संस्कृतीनुसार या जगात अभिषेकादि कर्मात स्त्री पुरुषाच्या वामभागी अर्थात डावीकडे बसते. (५७)

वामांग स्त्रीरूपाने एकाच देहात असल्याने भिन्न नाहीये. प्रजोत्पादनाकरिता पुरुषाच्या डाव्या भागात स्त्रीची भिन्न रूपात कल्पना केली गेली आहे. (५८)

पुरुषाच्या देहाच्या डाव्या भागात स्त्रीरूपाने राहणारी स्त्री, पुरुषाहून भिन्न झाली आणी पुरुषाने भिन्नत्वाने स्त्रीसोबत ऐक्यरूपी भोग घेत स्वतःचे बीज स्त्रीगर्भात टाकले. (५९)

पुरुष, संततिप्राप्तीच्या इच्छेने स्वतःहून अभिन्न स्वशक्तीचा अर्थात स्त्रीमध्ये भिन्नत्वभाव ठेवून स्वतः तिचा उपभोग घेतो. स्वतःसारखीच स्वतःची संतती व्हावी म्हणून पुरुष भिन्नत्वाची कल्पना करतो. (६०)

"मी" मध्ये स्त्री आणी पुरुष भिन्नत्वाचा उद्देश प्रजोत्पादन (संतती) आहे. "मी" एकमात्र असूनसुद्धा "मी"मध्ये जो भिन्नत्वाचा भ्रम उत्पन्न होतो ते "मी"च्या अज्ञानामुळेच. (६१)

देहाला "मी पुरुष आहे" अथवा "मी स्त्री आहे" हे ज्ञान कधी स्फुरित होत नाही. याचे कारण जड वासना आहे. हे पूर्वीच स्पष्ट केलेले आहे. (६२)

देहरहित “मी”ला स्त्री-पुरुष असा भेद नाहीये. "मी" पुरुष-स्त्री रहित असूनही देहाचा आकाराने हा भेद दिसणे फक्त वादाला कारणच ठरते. (६३)

“मी” स्त्री-पुरुष देहरहित आहे तर हे स्पष्टच होते की भिन्नत्वाचे कारण प्रजोत्पादनासाठी केलेला अनेकत्वाचा संकल्पच आहे. (६४)

"मी" स्त्री-पुरुष रहित असूनही जर स्त्री-पुरुष भाव उत्पन्न होतो तर त्याचे मूळ कारण प्रजोत्पादनाची इच्छा. जर अशी इच्छाच उत्पन्न झाली नाही तर स्त्री-पुरुष भेद उत्पन्न होण्यास काही कारणच उरत नाही. (६५)

याचे कारण संतती (प्रजा)च आहे कारण स्त्री-पुरुष भिन्नत्वाच्या अभावात प्रजोत्पादन संभव नाहीये. म्हणून प्रजोत्पादनाच्या इच्छेनेच “मी”मध्ये भिन्नत्वाचा भ्रम उत्पन्न होतो. (६६)

गुप्त उद्देश अर्थात प्रजोत्पादनाची कल्पना पूर्तीसाठी “मी”चे स्मरण आवश्यक आहे. प्रजोत्पादनानंतर "मी" जगात स्त्री-पुरुष रुपाने बावरत असतो. (६७)

हे सत्य आहे की उद्देश नसल्यास “मी”ला स्वतःचे स्फुरण होत नाही. परंतु “मी” स्फुरणाच्या आधीही “मी” उपस्थित असतो. त्यामुळे काही उद्देशाकरिता “मी”मध्ये स्फुरण होते असेही नाहीये. (६८)

"मी"ची उपस्थिति "मी"च्याच अस्तित्वाने व प्रकाशाने असते. जर "मी" पण तेथे वेगळे स्फुरले तरी "मी" अद्वय आहे ह्याविषयी शंका येण्याचे काहीही कारण नाही. (६९)

हे स्पष्ट आहे की पूर्वी “मी” स्फुरण नव्हते आणी त्यानंतर “मी” स्फुरणाची उत्पत्ती प्रजोत्पादनाच्या उद्देशाने झाली आणी ह्याच “मी” स्फुरणाने स्त्री आणी पुरुष ही दोन रूपे धारण केली. (७०)

अनेकत्वाला धारण करण्यासाठी “मी”ने स्वशक्तीचे स्मरण केले. मग संकल्परूपाने “मी” आणी“मी”ची शक्ती यांच्या ऐक्याने प्रजा (संतती विस्तार) निर्माण झाली. (७१)

नामरूप रहित पिंड व ब्रह्मांडव्यापक "मी"

ज्याप्रकारे स्त्री-पुरुष संततीरूपाने हे जगत भासमान आहे त्याच प्रकारे आदिपुरुषापासून अखिल जीवसृष्टीची उत्पत्ती झाली आहे. (७२)

सृष्टीमध्ये “मी” स्फुरणाला सोडून अन्य उपाधी (दृश्य व अदृश्य सृष्टि) ला वेगळे केल्याने नामरूप रहित एक “मी” च शेष राहतो आणी अन्याचे कुठलेही अस्तित्व देखील राहत नाही. (७३)

पिंड–ब्रह्मांडात निवास करणारा एक मात्र “मी” च आहे. “मी” स्वतःच्या प्रकाशाने सर्वांना प्रकाशित करतो. भ्रमवश जी भिन्नता दिसते तसे काहीही नसते. (७४)

"मी" मध्ये अनेकत्व बोधाचे कारण

"आसिदात्मैवेदं अग्रे" अर्थात वेद म्हणतात की सर्वप्रथम “मी” च होता आणी “मी” मुळेच जगतात अनेकत्वाचे स्फुरण झाले. “मी” मध्ये "ऐक्षत" अर्थात साक्षीभावाच्या संकल्पाने संपूर्ण सृष्टीची निर्मिती झाली. (७५)

सृष्टीकार्याच्या विविधतेमुळे अनेकत्वाचा बोध आहे. विचार केल्यावर असे कळते की अनेकत्वाचे स्फुरण होण्यापूर्वी अनेकत्व नव्हते. (७६)

जगात हे स्पष्ट दिसते की कुठलीही वस्तू तिच्या निर्मितीपूर्वी अस्तित्वात नसते. विचार केल्यावर असे कळते की त्यामुळे सृष्टीच्या निर्मितीपूर्वी अनेकत्वाला कोणी पाहिले आहे? (७७)

जर कोणी म्हणत असेल की सृष्टिपूर्वी अनेकत्व पाहिले आहे तर अनेकत्व पाहणारा "मी" तेथे वेगळेपणाने होता का? हे सत्य सांगावे की अनेकत्व पाहणारा "मी" सृष्टिपूर्वी वेगळेपणाने होता की सृष्टीमध्ये "मी" वेगळेपणाने नव्हता. (७८)

जर सृष्टीकार्याच्या पूर्वी "मी" होते आणी तेच "मी" जगत रूपाने देखील आहे तर सृष्टीकार्याच्या पूर्वी "मी" चे अस्तित्व आणी सृष्टीकार्यांनंतर जगात "मी" चे अस्तित्व वास्तवात सत्य आहे का? (७९)

असे म्हणतात की सृष्टीकार्याच्या पूर्वी जे "मी" होते तेच "मी" सृष्टीकार्यांत देखील आहे. श्रुती माता स्पष्ट म्हणते की सृष्टीकार्याच्या पूर्वी "आत्मैवेदमग्र इति" अर्थात सर्वप्रथम "मी" च होते आणी "तत्त्वमसि" म्हणून सृष्टिकर्मातही तेच "मी" आहे. (८०)

विशेष: "मी" वाचून काहीही नसल्याने जगत म्हणून द्वैतदृष्टिने भासते ते वास्तविक दृष्ट्या "मी"च जगतचे मूळ कारण आहे. जीव-शिवाला ब्रह्माचे प्रतिबिंब असेही म्हणतात. "मी" आणी ब्रह्म वेगळे नाहीत. "मी" ला जेव्हा स्वतःचा सत्यबोध नसतो अर्थात "मी" चे प्रतिबिंब धूसर असते त्याला जीव म्हणतात. शिव किंवा ईश यांना जेव्हा "मी" चा सत्यबोध असतो अर्थात "मी" चे प्रतिबिंब स्पष्ट असते तेव्हा हा बोधच ब्रह्मांडनिर्मितीला कारण ठरतो. तसेच "मी" ला जेव्हा "मी" चा सत्यबोध नसतो तेव्हा तो जीव म्हणून देह (पिंड) निर्मितीला कारण ठरतो. जगत म्हटले तर तेथे पिंड–ब्रह्मांड दोघांचा समावेश असतो. जर बिंबच नसेल तर प्रतिबिंब कसे भासणार? जर "मी" बोधच नसेल तर जगत कसे भासणार? "मी" चे अज्ञान म्हणजे "मी" च्या ज्ञानाचा अभाव असे नाहीये. खरे म्हणजे "मी" चे वास्तविक स्वरूप समजले नाही आणी चुकीची समजूत केली जाते, इतकेच.

श्रुती स्पष्ट म्हणते "एकं नान्यत" अर्थात सृष्टीउत्पत्तीच्या पूर्वी एक सत्य (अविनाशी तत्त्व) "मी" वाचून दुसरे काही नव्हते. त्या अद्वैत अवस्थेत "मीपणा" चे वेगळेपणाचे भान "मी" मध्ये विरघळून जाते. (८१)

अनेकत्वपूर्वी अर्थात सृष्टिसंकल्पाच्या पूर्वी सर्वकाही अद्वैतच होते. त्या अद्वैतावस्थेत चर्चा करण्यास भिन्न रूपाने कोण शेष राहील? (८२)

सृष्टिचे अनेकत्व सृष्टीपूर्वी रहस्यमय स्थितीत होते. हे तसेच आहे जसे बीजाच्या आतच वृक्ष असतो. बीजावाचून वृक्षउत्पत्ती कशी संभव आहे? (८३)

जर वृक्षाची उत्पत्ती बीजापासून आहे तर हा प्रश्न उठतो की बीज वृक्षापासून भिन्न आहे की अभिन्न? जर वृक्षाला बीजापासून भिन्न मानले तर पुन्हा प्रश्न उठतो की हा भिन्नतेचा बोध कोणाला होतो? (८४)

विशेष: जेव्हा वृक्ष अव्यक्त अवस्थेत असतो त्या स्थितीत बीजच एक मात्र राहते. परंतु जेव्हा वृक्ष व्यक्त अवस्थेत असतो तेव्हा बीज आणी वृक्ष एकमेकांपासून अभिन्न असूनही भिन्न भासतात. आता प्रश्न हा उठतो की ह्या भिन्नत्वाचा बोध कोणाला होतो?

जरी हे मानले की भिन्नत्वाचा बोध झाला आहे तरी हा बोध कोणाला होतो? हे कोणी पाहिले आहे का? शंकाकाराला अशी शंका न पाहता कशी उत्पन्न होईल? (८५)

ज्याप्रकारे "मी" ला "मी" चे स्मरण होत नाही आणी"मी" चे स्मरण ज्याला होत असेल त्याला "मी" भासत नाही, त्याच प्रकारे रहस्यमय अनेकत्व धारण करणाऱ्या सृष्टीमध्ये भिन्नत्व कसे संभव आहे? (८६)

"मी" स्फुरणानंतर भासतो पण त्याआधी "मी" स्फुरणरहित अवस्थेत असतो. मग सृष्टिचे अनेकत्व बघणारा "मी" पूर्वीचा स्फुरणरहित "मी" च होता असे कसे म्हणता येईल? (८७)

जेव्हा बीजाचे रूपांतर वृक्षात होते तेव्हा ह्या प्रक्रियेला सांगणारा व पाहणारा अन्य कोणीही नसतो. तरी बीजामध्ये सूक्ष्म सृष्टी भिन्न रूपाने होती हे कोणालाही कसे कळेल? (८८)

म्हणून सर्वांच्या आधी अर्थात सृष्टीच्या आधी एक "मी" च होते. सर्व अनेकत्व त्या एका "मी" मध्ये मिसळून जाऊन शेवटी एक "मी" च शिल्लक उरते. (८९)

"अथ प्रजायेय" या प्रकारे अनेकत्व अस्तित्वात आले. असे भासते की जणू "मी" नेच अनेकत्वाचे रूप धारण केले आहे. "मी" स्वतःच्या शक्तीला स्वतःपासून भिन्न करून अनेकत्व धारण करतो. (९०)

अशाप्रकारे सर्वकाही "मी"च आहे, जे "मी" च्या स्मरणानेच ज्ञात होते. म्हणून "मी" च एकमात्र द्रष्टा, दृश्य आणी दर्शनरूपाने भासमान आहे. (९१)

स्त्री-पुरुष कारण "मी" आणी"मी" ची शक्ती

द्रष्ट्याहून दृश्य अभिन्न असते. शक्ती शक्तीवंताहून अभिन्न असते. पण कार्याच्या कारणी दृष्टी व शक्तीमध्ये भिन्नत्व भासते. (९२)

द्रष्ट्याची शक्ती — दृष्टी — द्रष्ट्याहून अभिन्न असूनही स्वेच्छेने अनेकत्व धारण करते. दृष्टी द्रष्ट्याहून अभिन्न असूनही कार्य म्हणून दृश्यरूपाने वेगळी भासते. (९३)

"अविनाशित्वात् द्रष्टुर्दृश्टेः न हि विद्यते विपरिलोपः।
न तु तद्वितीयं अस्ति विभक्तम्; यत्तत्स्तुयः पश्येत" ॥ (९४)

द्रष्टा अविनाशी आहे. दृश्य आणी द्रष्टा यात विरोधाभास आहे असे वाटते; पण असे काहीही नाहीये. तरी द्रष्टा–दृश्य वेगळ्या रूपाने भासते हे स्तुत्य आहे. (९४)

द्रष्टा म्हणुनी "मी" जरी अविनाशी असला तरी त्याची शक्ती कधीही लुप्त होत नाही. "मी" आणी"मी" ची शक्ती मध्ये किंचितही द्वैत नसते, जरी शक्तीला वेगळेपणाने पाहता येत नाही. (९५)

हे स्पष्ट होते की प्रारंभापासून "मी" आणी"मी" ची शक्ती एकच आहे. "मी" ची शक्तीच अनेकत्वाच्या संकल्पामुळे स्त्री–पुरुष रूपाचे कारण आहे. (९६)

|| इति रामदासकृपान्वितेन श्रीधरस्वामिना विरचिते स्वात्म निरुपणे

सप्तमं प्रकरणं समाप्तम् ||

श्री राम समर्थ

स्वात्म निरुपण

प्रकरण- ८

"मी" चे अद्वयत्व

"मी" व अनेकत्वाचे प्रागट्य

“मी” स्फूर्ती होण्यापूर्वी संकल्प नावाचे काहीच नव्हते. जेव्हा “मी” ह्या नावानेच कोणी नव्हते तर संकल्प तरी कोण करणार? आणी संकल्पाची कल्पना तरी कोण करणार? (१)

म्हणून हे सत्य आहे की संकल्प–कल्पनेच्या अनुपस्थितीत कुठलाही संकल्प उत्पन्न होत नाही. “मी” स्फूर्ती उद्भवल्यानंतरच संकल्पात्मक सारे कार्य घडतात. (२)

“मी” बोध नसतानाही केवळ “मी” च्या उपस्थितीतच “मी” मध्ये अनेकत्वाचा संकल्प स्फुरित होतो. (३)

असे म्हणतात की एकमात्र “मी” जगात अनेकत्व कसे धारण करतो? सामान्य जीवाला "मी"च अनेकत्वाने जगात नांदत आहे असेच दिसते. (४)

“मी” बोध रहित कोणीही जगात जिवंत असू शकत नाही. म्हणून या अनुभवाच्या आधारावर जगात सर्व प्राणीमात्रांमध्ये “मी” ला पाहता येते. (५)

“मी” ने स्वेच्छेने स्वतः अनेकत्व धारण केले आहे अथवा “मी” मध्ये स्वतःच अनेकत्व होतेच. “मी” मध्ये “मी” वाचून काहीही नाही आणी“मी” ने स्वतः “मी” मध्येच अनेकत्व धारण केले. (६)

एकमात्र “मी” च अनेकत्वाने सर्व प्राणीमात्रात दिसत असल्याने “मी”च स्वप्नसृष्टीप्रमाणे स्वतःच्या अंशाला अनेकत्वाच्या रूपाने प्रदर्शित करतो. (७)

“मी” एकमात्र असूनही स्वेच्छेने स्वतः अनेकत्व कसे धारण करू शकतो? जीवात्मा स्वप्नसृष्टीची निर्मिती स्वतःच करतो, यात कुठल्याही प्रकारचा संदेह आहे का? (८)

विश्वामित्र ऋषींनी स्वतःच्या संकल्पाने दुसऱ्या स्वर्गाची निर्मिती कशी केली होती? कालनेमी राक्षसाने रमणीय आश्रमाची निर्मिती कशी केली होती? (९)

यक्ष, राक्षस, मानव आदि स्वसंकल्पाने अनेकरूप कसे धारण करतात? असे ज्ञात होते की मुळातच “मी” विविध रूपात व्यक्त होतो. (१०)

“मी”ची शक्ती जगतरूपाने व्यक्त

जगाच्या निर्मितीसाठी “मी” ची शक्तीच जगतरूपाने व्यक्त होते. “मी” ची शक्ती कोणावरही आश्रित नाही आणी कोणाच्या अभावाने “मी” ची शक्तीचा नाशही होत नाही. (११)

“मी” ची शक्ती स्वतः जगाचे निर्माण करते आणी जगाचे पालनही करते. “मी” ची शक्ती स्वतः सर्वांमध्ये समाविष्ट होऊन स्वतः "मी" मध्ये "मी" रूपानेही असते. (१२)

एका अग्नीच्या ठिणगीनेच पुढे अग्नीच्या अनेक ठिणग्या उत्पन्न होतात. त्याच प्रकारे विविध रूपे एका आत्मस्वरूपामुळेच निर्माण होतात आणी लय पावतात. (१३)

तदेत्तत्सत्यं यथा सुदीप्तादपावकाद्विस्फुल्लिंगा: सहस्रशः प्रभवन्ते सरूपा:।
तथाक्षराद् विविधाः सौम्य भावा: प्रजायन्ते तथेवापियन्ति॥ (मुण्डकोपनिषद् २/१)

अर्थ: हे सत्य आहे की अग्नीच्या ठिणगीपासून पुढे हजारो ज्वाळा निर्माण होतात. त्याचप्रमाणे अद्वैत "मी" पासून द्वैत–रूपी सृष्टी प्रकट होते आणी"मी" ची शक्ती "मी" मध्ये देखील उपस्थित राहते. (मुण्डकोपनिषद २/१)

"मी" ची शक्ती जगाची निर्मिती करून "मी" शक्तीच्याच रूपात जगाचे पालन करण्यास कशी राहते? "मी" ची शक्ती स्वेच्छेने सर्वांना आपल्यात समावूनही "मी" च्या शक्तीरूपात "मी" मध्ये कशी राहते? (१४)

"मी" ची शक्ती उत्पत्ती, स्थिती आणी लयाच्या कार्याची एकमात्र कारण असूनही अविकारी कशी आहे? "मी" ची शक्ती अन्य कोणाकडूनही मदतीची अपेक्षा न करता वरील कार्य स्वतः कशी करते? (१५)

जर असे आहे तर दृष्टांताद्वारे स्पष्ट केले जाऊ शकते. आत्मा (आकाश) पासून जगाची निर्मिती कशी झाली? (१६)

ज्याप्रमाणे कोळी कीटक जाळ्याची निर्मिती स्वतः करतो, त्याच प्रकारे "मी" ची शक्ती स्वतः अन्य कोणाकडून मदतीची अपेक्षा का करेल? (१७)

कोळी कीटक जाळ्याची निर्मिती करून त्याचे संरक्षणही स्वतःच करतो आणी शेवटी स्वेच्छेने जाळ्याला स्वतःमध्ये समाविष्ट करूनही कोळी कीटकाचा नाश होत नाही. (१८)

ज्याप्रमाणे जाळ्याच्या निर्मितीसाठी कोळी कीटक स्वतःच निमित्तमात्र कारण आहे, तेथे कोळी कीटक वाचून कोणीही दुसरा नसतो. सर्व काही एकमात्र कोळी कीटकच आहे. (१९)

त्याच प्रकारे जगाच्या निर्मितीसाठी ईश्वर वाचून अन्य कोणीही नाही. जगाच्या उत्पत्ती, स्थिती आणी लयाचे कारण स्वतः ईश्वरच आहे. (२०)

विशेष: ईश्वर ब्रह्मांडाचा अव्यक्तदेह (कारणदेह) आहे. येथे गुणमायेचा सात्त्विक भाव असतो. ब्रह्मांडाच्या कारणदेहाची ही अवस्था पिंडाच्या सुषुप्ती अवस्थेस प्रमाणेच आहे.

अविकारी ईश्वराद्वारे जगत कार्याची उत्पत्ती, स्थिती आणी लय कसे शक्य आहे हे कोळी–कीटक व त्याचे जाळे–निर्मितीच्या दृष्टांताद्वारे समजले जाऊ शकते. (२१)

एका ईश्वरापासून अनेकत्वाची उत्पत्ती कशी होते हे जमिनीत असलेल्या अनेक प्रकारच्या बीजांच्या दृष्टांताद्वारे समजले जाऊ शकते. (२२)

चैतन्यापासून जडाची उत्पत्ती

ईश्वर चैतन्यस्वरूपी असूनही त्यापासून जड जगाची उत्पत्ती कशी संभव होते? मग देहापासून जड नख, केस आदि उत्पन्न होणे कसे शक्य आहे? (२३)

जसे चैतन्ययुक्त देहापासून जड नख, केस आदि उत्पन्न होतात तसेच चैतन्ययुक्त ईश्वरशक्तीपासून जड विश्वनिर्मिती होते. (२४)

अतिसूक्ष्म एक "मी" पासून विस्तृत विविध जड पदार्थांची उत्पत्ती कशी संभव आहे? संशय बाळगण्याची आवश्यकता नाहीये. हे त्याच प्रकारे संभव आहे ज्याप्रमाणे वटबीज अर्थात बीजापासून वृक्षाची उत्पत्ती होते. (२५)

एकमात्र “मी” पासून अनेकत्व प्रकट झाले असे म्हणणे आणी स्वीकार करणे दोन्हीही एक आश्चर्यच आहे, परंतु "तत्शक्तियोग" अर्थात ह्याला “मी” ची शक्तीच कारण आहे. “अघटित–घटना–पटियसी माया” अशक्यही शक्य करून दाखविते, तिला माया म्हणतात. (२६)

विशेष: “मी” अविकारी असूनही “मी” च्या शक्तीपासून जगाची निर्मिती होते. त्या शक्तिजन्य कार्याला माया आणी कर्त्यास ब्रह्मांडाचा कारणदेह ईश्वर (मायोपहित ब्रह्म) असे म्हणतात.

एकच “मी” जड आणी चेतन रूपात

एकच वस्तू जड आणी चेतन अशा दोन्ही रूपात कशी राहू शकते? हे त्याचप्रमाणे संभव आहे जसे सजीव शरीरात हात व पायांवर निर्जीव नख आणी केस येतात. (२७)

ह्या प्रकारे स्पष्ट होते की कुठल्याही कार्याचे मूळरूपाने स्वतःचे कारण असतेच आणी कार्याला पाहूनच त्याचे कारण कोण आहे हे ज्ञात होते. (२८)

ज्याप्रकारे बीज अनेकत्व धारण करते त्याच प्रकारे “मी” अनेकत्व धारण करतो. ज्याप्रकारे एक बीजच अनेकत्वाने व्यक्त होते त्याच प्रकारे “मी” देहरूपाने अनेकत्व धारण करतो. ज्याप्रकारे अनेक कार्यरूपानी बीजापासूनच पाने, फांद्या आदि उत्पन्न होतात त्याचप्रकारे अनेक कार्यरूपानी अनेकत्वाने “मी”च राहतो, हे सत्य स्वीकारावयास हवे. (२९)

ज्याप्रकारे सूर्याच्या ऊर्जेमुळे पृथ्वीवरील पाणी शोषले जाऊन ढग निर्माण होतात त्याच प्रकारे “मी” पासून संकल्पयुक्त शक्तीचा प्रादुर्भाव होतो. जसे ढगापासून वृष्टि आणी गारा पडतात तसेच “मी” पासून जीव आणी शिव यांचे प्रागट्य होते. (३०)

ज्याप्रकारे ढग पाऊस आणी गारा ह्या दोन रूपात दिसतो त्याचप्रकारे “मी” एकमात्र असूनही कार्यदृष्टीने जड आणीचेतन रूपाने व्यक्त होतो. (३१)

ज्याप्रमाणे ढग, जमिनीवरील पाणी आणी पाऊस यापासून असंग आहे त्याचप्रकारे “मी”च्या पूर्वी सर्वत्र आत्मरूपच होते. (३२)

विशेष: ढग, गारा, पाऊस आणी जमिनीवरील पाण्यात जलतत्त्व आहे, परंतु सूर्य या सर्वांचे कारण असूनही सूर्यांत जलतत्त्वाचा अभाव आहे. म्हणून सूर्याच्या अनुपस्थितीत ढग, गारा, पाऊस आणी जमिनीवरील पाण्याचे कुठलेही अस्तित्व नाही. सूर्य सर्वांपासून असंग आहे आणी सर्वात आधी सूर्याचेच अस्तित्व होते.

स्वतः “मी” अनेक कार्य (जड आणी चेतन) रूपाने स्वतःच व्यक्त झाले. “मी” अन्य कोणाचीही अपेक्षा ठेवीत नाही आणी“मी” स्वतःच स्वतःला पाहतो. (३३)

“मी” स्फूर्तीने अनेकत्वाचा संकल्प करून स्वतःच अनेकत्व धारण केले. त्या अनेकत्वाच्या संकल्पात जड कार्यांत स्वाभाविक रूपाने चेतनेचा समावेश असतोच. (३४)

"मी" द्वारा कसल्याही सहाय्यावाचून जगत-कार्याची निर्मिती

एक प्रश्न येतो की “मी” ने कुठल्याही सहाय्यतेशिवाय आणी स्वतः अभिन्न राहून जगत-कार्याची निर्मिती कशी केली? (३५)

जरी निमित्त काहीही असले तरी कार्यापासून कर्ता भिन्नच असतो. जो कार्य करतो तो भिन्नत्वाने असल्या शिवाय कार्य करू शकत नाही. (३६)

कुठल्याही कार्यास संपन्न करण्यास सहाय्यकांची आवश्यकता असते. या प्रकारे प्रत्येक कार्यास भिन्न-भिन्न रूपाने अनेक सहयोगी असू शकतात. (३७)

माठ (मटका) कुंभाराद्वारे निर्मित असूनही हे स्पष्ट आहे की माठात (मटक्यात) मातीच असते. परंतु माठाच्या (मटक्याच्या) निर्मितीत अन्य पदार्थांच्या मिश्रणाचा देखील सहयोग असतो. हे अनुभवाने स्पष्ट आहे. (३८)

माठाच्या (मटक्याच्या) निर्मितीकरिता कारण माती आणी निमित्त-कर्ते कुंभार भिन्न आहेत. हेही स्पष्ट आहे की अन्य सहयोगी जसे पाणी, अग्नी आदि देखील माठापासून (मटक्यापासून) भिन्न आहेत. (३९)

जर अजूनही समाधान झाले नसेल तर पुन्हा योग्य प्रत्युत्तराद्वारे सत्य स्पष्टीकरण करूया. (४०)

माठाच्या (मटक्याच्या) निर्मितीचा मुख्य कर्ता – कुंभाराचा देह पार्थिव अर्थात जड आहे, अथवा अन्य काही आहे का? माठाच्या (मटक्याच्या) निर्मितीचे अन्य सहयोगी (माती, पाणी आदि) देखील जडच आहेत की नाही, याचे लवकर उत्तर द्यावे. (४१)

माठाच्या (मटक्याच्या) निर्मितीकरिता मुख्यत्वेकरून पृथ्वी-तत्वच मातीच्या रूपाने उपस्थित आहे. निमित्तरूपी कर्ता अर्थात कुंभाराचा देह आणी अन्य सहयोगी – माती, पाणी आदि देखील जड-तत्वच आहेत. (४२)

जर असे म्हटले की सर्वांचे कारण पंचभूतच आहेत, तर माठाच्या (मटक्याचा) निमित्तरूपी कर्ता – कुंभाराचा देह आणी अन्य सहयोगी – माती, पाणी आदि देखील पंचभूताहून भिन्न असू शकत नाही. (४३)

जर असे म्हटले की हे सर्व पंचभूतांचे कार्य आहे, तर आपण स्वतः विचार करावा की काय माठाच्या (मटक्याचा) निमित्त- कर्ता कुंभार पूर्वीपासूनच उपस्थित होता? (४४)

जर असे म्हटले की निमित्त- कर्ता कुंभार पूर्वीपासूनच उपस्थित होता, तर हे स्पष्ट करावे की तो जड आहे की चेतन? (४५)

कारण आणी कार्यरूपाने “मी”

जड-कार्याच्या निर्मितीपूर्वी जड-कार्याचा निर्माता चेतन-स्वरूपच आहे. त्याच्याहून भिन्न काहीही नसल्याने चेतन-स्वरूप निर्माता सर्वत्र व्याप्त आहे. (४६)

जर चिद्-स्वरूप ईश्वर अर्थात “मी” ला स्वतःहून भिन्न काही आहे असे वाटत असेल, तर जड आणी चेतन यामध्ये काय भिन्नता दिसेल हे निश्चित सांगावे. (४७)

कार्य करण्याचे अधिकृत स्वातंत्र्य ज्यास नसते त्याला जड म्हणतात. कार्याच्या पूर्वी असणाऱ्या सत्तामात्र कारणाचे जड असणे संभवत नाही. (४८)

विचार करून सांगावे की चेतन “मी” म्हणून काही आहे का? विचारांती असे कळते की कार्यरूपाने दिसणारे दृश्यच आहे. (४९)

दृश्याच्या पूर्वी असणारा चेतन “मी” दृश्य अथवा अदृश्य कसा असू शकतो? जर चेतन “मी” ला दृश्य म्हणावे तर दृश्याचा कर्ता कोण आहे? (५०)

दृश्याच्या पूर्वी, दृश्याचे कारण – चेतन “मी” कर्ताच आहे. विचार केल्यावर ज्ञात होते की तो अदृश्य आहे, कारण त्यास बघण्याची क्षमता कोणाकडेही नाही. (५१)

चेतन "मी" पासून काही वेगळे आहे असे वाटत असले तरी दोन्ही बाजूला स्पष्ट दृश्यच दिसते. तिसरा म्हणजे कोणीतरी पाहणारा जरी आला तरी तेथे दृश्यच असेल; चेतन "मी" नसेल तर कोणाला काय दिसणार? (५२)

दृश्याच्या पूर्वी "मी" चेतनरूपाने अदृश्य जरी झाला तरी किंचितही "मी" पासून भिन्नत्व न ठेवता स्वतःच्या बोधाने अद्वय रूपातच असतो. (५३)

कार्य त्याला म्हणतात जे संपन्न झाल्यावर दिसते. दृश्यामुळे द्रष्ट्याचे अस्तित्व आहे; असे नाही की द्रष्ट्याचे अस्तित्व दृश्यापूर्वीही आहे. (५४)

कार्यामुळेच द्रष्टा आणी दृश्य यांमध्ये परस्पर-सापेक्ष भाव बनलेला आहे. हे सत्य आहे की कार्याच्या पूर्वी कारणरूपाने द्रष्टाच असतो; तेथे दृश्य नाही. (५५)

द्रष्टा (कर्ता) आणी दृश्य (कार्य) दोन्हीच्या अभावात अन्य काहीही नसते. त्या परिस्थितीतही कार्य-कारणाहून अन्य काही आहे, हे कसे स्वीकारता येईल? (५६)

त्यामुळे हे स्पष्ट होते की कार्य-कारणाहून अन्य काहीही नाही. "मी"च्या स्वतःच्या शक्तीनेच अनेकत्वाचे (सृष्टीचे) कार्य संपन्न होते. हे अनेकत्वाचे (सृष्टीचे) कार्य "मी" पासून भिन्न नाही. (५७)

एकमात्र "मी"च निमित्तरूपाने व मुख्य कारण रूपानेही आहे. त्यापासून भिन्न काहीही नाही. कार्यरूपानेही "मी" पासून काहीही भिन्न नाही. (५८)

पंचभूत सृष्टी कार्यरूपाने जरी दिसत असली तरी ती एकच आहे; कारण सृष्टी-कार्याला पंचभूतच कारण ठरते. म्हणून कार्य भिन्न नसून सर्व काही कारणच आहे. (५९)

"तत् तेजोऽक्षत" अर्थात सर्वत्र त्याचाच प्रकाश आहे असा छांदोग्य उपनिषदात स्पष्ट उल्लेख आहे. परंतु जडात चैतन्यात्मक कार्य-संकल्प कधीच होणे शक्य नाही. (६०)

अदृश्य आणी दृश्य दोन्ही एक कसे असू शकतात? आणी त्याच बरोबर ते अनेकत्व कसे धारण करू शकतात? तसेच चेतन आणी जड दोन्ही स्वतःच कारण आणी कार्य कसे असू शकतात? (६१)

"मी"ची शक्ती अनेकत्वाला कारण

"मी"च्या शक्तीमुळे सर्व काही संभव आहे, कारण *अघटित-घटना-पटियसी माया* — अर्थात असंभवास संभव करण्याचे सामर्थ्य जिच्यात आहे, तिला "मी"ची शक्ती अर्थात माया म्हणतात, असे या आधीही नमूद केले गेलेले आहे. म्हणून व्यर्थ संशय घेण्याचे कारण नाही. (६२)

हे स्पष्ट आहे की अद्वय "मी" जो चेतनस्वरूपात आहे, त्यात आणी"मी"च्या शक्तीत कुठलाही भेद नाही. "मी"ची शक्तीला "मी"हून भिन्न जरी मानले, तरी वर नमूद केलेल्या विवेचनास सिद्ध करण्यास काही कष्ट पडणार नाहीत. (६३)

पूर्वी स्वतः "मी" चिद्रूप असल्याने "मी"ला स्वतःच्या शक्तीला जड व भिन्न रूपात पाहण्याची आवश्यकता का भासेल? जर "मी" स्वतः जड आहे तर तो त्याच्या शक्तीला पाहण्यास कसा समर्थ असू शकेल? (६४)

जरी हे मानले की "मी"ची शक्ती "मी"हून भिन्न आहे, तर हे स्पष्टच होईल की "मी"ची शक्ती जड आहे. "मी"ची शक्ती जड असल्यास तिला "मी"चे स्मरण अथवा विस्मरण होणे कसे संभव आहे? (६५)

चेतन "मी"ला भिन्न रूपाने पाहणारा कोणी असूच शकत नाही. शक्ती चेतन "मी"पासून भिन्न नसल्याने शक्तीला पाहणाऱ्याला शक्ती जड कशी भासेल? (६६)

शक्तीला चेतनमात्र म्हटले तर शक्तीच्या चेतनमात्रतेने (ज्ञानाने) काय भिन्नत्व भासते? ज्ञानस्वरूप म्हणून एकच चेतन "मी" असून तो भिन्नत्वाच्या भासाने युक्त आहे. (६७)

विशेष: "मी" आणी "मी"ची शक्ती दोन्हीही चेतनमात्र असल्याने, जरी भिन्न भासयुक्त दिसले तरी एकच चेतनमात्र आहेत.

जरी "मी" आणी"मी"च्या शक्तीमध्ये भिन्नत्वाचा भास होतो तरी त्याआधीपासून "मी" आणी"मी"ची शक्ति अभिन्नच आहेत. "मी" आणी"मी"ची शक्ति अद्वय ज्ञानस्वरूप असल्याने तिथे चेतनमात्रता (ज्ञान) वाचून अन्य काय असू शकते? (६८)

सर्वात आधी चेतना (ज्ञान)च असल्याने अद्वय "मी" चेतना (ज्ञान)हून भिन्न नाही. त्यामुळे हे स्पष्ट आहे की अद्वय "मी"पासूनच सर्वकाही संभव झाले आहे, ज्यास कर्ताही म्हणतात. (६९)

ज्याप्रकारे माठाच्या (मटक्याच्या) निर्मितीत मुख्य निमित्त-कर्ते कुंभार, मुख्य सहयोगी माती आणी अन्य सहयोगी अग्नी, पाणी आदि यांमध्ये कार्यरूपाने कुठल्याही प्रकारचा भेद नाही — सगळे माठाच्या (मटक्याच्या) निर्मिती-कार्याचे सहयोगी आहेत. (७०)

जरी "मी" आणी"मी"च्या शक्तीमध्ये भिन्नत्वाचा भास दिसतो तरी "मी" आणी"मी"च्या संकल्पशक्तीत किंचितसुद्धा भेद नाही. (७१)

"मी"च्या संकल्पात अनेक विषमता असूनही "मी" विषमतेपासून अलिप्त

उच्च-नीच आणी सर्वज्ञ-अल्पज्ञ आदि विषम भावामुळे जगात एक सुखी आणी दुसरा दुःखी आहे. त्याचप्रकारे 'विद्वान'-मूर्ख आणी सज्जन-दुर्जन भेद देखील आहेत. (७२)

एकाला जे लाभले तसेच दुसऱ्यालाही तेच लाभलेले आहे. अर्थात चेतन "मी" सर्व प्राणिमात्रांत एकसारखाच आहे. मग एकत्वामध्ये (अद्वैतात) जगात वेगळेपणा (द्वैत) कसा भासेल? अद्वैतात द्वैत नसूनही अद्वैतात द्वैत भासते; अद्वैतात दिसणारी विषमरूपी द्वैतता खरी नाही. (७३)

"मी" एकमात्र असल्याने "मी"मध्ये अनेकत्वाचा संकल्प झाला. "मी"च्या संकल्पात अनेक विषमता असूनही "मी" त्या विषमतेहून अभिन्न आहे. (७४)

"मी"च्या संकल्पामुळेच एकमात्र "मी" अनेकत्वाने प्रकट झाला आहे. त्यामुळे एकमात्र "मी"द्वारे कुठल्याही प्रकारचा पक्षपात होणे कसे शक्य आहे? म्हणून असे म्हणणे की "मी"मध्ये विषमता, भेद, भ्रांत, उच्च-नीच आहे, हे कसे शक्य आहे? (७५)

ज्ञानस्वरूप ईश्वर अर्थात "मी" सर्वत्र व्याप्त कसा झाला? कारण "मी" वाचून काहीही अन्य नाही. या विषयी कुठल्याही प्रकारची शंका घेण्यासारखीही नाही. यातून हे स्पष्ट होते. (७६)

"मी"च्या शक्तीला व्यक्त करण्यासाठी "मी"ला अर्धनारीनटेश्वर देखील म्हणतात. "मी"हून "मी"ची शक्ती भिन्न नसल्याने "मी" आणी"मी"ची शक्ती एकच आहे, हे स्पष्ट होते. (७७)

त्यामुळे स्पष्ट आहे की "मी" आणी"मी"च्या शक्तीचे ऐक्य असल्याने "मी"च्या शक्तिजनित सृष्टि-कार्याचे भिन्न रूपाने अस्तित्व नाही. जर "मी"ची स्वतःची शक्ती "मी"हून अभिन्न आहे तर "मी"चे देखील "मी"च्या शक्तीपासून भिन्न राहणे कसे शक्य आहे? (७८)

ऐक्यत्वामध्ये अन्य कोणी नाही, त्यामुळे अन्यत्वाचा भावदेखील नाही. कारणरूपाने एक निर्विकल्प चिद्रूप "मी"च असल्याने तिथे अन्याचा अभाव आहे. (७९)

स्वतः "मी"च स्वतःच्या शक्तीद्वारे अनेकत्वाने व्यक्त होण्यासाठी सृष्टि-कार्यरूपात परिणत झाला. "मी"ची स्वतःची शक्ती "मी"हून अभिन्न असूनही सृष्टिरचनेच्या दृष्टीने भिन्न दिसते, असे म्हणतात. (८०)

हे स्पष्ट आहे की जोपर्यंत "मी" (ईश) "मी"च्या शक्तीपासून अभिन्न आहे, तोपर्यंत सृष्टि-कार्य कसे घडेल? तरी सृष्टि-कार्य कसे घडले? (८१)

म्हणून सृष्टि-कार्याच्या संपन्नतेच्या दृष्टीने "मी"ची शक्ती "मी"हून भिन्न भासते. "मी" शक्तीला स्वतःपासून भिन्न करून पुन्हा तिच्याकडून अनेकत्व-सृष्टि-कार्याची निर्मिती करतो. (८२)

"मी"पासून जरी "मी"ची शक्ती भिन्न नसेल तर "मी" अनेकत्वाची कल्पना तरी कशी करू शकतो? (८३)

सर्वप्रथम "मी"चेच अस्तित्व असल्याने "मी"हून अन्य काहीही नव्हते. या निर्विकल्प स्थितीत "मी"हून अन्य काहीही आणी कधीही संभव नाही. (८४)

"मी" आणी"मी"च्या शक्तीच्या ऐक्यत्वाशिवाय अन्य काहीही नसल्याने "मी" स्वतःच द्वैताची कल्पना करतो. या द्वैत-कल्पनेत "मी"च्या सहाय्यतेकरिता "मी"च्या शक्तीशिवाय अन्य कोणीही नाही. (८५)

"मी"च्या संकल्पाने सृष्टि-उत्पत्ती

जरी "मी"ची शक्ती "मी"हून भिन्न नाही तरीही सृष्टि-कार्याच्या दृष्टीने "मी" केवळ भिन्नत्वाची कल्पनाच करतो. "मी" आणी"मी"च्या शक्तीच्या ऐक्यत्वात अन्याचा अभाव असल्याने संकल्पमात्रानेच सृष्टि-कार्य शक्य झाले. (८६)

संकल्पाच्या पूर्वी एकमात्र "मी" होता. तत्पश्चात संकल्प आणी"मी"ची शक्ती प्रस्फुरित झाली. "मी" स्वतःच्या शक्तीला स्वतःपासून भिन्न करून अनेकत्व धारण करतो — हेच सत्य आहे. (८७)

पूर्वी "मी"ला "मी" हा बोधही नव्हता. फक्त "मी"-रहित ज्ञानच होते. जर "मी" निर्विकल्प आहे तर "मी"मध्ये स्फूरण व अन्य काहीही नव्हते — हेच स्पष्ट आहे. (८८)

"मी"च स्त्री-पुरुषरूपाने

ज्याला आद्य ईश्वर म्हणतात तोही "मी" सारखाच स्फूरणरहित अवस्थेत होता. त्यानंतर त्या ईश्वरामध्ये "मी" हे स्फूरण कारण-कार्याला उद्देशून होते. (८९)

अनेकत्वाचे सृष्टि-कार्य निर्माण करण्याकरिता "मी"ला "मी"च्या शक्तीची कल्पना भिन्नत्वरूपाने करावी लागली. "मी"ने स्वशक्तीला *प्रकृती* आणी"मी"ला *पुरुष* नावांनी संबोधित केले. (९०)

अनेकत्वाच्या सृष्टि-कार्याच्या उद्देशपूर्वी आद्य ईश्वर निर्विकल्प अवस्थेत होता.आद्यईश्वरानेच सृष्टि-कार्याच्या उद्देशाची कल्पना करून "पुरुष–प्रकृती" या दोन नावांनी अनेकत्व ग्रहण केले. (९१)

"आत्मानमेव द्वेधापातयत्ततः पतिश्च पत्नी च" — निर्विकल्प आद्य ईश्वर अर्थात "मी"च पती–पत्नी ह्या दोन भागांत विभक्त झाला, असे बृहदारण्यक उपनिषदात स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे स्त्री–पुरुष असा कुठलाही भेद नाहीये. (९२)

विशेष — श्रुतीत "आत्मैव पुरुषः" अर्थात आत्म्यालाच पुरुष म्हणतात. ज्ञानेश्वरी (भावार्थदीपिका) मधील क्षेत्र–क्षेत्रज्ञ योगामध्ये प्रकृती–पुरुषाचे विस्तृत विवेचन केलेले आहे. ते पहावे.

कामक्रीडेद्वारे चौऱ्याऐंशी लक्ष योनी अस्तित्वात आली. तसेच देव–आदींकांद्वारेही प्रजा अस्तित्वात आली. (९३)

ज्ञानस्वरूप "मी"नी स्वतःच्या शक्तीद्वारे स्वसंकल्पाने स्वतःच अनेकत्व धारण केले. ह्या प्रकारे "मी"च प्रकृती–पुरुषाच्या माध्यमातून स्त्री–पुरुष, प्रजेच्या रूपात स्वतःच व्यक्त झाला. (९४)

ह्या सृष्टीच्या विविधतेत अन्य काहीही नाहीये आणी जो भेद भासतो तो खोटा आहे. "मी" निजबोधानी, निजसंकल्पानी, निजशक्तिरूपानी निर्विकल्पच आहे. (९५)

ज्ञानस्वरूप "मी"

ह्या विषयी काही संशय असल्यास आता स्पष्ट करू. काही संशय असेल तर स्पष्ट विचारावे. (९६)

जेथे एकमात्र "मी"च आहे तेथे अन्य व भेदत्वाचा भाव कसा येणार? जेथे कायमचा ज्ञानस्वरूप "मी"च आहे, मग वरील संशय कोणाला येणार? (९७)

जर ज्ञानस्वरूप "मी"च एकमात्र असल्यानी संशय, संशय निर्माण करणारा, संशयाचे निराकरण — ही त्रिपुटी ज्ञानस्वरूप "मी"सह असूच शकत नाही. (९८)

ज्याप्रकारे श्रीरामाच्या आणी परशुरामाच्या रूपात एकच विष्णू आहे, त्याचप्रकारे जीव आणी ईश्वर (शिव) एकच आहेत, परंतु दोन रूपात व्यक्त आहेत. (९९)

"मी"मध्ये अनेकत्वाला स्थान नाहीये

ज्ञानस्वरूप "मी"च निजशक्तीने, निजरूपानी अनेकत्व धारण करतो हे जरी सत्य आहे, तर त्यामध्ये भिन्नत्व का भासते? (१००)

एकत्वाचे ज्ञान अर्थात "मी"चा निश्चय झाल्याने स्त्री–पुरुष देह आणी संतती कोणाचेच अस्तित्व उरत नाही. प्रकृती–पुरुषाच्या संकल्पाने अनेकत्वरूप सृष्टीकार्याचेही अस्तित्व उरत नाही. (१०१)

हेही सत्य आहे की एकत्वाचे ज्ञान अर्थात "मी"चा निश्चय झाल्याने कामनेचे (संकल्पाचे) अस्तित्व उरत नाही. त्यामुळे हे स्पष्ट रूपाने सत्य आहे की कामनेच्या (संकल्पाच्या) अभावात पिंड आणी ब्रह्मांड काहीही राहत नाही. (१०२)

"मी" -आद्य ईश्वर

अन्य शरीरे निर्माण होण्यापूर्वी मूळ पुरुष "मी" (आद्य ईश्वर) एकच होता. विचार केल्याने हेही ज्ञात होते की मूळ पुरुष "मी" (आद्य ईश्वर)हून अन्य कोणीही नाहीये. (१०३)

सर्वात आधी आपण "मी" म्हणून जे उच्चारतो तो "मी"च स्वयं आद्य ईश्वर आहे. "मी" बोध झाल्यानंतर तो स्थिरावतो व तत्पश्चात देहरूपानी अनेकत्व धारण करतो. (१०४)

विशेष:"तत्त्वमसि" हे ऋग्वेदप्रणीत महावाक्य आहे, ज्यात तो आद्य ईश्वर अन्य कोणीही नसून "मी"च आहे.

कुठल्याही व्यक्तीला आवाज दिल्यास तो स्वतःला सर्वप्रथम "मी" नावाने संबोधित करतो. ह्या प्रकारे सर्व देहात एकच "मी" व्याप्त आहे, असे सिद्ध होते. (१०५)

"मी" अर्थात आद्य ईश्वर स्वतःला एकटा पाहून स्वतःच्या एकट्यापणाने भयभीत झाला. "मी" वाचून अन्य कोणी नाही हे ज्ञात होताच जीवाला निर्भय स्थिती प्राप्त झाली. (१०६)

ज्याप्रकारे आद्य ईश्वर अर्थात “मी” स्वतःच्या एकट्यापणाने सुखी नव्हता, त्याचप्रकारे जीव देखील एकटा सुखी राहत नाही. त्यामुळे “मी”मध्ये उत्पन्न झालेली अन्यत्व/अनेकत्वाची इच्छा जीवादेखील पहावयास मिळते. (१०७)

ज्याप्रकारे "अर्धो वा एष" अर्थात “अर्धे–अर्धे आहोत” असे संहितेत उल्लेखित आहे, त्याचप्रकारे "अर्धवृगलमिवस्व" अर्थात “अर्धे–अर्धे असूनही एक आहोत” असे बृहदारण्यक उपनिषदातही उल्लेखित आहे. (१०८)

विशेष: संहितेत "अर्धो वा एष" असा उल्लेख आहे, अर्थात “मी”च स्वशक्तीशी संकल्पवश प्रकृती आणी पुरुषाद्वारे दोन समभागांत विभक्त होऊन स्त्री–पुरुष देह धारण करतो. परंतु "अर्धवृगलमिवस्व" अर्थात “मी”च शक्तीच्या संकल्पानुसार प्रकृती आणी पुरुषाद्वारे स्त्री–पुरुष देह धारण केल्यानंतर अर्धे–अर्धे असूनही एक “मी” आहे, असे बृहदारण्यक उपनिषदातही वर्णिलेले आहे.

स्त्री–पुरुष अर्धे–अर्धे एकाच तत्त्वाचे पूरक आहेत, अर्थात एकच “मी” अर्थात आद्य ईश्वर अर्ध पुरुष आणी अर्ध स्त्रीच्या रूपात व्यक्त आहे. गृहस्थधर्मात एकच देह अर्धा पुरुष आणी अर्धा स्त्रीच्या रूपात आहे आणी ह्यात थोडीदेखील भिन्नता नाहीये. (१०९)

मग किंचितही अन्यत्वाचा भेद नसून चिद्रूप (ज्ञान) "मी"च पूर्णत्व व अद्वयरूपाने उरतो. ह्या व्यतिरिक्त सर्व भ्रमात्मक सोडून सत्याचा निश्चय करून "मी"ची अर्थात स्वतःची ओळख करून घ्यावी. (११०)

अन्याच्या अभावात “मी”ला कोणताही संकल्प उद्भवू शकत नाही. संकल्पाभावी “मी”मध्ये प्रकृती–पुरुष, स्त्री–पुरुष भावना देखील निर्माण होऊ शकत नाही. (१११)

पुरुष–प्रकृती, स्त्री–पुरुष आदींच्या अभावात एक दुसऱ्याशी संग होणे असंभव आहे. जोपर्यंत पुरुष–प्रकृती एकमेकांचा उपभोग घेत नाही, तोपर्यंत पुरुष–प्रकृतीद्वारे ब्रह्मांडोत्पत्ती आणी स्त्री–पुरुषांद्वारे पिंडोत्पत्तीचे कार्य असंभव आहे. (११२)

म्हणून एक अद्वय “मी”च्या अतिरिक्त अन्य काहीही नाहीये. जगात “मी आणी तू” असे काहीही नसून अद्वयरूपाने केवळ “मी”च उरतो. (११३)

भिन्नत्वाचा भास सोडून एकत्वाच्या अर्थात आपल्या मूळ "मी"स्वरूपातच विरघळून राहावे. "मी"च्या चिद्रूपी अन्यत्वाला स्थान नाहीये. हेच सत्य आहे. (११४)

॥ इति श्रीरामदासकृपान्वितेन श्रीधरस्वामिना विरचिते
स्वात्मनिरूपणे अष्टमप्रकरणं समाप्तम् ॥

||श्रीराम समर्थ||

स्वात्मनिरुपण

प्रकरण-९

सच्चिदानंद "मी" वर जगत आवरण

"मी" कोण ?

"मी" सत्य, ज्ञान आणी अनंताने परिपूर्ण स्वतः आनंदस्वरूप आहे. मिथ्या जडत्व कारणी स्वतःला अल्पज्ञ समजल्यानेच दुःख प्राप्त होते. श्रुतीचे असे कथन आहे की याचे मूळ कारण "मी" वर आलेले अज्ञानाचे आवरण आहे, जे सत्य नसून केवळ मिथ्या भ्रांतीच आहे. म्हणून "मी" च "मी"ला तात्त्विक दृष्टीने का पाहत नाही? (१)

मुलगा आईस विचारतो की दोरीमध्ये साप कुठून येतो? आणी ही सापाची भ्रांती कशी उत्पन्न होते? आई म्हणते की, "अरे मुला! हा तुझा भ्रम आहे आणी हे सत्य नाहीये," असेच समजले पाहिजे. "मुला, स्वतः विचार कर की जर दोरीच साप आहे तर तुला दोरी दंश का करीत नाही?" आई स्वतः दोरी हातात घेऊन मुलास सांगते, "हे बघ! हा साप नाहीये, ही वास्तवात दोरीच आहे." (२)

स्वतः "मी"ला जगतरूपी मिथ्या भ्रांती कशी उत्पन्न झाली? श्रुती माता प्रत्युत्तर देते की याचे कारण "मी"चे अज्ञानच आहे. "मी"च्या नित्यज्ञानस्वरूपात स्वतः जगतरूपी भ्रांती कशी होणार? जरी ही भ्रांती उत्पन्न झाली असेल तरी ती खोटी आहे. कारण "मी"ला स्वतःची विस्मृती होणे कधीच शक्य नाही. (३)

देहाला बघताच "मी" आहे असे म्हणत असतो. पण देह नश्वर आहे. असे पाहून लक्षात येते की देह नश्वर आहे व तसे म्हणतातही. मग "मी" कोणाला म्हणावे? हे कळताच कळते की हे "मी"विषयीचे अज्ञानच आहे. श्रुती माता सांगते की सच्चिदानंदस्वरूप "मी"वर जगत केवळ आवरण मात्र आहे. (४)

"मी"च्या नित्यज्ञानस्वरूपाला अनंत आणी अद्वय स्फुरण निरर्थक

नित्यज्ञानस्वरूपात "मी" अनंत, अद्वय ब्रह्म आहे. हे स्फुरण मिथ्याच आहे, अर्थात याचे काही अस्तित्व नाहीये. "मी" ह्या स्फूर्तीची स्मृती "मी"पासून वेगळी नसून "मी"मध्येच सामावलेली आहे. ही स्मृती आंत आणी बाहेर असतेच, पण ह्याचे लक्षच नसते. (५)

विशेष: "मी अनंत, अद्वय ब्रह्म आहे" ही भ्रांती आहे, कारण की हे स्फुरण देखील "मी"नेच व्याप्त आहे. म्हणून "मी"हून भिन्न काहीही नाहीये.

"मी"चे सत्य स्वरूप

स्वतः "मी"मध्ये "मी"च्या उद्भवाविषयीचे चिंतन केले पाहिजे. अनंत विषयाच्या भ्रांतीकळे लक्ष देऊ नये. "मी"ला हा भाव किंचितही येत नाही. अनंत कधीही अल्प होऊ शकत नाही, अर्थात अनंत बुद्धीच्या कक्षेचा बाहेरचा विषय आहे. (६)

म्हणून "मी"मध्ये अनंताची कल्पना करणे व्यर्थ आहे. जगात मूढ लोकांना कळण्यासाठी अनंत अशी कल्पना केलेली आहे. रज्जूमध्ये सर्प नसतो व निर्माणही करता येत नाही. मग शेवटी म्हणतात की रज्जूमध्ये सर्प नाहीच. (७)

“मी”ला स्वतःच्या नित्यत्वाची विस्मृती कशी शक्य आहे? जर “मी”ला स्वतःच्या नित्यत्वाची विस्मृती शक्य नाही तर “मी”ला स्वतःच्या नित्यत्वाची स्मृती कशी येणार? "मी"ला स्मृती व त्या सापेक्ष विस्मृती पण नाहीये. ही सर्व भ्रांती सोडून "मी"चे खरे स्वरूप ओळखणेच श्रेयस्कर आहे. (८)

विशेष: “मी” नित्य जागृत असल्याने “मी”मध्ये स्मृती–विस्मृतीची कल्पना करणे मिथ्या आहे.

“मी”मध्ये स्फूर्तीची अनुपस्थिति “मी”च्या अनंततेला दर्शवते. “मी”मध्ये स्फूर्तीचा उदय आणी अंतही “मी”च्या अनंततेला दर्शवतो. “मी”मध्ये स्फूर्तीचा उदय आणी भासही “मी”च्या अनंततेला दर्शवतो. "मी”मध्ये स्फूर्तीच्या उदय आणी अंत होण्यापूर्वीही “मी” अनंतताच दर्शवितो. (९)

स्फूर्ती प्रागट्य, स्थिति आणी लय "मी"च्या कारणीच

स्फूर्ती प्रगट होणे आणी लीन होणे "मी"च्या कारणीच आहे. तसेच स्फूर्तीचे टिकणेही "मी"च्या कारणीच आहे. म्हणून असे ठरते की स्फूर्ती रुपाने अद्वय “मी”च प्रकाशित आहे. (१०)

“मी” स्फूर्ती उत्पत्ती आणी लयाच्या दोन्ही स्थितीत प्रकाशित आहे. “मी” स्फूर्तीच्या अस्तित्वातही प्रकाशित आहे. म्हणून तोच अद्वय “मी” स्वतः “मी”रूपातही प्रकाशित आहे. (११)

"मी"मध्ये द्वैत–अद्वैत नाही

आनंदात्मक “मी”मध्ये अद्वैत आणी द्वैताचा अभाव आहे. ह्या “मी”च्या अद्वैतामृतसागरात स्फूर्तीचा देखील अभाव आहे. त्यामुळे स्वभावतः अद्वैत “मी”मध्ये कुठल्याही प्रकारचे द्वैत नाहीये. "मी" स्वतः "मी"च असल्याने येथे कशाही प्रकारचे भिन्नत्व नाहीये. “मी”मध्ये कुठल्याही प्रकारच्या कार्यकारणभावाचा अभाव असल्याने अद्वैत "मी"मध्ये भ्रांती येणे शक्य नाही. (१२)

ज्ञानस्वरूप “मी”ची स्मृतीच स्फूर्ती

नित्यज्ञानस्वरूप “मी”च्या स्मृतीलाच स्फूर्ती म्हणतात. परंतु या स्फूर्तीने होणारे “मी”चे ज्ञान भासात्मकच आहे. परंतु “मी” स्वतः असा नाहीये. (१३)

स्फूर्तीच्या माध्यमातून होणारे “मी”चे ज्ञान भासात्मक आहे. कारण “मी” स्वयं निराभास असल्याने “मी”चे स्फूर्तीजनित ज्ञान होणे असंभव आहे. म्हणून “मी”चे होणारे स्फूर्तीजनित ज्ञान अज्ञानत्वच दर्शविते. (१४)

म्हणून स्फूर्तीच्या माध्यमातून होणारे “मी”चे ज्ञान भासात्मक आहे. स्फूर्ती द्वारे मिळणारे “मी”चे ज्ञान सत्य नाहीये. वैचारिक दृष्टिने हे स्वतः अज्ञानच दर्शवते. (१५)

"मी"च्या बोधरुपाने होणारी स्मृती आणी विस्मृती सर्व भासात्मक

"मी"च्या बोध (भान) रुपाने होणारी स्फूर्तीच स्मृती आणी विस्मृती रुपानी भासते. मुळातच विस्मृतीला कारण "मी"ची स्मृतीच आहे. (१६)

स्फूर्तीच्या माध्यमातून होणाऱ्या “मी”च्या स्मृतीला ज्ञान म्हणतात. पण हे ज्ञान “मी”चे ज्ञान नाहीये. “मी”चे ज्ञान स्मृतीच्या आधाराने होत असल्याने वास्तवात हे “मी”चे अज्ञानच आहे. (१७)

ज्याप्रकारे निश्चल अशा आकाशात वायूचा प्रवाह चालतो त्याचप्रकारे निश्चल अशा चिद्रूप “मी” मध्येच स्फूर्ती उदयास येते.(१८)

"मी" ब्रह्म हे ज्ञान ही मिथ्या

स्फूर्तीमध्ये “मी”चे ज्ञान आणी अज्ञान दोन्हीही आहेत. पण स्मृती–विस्मृती "मी"ला स्पर्शही करू शकत नाहीत. (१९)

स्मृतीरुपात "मी"चे ज्ञान आणी विस्मृतीरुपात "मी"चे अज्ञान फक्त "मी"चा स्फूर्तीमध्येच भासते. "मी"मध्ये ज्ञान–अज्ञान दोन्ही नाहीये. (२०)

“मी”मध्ये स्फूर्ती अभावे स्मृती–विस्मृती दोन्हीही नाहीये. त्यामुळे स्फूर्तीमध्ये स्मृती–विस्मृतीचा वास आहे, “मी”मध्ये नाही. (२१)

“मी” नित्यज्ञानस्वरूप असल्याने “मी”मध्ये स्मृती नाही. स्मृतीचा अभाव असल्याने विस्मृती तरी कशी असणार? (२२)

सूर्यप्रकाशामुळे पाण्यात सूर्य प्रतिबिंब भासते. वास्तवात पाण्यात सूर्य नाहीये. सूर्य केवळ आभास मात्रच आहे. (२३)

त्याचप्रकारे अनंत “मी”मध्ये उदित स्फूर्तीद्वारे “मी”च्या चिद्रूपत्वाचा भास होतो. “मी”ला “‘मी’ ब्रह्म आहे” असे म्हणणे ही मिथ्या आहे. कारण की “मी” स्वयं चिद्रूप नाहीये. (२४)

“मी ब्रह्म आहे” हे ज्ञान मिथ्या स्फूर्तीमुळे आहे. स्फूर्ती रहित "मी"मध्ये “मी ब्रह्म आहे” असे नाहीये. (२५)

जिथे ज्ञानालाच स्थान नाहीये, तेथे अज्ञान असणे कसे संभव आहे? म्हणून “मी”मध्ये ज्ञान–अज्ञान असा कुठलाही भेद नाहीये. (२६)

“मी ब्रह्म आहे” ही स्फूर्ती होण्यापूर्वी विस्मृतीरूपाने अज्ञान होते. परंतु “मी” नित्यज्ञानस्वरूपच असल्याने विस्मृतीद्वारे उत्पन्न अज्ञानाचा लवलेशही तेथे राहत नाही. (२७)

हे सत्य आहे की "मी"चे ज्ञान कायमस्वरूपी असल्याने स्फूर्तीमुळे “मी”मध्ये कसलाही विकार उत्पन्न होत नाही. म्हणून “मी”मध्ये स्फूर्ती होणे मिथ्याच आहे. (२८)

स्फूर्ती मिथ्या असल्याने तिला माया म्हणणे योग्य ठरेल. स्फूर्ती मिथ्या असल्याने किंचितही सत्य नाही; त्या कारणी स्फूर्ती सह राहणारे जीव–ईशादि कार्य आदि भ्रान्तिमूलकच आहे. (२९)

"मी"वर असलेले विस्मृतीरूपी आवरणच अविद्या आहे. "मी ब्रह्म आहे" ज्ञान–स्मृतीच विद्याविक्षेप आहे. (३०)

विद्या–अविद्या, स्फूर्ती, विक्षेप व आवरण सर्व माया रूपाने भासमान आहे. हे सत्य आहे की “मी”च्या अस्तित्वा कारणी मायेने केलेले सर्व कृत्य वाया जाते. (३१)

जर विक्षेप, आवरण आणी स्फूर्तीच्या माध्यमाने माया भासमान आहे, तर हे सत्य आहे की ही माया “मी”ला अल्पही बाधक होणार नाही. (३२)

दोरीवर सापाचा जो भास होतो त्याचे कारण त्याचे मूळ स्वरूप अर्थात दोरीचे ज्ञान नसणे हे आहे. दोरीच्या मूळ स्वरूपाच्या अज्ञानालाच आवरण म्हटले जाते. (३३)

दोरीच्या ज्ञानावर आवरण येण्याने दोरीस साप म्हटले जाते. याला विक्षेप म्हणतात. हा विक्षेप — अर्थात दोरीवर सापाचा अनुमानच भयाचे कारण आहे. (३४)

अज्ञानामुळे आवरण, आवरणाने सत्यस्थितीची (दोरीवर सापाची भावना) विस्मृती, सत्यस्थितीच्या विस्मृतीने विपरीत भावना उत्पन्न होते, अर्थात "ही दोरी नाहीये, साप आहे." (३५)

"मी ब्रह्म आहे" असे म्हटल्याने असे ज्ञात होते की ही स्मृती येण्यापूर्वी "मी ब्रह्म आहे" याची विस्मृती होती. हे आवरण म्हटले जाते. हे आवरण काल्पनिक असून सत्य नाही. (३६)

मूळ "मी"च्या नित्यज्ञानस्वरूपाची विस्मृतीच अज्ञान आहे. हेही सत्य आहे की "मी"चे अज्ञानच आवरण आणी विस्मृतीचे कारण आहे. (३७)

"मी"वर आवरण येण्यानेच जगत, जीव आणी ईश यांचे ज्ञान होते. आवरणाने होणाऱ्या भासास विक्षेपशक्ती म्हणतात. परंतु "मी"चा विक्षेपशक्तीशी कुठल्याही प्रकारचा संबंध नाहीये. (३८)

"मी"वर आलेल्या आवरणामुळेच "मी ब्रह्म आहे" हे ज्ञान होते. वरील आद्य विक्षेपाला चौथ्या उपाधी (ब्रह्मांडाचा चौथा देहाभिमानी — साक्षी) ईशाने जाणले जाते. पण ही चौथी उपाधी "मी"ला नाहीये. (३९)

विशेष: ब्रह्मांडाचे चार देह-(१) स्थूल देह — विराट (२) सूक्ष्म देह — महत (३) कारण देह — ईश्वर (४) महाकारण देह — साक्षी (ईश)

स्थूल सृष्टीचे प्रागट्य

"मी"वर अज्ञानांधकाराचे आवरण जेव्हा घनीभूत होते, तेव्हा स्थूलता अर्थात जडता उत्पन्न होते. ह्या जडतेमुळे विकार (एकोऽहं) उत्पन्न होतो. जडताजनित विकाराने स्थूल सृष्टीचा विकार अर्थात अनेकत्वाचा (बहुस्याम्) संकल्प उत्पन्न होतो. (४०)

मुळात स्थूल जगाला सृष्टिकारणाचे बीज अविद्या— अर्थात "मी"चे अज्ञान —च कारणीभूत आहे. त्या स्थितीत जग व्यक्तरूपाने दिसत नाही. म्हणून त्या स्थितीला अव्यक्त म्हणतात. (४१)

अव्यक्त स्थितीत सृष्टीसंकल्प रहस्यमय रूपात वास करतो. ही अव्यक्त स्थिती उद्गमाचे कारण आहे, ज्यास जगत म्हणतात. (४२)

ब्रह्मांडाचा तिसरा देह — अव्यक्त — ब्रह्मांडाचा चतुर्थ देहाभिमानी ईशाचा अत्यंत रहस्यमय सृष्टीसंकल्प स्वतःमध्ये लपवून ठेवतो. तत्पश्चात ब्रह्मांडाचा चतुर्थ देहाभिमानी ईशाचा रहस्यमय सृष्टीसंकल्प ब्रह्मांडाच्या दुसऱ्या देहात सूक्ष्मरूपाने अंकुरित होतो. (४३)

विशेष:"मी"वर आलेल्या आवरणामुळे अविद्या जनित ब्रह्मांडाचा तिसरा देह अर्थात कारणदेह अव्यक्त आहे. कारणदेहाभिमानी "ईश्वर" आहे. ह्या अव्यक्त स्थितीतच सृष्टीचा अत्यंत रहस्यमय संकल्प वास करतो.अव्यक्त स्थितीतील हा रहस्यमय संकल्प व्यक्त–अव्यक्त रूपाने ब्रह्मांडाच्या दुसऱ्या देह अर्थात सूक्ष्म देहाचा कारक आहे.सृष्टीसंकल्पाला पल्लवित करण्याकरिता सूक्ष्म देहाचा अभिमानी "महत" आहे.

ज्याप्रकारे बीजातून अंकुर उत्पन्न होतो त्याचप्रकारे ब्रह्मांडाच्या तृतीय देह (कारणदेह) अव्यक्तापासून ब्रह्मांडाचा दुसरा देह (सूक्ष्मदेह) अव्यक्त–व्यक्तची उत्पत्ती आहे. सूक्ष्मदेहाभिमानी "महत" आहे. "महत"पासून सृष्टीसंकल्प पूर्ण होतो. (४४)

ब्रह्मांडाचा चतुर्थ देहाभिमानी "ईश"पासून ब्रह्मांडाचा द्वितीय देहाभिमानी "महत" अस्तित्वात आला. ब्रह्मांडाचा चतुर्थ देहाभिमानी "ईश"च्या कारणी ब्रह्मांडाचा द्वितीय देहाभिमानी "महत"ला "हिरण्यगर्भ" नाव आले. (४५)

ज्या प्रकारे बीजातून उत्पन्न झालेल्या अंकुरात दोन पाने असतात, त्याचप्रकारे ब्रह्मांडाचा दुसरा देहाभिमानी "महत"च्या सूक्ष्म संकल्पाने “मी”च "पुरुष–प्रकृती" रूपात व्यक्त झाला. (४६)

ह्या प्रकारे “मी”द्वारे अनेकत्वाच्या संकल्पमात्राने त्रिगुण (सत्त्व, रजस आणी तमस) आणी प्रकृती–पुरुष यांच्या संयोगाने आदि सृष्टी व्यक्तावस्थेत आली. (४७)

विशेष: प्रकृती–पुरुष एवं त्रिगुणांची उत्पत्ती व गुणधर्म याविषयी विस्तृत माहिती भगवद्गीतेतील क्षेत्र–क्षेत्रज्ञ योगात दिली आहे।

कृतिभाव सत्त्वात्मक, कर्म करण्याची प्रवृत्ती रजात्मक आणी स्थूल रूपातील संकल्पात्मक कर्म तमात्मक म्हटले जाते. (४८)

संकल्पाच्या प्रवाहाने वायूची उत्पत्ती, रिक्त स्थानाने आकाशाची उत्पत्ती आणी बोध होण्याच्या अर्थात ज्ञान होण्याच्या प्रक्रियेने अग्नीची उत्पत्ती झाली आहे. जलाची उत्पत्ती कशी झाली ते पुढे चर्चा करू. (४९)

संकल्प–विकल्पाच्या सूक्ष्म चिंतनाने आपतत्त्व अर्थात जलतत्त्वाची उत्पत्ती झाली. आता पृथ्वीच्या उत्पत्तीचे कारण स्थूल रूपाने संकल्पाचे प्रगटीकरण हे आहे. (५०)

याप्रकारे एकमेकांपासून भिन्न आकाश (खं), वायु, अग्नि, जल आणी पृथ्वी ह्या पंचभूतांची आणी त्रिगुणांची उत्पत्ती एकमात्र संकल्पाने झाली आहे. (५१)

प्रकृती–पुरुष आणी शक्ती

सृष्टिसंकल्प उदित झाल्यावर शक्तीचा बोध झाला. ही शक्तीच प्रकृती आहे. ह्या प्रकारे प्रकृतीची उत्पत्ती झाली. (५२)

“मी”च्या प्रगटीकरणाचे मुख्य कारण “मी”ची शक्तीच आहे. हिच्या माध्यमातूनच पुढे सृष्टीचा विस्तार होतो. सृष्टीचा “मी कर्ता आहे” हा दिव्य भाव जेथे उदित राहतो त्याला पुरुष म्हणतात. (५३)

ब्रह्मांडाच्या दुसऱ्या देहाभिमानी हिरण्यगर्भामध्ये संकल्प उद्गमाच्या पूर्वीच पुरुष–प्रकृती, त्रिगुण आणी पंचभूत सर्व मूळ संकल्पात समाविष्ट होते. (५४)

अनेकत्वरूपाने “मी”च स्वतः “मी”चा अनुभव घेतो. “मी” अनेकत्वाचा संकल्प घेऊन स्वतः भोगांचा स्वीकारही करतो. (५५)

अनेक सूक्ष्मदेहांच्या माध्यमातून भोग भोगण्याच्या इच्छेने अनेकत्व धारण करण्यास जो उत्सुक आहे, त्यास "विभू" म्हणतात. (५६)

॥ इति श्रीरामदासकृपान्वितेन श्रीधरस्वामिना विरचितेस्वात्मनिर्णये

नवमं प्रकरणं समाप्तम् ॥

॥श्रीराम समर्थ॥

स्वात्मनिरुपण

प्रकरण-१०

पंचभूत आणि त्रिगुण-अष्टधा प्रकृती (पंचीकरण भाग-१)

सूक्ष्मदेह निर्मिती

याप्रकारे उत्पन्न झालेल्या पृथ्वी, जल, तेज, वायु आणी आकाश पंचभूतांत "मी"च्या शक्तीच्या विभागाने अनेक सूक्ष्मदेहांची निर्मिती केली. (१)

प्रत्येक भूत स्वेच्छेने "मी"च्या शक्ती (प्रकृती)च्या माध्यमातून दोन समान भागांत विभक्त झाले. प्रत्येक भूताचा अर्धा भाग वेगळा ठेवून, शेष अर्ध्या भागाचे चार भागांत पुन्हा विभाजन केले. (२)

स्वतःला सोडून, अर्थात स्वतःच्या अर्ध्या भागाला सोडून, शेष चार भूतांच्या अर्धांशातील प्रत्येकाचा एक चतुर्थांश भाग अर्थात १/८वा भाग, अन्य चार भूतांच्या अर्धांशांत मिळून पाच-पाच अर्थात २५ भाग केले गेले. (३)

पंचभूत विभाजन तालिका–१

पंचभूत	पृथ्वी	जल	वायु	आकाश	अग्नि
पृथ्वी	१/२	१/२	१/२	१/२	१/२
जल	१/८	१/८	१/८	१/८	१/८
वायु	१/८	१/८	१/८	१/८	१/८
आकाश	१/८	१/८	१/८	१/८	१/८
अग्नि	१/८	१/८	१/८	१/८	१/८

ह्या प्रकारे संकल्पाने पंचभूतांचे उत्पन्न होणे तमोगुणाची उपस्थिती दर्शवते. संकल्प स्थूल रूपात अज्ञानालाच दर्शवतो. (४)

विशेष: संकल्प म्हणजे "मी"वर आलेले अज्ञानाचे आवरण. म्हणून पंचभूतांच्या उत्पत्तीचे कारण अज्ञान अर्थात तमोगुणच ठरते.

पाच–पाच असे पंचवीस तत्त्वांनी सूक्ष्मदेहाची निर्मिती झाली. त्या त्या भूतपंचकांद्वारे कार्य संपन्न करण्यासाठी त्या त्या देवतांची निर्मितीही झाली. (५)

आकाश पंचक

आकाशाचा प्रथम १/८वा भाग वायूमध्ये मिळण्याने व्यान वायु,द्वितीय १/८वा भाग अग्नीत मिळण्याने श्रोत्रेंद्रिय,तृतीय १/८वा भाग जळात मिळण्याने वाणी (वाचा),चतुर्थ १/८वा भाग पृथ्वीमध्ये मिळण्याने शब्द,आणी आकाशाचा शेष अर्धा भाग अंतःकरण म्हणून आकाशातच राहतो.हे आकाश पंचक म्हटले जाते. (६)

तालिका–२ : आकाश पंचक

आकाश (१/२) =अंत:करण	आकाश(१/८) + वायु(१/८) =व्यान	आकाश(१/८)+ अग्नि(१/८) =श्रोत्र	आकाश(१/८)+ जल(१/८) =वाणी	आकाश(१/८)+ पृथ्वी(१/८)=शब्द

वायु पंचक

वायूचा प्रथम १/८वा भाग आकाशात मिळण्याने मन,द्वितीय १/८वा भाग अग्नीत मिळण्याने त्वचेन्द्रिय, तृतीय १/८वा भाग जळात मिळण्याने हात,चतुर्थ १/८वा भाग पृथ्वीमध्ये मिळण्याने स्पर्श,आणी वायूचा पंचम अर्धा भाग समान वायु झाला.हे वायु पंचक म्हटले जाते. (७)

तालिका–३ : वायु पंचक

वायु(१/२)=समान	वायु(१/८)+ आकाश(१/८) =मन	वायु(१/८)+ अग्नि(१/८) =त्वचेन्द्रिय	वायु(१/८)+ जल(१/८) =हाथ	वायु(१/८)+ पृथ्वी(१/८)=स्पर्ष

अग्नि पंचक

अग्नीचा प्रथम १/८वा भाग आकाशात मिळण्याने बुद्धी,द्वितीय १/८वा भाग वायूमध्ये मिळण्याने उदान, तृतीय १/८वा भाग जळात मिळण्याने पाय,चतुर्थ १/८वा भाग पृथ्वीमध्ये मिळण्याने रूप,आणी अग्नीचा मुख्य पंचम अर्धा भाग डोळ्यांची निर्मिती करतो.हे अग्नि पंचक म्हटले जाते. (८)

तालिका–४: अग्नि पंचक

अग्नि(१/२) = नेत्र	अग्नि (१/८) + आकाश(१/८) = बुद्धी	अग्नि (१/८) + जल(१/८)= पैर	अग्नि (१/८) + पृथ्वी(१/८) = रुप (आकार)	अग्नि (१/८) + वायु(१/८) = उदान

जल (आप) पंचक

जलाचा प्रथम १/८वा भाग आकाशात मिळण्याने चित्त,द्वितीय १/८वा भाग वायूमध्ये मिळण्याने प्राण वायु,तृतीय १/८वा भाग अग्नीत मिळण्याने रसना,चतुर्थ १/८वा भाग पृथ्वीमध्ये मिळण्याने रस,आणी जलाचा मुख्य पंचम अर्धा भाग *जननेन्द्रिय* बनतो.हे जल पंचक म्हटले जाते. (९)

तालिका–५:जल (आप) पंचक

जल (१/२) =जननेद्रिय(शिश्न)	जल (१/८)+ आकाश(१/८) =चित्त	जल (१/८) + वायु(१/८)= प्राणवायु	जल (१/८)+ अग्नि(१/८) = रसना	जल (१/८)+ पृथ्वी(१/८) = रस

पृथ्वी पंचक

पृथ्वीचा प्रथम १/८वा भाग आकाशात मिळण्याने अहंकार,द्वितीय १/८वा भाग वायूमध्ये मिळण्याने अपान वायु,तृतीय १/८वा भाग अग्नीत मिळण्याने घ्राणेंद्रिय (नासिका),चतुर्थ १/८वा भाग जळात मिळण्याने गुदेंद्रिय,आणी पृथ्वीचा पंचम अर्धा भाग गंध बनतो.हे पृथ्वी पंचक होय. (१०)

तालिका–६: पृथ्वी पंचक

पृथ्वी(१/२)=गंध	पृथ्वी(१/८)+ आकाश(१/८) =अहंकार	पृथ्वी(१/८)+ वायु(१/८) =अपान	पृथ्वी(१/८)+ अग्नि(१/८) =नासिका	पृथ्वी(१/८)+ जल(१/८) =गुदेन्द्रिय

प्रत्येक भूताच्या अर्धांश आणी इतर भूतांच्या अंशांच्या मिश्रणाबद्दल विवेचन केले.आता स्वयं मुख्य भूत आणी दुसऱ्या भूतांच्या अंशांचा संयोग कसा होतो याबद्दल ही चर्चा करू. (११)

अंतःकरण पंचक

आकाशाच्या अर्धांशाने अंतःकरण आणी आकाशाच्या शेष अर्धांशाच्या १/८व्या भागाच्या अन्य चार भूतांच्या संयोगाने मन, बुद्धी, चित्त आणी अहंकार यांची निर्मिती झाली. (१२)

तालिका–७: अंतःकरण पंचक

आकाश(१/२) =अंत:कर्ण	आकाश(१/८)+ वायु(१/८)= मन	आकाश(१/८)+ अग्नि(१/८)=बुद्धि	आकाश(१/८)+ जल(१/८)=चित्त	आकाश(१/८) + पृथ्वी(१/८)= अहंकार

प्राण पंचक

वायूच्या अर्धांशाने समान वायुची उत्पत्ती झाली.आकाश, अग्नि, जल आणी पृथ्वी यांच्या शेष अर्धांशातील १/८व्या भागांपासून अनुक्रमे व्यान, उदान, प्राण आणी अपान वायु यांची निर्मिती झाली आहे. (१३)

तालिका-८: प्राण पंचक

वायु(१/२) =समान	वायु(१/८) + आकाश(१/८)= व्यान	वायु(१/८) + अग्नि(१/८)= उदान	वायु(१/८)+ जल(१/८)= प्राण	वायु(१/८)+ पृथ्वी(१/८) = अपान

ज्ञानेन्द्रिय पंचक

अग्नीच्या मुख्य अर्धांशाने नेत्रा ची निर्मिती झाली आहे. अग्नीच्या शेष अर्धांशाच्या १/८ व्या भागापासून श्रोत्र, वायूच्या शेष अर्धांशाच्या १/८ व्या भागापासून त्वचा, जळाच्या शेष अर्धांशाच्या १/८ व्या भागापासून जिव्हा(रसना) आणी पृथ्वीच्या शेष अर्धांशाच्या १/८ व्या भागापासून नाकाची निर्मिती झाली आहे. (१४)

तालिका-९: ज्ञानेन्द्रिय पंचक

अग्नि(१/२) =नेत्र	अग्नि(१/८) + आकाश(१/८)= श्रोत्र	अग्नि(१/८) + वायु(१/८)= त्वचा	अग्नि(१/८)+ जल(१/८)= जिव्हा	अग्नि(१/८)+ पृथ्वी(१/८) = नासिका

जळाच्या मुख्य अर्धांशाने शिश्न याची निर्मिती झाली आहे. जळाच्या अर्धांशाच्या प्रत्येक भाग आकाश, वायु,अग्नि आणी पृथ्वीशी मिळून क्रमश: वाणी, हात, पाय आणी गुदाची निर्मिती झाली. (१५)

तालिका-१०: कर्मेन्द्रिय पंचक

जल(१/२) =जननेद्रिय (शिश्न)	जल(१/८) + आकाश(१/८)= वाणी	जल(१/८) + वायु(१/८)= हाथ	जल(१/८)+ अग्नि(१/८)= पैर	जल(१/८)+ पृथ्वी(१/८) = गुद

घ्राणेन्द्रिय पंचक:

पृथ्वीच्या मुख्य अर्धांशाने गंधाची निर्मिती झाली. पृथ्वीच्या शेष अर्धांशाच्या १/८ व्या भागापासून शब्द, वायूच्या शेष अर्धांशाच्या १/८ व्या भागापासून स्पर्श, अग्नीच्या शेष अर्धांशाच्या १/८ व्या भागापासून रूप आणी जळाच्या शेष अर्धांशाच्या १/८ व्या भागापासून रसाची निर्मिती झाली. (१६)

तालिका-११: घ्राणेन्द्रिय पंचक

पृथ्वी(१/२) = गंध	पृथ्वी(१/८) + आकाश(१/८)= शब्द	पृथ्वी(१/८) + वायु(१/८)= स्पर्ष	पृथ्वी(१/८)+ अग्नि(१/८)= रुप	पृथ्वी(१/८)+ जल(१/८) = रस

प्रत्येक भूताचे स्वत:चे अर्थांश(१/२) त्याचा जवळ ठेवून राहीलेले अर्धांश(१/२) चार भूतात प्रत्येकी अष्टमांश(१/८) रुपानी विभागले. असे प्रत्येक भूताचे स्वत:चे एक पंचक निर्माण झाले.(१७)///

आकाश पंचक - अंत;करण, व्यान,श्रोत्र, वाणी आणी शब्द आहे. वायु पंचक - मन,समान, त्वचा,हात आणी स्पर्श आहे. (१८)

अग्नि पंचक- बुद्धी,उदान,नेत्र, पाय आणी रुप आहे. जल पंचक- चित्त,प्राण जिव्हा शिश्न आणी रस आहे.(१९)

पृथ्वी पंचक- अहंकार,अपान,नासिका,गुद आणी गंध आहे. ह्या प्रकारे स्वतःच्या अंशाने पंचभूत पंचवीस भूतांमध्ये विभक्त होतात. (२०)

अन्य अंशांच्या मिश्रणाने प्रत्येक भूताने स्वतः पाच अन्य नामे कशी ग्रहण केली? त्या सर्व भूतांचे अन्य पाच नावे ह्या प्रकारे आहेत (२१)

अंत:करण, मन, बुद्धी,चित्त आणी अहंकार हे सर्व आकाशाच्या अन्य पाच भुतांच्या नावाने जाणले जातात. व्यान, उदान,समान, अपान आणी प्राण हे सर्व वायूच्या च्या अन्य पाच भुतांच्या नावाने जाणले जातात. (२२)

श्रोत्र,त्वचा चक्षु,,जिव्हा,नासिका हे सर्व ज्ञानेंद्रिय अग्नीच्या अन्य पाच भुतांच्या नावाने जाणले जातात. वाणी,हात, पाय ,गुद आणी शिश्न हे सर्व कर्मेंद्रिय जलाच्या अन्य पाच भुतांच्या नावाने जाणले जातात. (२३)

शब्द,स्पर्ष, रुप,रस आणीगंध हे सर्व विषय पृथ्वीच्या अन्य पाच भुतांच्या नावाने जाणले जातात. या प्रकारे प्रत्येक भूत अन्य पाच नावांनी देखील जाणले जातात. (२४)

तीन गुण (सत्वगुण, रजोगुण आणी तमोगुण) आणी तीन वृत्ती (सात्विक,राजसी आणी तामसी वृत्ती) एक दुसऱ्या बरोबरच राहतात परंतु स्वतंत्र राहत नाहीत. एका गुणात अन्य दोन गुण मिळून राहतात. कुठलाही एक गुण स्वतंत्र राहत नाही. (२५)

त्रिगुणात्मक माया अर्थात गुण मायेनेच त्रिगुणांची उत्पत्ती झाली. हेही स्पष्ट आहे की गुणांचे एक दुसऱ्यांशी मिळणे स्वाभाविक रूपानेच झाले आहे. (२६)

ज्या गुणाचा अंश मुख्य रूपाने असतो त्या गुणाला ते नाव प्राप्त होते. हे त्रिगुण जरी तीन गुणांमध्ये भिन्न-भिन्न दिसतात परंतु ह्या त्रिगुणात परस्पर मित्रत्वाचा संबंध आहे. (२७)

आधी असे म्हटले होते की पंच भूतांची उत्पत्ती तमोगुणाने झाली आहे तरीही भूत पंचकात रजोगुण आणी सत्वगुण यांचाही समावेश होतो. (२८)

सत्त्वगुण आकाशाच्या पंचभूतात समाविष्ट होऊन अत:करण, मन, बुद्धी, चित्त, अहंकाराच्या रूपात प्रगट होतो. (२९)

प्रत्येक भूतात समाविष्ट असलेला सत्वगुण कधी-कधी वेगवेगळा होऊन श्रोत्र,त्वचा, नेत्र,जिव्हा आणी नासिकेच्या रूपात प्रकट होतो. (३०)

रजोगुण वायूच्या पंचभूतात समाविष्ट होऊन व्यान, समान, उदान, प्राण आणी अपान वायूमध्ये समत्व रूपात दिसतो. (३१)

प्रत्येक भूतात समाविष्ट असलेला रजोगुण वेगळ्या रूपाने वाणी, हात, पाय, गुद आणी शिश्न मध्येही दिसतो. (३२)

पंचभूतात व्यापलेल्या तमोगुणाने पंचविषयांची अर्थात शब्द, स्पर्श, रूप, रस आणी गंधाची निर्मिती झाली. (३३)

प्रत्येक भूताची अभिमानी देवता

त्या त्या भूतांकडून त्यांच्या उपयुक्त कर्माचे क्रमबद्ध संपादन करण्याकरिता त्या कर्माच्या अभिमानी देवतांच्या विषयाबद्दल क्रमबद्ध चर्चा करू. (३४)

आकाशाची अभिमानी देवता सदाशिव, वायूची अभिमानी देवता ईश्वर, अग्नीची अभिमानी देवता रुद्र, जलाची अभिमानी देवता विष्णू आणी पृथ्वीची अभिमानी देवता ब्रह्मा आहे. (३५)

सदाशिवेश्वरौ रुद्रो विष्णुर्ब्रह्मा च सुव्रताः॥
क्रमाच्छब्दादिभूतानां देवताश्च प्रकीर्तिताः॥ सू.सं.

सदाशिव, ईश्वर, रुद्र, विष्णू आणी ब्रह्मा क्रमश: आकाश, वायू, अग्नी, जल आणी पृथ्वी रूपाने एकेक भूताची देवता म्हटले जातात.

अंतःकरणाचा साक्षी चंद्रदेव, मनाचा बृहस्पति, बुद्धीचा देवता ब्रह्मा आणी अभिमानाचा देवता रुद्र आहे. (३६)

श्रोत्र, दिशेची आणी त्वचेची देवता वायुदेव, चक्षूचा देवता सूर्यदेव, जिव्हेचा देवता वरुणदेव, रसाचा देवता आणी गंधाची देवता अश्विनीदेव आहे. (३७)

व्यान वायूची देवता विश्वयोनि, समान वायूची देवता जय, उदान वायूची देवता अजय, प्राण वायूची देवता विशिष्ट आणी अपान वायूची देवता विश्वसृष्टि आहे. (३८)

विशिष्टो विश्वसृष्टिश्च, विश्वयोनि जयाजयः॥
क्रमेण देवताः प्रोक्ताः प्राणादीनां मुनिश्वराः॥ सू.सं.

हे मुनीश्वर! विशिष्ट, विश्वसृष्टि, विश्वयोनि, जय आणी अजय क्रमश: पंचप्राण – प्राण, अपान, व्यान, उदान, समान यांच्या देवता म्हटल्या जातात. (सू.सं.)

वाणीची देवता अग्नि, हाताची देवता इंद्र, पायाची देवता त्रिविक्रम, गुदाची देवता मृत्यु (यमराज), लिंग (शिश्न) याची देवता प्रजापति आहे. (३९)

ज्याप्रकारे सदाशिव आदि देवतांच्या विषयी भूतपंचकात क्रमाने सांगितले आहे, त्याच क्रमाने शब्दादिक (पंचविषय – शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध) यांच्या संदर्भात देखील सांगितलेले आहे. (४०)

शब्दाचा दैवत श्रोत्र, स्पर्शाचा दैवत त्वचा, रसाचा दैवत जिव्हा, रूपाचा दैवत नेत्र आणी गंधाचे दैवत नासिका आहे. ही ज्ञानेन्द्रिये क्रमबद्ध त्या विषयांना चेतवितात. (४१)

वाणी, हात, पाय, गुद आणी उपस्थ (जननेंद्रिय) यांच्यासाठी क्रमश: अग्नि, इंद्र, उपेंद्र, मृत्यु आणी ब्रह्मा यांची निर्मिती झाली. बोलण्यासाठी – वाणी, दानासाठी – हात, चालण्यासाठी – पाय, मलोत्सर्गासाठी – गुद आणी मूत्रत्यागासाठी – जननेंद्रिय अशी कर्मेंद्रिये आहेत. (४२)

व्यान, समान, उदान, प्राण, अपान वायू साठी विश्वयोनि, जय, अजय, विशिष्ट, विश्वसृष्टि आदि देवतांची क्रमश: निर्मिती झाली. व्यानादि वायूच्या कर्मप्रवृत्तीच्या विषयाबद्दलही विस्ताराने चर्चा करू. (४३)

शरीराच्या संधीभागांचे चलन व्यान वायु करतो. समान वायु रसतत्त्व (जल, अन्न आदि) संपूर्ण शरीरात पोहोचविण्याचे काम करतो. शरीराला ऊर्ध्व गती देण्याचे काम उदान वायु करतो. (४४)

प्राणवायूचे कर्म श्वासोच्छवास करणे आहे आणी अपानवायूचे कर्म अधोभागातून घाण काढणे आहे. अपानवायूचे मुख्य कर्म मल, मूत्र व रेत विसर्जन करणे आहे. (४५)

शब्दोद्गार हे नाग उपवायूचे कर्म आहे, डोळ्यांची उघडझाप करणे हे कूर्म उपवायूचे कर्म आहे, शिंक आणी जांभई देणे हे कृकल उपवायूचे कर्म आहे, डुलकी येणे हे देवदत्त उपवायूचे कर्म आहे आणी शरीराला तेजस्वी ठेवणे हे धनंजय उपवायूचे कर्म आहे. (४६)

विशेष: संदर्भ : सद्‌गुरू भगवान श्रीधर स्वामी विरचित पंचीकरण अभंग क्रमांक ९९ आणी १००.

व्यानादिक वायूचे जे प्रेरक आहेत तेच नागादिक उपवायूचेही प्रेरक आहेत. नागादिक उपवायूचे ते फक्त प्रेरक आहेत; नागादिक वायूचे देवता नाहीत. (४७)

अंतःकरणाची प्रेरक देवता साक्षीच स्फूर्ती, संशय, निर्णय, चिंतन आणी अहंकाराला जागृत करते. (४८)

पंचभूतांचे कर्म क्रमाने याप्रमाणे आहेत — रिक्त स्थान (पोकळी) – नभ (आकाश), संवहन (वाहणे) – वायु, पाचन – अग्नि, क्लेदन (ओले करणे) – जल आणी धारण करणे – पृथ्वीचे कर्म. (४९)

विश्वात्म्याच्या (हिरण्यगर्भाच्या) संकल्पाने पंचभूतांचे कर्म

त्या विश्वात्म्याच्या संकल्पानेच पंचभूते याप्रकारे कर्म करतात. पंचभूतांना प्रेरणा देण्याचे कार्य सदाशिव आदि देवता करतात. (५०)

ज्ञान (जाणीव) – सत्त्वगुण आणी स्फूर्ती – रजोगुण म्हणतात. अहंकाराने संकल्पयुक्त क्रियेमधून जे जड कार्य घडते त्याला तमोगुण कारणीभूत असतो. (५१)

त्रिगुणांचे देवता क्रमाने याप्रमाणे आहेत — तमोगुण – रुद्र, रजोगुण – ब्रह्मा आणी सत्त्वगुण – विष्णू. (५२)

संकल्पामुळे उद्भवलेले त्रिगुणांचे कार्य या प्रकारे व्यक्त रूपात आले. कार्याच्या प्रेरणेचे स्त्रोत क्रमाने विष्णू, ब्रह्मा आणी रुद्र देवता आहेत. (५३)

विशेष: सत्त्वगुणाची (जाणीवेची) अधिष्ठात्री देवता विष्णू आहे.कार्य प्रवृत्त होण्यास रजोगुण अर्थात स्फूर्ती कारणीभूत आहे आणी रजोगुणाची अधिष्ठात्री देवता ब्रह्मा आहे.रजोगुणात्मक अहंयुक्त संकल्पाला प्रत्यक्ष कृतीत आणणे तमोगुणाचे कार्य आहे व तमोगुणाची अधिष्ठात्री देवता रुद्र आहे.

कर्माची उत्पत्ती व संहार

ज्या प्रकारे कर्मांची उत्पत्ती क्रमवार होते त्याचप्रकारे कर्मांचा संहारही क्रमवार होतो. ज्या कर्माचा आरंभ झाला आहे त्याचा संहार निश्चित आहे. (५४)

तमोगुणामुळे संहार होतो. त्यामुळे यात काहीही शंका उरत नाही की तमोगुण देखील क्रियात्मक आहे. हेही निश्चित आहे की तमोगुणाची अभिमानी देवता रुद्र आहे. (५५)

संकल्प हाच कोणत्याही कर्माचा जन्मदाता (आई) आहे. ज्यामुळे रजोगुणात्मक कर्म घडते. म्हणून ह्या विषयी कोणाचेही मतैक्य नसावे. (५६)

सृष्टी उत्पत्ती करिता केलेल्या कर्मात मुख्य रूपाने रजोगुणच असतो. अज्ञानामुळे केलेल्या संहारात्मक अथवा हिंसात्मक कर्मात मुख्य रूपाने तमोगुणच असतो. (५७)

सत्त्वज्ञानाची स्मृती (जाणीव) अर्थात "मी" चा बोध ज्याने सर्व प्राणिमात्रांचे संगोपन होते, तो सत्त्वगुण म्हटला जातो. सत्त्वगुणाचा अभिमानी देवता विष्णू आहे, जो जगाचे पालन करणारा आहे. (५८)

सृष्टीउत्पत्तीचे कारण ज्ञान–अज्ञानाचे मिश्रण आहे, जे स्मृती–विस्मृती रूपाने आहे. हा रजोगुण आहे. ज्याचा अभिमानी देवता ब्रह्मा आहे आणी ब्रह्माच सृष्टीची रचना करणारा आहे. (५९)

अज्ञानच (नेणीव) "मी"च्या विस्मृतीचे कारण आहे. हा तमोगुण आहे. तमोगुणाची अभिमानी देवता रुद्र आहे, जो सृष्टीचा संहार करणारा आहे. (६०)

"मी"च्या विस्मृतीने ज्ञाता आणी भोक्ता दोघांचेही अस्तित्व नाही. त्यामुळे "मी"-स्मृती ज्ञानात्मक असून सत्त्वगुणप्रधान आहे. (६१)

त्रिगुणांच्या कारणी सर्व काही घडते, म्हणून सर्वत्र त्रिपुटी हा उल्लेख येत असतो. आध्यात्मिक, आधिभौतिक आणी आधिदैविक हे सर्व त्रिगुणांच्या कारणीच आहे. (६२)

सृष्टीमध्ये आध्यात्मिक त्रिपुटीचा प्रेरक सत्त्वगुण आहे, आधिदैविक त्रिपुटीचा प्रेरक रजोगुण आहे आणी आधिभौतिक त्रिपुटीचा प्रेरक तमोगुण आहे. (६३)

आध्यात्मिक, आधिभौतिक आणी आधिदैविक त्रिपुटीचे प्रेरक क्रमवार या प्रकारे आहेत — आध्यात्मिक करिता श्रोत्रादि, आधिभौतिक करिता शब्दादिक विषय आणी आधिदैविक करिता दिशा आदिप्रेरक आहेत. (६४)

असे मत आहे की आध्यात्मिक त्रिपुटीकरिता अंतःकरण, आधिभौतिक त्रिपुटीकरिता स्फूरण आणी आधिदैविक त्रिपुटीकरिता साक्षी देवता आहेत. (६५)

या प्रकारे शेष प्राणपंचादिकांनाही समजावले जाऊ शकते. आध्यात्मिकाला स्वरूप म्हणतात, जो आधिभौतिक आणी आधिदैविक क्रियांचा प्रेरक आहे. (६६)

या प्रकारे त्रिगुणाने आणी पंचमहाभूतांनी अष्टधा प्रकृती अस्तित्वात आली. वरील देवतांनी घेतलेल्या सर्व संकल्पांचे मिळून एकच नाव प्रकृती असे आहे. (६७)

कुठे कुठे अष्टधा प्रकृतीची व्याख्या या क्रमानेदेखील केलेली आहे — १. पंचमहाभूत, २. अंतःकरण, ३. वायुपंचक, ४. विषयपंचक, ५. दशेंद्रिय, ६. अविद्या, ७. काम (इच्छा किंवा संकल्प) आणी८. कर्म. (६८)

॥ इति श्रीरामदासकृपान्वितेन श्रीधरस्वामिना विरचिते स्वात्मनिरूपणे

दशमं प्रकरणं समाप्तम् ॥

॥श्रीरामसमर्थ॥

स्वात्मनिरूपण

प्रकरण-११

(पंचीकरण भाग-२)

विश्वात्मा(हिरण्यगर्भ)- "मी" पासून स्थूल देह निर्मिती

पंचभूत स्वतः सृष्टीव्यवहार कार्यास अक्षम असल्याने सृष्टीकार्याकरिता देवतांचा सूक्ष्म संकल्पच विशेष कारणीभूत ठरतो. (१)

देवतांच्या सूक्ष्म संकल्पाने पंचभूतांत प्रवेश केल्यानंतर स्थूल (जड) कोषाची निर्मिती झाली. प्रथम सूक्ष्म सृष्टीची निर्मिती झाली व त्यानंतर स्थूल सृष्टी अस्तित्वात आली. (२)

अनेकत्वाचा संकल्प स्थूलक्रियेच्या अभावात अन्य कुठल्याही प्रक्रियेने संभव नाही. असे ज्ञात झाल्यावर विश्वात्म्याने (हिरण्यगर्भाने) स्वसंकल्पाद्वारे स्थूल रूपाने अनेकत्वरूपात प्रकट होण्याचा विचार केला. (३)

विशेष: ब्रह्मांडाचा सूक्ष्म देह, जेथे सूक्ष्म संकल्प निर्माण होतो, त्यास "विश्वात्मा" (हिरण्यगर्भ) असे म्हणतात. सर्व जीवांमध्ये "मी" ह्या स्मृतीचे मूळ स्त्रोत हिरण्यगर्भच आहे. त्यामुळे ब्रह्मांडाचा "हिरण्यगर्भ"च पिंड (स्थूल) देहात स्मृतियुक्त "मी"रूपाने प्रकट होतो. ब्रह्मांडाचा स्थूल देह "विराट" म्हटला जातो.

"विश्वात्म्याने" (हिरण्यगर्भाने) अनेक सूक्ष्म शरीरांच्या माध्यमातून अनेक स्थूल शरीरांची निर्मिती केली आणी तोच "विश्वात्मा" अर्थात "मी" स्वतः भिन्नभिन्न भाव धारण करून अनेकत्वाचा भोग घेण्याकरिता तत्पर झाला. (४)

"विश्वात्मा" (हिरण्यगर्भ) अर्थात "मी" ने स्वतः भोग्य वस्तू आणी तिचा भोक्ता होण्याकरिता प्रकृती–पुरुष हे नाव धारण केले. त्यानंतर स्त्री-पुरुष देह धारण करून कामनापूर्ती द्वारे स्वतःच्या एकत्वालाही सिद्ध केले. (५)

या प्रकारे "विश्वात्मा" (हिरण्यगर्भ) अर्थात "मी"च प्रजोत्पादनाद्वारे स्त्री-पुरुषाच्या एकत्वाचा बोध करवितो आणी अनेकत्वाच्या रूपात देहाच्या माध्यमातून स्वतःलाही व्यक्त करतो. (६)

"विश्वात्मा" (हिरण्यगर्भ) अर्थात "मी" अनेक कर्मफळ, अनेक संस्कारांमुळे अनेक देह धारण करतो. देहाहंकाराद्वारे भिन्नभिन्न क्रिया आणी भिन्नभिन्न भोग प्राप्त करतो. (७)

"विश्वात्मा" (हिरण्यगर्भ) अर्थात "मी" स्वनिर्णयाने शक्तीला भिन्न रूपाने पाहण्याकरिता अनेक स्थूल देहांच्या निर्मितीच्या उद्देशाने "विराट" नाव धारण करतो. (८)

तमोगुणात्मक सूक्ष्म पंचमहाभूतांनी पंचविषय (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) यांच्या माध्यमातून स्थूल पंचभूते — आकाश, वायु, अग्नी, जल आणी पृथ्वी — यांची निर्मिती केली. (९)

सूक्ष्म पंचभूतांत पंचविषयजनित संस्कारांनी प्रवेश करून अनेकत्व धारण केले आणी अनेक दृश्य निर्माण केले, ज्यास ब्रह्मांडाचा स्थूल देह म्हणतात. (१०)

विशेष: ब्रह्मांड आणी पिंडाचा सूक्ष्म देह सूक्ष्म पंचभूतांच्या माध्यमातून पंचविस तत्त्वांनी निर्मित आहे.

"मी" स्वसंकल्पाने अनेक पंचभूतात्मक देह धारण करतो. "विविधत्वेन राजते" — म्हणजे अनेक रूपे धारण करतो. हा स्थूल देह "विराट" म्हटला जातो. (११)

स्थूल पंचभूतांनी धारण केलेले सर्व दृश्यमान दृश्य हे ब्रह्मांडाचे महाकारण देह — "ईश" — चे स्थूल देह आहे. (१२)

स्थूल देहालाच ब्रह्मांड असे म्हणतात, ज्यात सर्व दृश्य विद्यमान आहे. ब्रह्मांडाच्या महाकारण देह "ईश" लाच ब्रह्मांडाचा स्थूल देहाभिमानी "विराट" म्हणतात. (१३)

अनेकत्वाच्या संकल्पाने जी स्थूल पंचभूतांची निर्मिती झाली, त्यात विश्वात्मा (हिरण्यगर्भ) अर्थात "मी" ने स्वशक्तीचे संक्रमण करून त्याच्याशी संबंधित भिन्नभिन्न स्थूल देहांची निर्मिती केली. (१४)

स्थूल देहाच्या पंचभूतांचे विभाजन सूक्ष्म देहाच्या पंचभूतांच्या विभाजनासारखेच केलेले आहे. हे विभाजन पूर्वक्रमानुसारच आहे, हे पुढे ज्ञात होईल. (१५)

प्रत्येक पंचभूत दोन भागांत विभक्त होतो आणीपुन्हा अर्धशेष भागदेखील विभाजित होतो. पाच पंचभूतांच्या शेष अर्धभागाला समरूपाने विभक्त करून चार पंचभूतांमध्ये मिसळल्याने पंचभूतजनित अनेकत्वाचा बोध होतो. (१६)

तालिका— १: स्थूलदेहात पंचभूत विभाजन:

पंचभूत	**पृथ्वी**	**जल**	**वायु**	**आकाश**	**अग्नि**
पृथ्वी	१/२	१/२	१/२	१/२	१/२
जल	१/८	१/८	१/८	१/८	१/८
वायु	१/८	१/८	१/८	१/८	१/८
आकाश	१/८	१/८	१/८	१/८	१/८
अग्नि	१/८	१/८	१/८	१/८	१/८

प्रत्येक भूताचे स्वत:चे अर्धांश(१/२) त्याचा जवळ ठेवून राहीलेले अर्धांश(१/२) चार भूतात प्रत्येकी अष्टमांश(१/८) रुपानी विभागले. असे प्रत्येक भूताचे स्वत:चे एक पंचक निर्माण झाले.(१७)

या प्रकारे स्थूल देहाच्या निर्मितीसाठी पंचवीस तत्त्वांची निर्मिती झाली. आकाशादि क्रमाने त्यांची नावे या प्रमाणे आहेत. (१८)

स्थूल देहाची निर्मिती प्रत्येक भूताच्या स्वतःच्या मुख्य अर्धभाग आणीअन्य भूतांच्या समांशांशात मिसळल्याने झाली आहे. (१९)

आकाश पंचक

आकाशाचा अर्धभाग आकाशात मिळाल्याने **शोक**,आकाशाचा १/८ वा भाग वायूच्या १/८ व्या भागात मिळाल्याने **काम (संकल्प)**,आकाशाचा १/८ वा भाग अग्नीच्या १/८ व्या भागात मिळाल्याने **क्रोध**,आकाशाचा १/८ वा भाग जलाच्या १/८ व्या भागात मिळाल्याने **मोह**,आकाशाचा १/८ वा भाग पृथ्वीच्या १/८ व्या भागात मिळाल्याने **भय** निर्माण होते.हे सर्व मिळून स्थूल देहाचे **आकाश पंचक** म्हटले जाते. (२०)

तालिका–२ : आकाश पंचक

आकाश (१/२) = शोक	आकाश(१/८) + वायु(१/८) = काम	आकाश(१/८)+ अग्नि(१/८) = क्रोध	आकाश(१/८)+ जल(१/८) = मोह	आकाश(१/८)+ पृथ्वी(१/८) = भय

स्थूल देहाभिमानी शोकादिक आकाश पंचकच स्थूल विषयांच्या माध्यमातून स्थूल रूपाने प्रकट होतात. (२१)

वायूपंचक

वायूचा अर्धभाग वायूत मिळण्याने — धावन व निरोधन, वायूचा १/८वा भाग आकाशाच्या १/८व्या भागात मिळण्याने — प्रसरण, वायूचा १/८वा भाग अग्नीच्या १/८व्या भागात मिळण्याने — वलन, वायूचा १/८वा भाग जळाच्या १/८व्या भागात मिळण्याने — चलन आणी वायूचा १/८वा भाग पृथ्वीच्या १/८व्या भागात मिळण्याने — आकुंचनाची निर्मिती होते. हे सर्व मिळून स्थूल देहाचे वायूपंचक म्हटले जाते.

तालिका—३ : वायूपंचक

वायु (१/२) = धावन व निरोधन	वायु (१/८) + आकाश (१/८) = प्रसरण	वायु (१/८) + अग्नि (१/८) = वलन	वायु (१/८) + जल(१/८) = चलन	वायु (१/८) + पृथ्वी (१/८) = आकुंचन

वायूपंचक ब्रह्मांडाच्या स्थूल शरीरात व नमूद केलेल्या रूपात राहतात. ब्रह्मांडाच्या स्थूल शरीराला गती देणारे विषयही स्थूल रूपाने राहतात. (२३)

अग्निपंचक

अग्नीच्या मुख्य अर्धांशाने (१/२) — भूक, अग्नीचा १/८वा भाग आकाशाच्या १/८व्या भागात मिळण्याने — निद्रा, अग्नीचा १/८वा भाग वायूच्या १/८व्या भागात मिळण्याने — तहान, अग्नीचा १/८वा भाग जळाच्या १/८व्या भागात मिळण्याने — कांती व मैथुन आणीअग्नीचा १/८वा भाग पृथ्वीच्या १/८व्या भागात मिळण्याने — आळस. हे सर्व स्थूल शरीराचे अग्निपंचक म्हटले जातात. (२४)

तालिका—४ : अग्निपंचक

अग्नी(१/२) = भूक	अग्नि(१/८)+ आकाश (१/८) = निद्रा	अग्नि(१/८)+ वायू(१/८)= तहान	अग्नि(१/८)+ जळ(१/८)= कांती व मैथुन	अग्नि(१/८)+ पृथ्वी(१/८)= आळस

स्थूल शरीरात अग्नीच्या अर्धांशात (१/२) शेष पंचभूतांच्या (१/८) मिश्रणाला अग्निपंचक म्हणतात. त्याचप्रमाणे जळाच्या मुख्य अर्धांश आणी शेष चार भूतांच्या अंश (१/८) मिश्रणाला आप (जळपंचक) म्हणतात. (२५)

जळपंचक

जळाच्या मुख्य अर्धांशाने (१/२) — रेत, आणीजळाचा १/८वा अंश प्रत्येक चार भूतांच्या १/८ अंशाशी मिळण्याने पुढील निर्मिती होते. जळाचा १/८वा भाग आकाशाच्या १/८व्या भागात मिळण्याने — लाळ, जळाचा १/८वा भाग वायूच्या १/८व्या भागात मिळण्याने — घाम, जळाचा १/८वा भाग अग्नीच्या १/८व्या भागात मिळण्याने — मूत्र, जळाचा १/८वा भाग पृथ्वीच्या १/८व्या भागात मिळण्याने — रक्त. हे सर्व स्थूल शरीराचे जळ (आप) पंचक म्हटले जातात. (२६)

तालिका–५ : जळपंचक

जळ(१/२) = रेत	जळ(१/८)+ आकाश(१/८) = लाळ	जळ(१/८)+ वायू(१/८)= घाम	जळ(१/८)+ अग्नी(१/८) = मूत्र	जळ(१/८)+ पृथ्वी(१/८)= रक्त

पृथ्वीपंचक

पृथ्वीच्या मुख्य अर्धांशाने (१/२) — अस्थी, आणी पृथ्वीचा १/८वा अंश प्रत्येक चार भूतांच्या १/८ अंशाशी मिळण्याने पुढील निर्मिती होते. पृथ्वीचा १/८वा भाग आकाशाच्या १/८व्या भागात मिळण्याने — रोम, पृथ्वीचा १/८वा भाग वायूच्या १/८व्या भागात मिळण्याने — त्वचा, पृथ्वीचा १/८वा भाग अग्नीच्या १/८व्या भागात मिळण्याने — नाडी, पृथ्वीचा १/८वा भाग जळाच्या १/८व्या भागात मिळण्याने — मांस. हे सर्व स्थूल शरीराचे पृथ्वीपंचक म्हटले जातात. (२७)

तालिका—६ : पृथ्वीपंचक

पृथ्वी(१/२)= अस्थी	पृथ्वी(१/८)+ आकाश(१/८)= रोम	पृथ्वी(१/८)+ वायु(१/८)= त्वचा	पृथ्वी(१/८)+ अग्नी(१/८) = नाडी	पृथ्वी(१/८)+ जळ(१/८= मांस

या प्रकारे स्पष्ट झाले की प्रत्येक पंचभूताचा अर्धांश अन्य चार पंचभूतांच्या १/८व्या अंशाशी कुठल्या प्रकारे संबंधित आहे. त्याची पुनरुक्ती आता एकत्रित रूपातही करू. (२८)

स्थूल देहात शोक, काम, क्रोध, मोह आणी भय हे आकाशामुळे आहेत. स्थूल देहात प्रसरण (पसरणे), धावन (वाहणे), वलन, चलन आणी आकुंचन हे वायूमुळे आहेत. (२९)

स्थूल देहात निद्रा, क्षुधा (भूक), तृषा (तहान), मैथुन आणी आळस अग्नीमुळे आहेत. स्थूल देहात लाळ, स्वेद (घाम), मूत्र, रेत (वीर्य) आणी रक्त जळामुळे आहेत. (३०)

स्थूल देहात रोम (केस), त्वचा, नाडी, मांस आणी अस्थी पृथ्वीमुळे आहेत. स्थूल देहात प्रत्येक पंचभूत अन्य चार पंचभूतांच्या संमिश्रणाने वर नमूद केल्याप्रमाणे राहतात. (३१)

प्रत्येक भूताच्या स्वतःच्या अर्धांशाच्या अतिरिक्त अन्य भूतांचा १/८वा अंश शेष चार भूतांमध्ये मिळवण्याने पंचभूतांचे पंचवीस विभाग होतात. (३२)

आकाशाच्या अर्धांशाने — शोक, आकाशाचा १/८वा अंश वायूच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — प्रसरण, आकाशाचा १/८वा अंश अग्नीच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — निद्रा, आकाशाचा १/८वा अंश जळाच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — लाळ, आकाशाचा १/८वा अंश पृथ्वीच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — रोम (केस) निर्माण होतात. (३३)

तालिका—७

आकाश(१/२)- शोक	आकाश(१/८) +वायु(१/८)= प्रसरण	आकाश(१/८) +अग्नि(१/८)= निद्रा	आकाश(१/८)+ जळ(१/८)= लाळ	आकाश(१/८)+ पृथ्वी(१/८)= रोम

वायूच्या अर्धांशाने — धावन, आणी शेष अर्धांश अन्य भूतांमध्ये विभागित होतो. वायूचा १/८वा अंश आकाशाच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — काम, वायूचा १/८वा अंश अग्नीच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — तहान, वायूचा १/८वा अंश जळाच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — घाम, वायूचा १/८वा अंश पृथ्वीच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — त्वचा निर्माण होते. (३४)

तालिका—८

वायू(१/२)- धावण	वायू(१/८)+ आकाश(१/८)= काम	वायू(१/८)+ अग्नि(१/८)= तहान	वायू(१/८)+ जळ(१/८)= घाम	वायू(१/८)+ पृथ्वी(१/८)= त्वचा

अग्नीच्या अर्धांशाने — क्षुधा (भूक), अग्नीचा १/८वा अंश आकाशाच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — क्रोध, अग्नीचा १/८वा अंश वायूच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — चलन, अग्नीचा १/८वा अंश जळाच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — मूत्र, अग्नीचा १/८वा अंश पृथ्वीच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — नाडी निर्माण होते. (३५)

तालिका—९

अग्नि(१/२)- क्षुधा(भूख)	अग्नि(१/८)+ आकाश(१/८)= क्रोध,	अग्नि(१/८)+ वायू(१/८) = चलन	अग्नि(१/८)+ जळ(१/८)= मूत्र	अग्नि(१/८)+ पृथ्वी(१/८)= नाडी

जळाच्या मुख्य अर्धांशाने — रेत, जळाचा १/८वा अंश आकाशाच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — मोह, जळाचा १/८वा अंश वायूच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — वळण, जळाचा १/८वा अंश अग्नीच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — मैथुन, जळाचा १/८वा अंश पृथ्वीच्या १/८व्या अंशात मिळाल्याने — मांसाची निर्मिती होते. (३६)

तालिका—१०

जळ(१/२)- रेत	जळ(१/८)+ आकाश(१/८)= मोह	जळ(१/८)+ वायू(१/८) = वळण	जळ(१/८)+ अग्नि(१/८)= मैथुन	जळ(१/८)+ पृथ्वी(१/८)= मांस

पृथ्वीच्या मुख्य अर्धांशाने अस्थी, पृथ्वीचा १/८वा अंश आकाशाच्या १/८व्या अंशात मिळाल्याने – भय; पृथ्वीचा १/८वा अंश वायूच्या १/८व्या अंशात मिळाल्याने – संकुचन; पृथ्वीचा १/८वा अंश अग्निच्या १/८व्या अंशात मिळाल्याने – आळस; पृथ्वीचा १/८वा अंश जळाच्या १/८व्या अंशात मिळाल्याने – रक्ताची निर्मिती होते. (३७)

तालिका—११

पृथ्वी(१/२)- अस्थि	पृथ्वी(१/८)+ आकाश(१/८)= भय	पृथ्वी(१/८)+ वायू(१/८) = संकुचन	पृथ्वी(१/८)+ अग्नि(१/८)= आळस	पृथ्वी(१/८)+ जळ(१/८)= रक्त

या प्रकारे प्रत्येक पंचभूत अन्य पंचभूतांशी मिळते. ध्यानाकर्षित करण्यासाठी पुन्हा एकत्रितरूपाने पुढे चर्चा करू. (३८)

शोक, प्रसरण, निद्रा, लाळ आणी रोम (केश) हे पाच आकाशाचे अंश आहेत. काम, आकुंचन (संकोचन), भूक (तृष्णा), घाम (स्वेद) आणी त्वचा हे पाच वायूचे अंश आहेत. (३९)

क्रोध, उत्क्रमण, तहान, मूत्र आणीनाडी हे पाच अग्नीचे अंश आहेत. मोह, चलन, मैथुन, रेत आणी हे पाच जळाचे अंश आहेत. (४०)

भय, संकुचन, आळस, रक्त आणीअस्थी हे पाच पृथ्वीचे अंश आहेत. वरीलप्रमाणे स्थूल देहात पंचभूते आपल्या–आपल्या अंशाने राहतात. (४१)

पंचभूत आणी त्रिगुणात्मक मिश्रित दृश्य विश्व

स्थूल पंचभूते ह्याप्रमाणे विभाजित होऊन अनेक देहांच्या निर्मितीस कारण झाले. या प्रकारे स्पष्ट होते की पंचीकृत चौदा विभागांची निर्मिती झाली. (४२)

ह्या प्रकारे पंचभूतांपासून पंचीकृत अंडज, जारज, स्वेदज आणी उद्भिज अशा चार प्रकारच्या स्थूल देहांची निर्मिती झाली. (४३)

हे स्पष्ट आहे की स्वर्गलोक, मृत्युलोक आणी पाताळलोकात स्थूलरूपाने भासीत असलेले चराचर दृश्य पंचभूतांपासूनच निर्मित आहे. (४४)

पंचभूत, त्रिगुणांचे स्वरूप आणी अष्टधा प्रकृती

जे काही चांगले दिसते त्यास सत्त्वगुण, जे मध्यम दिसते त्यास रजोगुण आणी जे काही अधम दिसते त्यास तमोगुण म्हणतात. (४५)

सत्त्वगुण सुखरूप, सुख-दुःखरूप रजोगुण आणी निषिद्ध, हिंसात्मक, दुःखरूप तमोगुण म्हटला जातो. (४६)

कठोरत्वाच्या गुणाने पृथ्वी, द्रवात्मक गुणाने जळ, उष्णत्वाच्या गुणाने अग्नि, चंचलत्वाच्या गुणाने वायु आणी रिक्त स्थानाच्या गुणाने आकाश निर्देशित होते. (४७)

त्रिगुण आणी पंचभूत स्थूल शरीरात वर नमूद केल्याप्रमाणे वास करतात. व्यवहारात स्थूल भासणारे सर्व काही अष्टधा प्रकृती या नावाने जाणले जाते. (४८)

ह्या प्रकारे त्रिगुण आणीपंचभूत पंचीकृत होऊन अनेक देहात प्रवेश करून अनेकत्वाच्या निर्मितीस कारण झाले. (४९)

पिंडाचा चार देहांची उत्पत्ती

"मी देहच आहे" असे मिथ्या आरोप स्वीकारून महाकारण देहाचा अभिमानी “ईश” स्वतःला जीवात्मा रूपाने प्रगट करतो. त्यामुळे ईश स्वसंकल्पजनित स्वतःच्या अविद्येने जीवात्मा म्हणून भासतो. (५०)

ज्याप्रकारे अग्नीपासून उत्पन्न झालेली ठिणगी ही अग्नीच असते त्याच प्रकारे ईश जीवात्माच्या रूपाने स्वतःलाच प्रदर्शित करतो. (५१)

ब्रह्मांडाच्या महाकारण देह साक्षी आणी त्याचा देहाभिमानी ईशच्या अंशाने, पिंड (जीव) च्या तिसऱ्या देह — कारण देह अव्यक्त — ची उत्पत्ती झाली. पिंड देहाच्या कारण देहाचे नाव प्राज्ञ असे आहे. (५२)

विशेष: ब्रह्मांडाचा महाकारण देह साक्षी आहे; पिंड देहाचा महाकारण देहही “साक्षी” नावाने ओळखला जातो. ब्रह्मांड आणी पिंड महाकारण देहाच्या साक्षीचे नाव एकच असल्याने त्यात कसलाही भेद नाही. ब्रह्मांड आणी पिंड महाकारण देहाभिमानीला अंतरात्मा ("मी") असे ही म्हणतात.

ब्रह्मांडाचा महाकारण देह अव्यक्त (साक्षी) चा अभिमानी ईशचा तिसरा देह (सूक्ष्म देह) "महत" म्हणतात. "महत" चा देहाभिमानीला सूत्रात्मा (हिरण्यगर्भ) म्हणतात. हा “हिरण्यगर्भ”च पिंड देहाच्या तिसऱ्या देहात (सूक्ष्मदेहात) प्रवेश करून "तैजस" नावाने ओळखला जातो. "महत" "सूक्ष्मात्मा" म्हणूनही ओळखला जातो. (५३)

ब्रह्मांडाच्या निर्मित चतुर्थ देहास — अर्थात स्थूल देहास — "विराट" म्हणतात. हा विराटच पिंडाच्या स्थूल देहात “विश्व” म्हणून ओळखला जातो. (५४)

ब्रह्मांडाच्या महाकारण देहाभिमानीला "ईश" अथवा "अंतरात्मा", ब्रह्मांडाच्या सूक्ष्म देहाभिमानीला "सूत्रात्मा" अथवा "हिरण्यगर्भ" आणी ब्रह्मांडाच्या स्थूल देहाभिमानीला "विराट" अथवा "वैश्वानर" या पर्यायी नावांनी देखील ओळखले जाते. (५५)

या प्रकारे पिंड देहात कारण देहाभिमानी "प्राज्ञ", सूक्ष्म देहाभिमानी "तैजस" आणी स्थूल देहाभिमानी "विश्व" वास करतात. (५६)

“ईश”(शिव) – “जीव” अभेदत्व

ज्याप्रकारे समुद्राचा लाटांशी, वनाचा वृक्षांशी, समष्टिचा व्यष्टिशी संबंध आहे त्याच प्रकारे ईश्वर आणी जीव यांचा संबंध आहे. (५७)

ज्याप्रकारे लाट आणी पाणी एकच असूनही भिन्न भासतात, त्याच प्रकारे ईश्वर आणी जीव एकच आहेत; परंतु उपाधीभेदामुळे त्यांच्यात भिन्नत्व भासीत होते. (५८)

विशेष: समुद्र आणी लाटा म्हणजे “ईश”(शिव)–“जीव”.लाटाला "मी समुद्राचे पाणीच आहे" ही स्मृती तेवत असणे म्हणजे “ईश”(शिव);ती विस्मृती होणे म्हणजे "जीव".तसे लाट आणी समुद्र दोन्ही ठिकाणी पाणीच असते.ब्रह्मांडाचा कारण देह अव्यक्ताचा अभिमानी "ईश्वर" आहे.

ब्रह्मांड व पिंडाच्या स्थूल देहाची जाग्रतावस्था, सूक्ष्मदेहाची स्वप्नावस्था व कारणदेहाची सुषुप्ती अवस्था जेव्हा एकमेकात लय होतात तेव्हा जीव आणी ईश हा भेद उरत नाही. (५९)

स्थूल देहात संकल्पामुळे "मी" वर आलेले आवरणच विस्मृती निर्माण करते. ही विस्मृतीच "मी" वर आलेले आवरण आहे. ह्या अशुद्ध आवरणालाच अविद्या म्हणतात. (६०)

ज्याप्रमाणे ढग हे सघन आणीविरळ अशा दोन रूपात भासीत होतात त्याच प्रकारे अविद्या दोन (शिव आणीजीव) रूपात भासीत होऊनही अभिन्न आहे. (६१)

शरद ऋतूमधील ढगांना “ईश”(शिव) आवरणाची उपमा दिली जाते व वर्षा ऋतूमधील ढगांना जीव आवरणाची उपमा दिली जाते. (६२)

विशेष: ईश (शिव) आवरण – विरळ आवरण, ज्या स्थितीत स्वतःचा "मी" हा बोध नित्य जागृत राहतो. जीव आवरण – सघन आवरण, ज्या स्थितीत स्वतःचा "मी" हा बोध नित्य जागृत राहत नाही.ईश्वर म्हणजे जेथे आवरणरहित "मी" चा शुद्ध बोध असूनही वेगळेपणा भासत नाही.अविद्या आवरणामुळे "मी" वर विक्षेप निर्माण होतो आणी त्यामुळे जीव व ईश (शिव) भेद भासतो; पण हे भासणे मिथ्या आहे. (६३)

माया- विद्या (मूळ अविद्या) आणी अविद्या

अविद्येच्या शुद्ध आवरणाला “ईश” नाव दिले गेले आहे व अविद्येच्या अशुद्ध आवरणाला “जीव” नाव दिले गेले आहे. (६४)

“ईश” उपाधीने युक्त अविद्येला शुद्ध मानून तिला "माया" असे नाव दिले गेले आहे, जी विद्येहून भिन्न नाही. (६५)

काही लोक विद्येला मूळ अविद्या म्हणतात कारण ही पूर्वीपासूनच जीव उपाधीग्रस्त आहे. (६६)

विशेष:प्रथम शुद्ध "मी" अर्थात विद्येवर आवरण आले, मग खरे “मी” लोपले – तिलाच अविद्या म्हणतात. विद्येवर आलेले आवरण विक्षेप निर्माण करते म्हणजे शुद्ध "मी" विषयी संशय.विद्येवर आवरण असूनही शुद्ध "मी" ची स्मृती असल्यास विक्षेपरहित स्थिती — ते "ईश"(शिव).शुद्ध "मी" ची विस्मृती होऊन विक्षेपयुक्त स्थिती — ते जीव. शुद्ध “मी” भासणे — त्याला विद्या म्हणतात.म्हणून काही लोक विद्या पूर्वीपासूनच ईश(शिव)–जीव उपाधीग्रस्त असल्यामुळे विद्येला मूळ अविद्या असे म्हणतात.

"मी" ब्रह्म (विद्याजनित) व "मी" देह (अविद्याजनित) - विक्षेप

"मी ब्रह्म आहे" ही विक्षेपरूपी स्मृती विश्व–सृष्टीचे कारण आहे. हे त्याच प्रकारे आहे, ज्याप्रमाणे शरद ऋतूच्या ढगांनी सूर्याचा प्रकाश भासतो. (६७)

देह–सुख प्राप्त करण्याकरिता "मी देह आहे" ही विक्षेपरूपी स्मृती त्याच प्रकारे आहे, ज्याप्रमाणे वर्षा ऋतूतील ढगांनी सूर्याला आवरण प्राप्त असते. (६८)

"मी" चे शुद्ध (विद्याजनित) व अशुद्ध (अविद्याजनित) आवरण — ईश व जीव भाव

"मी" वर आलेले विद्याजनित आवरण शुद्ध आवरण ("ईश" भाव) असते, अविद्याजनित आवरण ("जीव" भाव) अशुद्ध आवरण असते.सूर्यावर येणारे आवरण जसे असते, तसेच "मी" वर येणारे जीव व "ईश" आवरण आहेत. (६९)

एकच ढग उपाधीच्या भेदामुळे वर्षा ऋतूतील आणी शरद ऋतूतील ढग या दोन नावांनी ओळखला जातो. त्याचप्रकारे सूक्ष्म आणी स्थूल हा भेद उपाधी कारणी आहे. मूळात ढग एकच असतो. (७०)

विद्यारूपी उपाधीजनित विक्षेपच "ईश" (शिव) म्हटला जातो. म्हणून "मी" हा विक्षेपच नानात्वाला कारण झाला. (७१)

सृष्टी निर्मितीचे कारण "ईश" संकल्प

याप्रकारे संकल्पच अनेकत्वरूपी सृष्टीला कारण झाला. हे त्याच प्रकारे आहे जसे दोऱ्याचे मुख्य कारण तत्त्वदृष्टिने कापूसच असतो. (७२)

विविधत्वाचा संकल्प अनेक प्रकारच्या कर्मांनी पल्लवित झाला. त्या त्या कर्मांकरणीच विविधत्व निर्माण झाले. (७३)

अविद्यारूपी संकल्पाने "मी स्थूल देह आहे" असे म्हणून "मी" विषयात लिप्त राहतो. या "मी" ला जीव असे म्हणतात. याप्रकारे अविद्याजनित कर्मांमुळेच "मी" जन्म–मृत्यूच्या चक्रात पडतो. (७४)

"ईश" (शिव) ला निषंगतेचे ज्ञान असल्याने ईश (शिव) ब्रह्मभावनेकरणी मुक्तच असतो. पण "ईश" (शिव) ला हे ज्ञान विद्यारूपी उपाधीने होत असल्याकारणाने हे ज्ञान "ईश" (शिव) मध्ये समाहित असते. (७५)

ब्रह्मांडाचा कारण देह अव्यक्त व त्याचा देहाभिमानी "ईश्वर" ला स्वप्नजनित अहंकार उपाधी आहे. ब्रह्मांडाचा सूक्ष्म देह व्यक्त–अव्यक्त आणीVत्याचा देहाभिमानी "महत" ला जागृतीजनित अहंकार उपाधी आहे. म्हणून हे सत्य आहे की ब्रह्मांडाचा कारण देहाभिमानी "ईश्वर" आणी पिंडाचा कारण देहाभिमानी "प्राज्ञ" यात उपाधीदृष्टिने कसलाही भेद नाहीये. (७६)

पिंड–ब्रह्मांडाच्या जीव–ईश(शिव) अवस्थेत कारणरूपाने "मी" च आहे. त्या स्थितीत कुठल्याही प्रकारचा विकार "मी" ला स्पर्श करू शकत नाही. (७७)

ज्याप्रकारे वर्षा ऋतू आणी शरद ऋतूचे ढग सूर्यापासून असंग असतात, त्याचप्रकारे "मी" निर्विकार असल्याने अविनाशी आहे. (७८)

मृगजळात सूर्य दिसणे मिथ्या आहे अर्थात भास आहे. तसेच जगात "मी" रूपाने भासणारे जीव–ईश(शिव) भाव भासमात्र आहेत. "मी" ब्रह्मरूपाने जसाचा तसाच राहतो. (७९)

या प्रकारे संपूर्ण सृष्टीच्या निर्मितीचे कारण "ईश"(शिव) संकल्पच आहे व पुढे हाच "ईश"(शिव) संकल्प जीव निर्मितीचे कारण झाला. (८०)

ब्रह्मांडाच्या महाकारण देह "ईश"(शिव) मध्ये संकल्पाचा प्रादुर्भाव होताच सृष्टी प्रकट झाली. जागृतावस्थेचा अंत — अर्थात शुद्ध "मी" ची विस्मृती — जीवसृष्टीचे कारण आहे. (८१)

अस्तित्व नसतानाही "मी" वर मायेच्या आवरणामुळे जे भासीत होत आहे ते सत्य नाहीये. जर पाण्याची धार सर्पाप्रमाणे दिसत असेल तर ते सत्य नसून निव्वळ भ्रमच असते. अस्तित्वरहित जीव–शिव भेद सत्य भासीत होणे त्याचप्रकारे आहे जसे वंध्या (नि:पुत्रिक स्त्री) आणी तिचा पुत्र द्वैतरूपाने भासीत होणे. (८२)

॥ इति रामदासकृपान्वितेन श्रीधरस्वामिनाविरचिते

एकादश प्रकरणं संपूर्णम् ॥

चार देह	ब्रम्हांड	पिंड
महाकारण देह	देह- साक्षी , देहाभिमानी ईश ("अंतरात्मा")	देह-साक्षी, देहाभिमानी जीव("अंतरात्मा")
कारण देह (अव्यक्त देह)	देह-अव्यक्त ,देहाभिमानी-ईश्वर	देह-अव्यक्त, देहाभिमानी-प्राज्ञ
सूक्ष्म देह (अव्यक्ता-व्यक्त)	देह-महत अथवा सूक्ष्मात्मा, देहाभिमानी-हिरण्यगर्भ अथवा सूत्रात्मा	देह- तैजस, देहाभिमानी-हिरण्यगर्भ
जाग्रत स्थूलदेह	स्थूलदेह -ब्रह्मांड देहाभिमानी-विराट अथवा वैश्वानर	देह- पिंड , देहाभिमानी- विश्व

श्रीराम समर्थ

स्वात्मनिरुपण

प्रकरण-१२

मोक्ष मार्ग व साधना पद्धती

द्वैत म्हणजे बंध व अद्वैत म्हणजे मोक्ष

त्याग-भोग, सुख-दु:ख, शीत-उष्ण, हानी-लाभ सर्व प्रत्यक्ष अर्थात अपरोक्ष आहेत. सत्य-मिथ्या अप्रत्यक्ष अर्थात परोक्ष आहेत. (१)

तसेच राग-द्वेष, आप-पर, मी-तू, सज्जन-दुर्जन, श्रेय-प्रेय आणी विकल्प-निर्विकल्प हे सर्व जीवभावात असतात. (२)

ज्ञान-अज्ञान, जड-चेतन, जीव-ईश (शिव), द्वैत-अद्वैत, बंध-मोक्ष, दृश्य-द्रष्टा, व्यष्टि-समष्टि हे सात अनंत आहेत. (३)

तसेच शिव-शक्ती, पुरुष-स्त्री, जन्म-मृत्यु आणी कर्तृत्व-भोक्तृत्व हे सर्व द्वंद्वे "जीव" भावात असतात; पण हे सर्व द्वंद्वे "ईश" (शिव) भावात नसतात. (४)

जीवाने बंध आणी मोक्ष या दोन्हीला चांगल्या प्रकारे समजून घेतले पाहिजे. हे सत्य आहे की निर्ममत्वाला "मोक्ष" आणी ममत्वाला "बंध" समजले पाहिजे. (५)

'मी' व 'माझे' — सर्व अनर्थाचे कारण

द्वैताचे चिंतनच जीवास भवबंधनाचे कारण ठरते. "मी" आणी"माझे" हा द्वैतात्मक विपरीत भाव अनात्माच्या (देहाच्या) ठायी उत्पन्न होतो. हा द्वैताभावच सर्व अनर्थाचे कारण आहे. द्वैतभाव कसा नाहीसा होईल याचा प्रयत्न करायला पाहिजे. देहामधील 'मी' आणी'माझे' विसरून "मी स्वतः ब्रह्मच आहे" असे समजले पाहिजे. (६)

प्रातिभासिक सत्ता आणी व्यावहारिक सत्ता

मनात चालणारा वासना-खेळच "जीव-प्रपंच" आहे. डोळ्यांनी दिसणारे दृश्य-जगतच "ईश-प्रपंच" आहे. प्रथम मनात वासनेमुळे दिसणाऱ्या जीव-प्रपंचालाच प्रातिभासिक सत्ता असे म्हणतात. डोळ्यांनी दिसणाऱ्या दृश्य-जगताला व्यावहारिक सत्ता असे म्हणतात. (७)

"अस्तित्वा"ला "सत्ता" नावाने जाणले जाते. ही "सत्ता" जगात दोन प्रकारे आहे. पहिली सत्ता "ईशनिर्मित" आहे व दुसरी सत्ता "जीवभावाने" व्यक्त आहे. "जीवभावाने" अनेकत्व धारण करणारी सत्ता "अपरा सत्ता" आहे आणी"ईशभावाने" अनेकत्व धारण करणारी "परा सत्ता" आहे. (८)

विशेष: "मी ब्रह्मच आहे" ही अस्तित्वाची सत्ता ईश-सत्ता व "मी देहच आहे" ही अस्तित्वाची सत्ता जीव-सत्ता म्हटली जाते. जीवभावाने उत्पन्न सत्ता 'अपरा' या नावाने ओळखली जाते. ईशभावाने उत्पन्न होणारी सत्ता 'परा सत्ता' नावाने ओळखली जाते.

अंतर व बाह्य बंधन

जीव स्वतःच्या मूर्खतेमुळे अंतर (मानसिक) आणी बाह्य (व्यावहारिक अर्थात दृश्य विश्व) बंधनात पूर्णपणे गुंतलेला असतो. वासनेचे बंधन स्वतःच्या अंतरंगात (मानसिक) असते आणी बाह्य (व्यावहारिक अर्थात दृश्य विश्व) बंधन कर्तव्य म्हणून असते. सर्व जीवमात्रांना दोन्ही बंधने सारखीच असतात. (९)

व्यावहारिक, प्रातिभासिक व पारमार्थिक सत्ता

दोरीचे सर्पाप्रमाणे दिसणे ही प्रातिभासिक सत्ता आहे. सर्पाचा भ्रम दोरीमध्ये स्वीकारणे ही व्यावहारिक सत्ता आहे. ही व्यावहारिक सत्ता स्वतः नष्ट होऊन देखील प्रातिभासिक सत्ता असतेच. व्यावहारिक व प्रातिभासिक सत्ता नष्ट झाल्यावर ही जी सत्ता सतत शुद्धरूपाने असते तिला पारमार्थिक सत्ता म्हणतात. (१०)

पारमार्थिक सत्ताच मोक्षाला कारण

व्यावहारिक सत्ता आणी प्रातिभासिक सत्ता नष्ट होऊनही पारमार्थिक सत्ता शेष राहते. ही पारमार्थिक सत्ताच जीवाच्या मोक्षाचे कारण आहे. जोपर्यंत जीवाला कळत नाही की "मी ब्रह्मच आहे" आणी पारमार्थिक सत्ताच सत्य आहे, तोपर्यंत प्रातिभासिक सत्ता सर्व अनर्थाला कारण ठरते. (११)

विशेष: सर्पावर रज्जूचा भास ही प्रातिभासिक सत्ता आहे. सर्पावर रज्जूचा भास स्वीकारणे ही व्यावहारिक सत्ता. पण अंधार नाहीसा झाल्यावर हा सर्प नाही, रज्जू आहे हे कळल्यावर व्यावहारिक सत्ता स्वतः नष्ट होते. पुढे रज्जूला स्पर्श करून पाहिल्यावर हे कळते की आपल्याला दंश होत नाही — ही निश्चितच रज्जू आहे, सर्प नाही — ही 'पारमार्थिक सत्ता' म्हटली जाते.मायेचे अस्तित्व स्वीकरणे ही व्यावहारिक सत्ता. मायेचे अस्तित्व भासणे ही प्रातिभासिक सत्ता. तसेच "माया मिथ्या आहे" — अर्थात मायेचे अस्तित्वच नाही — ही पारमार्थिक सत्ता आहे. पारमार्थिक सत्ता संशयरहित करते.

"मी" वर येणारे आवरण आणी विक्षेप

"मी" ची रहस्यमय शक्ती अर्थात अविद्याअज्ञानवश जीवाला शुद्ध "मी" चे विस्मरण करवते. शक्तीच्या या आवरणामुळे जीवाला शुद्ध "मी" ची स्मृती नाहीशी होते. शुद्ध "मी" ला स्वतःच्या विस्मृतीने विक्षेप उत्पन्न होतो. या प्रकारे जीव स्वतःमध्ये "ईश" (शिव) पाहणे विसरतो. (१२)

विशेष — शुद्ध "मी" म्हणजे "मी" ला आपणच ब्रह्म आहे ही स्मृती तेवत असणे. यालाच ईश (शिव) म्हणतात. त्याची विस्मृती म्हणजे अशुद्ध "मी". त्याला जीव म्हणतात.

"मी" वर आलेला विक्षेप नाहीसा होणे — मोक्ष

असे प्रतीत होते की "मी" भोक्ता असून भोग्य पदार्थांचा भोग घेणारा आहे आणी"मी" कर्ता होऊन इंद्रियांच्या माध्यमातून केलेल्या कर्मफळांचे सुख प्राप्त करतो. (१३)

या प्रकारे जीव अविद्येने भ्रमवश स्वतः अनेकत्वाच्या बोधाने ग्रस्त होतो. ईशकृपास्तव सर्व भ्रम नष्ट झाल्यावर विक्षेपयुक्त "मी" अर्थात जीव मुक्त होतो. (१४)

सत्त्वगुण, रजोगुण आणी तमोगुणात्मक वृत्ती

“मी” ने स्वतःला भोक्ता समजणे — सत्त्वगुण आहे. “मी” ने इंद्रियांच्या माध्यमाने भोग्य पदार्थांची भावना करणे — रजोगुण आहे. सर्व प्रकारचे भोग्य विषय — तमोगुण आहेत. हे तिन्ही गुण “मी” ला बंधनात टाकतात. (१५)

सत्त्वगुण, रजोगुण आणी तमोगुण हे तीन गुण शुद्ध “मी” ची विस्मृती करवतात. शांतवृत्ती (विषयेच्छेच्या पूर्णत्वाने प्राप्त समाधान) ही सत्त्वगुणात्मक आहे. चंचलवृत्ती (विषयेच्छा) — रजोगुणात्मक आहे आणी मूढवृत्ती (विषयानंदाद्वारे सुखानुभूती) — तमोगुणात्मक म्हटली जाते. (१६)

सत्त्व, रज आणी तमोगुण अभावी सुख नाही — हा भ्रम

जीवाचे असे मानणे असते की या तीन वृत्तींच्या अतिरिक्त अन्य कुठल्याही प्रकारे सुखप्राप्ती (समाधान) होऊ शकत नाही. म्हणून मूढतेने भ्रमवश झालेला जीव स्त्री, धन आणी पुत्र यांच्या मोहात गुरफटून राहतो. (१७)

विशेष:अविद्या-उपाधीयुक्त "मी" ची विस्मृती — जीव आणी विद्या-उपाधीयुक्त "मी" ची स्मृती — ईश (शिव) आहे.

जन्म-मृत्यु म्हणजे जागृत–स्वप्न–सुषुप्तीच्या चक्रात विचरण

जीव जन्म-मृत्यूच्या कर्मचक्रात फसून जागृतावस्थेत नेत्र, स्वप्नावस्थेत कंठ आणी सुषुप्तीवस्थेत हृदय या तीन धामात विचरण करत राहतो. (१८)

जीव शास्त्रवासना (पांडित्य), लोकवासना (इहलोक-परलोक भोग) आणी देहवासना (विषयभोग) यांच्या बंधनात सतत गुंतलेला असतो. वासना स्वतःच्या इच्छेने अथवा इच्छा नसतानाही दुसऱ्यांच्या इच्छेने प्रेरित असते. त्या कारणी जीव अत्यंत कष्ट सहन करत असतो. (१९)

वायु, पित्त आणी श्लेष्म (कफ) दोष

वायूचे एक्याऐंशी दोष, पित्ताचे चौसष्ट दोष आणी श्लेष्माचे (कफ, लाळ आदी) दोनशे पंधरा दोष आहेत. या प्रकारे वात, पित्त आणी कफाच्या दोषांनी जीव दुःख प्राप्त करत राहतो. (२०)

आध्यात्मिक, आधिभौतिक आणी आधिदैविक ताप

मातेच्या रक्ताने निर्मित रज-धातूने माया अर्थात मोह आणी पित्याच्या रक्ताने निर्मित रेत-धातूने विषयेच्छा या दोन्हींच्या मिश्रणाने जीव देहाच्या माध्यमातून तीन प्रकारच्या तापांनी (आध्यात्मिक, आधिभौतिक आणी आधिदैविक) ग्रस्त होतो. (२१)

जीवाला त्रिविध (आधिभौतिक, आधिदैविक आणी आध्यात्मिक ताप) तापांनी मिळणारे त्रास पाप-पुण्याचे संमिश्र फळ आहेत. हे ताप स्वर्गलोक, पाताळलोक आणी मृत्युलोकात प्राप्त होतात. (२२)

देह, इंद्रिय, प्राण आणी मनाद्वारे प्राप्त झालेला ताप — आध्यात्मिक ताप आहे.
इतर प्राणी व पदार्थांद्वारे प्राप्त झालेला ताप — आधिभौतिक आहे.
दैवी प्रकोपाने प्राप्त झालेला ताप — आधिदैविक ताप आहे. (२३)

जीव स्वर्गसुखाचा उपभोग स्वर्गलोकात घेऊन पुण्य-क्षय करतो. पुण्य (सुकृत) क्षय होताच जीव स्वर्गसुखांपासून वंचित होतो व त्याला परत मृत्युलोकात जन्म घेणे भाग पडते. (२४)

जीवाला आध्यात्मिक, आधिभौतिक आणी आधिदैविक ताप स्वर्गातही आहेत. त्यामुळे जीव कधीही सुखी नाही. जीवाला पाप-पुण्यकर्मानुसार या तिन्ही तापांपासून सुटका नाही. (२५)

देवऋण, पितृऋण आणी ऋषि ऋण

जीव दारा (स्त्री-पुत्रादि), वित्त (धन) आणीजमीन-जायदाद यांच्या माया-रूपी मोहात फसून संचित, प्रारब्ध आणी आगामी कर्मांच्या भोगाने दुःखी राहतो. (२६)

जीव देहाभिमानाने “माझ्यावर देवऋण, पितृऋण आणी ऋषि ऋण आहे” असे स्वतःच मानून यज्ञ, प्रजोत्पादनात आणी अध्ययन रत होतो. (२७)

"मी" चे अनुसंधान आणी त्रिपुटी

जीवाला वैराग्य प्राप्त होताच श्रोत्र (श्रोता), श्रवण आणी श्राव्य (श्रवणविषय) या तीन माध्यमांद्वारे श्रवण, मनन आणी निदिध्यासन यात मग्न होतो. (२८)

श्रवणाने असत्याचे आवरण नष्ट होते.मननाने “मी” च्या विस्मृतीचे आवरण नष्ट होते.निदिध्यासनाद्वारे विपरीत भावना नष्ट होते; अर्थात “मी” चे निश्चयात्मक ज्ञान होते. (२९)

विशेष: श्रवणाने "मी देह नव्हे" ही भावना नष्ट होते. मननाने "मी देह नव्हे, ‘मी’ ब्रह्म आहे" ही भावना जागृत होते. निदिध्यासनाने "मी ब्रह्मच आहे" ही भावना दृढ होते.

ब्रह्म नावाने काही वेगळे आहे (कर्ता), ब्रह्म भासमान आहे (क्रिया) तसेच "मी ब्रह्म आहे" आहे (कर्म) — या त्रिपुटीला जीवभाव म्हणतात. जीवाची ही त्रिपुटी (कर्ता, क्रिया आणी कर्म) नाश पावताच "मी" चे निश्चयात्मक स्वरूप जाणवते; अर्थात स्वरूपस्थिति प्राप्त होते. (३०)

"मी" उपास्य (आराध्य) आहे, मी उपासक (आराध्याची पूजा करणारा) आहे आणी "मी" स्वतःची उपासना (आराध्याजवळ राहणारा) करणारा ही आहे. “मी” साठी गुरु सेव्य (सेवेचा विषय) आहे आणी“मी” ला गुरुची योग्य सेवा करण्याकरिता सदैव तत्पर राहिले पाहिजे. (३१)

"मी" स्वतः ज्ञाता (ज्ञेयाचे ज्ञान करणारा) आहे. "मी" स्वतः ज्ञेय (ज्याचे ज्ञान प्राप्त करणे आहे) आहे. "मी" स्वतः ज्ञान (ज्ञेय प्राप्त करण्यासाठी केलेली क्रिया) ही आहे. जीव अशा भावनेत सतत गुंतून असायला पाहिजे. (३२)

द्रष्टा, दृश्य आणी दृष्टि (दर्शन) भावाने केवळ “मी”च आहे. म्हणून ध्याता, ध्येय आणी ध्यानाद्वारे "मी" अर्थात जीवाची एकात्म भावना प्रगट होते. (३३)

साक्षी रूपाने जीव हा परमात्मा

जीव काया, वाचा आणी मनाच्या त्रिकरण (काया, वाचा, मन) शुद्धीसाठी कायिक, वाचिक आणी मानसिक तपाचरण करतो. याचे मुख्य कारण म्हणजे जीवाने स्वतःला बद्ध मानले आहे. परंतु ही बद्धावस्था ईश (शिव)ला नाहीये. (३४)

देह पंचवीस तत्त्वांनी निर्मित आहे ही केवळ भ्रामक कल्पना आहे. वास्तवात साक्षी रूपाने जीव परमात्माच आहे. परंतु षट्विकारांनी (काम, क्रोध, लोभ, मोह, असूया आणी अहंकार) ग्रस्त झाल्याने तो जीव आहे असे सांख्यशास्त्रात वर्णन केले आहे. (३५)

दृष्टी, मुद्रा व साक्षात्कार

जीवाने प्रतिपदा, अमावस्या आणी पौर्णिमेला क्रमशः अर्धदृष्टी (नासिकाग्र दृष्टी), डोळे पूर्ण बंद करून (भ्रूमध्य दृष्टी) आणी डोळे पूर्ण उघडून (शांभवी दृष्टी) — मध्य, अंतर आणी बाह्य लक्ष केंद्रित करून मोक्षसाधनेत लीन राहिले पाहिजे. (३६)

भ्रूमध्य दृष्टिला खेचरी, नासिकाग्र दृष्टिला भूचरी आणी डोळे उघडून पापण्या न झपकता ठेवणे — या अंतर्दृष्टीला शांभवी मुद्रा म्हणतात. (३७)

वरील मुद्रेने लक्षावर दृष्टी स्थिर होताच अग्नि (तेज अथवा चैतन्य) मंडल, सूर्य (प्रखर प्रकाश) मंडल आणी चंद्र (शांत प्रकाश) मंडल हे दृष्टिचे विषय होतात, अर्थात दिसू लागतात. (३८)

ज्ञानी लोक यालाच मोक्षाकरिता होणारा प्रकाशसाक्षात्कार म्हणतात. साक्षी ("मी") ज्ञानी होऊन स्वतः ("मी") च्याच प्रकाशाने स्वतः ("मी") ला प्रकाशित करतो. अशा प्रकारे "मी" च्या स्वतःच्या प्रकाशानेच "मी" ला साक्षी म्हणून पाहणारे ज्ञानच मुक्ती आहे. (३९)

अमनस्क तारक योग

"मी" स्मृतीभाव सतत जागृत असल्याने अन्य कोणताही भाव उत्पन्न होत नाही. त्यामुळे सर्व प्रकारचे भाव लय पावून एक निर्विकल्प भावच शिल्लक राहतो. (४०)

अमनस्क योगाच्या (मनोनाश योग) माध्यमातून “मी” चे ज्ञान झाल्यावर जीव मुक्तावस्था प्राप्त करतो. सांख्ययोगानुसार ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर जीव “अमनस्क तारक” योगी म्हणवला जातो. (४१)

बाह्य, अंतर व एकांतिक भक्ती

जीवाला जर स्वतः सिद्धज्ञानाद्वारे ईश (शिव) प्राप्ती करून नित्य मुक्त होण्याची क्रिया ज्ञात नसेल तर जीवाने बाह्यांतिक, अंतर आणी एकांतिक भक्तीचा आश्रय घ्यावा. (४२)

विशेष: अमनस्क योगीला प्राप्त झालेले ज्ञानच सिद्धज्ञान आहे.

बाह्य उपकरणांच्या (देहेंद्रियांच्या) माध्यमातून केलेली कर्मे म्हणजे बाह्य भक्ती; ध्यानादिकांनी केलेली भक्ती म्हणजे अंतर भक्ती; आणी ऐक्यभावाने केलेली भक्ती म्हणजे एकांतिक भक्ती. (४३)

वैधी, रागात्मक व पराभक्ती

भक्तीला वैधी, रागात्मक आणी परा (विदेही अर्थात सायुज्य) या नावांनीही ओळखले जाते. परंतु वरील बाह्य, अंतर व एकांतिक भक्तीमध्ये दृष्टीने कसलाच भेद नाही.वैधी (विधीयुक्त) म्हणजे बाह्य भक्ती, रागात्मक (प्रेमात्मक) म्हणजे अंतर भक्ती आणी परा भक्ती (विदेही/सायुज्य) म्हणजे एकांतिक भक्ती. (४४)

विशेष: वैधी भक्ती : कर्मेंद्रियांच्या माध्यमातून (श्रवण, अर्चन, वंदन, सख्य, पादसेवन, दास्य). रागात्मक भक्ती : नामस्मरण व नामसंकीर्तनाद्वारे ईश्वराशी प्रेम स्थापित करणे. परा भक्ती : ईश्वराशी अभिन्न राहूनही प्रेमभक्तीचा आनंद घेणे; हिलाच आत्मनिवेदन भक्ती म्हणतात.

भक्तीद्वारे चित्सुख प्राप्ती

भक्तीचे तीन प्रकार — वैधी, रागात्मिका आणी परा.भक्तीच्या माध्यमातून जीव तुच्छ विषयांची बाधा नष्ट करून संसारातून मुक्त होतो.भक्तीमुळे जीव निकृष्ट मलमूत्ररूपी देहसुखाला कंटाळून परमशुद्ध, श्रेष्ठ चित्सुख प्राप्त करतो. (४५)

संवाद, युक्तिवाद, वितंडवाद व कुतर्क

गुरु–शिष्यांमध्ये होणाऱ्या प्रश्नोत्तरांना संवाद म्हणतात.दोन विद्वानांमध्ये होणाऱ्या शास्त्रार्थाला युक्तिवाद म्हणतात.दोन मूर्खांमध्ये होणाऱ्या वादाला वितंडवाद म्हणतात.प्रमाणरहित दोन व्यक्तींमध्ये होणाऱ्या वादाला कुतर्क म्हणतात. (४६)

जगाला वेगळे अस्तित्व नाही

ज्या अवस्थेत दृश्य, दृश्यभास आणी कुठलेही अन्य भाव राहत नाहीत, त्या अवस्थेत जगाचे स्वतंत्र अस्तित्व राहत नाही.अज्ञानी लोक मात्र जगाच्या अस्तित्वावर आग्रह धरतात. हे तसेच आहे जसे वंध्यापुत्राच्या पित्याने त्याच्या जन्माविषयी व भवितव्याविषयी चर्चा करणे!हे सर्व कार्य–कारण संबंध मानून निरर्थक विवाद करतात आणी कष्टी होतात. (४७)

जगाविषयी वेगवेगळी मते

प्रगतिवाद्यांचे मत — जगाचे कारण परमाणूंचे घनीभूत होणे. हे तंतोतंत तसेच जसे सूतापासून वस्त्राची निर्मिती. दुसरे मत — जसे दुधाचे दुसरे रूप दही, तसेच “मी” चे दुसरे नाव जग. तिसरे मत — काहीसे सत्यभासक. दोरीवर अंधकार आवरण आणी विक्षेप येऊन सर्पभास होतो, त्याप्रमाणे “मी” वर अविद्या आवरण येऊन जग सत्य भासते. (४८)

जीवा ("मी") ची तीन रूपे

जगात जीव ("मी") तीनच रूपांनी व्यक्त होतो — व्यावहारिक, प्रातिभासिक आणी पारमार्थिक. इतर कोणतेही रूप नाही. (४९)

जिवाचे व्यावहारिक रूप दृश्याला सत्य मानते.प्रातिभासिक रूप मनाच्या व्यवहारालाच सत्य मानते. व्यावहारिक रूप दृश्याला सत्य मानून भोग घेतो. प्रातिभासिक रूप मनाच्या व्यवहारांना मिथ्या मानून भोग घेतो. (५१)

"मी" स्वतः एकमात्र

जीवाचे पारमार्थिक रूप व्यावहारिक व प्रातिभासिक रूपांना सत्य मानत नाही.त्याला दृश्य भासमान आहे या मतावर किंचितही विश्वास नसतो.दृश्याचे मिथ्यत्वबोध मात्र भोगाचे कारण आहे. आत्मभावाच्या दृष्टीने दृश्याला मिथ्या म्हणणे योग्य नाही. (५२)

सुषुप्तीचे कारण दृश्य असू शकत नाही, कारण सुषुप्तीत सत्यत्व आणी मिथ्यत्व दोन्हीचा अभाव असतो. सुषुप्तीत साक्षीचा अभाव असल्याने अत्यल्प दृश्यभासही संभवत नाही. (५३)

"मी" मध्ये केवलत्वच असते; काहीही दुसरे नसते.त्या स्थितीत सत्य–मिथ्य असे काहीही राहत नाही. "मी" एकमात्र, परिपूर्ण — तर वेगळेपणाच्या मिथ्यभावाचा आभास होणार कोणाला? (५४)

ज्या जीवा ("मी") ला पारमार्थिक रूप प्राप्त आहे तो अतिशय भाग्यवान आहे.जीवा ("मी") च्या पारमार्थिक रूपात आत्मप्राप्तीच योग्य आहे.या पेक्षा पूर्वीचे काही जरी श्रेष्ठ वाटत असले, तरी आत्मत्वदृष्टिने (आत्मस्थिति) जीवा ("मी") चे व्यावहारिक ("मी") रूप व प्रातिभासिक रूप दोन्ही भ्रमच आहेत. (५५)

वैराग्य, आत्मबोध आणी उपरति ने सच्चिदानंद-सुखाची प्राप्ती

जीवास तीन तापा (आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक) पासून मुक्ती मिळवण्यासाठी वैराग्य, आत्मबोध आणी उपरति (मायाबंधनातून बाहेर पडण्याची तीव्र इच्छा) आवश्यक आहे. यामुळे त्याला सच्चिदानंद-सुख मिळते आणी असत्य, दुःखरूप, जड संसाराचा नाश होतो. (५६)

दुःखाचे कारण — मोह

जर जीवाला जगातील दुष्ट मोहरूपी बंधनामुळे मिळणाऱ्या कष्टांपासून सुटका हवा असेल तर त्याने प्रामुख्याने सत्यज्ञानाचा आश्रय घ्यावा.या ज्ञानाने जीव मायापाशातून मुक्त होऊन मुक्तावस्था प्राप्त करतो. (५७)

आत्मिकज्ञान स्वतःमध्ये परिपूर्ण

ज्ञानाचे दोन अंग आहेत —१) व्यावहारिक ज्ञान २) आत्मिक ज्ञान.आत्मिक ज्ञान स्वतःमध्ये परिपूर्ण आणी सत्य आहे. त्याचा अभाव असताना ज्ञान म्हणजे सुषुप्तावस्थेत सौंदर्य किंवा सुवास अनुभवण्यासारखे आहे. (५८)

बोधाचे तीन प्रकार — श्रवण, मनन आणी निदिध्यासन

बोधाचे तीन प्रकार आहेत, ज्यामुळे स्वरूप-साक्षात्कार होतो.प्रत्येक प्रकाराचे तीन-तीन भाग आहेत.यथार्थ ज्ञानाच्या संदर्भाने पुढे याची चर्चा आहे.हे सर्व बोध जीवासाठीच आहेत; ईश (शिव) साठी नाहीत. (५९)

जगतकार्यात दोषदृष्टी — वैराग्याची मैत्री

विषयभोगात जेव्हा मनाला दोष दिसू लागतात, तेव्हा वैराग्याशी मैत्री होते.कार्यजनित कर्मफळातून सुख मिळवण्याची इच्छा संपते. तेव्हा मनाला कारणातून अर्थात शुद्ध "मी" च्या ज्ञानातूनच सुख मिळते. (६०)

विशेष:जगत कार्यरूप आहे आणी कारणरूपाने “मी” एकटाच आहे.कार्यापासून सुखाची अपेक्षा संपताच “मी” मध्येच सुख आहे हा निश्चय होतोआणी जीवाला वैराग्य मैत्रीस्वरूप होते.

जर संपूर्ण सुख कारणात ("मी") मध्येच असेल,तर कार्यरूप जगात सुख कसे मिळणार? जगतकार्यत दोषदृष्टी दृढ झाली तरच वैराग्य जीवाच्या अधीन होते. (६१)

जगतकार्यात दोषदृष्टी — विरक्तास सर्वोत्तम

विरक्त पुरुषाला स्वरूपसाक्षात्कारासाठी जगतकार्यात दोषदृष्टी आवश्यक असते,कारण दोषदृष्टी नसली तर मनात व्यवधान निर्माण होते.जगतकार्यात दोषदृष्टी ठेवल्याने तिन्ही काळात पुनर्भोगाची इच्छा उरत नाही.वरवर जगात दोष दिसत नसला तरी कार्यरूप जगात दोष असतोच. (६२)

त्रिभुवनातील मोहाने जरी बलपूर्वक विरक्ताला आकर्षित करण्याचा प्रयत्न केला तरी तो यशस्वी होत नाही.विरक्ताच्या चित्तात किंचितही विकार उत्पन्न होत नाही.तो मेरूपर्वताप्रमाणे अचल राहून आपल्या स्थानावर स्थिर असतो. (६३)

स्वरूपबोध — कारण, कार्य व लक्षण

आता स्वरूपबोधाचे कारण, कार्य आणी लक्षण स्पष्ट करू. (६४)

स्वरूपबोधाचे कारण —श्रवण, मनन आणी निदिध्यासन.स्वरूपबोधाने "मी" ब्रह्मच आहे हे निश्चयात्मक ज्ञान होते.नंतर शरीरबुद्धीचे — "मी देह आहे" — हे स्फुरण उरत नाही.पूर्वी "मी देहच आहे" असे सत्यभास होत होते.आता "मी" च सत्य आहे हा निश्चय होतो. (६५)

जीवाला "मी देह नसून, मी ब्रह्म आहे" हे कळताच जसे पौर्णिमेच्या रात्री चंद्रप्रकाशाने पृथ्वी उजळते किंवा पुष्प फुलताच सुगंध चारही बाजूंनी फैलावतो तशी अवस्था होते. (६६)

कारण ("मी"), कार्य (जगत) आणी स्वरूप (आनंद)

स्वस्वरूप ("मी") चे शुद्ध ज्ञान होताच दुसरे काही उरत नाही.देह–इंद्रिय रहित "मी" परब्रह्म आहे हेच शिल्लक राहते. जीवा ("मी") ला जगात मिळवण्यासारखे काही उरत नाही. “मी” आनंदस्वरूप असल्याने याशिवाय इतर कुठलेही सुख प्राप्त करण्यासारखे नसते. (६७)

या स्थितीत दृश्य जरी भासत असले तरी नसल्यासारखेच असते.“मी” मध्येच “मी” आणी“माझे” विलीन होते — जसे पाण्यात बर्फ मिसळून जातो."मी" च्या अखंड, अमित आनंदस्थितीत “मी” स्फुरणही उमटत नाही.हे स्फुरण सुषुप्ती ओलांडून “मी” च्या रहस्यमय स्थितीत स्थिरावते. (६८)

“मी” चे सत्यज्ञान झाल्यावर, विरक्ताचा देहपात होईपर्यंत तो अखंड अमित आनंदस्थितीतच राहतो. त्याला देहभान रहात नाही. तो "मी" ज्ञानात दृढ स्थिरावतो. त्याच्यावर कोणतेही भूत–भविष्यकाळीन कर्तव्य उरत नाही. (६९)

या प्रकारे कारण, कार्य व स्वरूप यांचा विवेचनात्मक आढावा या तीन श्लोकांत (६७–६९) दिला. (७०)

ब्रह्मानंद, निर्वैषयिक आनंद आणी वैषयिक आनंद

जागृती, स्वप्न आणी सुषुप्ती यांचे सर्व अंश नाहीसे झाले की द्वैतभावाचा नाश होतो आणी निर्विकल्प अवस्थेत मिळणाऱ्या आनंदाला **ब्रह्मानंद** म्हणतात. सुषुप्तीत मिळणारा आनंद — निर्वैषयिक आनंद — तो सर्व क्रिया लय पावल्यानंतर भासतो. जागृत अवस्थेत विषयभोगातून मिळणारा आनंद — विषयानंद. (७१)

जीवाला आनंदप्राप्तीचे तीन स्रोत — ब्रह्मानंद, वासनानंद व विषयानंद

आनंद तीन मार्गांनी मिळतो —१) ब्रह्मानंद २) वासनेतून प्राप्त होणारा आनंद ३) विषयानंद (७२)

प्रथम — ज्ञानी, ज्याला ब्रह्मानंद प्राप्त आहे. दुसरा — मुमुक्षु, पुण्यवान, ज्यात ज्ञानप्राप्तीची वासना उत्पन्न झाली आहे. तिसरा — निकृष्ट, अज्ञानवश विषयानंदात मग्न राहणारा. (७३)

विषयेच्छेचे तीन दोष — पूर्वपाप, चंचल मन आणी“मी” चे अज्ञान

जीवाच्या अंतःकरणात विषयेच्छा उत्पन्न होण्यास तीन दोष कारणीभूत —१) पूर्वपाप २) चित्ताची चंचलता ३) "मी" विषयीचे अज्ञान (७४)

कर्माची तीन साधने — मन, वाणी आणी देह

जीव कर्म तिन्ही साधनांनी करतो —१) मन २) वाणी आणी ३) देह विषयमोहात अडकून कर्म करताना जीव स्वतःच दुःखात सापडतो. (७५)

विषयमुक्तीची तीन साधने — विधी, नियम आणी परिसंख्या

विषयांच्या बंधनातून बाहेर पडण्याचे तीन मार्ग — १) विधी २) नियम आणी ३) परिसंख्या (आकडे/मोजमाप/मर्यादा).यांना विधित्रिचय असे म्हणतात. (७६)

"विधिरत्यन्तमप्राप्तौ नियमः पाक्षिके सति॥
तत्र नान्यत्र च प्राप्तौ परिसंख्या निगद्यते"

विशेष:(१) विधि – अप्राप्तस्य प्राप्तिः विधिः — जे आजच्या घटक्याला प्राप्त झालेले नाही, अर्थात "मी"चे सत्य स्वरूप ओळखण्याचे प्रयत्न. (२) नियम – "मी" ओळखण्यास आखलेली क्रमबद्ध योजना.(३) परिसंख्या – जपाचे ठराविक आकडे.

कर्मकांड, भक्तिकांड आणी ज्ञानकांड

बहुजन समाजाच्या दृष्टीने जगात मुक्ती प्राप्त करण्याकरिता वेदात असलेले तीन कांड — कर्मकांड, भक्तिकांड (उपासना कांड) आणी ज्ञानकांड हे होय. श्रुती म्हणते की भवसागरातून कसलाही त्रास न होता पार होण्याकरिता या व्यतिरिक्त अन्य कुठलाही मार्ग नसल्याने वरील उपायच अत्यंत श्रेष्ठ आहे. (७७)

नरकाचे द्वार — काम, क्रोध आणी लोभ

हेच सत्य आहे की जगात तीन द्वाराने जीव नरकात जातो. ही तीन द्वारे म्हणजे काम, क्रोध आणी लोभ आहेत. कुठल्याही जीवाला ही तीन द्वारे सत्य सुखाची प्राप्ती होऊ देत नाहीत. (७८)

॥इति श्रीरामदासकृपान्वितेन श्रीधरस्वामिना विरचिते स्वात्मनिरुपणे

द्वादशप्रकरणं समाप्त||

॥श्रीरामसमर्थ॥
स्वात्मनिरुपण
प्रकरण १३

मोक्षा साठी अधिकार संपन्नता आणी विविध साधन पद्धती

मानवात बुद्धीचे वैशिष्ट्य

जगात आहार, निद्रा, भय आणी मैथुन ह्या क्रिया सर्व देहधारींमध्ये सामान्य रूपाने असतात. वरील विशेषता केवळ नरदेहातच असते असे ज्ञानी लोक स्वीकारत नाहीत. जर ही विशेषता मनुष्यदेहातही असेल, तर त्यात काही विशेष नाही. अन्य प्राण्यांहून काही भिन्न मनुष्याला प्राप्त आहे, आणी ते म्हणजे बुद्धी, अर्थात नित्यानित्य विवेक. (१)

आत्मशुद्धी, देहशुद्धी आणी मनशुद्धी

तीन प्रकारच्या शुद्धीचा क्रम याप्रकारे आहे. प्रथम आत्मशुद्धी, द्वितीय देहशुद्धी आणी तृतीय मनशुद्धी. स्वच्छ जलाने देहशुद्धी होते, बुद्धीच्या दृढतेने अर्थात नित्य–नित्य विवेकाने मन शुद्ध होते आणी"मी ब्रह्मच आहे" अशा दृढनिश्चयाने आत्मशुद्धी होते. (२)

मुमुक्षु, साधक आणी सिद्ध

जगात परमार्थाचे अधिकारी तीन प्रकारचे असतात. प्रथम–मुमुक्षु, द्वितीय–साधक आणी तृतीय–सिद्ध. या तिघांचा साधना प्रकार वेगवेगळा असतो. मुमुक्षुची साधना–नैष्कर्म्य वृत्ती, साधकाची साधना–ब्रह्मभावना आणी सिद्धाची साधना म्हणजे "एक ब्रह्म शिवाय अन्य काहीही नाही". (३)

स्थूल, सूक्ष्म व कारण देहाचा नाश

जेव्हा सत्संग प्राप्तीने नैष्कर्म वृत्ती द्वारे वैराग्य दृढ होते आणीजड देहभाव नष्ट होऊन सद्गुरूंच्या उपदेशानंतर "मी ब्रह्मच आहे" हा भाव जागृत होतो, तेव्हा अद्वैत तत्वाच्या बोधाने अत्यंत सूक्ष्म देहभाव नष्ट होतो. "मी ज्ञानरूप आहे" हा भाव अत्यंत दृढ होण्याने कारण देहाचा नाश होतो. (४)

स्वर्गलोक, ब्रह्मलोक आणी मोक्ष

जीवात्मा उत्कृष्ट कर्माने दिव्य सुख प्राप्तीसाठी स्वर्गलोकात जातो. निष्काम कर्म आणी योगनिष्ठेने ब्रह्मभाव जागृत होतो. परंतु हा मोक्ष नाही. ब्रह्मभावनेमुळे जीवात्मा ब्रह्मलोकात जाऊन राहतो आणी ह्या क्रमाने मोक्ष प्राप्त करतो. "मी ब्रह्मच आहे" आणी"मी हून वेगळे काहीही नाही" हा दृढनिश्चयच मोक्ष आहे. (५)

कायिक, वांग्मय व मानसिक तप

देव, द्विज, गुरु आणीज्ञानी मनुष्याचे पूजन अर्थात त्यांच्याबद्दल आदर देहपवित्र्य (स्नानादि क्रिया), साधेपणा, ब्रह्मचर्य आणी अहिंसा ह्या देहतप क्रियेच्या अंतर्गत आहे. कोणालाही दुःखी न करणे, प्रिय बोलणे आणी हितकर सत्य भाषण करणे आणीस्वाध्याय–वांगमय (वाणी) तप क्रियेच्या अंतर्गत आहे. जीवास वर नमूद केलेल्या तपांचे अनुकरण करावे. (६)

मानसिक तप

मोह आणी दुःखाला सोडून चित्ताने सदा प्रसन्नचित्त राहिले पाहिजे. विषयेच्छेपासून निवृत्त होऊन सर्वदा चिद्स्वरूपाचेच अवलंबन केले पाहिजे, ज्यामुळे कुठल्याही प्रकारच्या आपत्तींपासून मुक्त राहता येईल. विचारशून्य स्थितीत राहून सर्वदा स्वाभाविक मौन मुद्रा धारण करावी. हे सर्व अतिशुद्ध मानसिक तप म्हटले जाते. (७)

प्राण्यांचे चार विभाग आणी सत्संगतीचे महत्व

सर्व जीवसृष्टी (प्राणी) वनचर, भूचर, खेचर आणी जलचर ह्या चार भागात विभक्त आहेत. परंतु परमार्थाने आत्मप्राप्ती केवळ मानवदेहातच प्राप्त होऊ शकते. जीवास सत्संगती सुख देणारी, भवभयाचा नाश करणारी आणीसंशयाचा नाश करणारी आहे. जीव नियम पाळून ब्रह्मज्ञानाची प्राप्ती स्वतः करतो. (८)

मोक्षमार्गाचे चार द्वारपाल

मोक्षाच्या द्वारावर नित्य चार द्वारपाल असतात. या द्वारपालांची नावे – नित्यानित्य विचार, शम, संतोष आणी विशेष रूपाने साधुसंग आहेत. जर जीवास साधुसंग प्राप्त झाला, तर शेष तीन सहजच प्राप्त होऊ शकतात. भवरोगाने पीडित जीवास साधुसंग औषधच आहे. (९)

ब्रह्मैक्य, बोध्य आणी बोधकत्व

ब्रह्मैक्य (ब्रह्मतत्त्व ऐक्यत्व), बोध्य (ज्याचा बोध होतो) आणी बोधकत्व (बोधानुभूती) यामध्ये परस्पर संबंध स्थापित होतो. ह्याचे मुख्य प्रयोजन कुठल्याही प्रकारच्या बंधनापासून रहित सर्वाधिक सौख्याची प्राप्ती करणे आहे. (१०)

साधनचतुष्टय संपन्नता

वेदांतग्रंथात लिहिल्याप्रमाणे, वेदांतग्रंथाचा अधिकारी तोच आहे जो साधनचतुष्ट्य संपन्न असतो. (११)

साधनचतुष्टयात –(१) नित्यानित्य विवेक,(२) सांसारिक आणी स्वर्गाच्या भोगांचे वैराग्य,(३) शमादि षट संपत्ती,(४) तीव्र मुमुक्षुत्व. (१२)

भवबंधन नष्ट करणारा सद्गुरूंचे लक्षण

भवबंधन नष्ट करण्यासाठी वेदशास्त्रात निपुणता, मधुर संभाषण कला, सत्यतत्त्व विवेचन कला, निष्काम वृत्ती, अत्यंत दयाळू आणी ब्रह्मनिष्ठ असणे आवश्यक आहे. (१३)

सद्गुरू सेवेचे प्रकार

जीवाने वर नमूद केलेल्या लक्षणांनी युक्त सद्गुरूंना शरण जावून त्यांच्या निवासस्थानाची आणी त्यांची आत्मीय भावाने सेवा सुश्रुषा करून त्यांना संतुष्ट केले पाहिजे. (१४)

सद्गुरूंच्या स्थानाचे, घराचे, पशुचे, गावाचे, धन आदीचे रक्षण करण्याबरोबरच सद्गुरूंच्या भोजन, स्नानादी आणी देहाच्या सेवेतही आत्मीय भाव ठेवला पाहिजे. (१५)

"सद्गुरूच माझ्यासाठी सर्वस्व आहेत, त्यांच्या व्यतिरिक्त मी काहीही जाणत नाही" अशी निष्ठा ठेवणे आणी सद्गुरूंचा आंतर्भाव जाणून त्यांची आत्मीय सेवा करणे श्रेष्ठ आहे. (१६)

सद्‌गुरूंकडून चार महावाक्यांचे श्रवण व चिंतन

वेदातील चार शाखा – ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणी अथर्ववेद – येथे चार ब्रह्मबोधक महावाक्यांचा उल्लेख आढळतो. ह्या चार महावाक्यांचा गुरुसेवा करताना त्यांचा कडून श्रवण करावे व नंतर महावाक्यांच्या चिंतनात रमावे. (१७)

वेदातील चार महावाक्य व त्याचे विवेचन

"प्रज्ञानं ब्रह्म" – अर्थात ब्रह्म पूर्ण ज्ञानस्वरूप आहे. हे ऐतरेयी उपनिषद (ऋग्वेदाचे सार) आहे. "ब्रह्माहमस्मि",वाऽहं ब्रम्ह" अर्थात ब्रह्मच "मी" आहे अथवा "मीच ब्रह्म आहे". हे यजुर्वेदाचे सार आहे. (१८)

नारायणोपनिषद आणी बृहदारण्योपनिषद महावाक्य

ह्या दोन उपनिषदांमध्ये यजुर्वेदाच्या महावाक्याचे सार सांगितले आहे, ज्याने "मी देह आहे" हा भ्रम नष्ट होतो. (१९)

छादोग्य उपनिषद व मांडुक्य उपनिषद महावाक्य

सामवेद शाखेच्या छादोग्य उपनिषदात तत्वमसि (तत्-त्वम्-असि) अर्थात "तो (ब्रह्म)च 'मी' आहे" ह्या महावाक्याचा उल्लेख आहे.अथर्ववेद शाखेच्या मांडुक्य उपनिषदात अयमात्मा (अयम् आत्मा) अर्थात "मीच आत्मा आहे" ह्या महावाक्याचे विवेचन आहे. (२०)

महावाक्याचे सतत चिंतन अनिवार्य

जीवास महावाक्याचे चिंतन करणे अनिवार्य आहे. परंतु ईश्वरास हे चिंतन करण्याची आवश्यकता नाही. जीवास बंधनातून मुक्त होण्यासाठी महावाक्याचे चिंतन हे एकमेव साधन आहे. (२१)

मुक्तीचे चार प्रकार

जीवाला कर्मफलाच्या कारणी ईश्वरभक्तीने चार प्रकारची मुक्ती (चार मुक्ती – सलोकता, समीपता, स्वरूपता व सायुज्यता) प्राप्त होते. ईश्वर कर्मफळापासून अलिप्त असल्याने त्याला मुक्तीची आवश्यकता नाही. (२२)

जीवाचे चार वर्ण व चार आश्रम

ब्राम्हणादि चार वर्ण (ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणीशूद्र) आणी ब्रह्मचर्यादि चार आश्रम (ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास) म्हटले जातात. जीवाला देहाभिमानामुळे हे चार वर्ण आणी चार आश्रम प्राप्त आहेत. परंतु ईश्वर देहाभिमान रहित असल्याने या सर्वापासून अलिप्त आहे. (२३)

प्राण्यांचे चार वर्ग

पूर्वी प्राण्यांचे चार वर्ग – वनचर, भूचर, खेचर व जलचर – यांचा उल्लेख केला गेला आहे. हे सर्व मानवदेहधारी जीव नाहीत. परंतु आहाराच्या दृष्टीने लेह्य (चाटणे), चोश्य (चावणे) आणीपेय (पीणे) हे सर्व देहधारी प्राण्यांमध्ये समान आहेत. (२४)

मोक्षासाठी विभिन्न योगाचा आश्रय

मुक्तीची इच्छा ठेवणारा मानवदेहधारी जीव मंत्रयोग, लययोग (ध्यान-समाधी), राजयोग (ज्ञानयोग) आणी हठयोग (आसन, मुद्रा, प्राणायाम व बंध) या चार योगांचा आश्रय घेतो. हे सर्व योग ईश्वरासाठी नाहीत, कारण ईश्वर सदैव मुक्त आहे. मात्र जीव वर नमूद केलेल्या योगांचा आश्रय घेऊन ईश्वरपद प्राप्त करू शकतो. (२५)

मंत्रांचे प्रकार व नियम

मंत्राचे चार प्रकार आहेत – जप, अजप, स्मरण आणी क्रिया. हा विषय पुढे स्पष्ट केला जाईल. (२६)

मंत्र जपाची फलश्रुती

जीवाने वेदोक्त महामंत्राचा जप, पठण अथवा स्मरण गुरुबोधित मार्गाने षडांगअंगन्यास व करन्यास पूर्वक केले पाहिजे.(२७)

विशेष: अंगन्यास: हृदय, शिर, शिखा, कवच, नेत्र, अस्त्रायफट; करन्यास: अंगुष्ठ, तर्जनी, मध्यमा, अनामिका, कनिष्ठिका, करतलकर पृष्ठ.

जो जीव ब्रह्मचर्यादिक व्रत पाळून गुरुपदिष्ट मंत्राचा बारा वर्षे क्रमवार नित्य जप करतो, तो कधीही मायेने भ्रमित होत नाही. (२८)

त्या जीवास आणिमादिक सिद्धी आणीज्ञानयोगही प्राप्त होतो. जर जीवाने जप अक्षरसंख्येचा कोटी जप केला, तर त्याला ईश्वराचा साक्षात्कार होतो. (२९)

जपसंख्या जास्त होताच, क्रमवार तोच जप वैखरी पासून मध्यमा, पश्यंती आणी परावाणी सह ईश्वरसन्निध्यापर्यंत पोहोचतो. (३०)

वाचिक व मानसिक जप

जपाचे मुख्य दोन प्रकार आहेत – प्रथम वाचिक जप आणी द्वितीय मानसिक जप. ह्या दोन्ही जप प्रक्रियेबद्दल पुढे विस्तृत चर्चा होईल. (३१)

वाचिक जपाचे दोन प्रकार

वाचिक जपात दोन प्रकार आहेत – प्रथम जिव्हेने उच्चारित (उच्च) आणी द्वितीय उपांशु (ओठांच्या आत उच्चारित). जिव्हेने उच्चारित जप शब्दरूपाने बाहेर ऐकू येतो. उपांशु जप – ओठांच्या माध्यमातून मंद स्वरात, स्वतःच्या शिवाय इतर कोणालाही ऐकू जात नाही. (३२)

मानसिक जप

मानसिक जप ध्यानयुक्त होऊन मनात केला जातो. जिव्हा आणी ओठाने केलेल्या जपाच्या तुलनेत मानसिक जप कोटी पटीने श्रेष्ठ आहे. (३३)

पुनश्चरण जप

अखंड स्मरणयुक्त ध्यान प्रक्रियेत केलेल्या जपाला पुनश्चरण म्हणतात. हा जप करण्याची तिसरी विधी आहे. प्रथम जिव्हेने जप करण्याची विधी, दुसरी – उपांशु जप (ओठांत मंद जप). ह्या दोन्ही विधींमध्ये नियमांचे बंधन नाही. परंतु तिसऱ्या विधीत नियमांचे पालन आवश्यक आहे. (३४)

विशेष – ध्यानयुक्त जप पुनश्चरण साधनेत एकांत, आसन, मुद्रा, विशिष्ट जपसंख्या, अंगन्यास, करन्यास यांचा समावेश असतो.

अजपा-जप

अजपा जप म्हणतात ज्यात श्वास घेताना व सोडताना सोहं-सोहं शब्दाच्या माध्यमातून नित्य जप चालू राहतो. (३५)

श्वास घेताना "सो" आणी सोडताना "हं" या ध्वनीमुळे जीवात “तोच ‘मी’ आहे” ही स्मृती सतत जागृत राहते. ही स्मृती जागृत राहिल्यामुळे जीव सर्व भवआपदांपासून मुक्त राहतो. (३६)

नामस्मरण

नामस्मरण मंत्र जीवासाठी अत्यंत सोपा व सुलभ साधन आहे. ह्या प्रक्रियेत शिव-विष्णु इत्यादी देवतांचा नाम अत्यंत प्रेमपूर्वक जपला जातो. (३७)

मंत्रोच्चार विधी (क्रिया)

गर्भाधानादि संस्कार, यज्ञयागादी कर्म आणी श्रौतादि कर्माच्या वेळी केलेल्या मंत्रोच्चार विधीला क्रिया म्हणतात. (३८)

दृष्टी साधन व त्याचे फलित

काही लोक ध्यानयुक्त (मानसिक) जपाला दृष्टी साधन देखील म्हणतात. हा ध्यानयुक्त जप योगी लोक करतात म्हणून यास कर्मयोग म्हणतात. हा सर्व योगांचा राजा आहे. म्हणून हा ज्ञानयोगही आहे. (३९)

दृष्टी साधन आणी परिणाम

दृष्टी साधन एका लक्ष्यावर सिद्ध झाल्यानंतर चंद्रप्रकाश, सूर्यप्रकाश, धुके, अग्नि, निळे आकाश, चमकणारे स्फटिक, आकाशातील चतुष्कोणी आकाराचे नक्षत्र जसे बाहेर दिसतात, तसे ध्यानावस्थेतही दिसतात. (४०)

कधीकधी अनाहत नाद घोष, घंटा-शंख आदींचा नाद, मृदंग-वेणू वाद्यांचे संगीत, नगारा आणी मेघगर्जना ऐकू येतात. या सर्व वाद्यांच्या संगीतात मन लीन होते, जसे अमृताच्या ऐवजी दुधरसपान करणे. या सर्व उपाधींचा लय झाल्यानंतर जे शेष राहते, त्यास निर्गुण रूप म्हणतात. (४१)

हठयोग साधना

ईश्वराला प्राप्त करण्यासाठी प्राण-अपान वायुचा निरोध करणे, विषय मोहापासून मुक्ती प्राप्त करण्याकरिता परिपूर्ण अष्टांग योग साधना करणे आणीलोकांत किंवा एकांतात राहून अत्यंत कठोर साधनेने देहकष्ट सहन करणे हे सर्व हठयोगाच्या अंतर्गत येते. परंतु ही साधना उत्कृष्ट श्रेणीची साधना नाही. (४२)

विशेष: जीव स्वतःच्या मूर्खतेमुळे स्वतःच्या विभूत्वाला (परमात्मस्वरूपाला) न ओळखल्याने भ्रष्ट होतो, अर्थात भवसागरात फसून पतित होतो.

जीवाचे पतन होऊ नये आणी जीवात सदासर्वदा स्वतःच्या विभूत्वाचा बोध जागृत राहावा, म्हणून वर विविध साधनांची चर्चा केली आहे. (४३)

॥इति रामदासकृपान्वितेन श्रीधस्वामिनाविरचिते स्वात्मनिरुपणे

त्रयोदश प्रकरणं समाप्तम॥

॥श्रीरामसमर्थ॥

स्वात्मनिरूपण

प्रकरण १४

ज्ञान योग व ज्ञाननिष्ठा(आत्मनिष्ठा)

"मी" शिव-जीव भाव रहित

अल्पज्ञ आणी सर्वज्ञ हा भाव क्रमशः जीव आणी शिव यांच्याशी संबंधित आहे. परंतु ज्ञान स्वरूपात हे दोन्ही नाहीत. ज्यास "मी" आत्मैक्य प्राप्त करण्याची तीव्र इच्छा आहे, त्यास “मी”चे ज्ञान असणे अत्यावश्यक आहे. (१)

“मी” अद्वय आहे. परंतु “मी”मध्ये भिन्नत्वाच्या भावाने भ्रांती निर्माण होते. "मी" मधील भिन्नत्वाचा भाव त्यागल्याने “मी” मध्ये ब्रह्म स्वरूपाची शांती प्राप्त होईल. “मी” ज्ञानस्वरूप असल्याने “मी”ला सदासर्वदा नित्य सुख देखील प्राप्त आहे. जीवास दुःखाचे कारण "मी"च्या आत्मस्वरूपाची विस्मृती आहे. (२)

जगात "मी"ला जीव आणी ईश (शिव) समजणे अज्ञान आहे. परंतु ज्ञानावस्थेत ब्रह्मैक्य (जीव-शिव ऐक्य) बोध स्थिर होताच, “मी”च्या अतिरिक्त अन्य काहीही नाही. अज्ञानामुळे उत्पन्न झालेला विपरीत भास ज्ञानाने नष्ट होतो. अज्ञानामुळे दोरीवर सापाचा भास होतो; त्याच्या निवारणार्थ दोरीमध्ये सत्यत्वाचे ज्ञान आवश्यक आहे. (३)

"मी"च्या ज्ञानाचे महत्व

जीवात्मास आत्मज्ञानाच्या अभावात मोक्ष प्राप्त होऊ शकत नाही. सर्वांसाठी आत्मसुख अथवा स्वरूपसुख शाश्वत आणी श्रेष्ठ आहे. (४)

आत्मज्ञानाचा अभाव सर्व समस्येचे मूळ कारण आहे. मानसिक अशांती, कांतीरहित देह, युक्ती व बुद्धीच्या अभावाचे कारण देखील आत्मज्ञानाचा अभावच आहे. (५)

जीवास अनंत शक्तीचे भंडार आत्मज्ञानानेच प्राप्त होते. जीवात दैन्याचे कारण आत्मज्ञानाचा अभावच आहे. आत्मज्ञानाचा अभावानेच विश्वाचे आकर्षण उत्पन्न होते. आत्मज्ञानाच्या प्राप्तीनेच मोह नष्ट होतो. (६)

अज्ञानी व ज्ञानी पुरुषाचे लक्षण

मी देहच आहे” ही भावना आत्मज्ञानामुळे व्यर्थ भासते. अज्ञानी जीवाला आत्मज्ञानाच्या अभावात “मी देहच आहे” हे ओझे वाहावे लागते. (७)

जीव अज्ञानी असल्यामुळे मलमूत्राने भरलेल्या देहरुपी भांड्याला पाहून भ्रमवश देहसुखाची इच्छा ठेवतो, परंतु ज्ञानी माणसास ही कृती मूर्खतापूर्ण वाटते. (८)

जीवाला स्त्री-पुरुष भाव अज्ञानामुळे उत्पन्न होतो, परंतु ज्ञानी, ज्ञानस्वरूप असल्याने मूर्खतावश वागत नाही. (९)

ज्ञानी पुरुषास सर्व प्रकारची सुखे तृणतुल्य वाटतात; तो आत्मसुखाने तृप्त राहतो. अज्ञानी पुरुष या आत्मसुखाचा लाभ कधीही प्राप्त करू शकत नाही. (१०)

ज्ञानी पुरुषास सर्वांबद्दल आत्मप्रेम असते; यामुळे ज्ञानी सर्वात्मा म्हणला जातो. सर्व प्रकारचा अहंकार नष्ट झाल्याने ज्ञानी सर्वांचा प्रिय होतो. (११)

निरपेक्ष प्रेमामुळे ज्ञानी सर्वांना ज्ञात असतो. आत्मनिष्ठेने प्राप्त आत्मसुखाच्या तृप्तीने सर्व प्रकारचे सामर्थ्य त्याच्यामध्ये प्रगट दिसते. (१२)

ज्ञानी सर्वांमध्ये आत्मभावाचे दर्शन करतो, ज्यामुळे भिन्नत्वदृष्टी समूळ नष्ट होते. ज्ञानी कोणाशीही द्वेषभाव ठेवीत नाही; अन्य लोकही ज्ञानी पुरुषाशी द्वेषभाव ठेवत नाहीत. (१३)

ज्ञानी पुरुषाच्या अंतरंगात संपूर्ण विश्व व्याप्त असते आणीसंपूर्ण विश्वात ज्ञानी समत्वदृष्टीने व्याप्त असतो. ज्ञानी शोक, मोह आदि रहित राहतो आणी भिन्नत्वाबद्दल अनभिज्ञ असतो. (१४)

ज्ञाननिष्ठा (आत्मनिष्ठा)

कर्मयोगाच्या तपोनिष्ठेपेक्षा ज्ञाननिष्ठा श्रेष्ठ आहे. ज्ञाननिष्ठेत जीवाला कधीही कष्ट होत नाहीत आणी तो स्वतःमध्ये ब्रह्मैक्य (जीव-शिव ऐक्य) प्राप्त करतो. (१५)

कर्ममार्ग व भक्तिमार्गाद्वारे केलेल्या तपाचरणामुळे मनात द्वैतभाव स्थिर राहतो, परंतु ज्ञानमार्गाचा आश्रय घेतल्याने ब्रह्मैक्य प्राप्त होते. प्रपंचात (जन) आणी एकांतात (वन)ही "मी"चे अद्वयत्व स्थिर राहते. (१६)

भावनेच्या अनुरूप भाव दृढ होतो. ब्रह्मभावाची पूर्णता अर्थात चराचर विश्वात "मी"च्या व्याप्तीने आत्मनिष्ठा दृढ होते. (१७)

आत्मनिष्ठा भेददृष्टी रहित आहे. अनेक योग जसे कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग साधना करूनही मोह(स्वदेहाहंकारचा माध्यमाने सांसारिक आकर्षण) नष्ट करण्यासाठी ज्ञान आवश्यक आहे. "मी" मध्ये पूर्ण स्थिरता आल्यावर कुठल्याही प्रकारची भेददृष्टी शेष राहत नाही. (१८)

ज्ञानयोग

प्रमाणमात्र (अस्तित्वयुक्त) "मी"ची जाणीव सर्वप्रकाशक आहे. "मी"मुळेच संसारात मिथ्य ज्ञेय (दृश्य) वस्तू भासतात. "मी"चे स्वभावच आहे की मिथ्य ज्ञेय (दृश्य) विखंडित करून नष्ट करणे आणीज्ञेयशून्य (दृश्य रहित) राहून ज्ञानस्वरूप होणे. (१९)

विशेष: ज्ञाता, ज्ञेय आणी ज्ञान यांस त्रिपुटी म्हणतात.ज्ञाता – जो ज्ञान ग्रहण करतो. ज्ञेय – ज्या विषयाचे ज्ञान ज्ञाता ग्रहण करतो. ज्ञान – ज्ञेय प्राप्त करण्याची निर्धारीत विधी.

ज्ञेय प्राप्तीसाठी ज्ञात्याला स्वस्मृती आवश्यक आहे. जेव्हा ज्ञात्याला स्वस्मृती नसते, तेव्हा ज्ञेयाचे काही औचित्य राहत नाही. ज्ञाता ज्ञेयशून्य होऊन ज्ञानस्वरूप होतो; ज्ञाता ज्ञानस्वरूप झाल्याने त्यास ज्ञेयाची आवश्यकता भासत नाही. हेच ज्ञानयोग आहे. ज्ञानयोगाद्वारे जीव अर्थात "मी" हून वेगळे काहीही शेष नाही असे ज्ञान प्राप्त होते. (२०)

ज्ञानयोगा द्वारे सर्व संवेदनांचा नाश

ज्ञानयोगाच्या अवस्थेत दृश्यमान जगत आणी जीव-शिव बोध दोन्हीही राहत नाही. "मी"मध्ये "मी"च्या नित्य स्मृतीचे ज्ञानदेखील नसते. सत्यज्ञानाच्या स्मृतीत "मी" पूर्णपणे विलीन केल्यावर निर्विकल्पावस्था प्राप्त होते. त्या अवस्थेत जगाचे अस्तित्व असणे किंवा नसणे याबद्दल कोणतेही भिन्नत्व राहत नाही. (२१)

“मी” ही स्फूर्ती उत्पन्न आणी लय होण्यापूर्वी देखील ज्ञानरूपाने तिथे राहतेच. ज्ञानी पुरुषाला हे निश्चयपूर्वक ज्ञात असते की “मी”च्या भानाने स्फूर्ती उत्पन्न होत नाही; पूर्वीपासून अस्तित्वात आहे. ज्ञानाच्या माध्यमातून दृश्य तसेच मन, इंद्रिय, वासना, जीव-शिव, देहभावना इत्यादी सर्व संवेदनांचा नाश होतो. (२२)

"मी"एकमात्र

दृश्य विन्मुख झाल्यावर “मी” स्मृतीचा लय होताच विवेकाने हे स्थैर्य येते की दृश्यपूर्वीचा “मी” एकमात्र ज्ञानमात्रच आहे. त्या अवस्थेत “मी” दृश्य रहित, भावनारहित स्थितीत राहतो आणी स्वतःच्या सत्तेने परिपूर्ण असतो. मायेमुळे झालेला नर-नारी, जीव-शिव अन्योन्य संबंध देखील राहत नाही. या प्रकारे जीव सर्वस्वाचे त्याग करून नि:संग भावनेने "मी"सह ऐक्यत्व प्राप्त करतो. (२३)

दुःखाचे कारण आणी अन्यत्वाचा त्याग

दुःखाचे कारण अन्य भावना हीच आहे, हे ज्ञात झाल्यानंतर अन्यत्व अर्थात भिन्नत्व भावाचा त्याग केला पाहिजे. अन्य भावनाच भिन्नतेची जन्मदात्री आहे. म्हणून अन्य भावनेचा त्याग करून ज्ञानमात्र “मी”सह ऐक्यत्व प्राप्त करायला पाहिजे. (२४)

"मी" बोध आणी स्मृती

“मी” प्रगटीकरण बोध ऐक्यता आहे. "मी" प्रगटीकरणानंतर "मी" ची स्मृती ज्ञानावस्था आहे. तसे ज्ञानमात्र “मी”च्या वरील दोन्ही अवस्था असल्यामुळे, दोन्ही अवस्थेत कोणतेही भेद नाहीत. हेच ज्ञानमात्र "मी"च्या एकत्वाचे निदर्शन करते. (२५)

आत्मनिवेदन भक्तीचे श्रेष्ठत्व

जीव जेव्हा आपल्या “मी”मध्येच राहतो, तेव्हा तो मुक्त होतो आणी पुन्हा भवकुपात जाऊन पडत नाही. आत्मनिवेदन भक्तीच सत्य आहे आणी कर्म योग यापेक्षा भिन्न नाही. जीव “मी ब्रह्मच आहे” हा जप करत कर्तेपणापासून अलिप्त राहून नित्य नैमित्तिक कर्म देखील करतो. म्हणुन जीव आत्मैक्य साधावयास आत्मनिवेदन भक्ती निश्चिंत होऊन करतो. (२७)

आत्मैक्ययोग

जीवाकरिता आत्मनिवेदन भक्तीच आसन, प्राणायाम, ध्यान आणी समाधि सर्व काही आहे. आत्मैक्ययोगा द्वारेच जीव मोक्ष प्राप्त करतो. (२८)

आत्मैक्ययोगाच्या दृष्टीने देह, मन आणी इंद्रिय यांचे वैराग्य हाच यम आहे.ब्रह्मतत्त्वाचे चिंतन जे भ्रम नष्ट करण्यास समर्थ आहे, हेच नियम आहे.दृश्य जगाविषयी उदासीनता हेच आसन आहे.विश्वाचे मिथ्यत्व हाच प्राणायाम आहे. (२९)

मनाची अंतर्मुख स्थिती हीच प्रत्याहार आहे.नित्य "सोऽहं" चिंतन हेच ध्यान आहे. स्वतःच चित्त स्थैर्याकरिता प्रयत्नशील राहणे हीच धारणा आहे.“मी” स्मृति रहित असणे हीच समाधि आहे. (३०)

"मी"ची नित्य स्वसंवेदना

वेदात ज्या ब्रह्मतत्त्वाचे प्रतिपादन केले आहे, ते अन्य काही नसून "मी"ची नित्य स्वसंवेदनाच आहे. जसे अमृतरसाच्या आस्वादनात सर्व रसांचे सार आहे, तसेच "मी"चे सत्य अनंत स्वरूपाचे बोध सर्व सौख्याची पूर्णता प्रदान करतो. स्वस्वरूपात ऐक्यत्व प्राप्त झाल्यामुळे पुनर्जन्म होत नाही. (३१)

“मी” शब्दातीत व अनुभवातीत

“मी”चे अनंत स्वरूप शब्दांनी व्यक्त करता येत नाही. "मी"मध्ये जीव आणी शिव भावाचे विलीनकरण झाल्यावरच जीवाला व शिवाला "मी"च्या सच्चिदानंद स्वरूपाचे खरे ज्ञान प्राप्त होते. निजस्वरूपात पूर्ण विरघडल्यावरच जीवाला "मी"चे खरे ज्ञान आटोक्यात येते. त्या अवस्थेत दृश्य जगत, देह, इंद्रिय, चित्त, मन इत्यादी कोणतीही शिल्लक राहत नाही व कोणताही भेद शेष राहत नाही. (३२)

विशेष: “चिदानंद रूपं शिवोऽहं शिवोऽहं” हा बोध “मी”मध्ये "मी"चे पूर्ण विलीन झाल्यानंतर पटतो आणी"मी"चा स्वानंद अनुभवता येतो.

मायेचा मिथ्या खेळ – दृश्य जगत

दृश्य जगत मायेचा मिथ्या खेळ आहे. त्यामुळे जगाचे दृश्य रूपात भासणे किंवा भासणे नाही, दोन्ही असत्य आहे. हे सूर्यप्रकाशात कुंभ भासणे आणी सूर्यप्रकाशाच्या अनुपस्थितीत कुंभ न भासणे एवढेच स्पष्ट आहे. जसे कुंभ सूर्याहून अलिप्त आहे, तसे “मी” सर्व प्रकारच्या संगापासून अलिप्त आहे. (३३)

"मी" सूक्ष्माती-सूक्ष्म

आकाश जरी अत्यंत सूक्ष्म आहे, तरी आकाशाच्या तुलनेत “मी” त्यापेक्षा अत्यंत सूक्ष्म आहे. जर सृष्टी कार्याचे कारण “मी”चे अज्ञान आहे, तर “मी”चे अस्तित्व कसे आहे? ह्याचे शब्दात स्पष्टीकरण देता येत नाही. (३४)

॥इति श्रीरामदासकृपान्वितेन श्रीधर स्वामिनाविरचिते स्वात्मनिरुपणे

चतुर्दशप्रकरणं समाप्त॥

॥श्रीराम समर्थ॥

स्वात्मनिरूपण

प्रकरण-१५

"मी" सच्चित्सुखामृतोदधि

“मी” निर्विकल्प आनंदस्वरूप

“मी” स्वतःच निर्विकल्प आनंदस्वरूप आहे. “मी”मध्ये समाविष्ट असलेला अहंकार विकाररूप आहे. हा अहंकार सर्व सृष्टी विस्ताराचे मूळ कारण आहे. जीव-शिव भाव असूनही “मी” अहंकारापासून निःसंग राहतो. (१)

अहंकारादि विकारांचे “मी”वरील आवरण भासते. परंतु हे त्याचप्रकारे आश्चर्यजनक आहे, जसे ढगांमुळे सूर्याचे आवृत्त होणे. ज्याचा कारणी ढग दिसतात, त्या सूर्याला ढगाचा स्पर्श नसतो; तसेच ढगांमुळे सूर्याला कसलाही विकार लागत नाही. (२)

ब्रह्मांडाचा सूक्ष्म देह हिरण्यगर्भापासून पिंडातील जीव आणीब्रह्मादिकांपर्यंत कोणीही सत्यसुख (आत्मसुख) प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत नाही. आत्मसुखच केवळ नित्य आहे, आणी ह्या व्यतिरिक्त जेवढी सुखे आहेत, निकृष्ट आहेत. विषयजनित सुखानी आघात होतो, म्हणून त्यांचा त्याग करून ब्रह्मसुखाचेच चिंतन केले पाहिजे. (३)

जगाचे कारण नित्य शुद्ध ब्रह्म अर्थात “मी” सर्वव्यापक आहे. “मी”मध्ये “मी”पेक्षा भिन्न अन्य काहीही नसून, “मी”चे अविनाशी स्वरूपच आहे. त्या एकमात्र ब्रह्म अर्थात “मी”शी स्वाभाविक एकात्मकता धारण केली पाहिजे. ब्रह्म अर्थात “मी” व्यतिरिक्त सर्व अनित्य आणी अल्प वस्तूंचा त्याग करणेच श्रेयस्कर आहे. (४)

स्वर्गलोक आणी मृत्युलोकात केले गेलेले कर्म दुःखाचेच कारण आहेत. अज्ञानवश भोक्त्यास असे वाटते की ह्या भोगांपासून सुखप्राप्ती होईल. भोक्ता, भोग आणी भोग्य ह्या त्रिपुटी रहित स्वतःचे सत्य आनंदस्वरूप “मी” स्वतःच नित्य आहे. (५)

“मी”ला विषयजनित सुखेच्छा अल्पमात्रही नाही. ज्याप्रमाणे समुद्राला लाटांची कुठल्याही प्रकारची आवड अथवा आसक्ती नसते, त्याचप्रकारे “मी”ला उपाधीजन्य सुखप्राप्तीची इच्छा नसते. (६)

अमृताचा समुद्र तहान भागविण्या साठी पाण्याची याचना करीत नाही तसेच "मी" विषयजनित सुखेच्छाचा मोहात सापडत नाही.(७)

जीवानी निशिदिन “मी”च्या स्वरूपात समाधानपूर्वक राहिले पाहिजे. हे सत्य आहे की “मी”ला संसारापासून कुठल्याही प्रकारची बाधा होणे संभवत नाही. ज्या संसारीक बाधा प्रतीत होत आहेत, त्या सर्व असत्य आणी मायिकच आहेत. माया नावाचे काहीही नसल्याने माया जनित कार्य “मी”ला स्वतः बंधक कसे होऊ शकते? (८)

सच्चिदानंद स्वरूप “मी” मध्ये जीव-शिव, देह-विषयेन्द्रिय, उत्तम-अधम, सुख-दुःख आदि भेदयुक्त विकार दिसतात, परंतु “मी” स्वतः अविकारी असल्यामुळे वरील विकार “मी” मध्ये प्रवेश करू शकत नाही.(९)

व्यक्तीस पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब पाहून वाटते की तो पाण्यात बुडत आहे, परंतु त्याला समजवावे लागते की तो पाण्यात बुडत नाही. "मी"लाही प्रतिबिंबप्रमाणे मायिक पदार्थांचा संपर्क होत नाही. प्रतिबिंब रूपात पाण्यात व्यक्तीस पाहणे आणी"मी"मध्ये जीव-शिव भाव पाहणे हे दोन्ही भ्रम आहेत.(१०)

"मी"च अस्ति, भाति आणी प्रिय सच्चिदानंद स्वरूप आहे. नदीच्या पाण्यात ज्याचे प्रतिबिंब दिसते, वास्तवात तो नदीच्या किनाऱ्यावर उभा असतो. हे जाणूनही तो पाण्यात प्रतिबिंबच पाहत आहे. अस्ति, भाति आणी प्रिय जे काही दिसते, ते अन्य नसून सच्चिदानंद स्वरूप "मी"च आहे. ज्यास हे ज्ञात आहे, त्यास "मी"मध्ये जीव-शिव भेद दिसत नाही. (११)

"मी" स्वतः सर्वदा एकमात्र असल्यामुळे अद्वय आहे. हे सत्य आहे की याचे कारण "मी" स्वतःच आहे.हे सत्य स्वीकार करावयास मी चे अस्तित्व स्वीकार करावयास पाहिजे. स्वतः सच्चिदानंद स्वरूप असल्यामुळे "मी" इतके स्वच्छ आहे की त्यात कसलीही द्वैतरूपी घाण नाही जी भिन्न रुपानी भासते. म्हणुन मी स्वसंवेद्य असल्याने एकमात्र आहे. (१२)

"मी" स्वानंदसुखात सर्वदा निर्विकल्प अवस्थेत राहतो. "मी" सत्ता रूपाने भासित, स्वतः केवलानंद आहे. "मी" ची उत्पत्ती झालेली आहे, हा विचार त्या प्रमाणे स्थिर राहत नाही जसे दोरीवर सर्पाचे भास उत्पन्न होणे. परंतु सत्य आहे की तेथे फक्त दोरी आहे. (१३)

"मी"" ब्रम्हानंद, अनंत आणी अद्वय रुपानी अद्वितिय आहे. "मी" मध्ये देहरुपानी असे काय आहे जे अहंभाव ग्रसित असू शकणार? "मी" चैतन्य आणी अनंत असल्यानी "मी" मध्ये द्वैत असणे कसे शक्य आहे?. "मी" ला द्वैताचा स्पर्ष नसल्यानी मी मध्येच आत्मतत्वाचे शोधन करावयास पाहिजे. (१४)

शिंपल्यामध्ये चांदीचे कुठलेही स्थान नसते; शिंपले स्वतः फक्त शिंपलेच असते. त्याचप्रकारे "मी" स्वतः अद्वय आहे. (१५)

खांबावरील आवरणामुळे मनात पुरुष उभा असल्याचा भास मिथ्या आहे; तसेच जग सत्य भासणे जीवाला कष्टाचे कारण ठरते. (१६)

"मी" स्वतः "मी"मध्येच विद्यमान आहे. जसे सशाच्या डोक्यावर शिंग नसतात, तसे सद्चिद्घन अनंतात जग भासीत आहे, पण वास्तवात असे काहीही नाही. "मी" स्वतःच परिपूर्ण असल्यामुळे त्याच्यात द्वैत दृष्टिने अन्य काहीही नाही. (१७)

सशाच्या शिंगा प्रमाणे कुठलीही वस्तू अस्तित्वात नाही. त्याच प्रकारे "मी" हून भिन्न दुसरे कांहीही नाही. अद्वयता आणी बुद्धीकक्षेचा पलीकडे "मी" ची एकात्मता आहे."मी" स्वतः नित्य चैतन्य व आनंदरूप आहे. "मी" स्वत:च परिपूर्ण असल्यानी "मी" मध्ये द्वैत म्हणुन कांहीही नाही.(१८)

"मी" स्वतःच परिपूर्ण आहे. लाटांचे उत्पन्न आणी लय होण्यानेही पाणी अल्प मात्रही समुद्रापेक्षा भिन्न नाही. जग आणी जीव लयस्थितीतही एकमात्र "मी" हून भिन्न काहीही नाही. (१९)

"मी" स्वतः सच्चिदानंद सुखामृताचा समुद्र आहे. ह्या सच्चिदानंद सुखामृतामुळे "मी" अद्वय आहे आणी त्यात कधीही अपूर्णत्वता नाही. (२०)

ह्या ग्रंथात "मी" वर आलेल्या जगत रुपी उपाधी आवरणाची विस्तृत चर्चा केली आहे. ही कथा वंध्या स्त्री चा अवती भोवती फिरत आहे. अज्ञानाने भ्रमवश दिसणाऱ्या जगतात "मी" चे कांहीहीअस्तित्व नाही. भिन्नभावनेने स्वतःच्या मध्ये असणारा "मी" ला विसरु नये आणी एकमात्र "मी" वाचून अन्य कांहीही नाही, हा निश्चय ठेवायला पाहिजे.(२१)

||इति रामदास्कृपान्वितेन श्रीधर्स्वामिना विरचिते स्वात्मनिरुपिणे

पंचदश प्रकरणम संपूर्णम॥

इति श्री श्रीधर स्वमिनाविरचिते श्री स्वात्मनिरुपणम संपूर्णम
ॐ तत्सत्